**क्रमांक :- ७**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग – दोन**

**गुरुवार, दिनांक २९ जानेवारी, २०२६ / माघ ९, शके १९४७**

## ७ . लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-

विधानसभेचे सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ३० जून, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय (पावसाळी) अधिवेशनात एकूण ३५९ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. ३५९ निवेदनांपैकी २६ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण ३३३ निवेदनांपैकी १६९ निवेदने सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक १२२ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता ११८ निवेदने कक्षात प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ४६ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,<br>मुंबई<br>दिनांक : २९ जानेवारी, २०२६

**मेघना तळेकर**<br>सचिव-२,<br>महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य

२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

१०) संगणक कक्ष (WEBSITE)

११) एम. के. सी. एल.

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

मा. विधानसभा सदस्य श्री. चंद्रदीप नरके व श्री. राजेश क्षिरसागर यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ११८९ खालीलप्रमाणे आहे.

"कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ अथवा सर्किट बेंच व्हावे यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूरसह रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वकील, पक्षकार, विविध संघटना चाळीस वर्षांपासून लढा देत असणे, कोल्हापूरला सर्किट बेंच होण्याची गरज असून कोल्हापूरसह आसपासच्या पाच जिल्ह्यातील जनतेची त्यामुळे सोय होणार असणे, उच्च न्यायालयात प्रलंबित खटल्यांची संख्या पाहता कोल्हापूरला पहिल्या टप्प्यात सर्किट बेंच व नंतर उच्च न्यायालयाचे खंडपीठाची अत्यंत आवश्यकता असणे, दीड लाखाहून अधिक दिवाणी दावे तर ७५००० हून अधिक फौजदारी दावे प्रलंबित असणे, यावरून प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येणे, परंतु संबंधीचा निर्णय अद्याप पर्यंत झालेला नसणे, खंडपीठ कृती समितीने यापूर्वी अनेक वेळा मुख्यमंत्री यांची भेट घेऊन खंडपीठासाठी विनंती केली असणे, राज्य सरकारने १२ मे २०१५ रोजीच्या ठरावाद्वारे खंडपीठ मागणीस पाठिंबा दर्शविला असणे, ७ सप्टेंबर २०१५ रोजी तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती महोदय यांनी कोल्हापुरात खंडपीठ स्थापनेची शिफारस केली असणे, प्रलंबित खटल्यांची संख्या पक्षकारांची होणारी गैरसोय, मनस्ताप, अमूल्य वेळ, मुंबईतील वास्तव्याचा खर्च, येण्या जाण्याचा खर्च या सर्वांचा विचार करता हा निर्णय होणे अत्यंत महत्त्वाचे असणे, विशेष म्हणजे भौगोलिक परिस्थिती व उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा लागणारे सर्व निकष कोल्हापूर पूर्ण करू शकणे. याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मुख्यमंत्री तथा मंत्री, विधि व न्याय विभाग यांचे निवेदन

मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याची मागणी पुणे जिल्ह्यासह राज्यातील कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, अमरावती, नांदेड अशा अनेक भागातून तेथील नागरीक, वकील संघटना, लोकप्रतिनिधी यांचेमार्फत मागील अनेक वर्षांपासून सातत्याने होत आहे. विधानमंडळ अधिवेशनांमध्येही लोकप्रतिनिधींमार्फत त्यासंबंधीची चर्चा अशासकीय ठराव, तारांकीत/ अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास सूचना इत्यादी आयुधांमार्फत उपस्थित करण्यात येते. याबाबत लोकप्रतिनिधी यांच्याकडून वेळोवेळी निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

राज्यात उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी त्यास राज्य पुर्नरचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५१ (२) नुसार मा. मुख्य न्यायमूर्तींची सहमती आवश्यक आहे. देशातील विविध राज्यांमध्ये त्या त्या उच्च न्यायालयाची खंडपीठे स्थापन करण्यासंदर्भात काही निकष विहीत करण्यासाठी जसवंत सिंग समितीचे गठन करण्यात आले होते. या समितीच्या निकषांच्या आधारे राज्यात मुंबई उच्च न्यायालयाचे तिसरे खंडपीठ स्थापन करता येईल किंवा कसे, यासंदर्भात उच्च न्यायालयाकडून स्थापित पेंडसे समितीने १९८७ साली सादर केलेला अहवाल विचारात घेऊन कोल्हापूर व अन्यत्र कोठेही उच्च

न्यायालयाचे खंडपीठ स्थापन न करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने घेतला होता.

खंडपीठ स्थापनेच्या मागण्यांच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी अभिप्राय मागविण्यात आले असता उच्च न्यायालयाचे खंडपीठ अन्यत्र स्थापन करणे लाभदायक व उचित नसल्यामुळे ते स्थापन न करण्याचा पूर्वीचाच निर्णय कायम असून त्यात कोणताही बदल करणे गरजेचे वाटत नाही, असे अभिप्राय उच्च न्यायालयाकडून प्राप्त झाल्यामुळे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आलेला नाही.

नवीन खंडपीठ स्थापनेच्या विविध स्तरातून होणाऱ्या मागणीस अनुसरुन सदर मागणी तपासून अहवाल सादर करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. मुख्य न्यायमूर्तींनी तीन न्यायमूर्तींची समिती गठीत केली आहे. तथापि, उच्च न्यायालयाने त्यांच्या दि. ०२/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदरहू समितीच्या मा. न्यायमुर्ती यांची अन्य राज्यातील उच्च न्यायालयात झालेल्या बदलीमुळे तसेच अन्य कारणाने सदरहू समिती पुर्नगठित करण्याचे कामकाज सुरू असल्याचे कळविले आहे.

जसवंत सिंग समितीने निर्धारित केलेल्या निकषांच्या आधारे मुंबई उच्च न्यायालयाचे राज्यात आता एकच खंडपीठ स्थापन केले जाऊ शकते. त्यानुसार राज्यात अनेक ठिकाणांहून होणारी खंडपीठ स्थापनेची मागणी विचारात घेऊन त्याबाबतचा मंत्रीमंडळाचा निर्णय उपलब्ध करण्याबाबत मा. मुख्य न्यायमुर्ती यांनी त्यांच्या दि. ११/०८/२०१४ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांना कळविले होते.

राज्यात उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करण्यास बराचसा कालावधी लागू शकतो, ही बाब विचारात घेवून प्रलंबीत खटल्यांची संख्या, मुंबई शहरापासूनचे अंतर व लोकसंख्या या निकषांवर कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, अशी शिफारस करण्याबाबतचा निर्णय दि. १२/०५/२०१५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. तशी शिफारस मा. मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना दि. १७/०७/२०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे. शासनाच्या सदर शिफारशीचा सकारात्मक विचार करण्याची फेरविनंती दि. २८/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी त्वरित निर्णय होण्याकरिता बैठक आयोजित करण्याबाबत शासन पत्र, दि. १९/०१/२०१९ अन्वये मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना विनंती करण्यात आली असून शासन पत्र, विधि व न्याय विभाग, दि.१९/०३/२०२० अन्वये सदर विनंतीकडे उच्च न्यायालय प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे नियमित खंडपीठ स्थापन होईपर्यंत शक्य तितक्या लवकर कोल्हापूर येथे सर्किट बेंच स्थापन करण्याची विनंती शासन पत्र, दि. ०८/३/२०२२ अन्वये मा. मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली आहे. त्यास अनुसरून मा. मुख्य न्यायमुर्ती यांनी त्यांच्या दि. १५/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, दि. १०/०३/२०२२ रोजी कोल्हापूर खंडपीठ कृती समितीचे सदस्य तसेच विभागातील अन्य बार असोसिएशन्सचे सदस्य यांचेसोबत बैठक अयोजित करण्यात आली होती. बैठकीत फिरते खंडपीठ स्थापनेसंबंधीची कार्यपद्धती,

त्याच्या कायदेशीर बाबी तसेच फिरते खंडपीठ कार्यरत होण्याकरिता आवश्यक पायाभूत सुविधा विचारात घेऊन, फिरते खंडपीठ स्थापनेबाबत निर्णय होण्याकरिता काही अवधी आवश्यक असल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करणेबाबत जिल्ह्यांतून प्राप्त होणा-या निवेदनांवर कार्यवाही करण्याकरिता मा. मुंबई उच्च न्यायालयाने दोन न्यायमूर्तींची (मा. ज्येष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती व मा. कनिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती) समिती स्थापन केली असल्याचे, उच्च न्यायालय प्रशासनाने त्यांच्या दि.२४.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.

---

लक्षवेधी सुचना क्रमांक :१५२२ गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. विश्वनाथ भाईर, वि.स.स यांच्या लक्षवेधी सूचना क्र.१५२२ पुढीलप्रमाणे आहे :-

"कल्याण-पडघा मर्गावरील (जि.ठाणे) गांधारी पुलावर दिनांक २० मे, २०२५ रोजी सकाळी भरधाव डंपरने एका रिक्षाला दिलेल्या धडकेत एका महिलेचा दुदैवी मृत्य होणे, तसेच रिक्षा चालक गंभीर जखमी झालेला असणे, सदर घटनेची पडघा पोलीस ठाण्यात अपघाती मृत्युची नोंद करण्यात येणे, सदर डंपर चालकाला अटक करण्यात आल्यानंतर त्याची कोणतीच चौकशी न करता एका दिवसात जामीन मंजूर होणे, डंपर नदीत पडल्यामुळे डंपरमध्ये नेमके काय होते याबाबत पोलीसांकडून चौकशी करण्यात न येणे, तसेच नदीपात्रातील डंपर काढण्यासाठी तहसिलदार यांच्यासोबत लोकप्रतिनिधींनी चर्चा केली असता यंत्रणा उपलब्ध झाल्यानंतर डंपर पाण्याबाहेर काढून जप्त केला जाईल असे सांगण्यात येणे, या दुर्घटनेची गांभीर्याने चौकशी करण्यास स्थानिक पोलीस व तहसीलदार यांच्याकडून जाणीवपुर्वक दुर्लक्ष होत असणे, सदर भीषण अपघातानंतरही डंपरचालकाला पोलीसांनी एका दिवसात जामीनावर सोडून दिल्यामुळे स्थानिक नागरीकांसह लोकप्रतिनिधींकडून पडघा पोलीसांची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप करण्यात येणे, शासनाने उक्त प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन दोषी असलेल्या संबंधित डंपरचालक व त्याला पाठिशी घालणा-या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

ठाणे ग्रामीण जिल्हयातील पडघा पोलीस ठाणे हद्दीत दि. २०/०५/२०२५ रोजी फिर्यादी निलेश वानखेडे हे त्यांची आई मंगल दिलीप वानखेडे व एक प्रवासी मुलगी पायल योगेश माने हे श्री. वानखेडे यांच्या रिक्षा क्र. एम. एच.०५/ई-एक्स/६७७० यातून बापगांव बाजूकडून जात असताना उल्हास नदी वरील गांधारी ब्रिजवर येथे आले असता समोरुन कल्याण बाजुकडून येणारे डंपर वाहनावरील चालकाने त्याच्या ताब्यातील डंपर वाहन (क्र.एम.एच.०३/सी.पी/२२४९) निष्काळजीपणाने, चुकीच्या बाजूने (रिक्षाचे समोरुन) चालवित आणले व फिर्यादी व साक्षीदार हे बसलेल्या रिक्षा वाहनास समोरुन जोराने धडक दिली यामुळे अपघात झाला आहे. सदर अपघातामध्ये डंपर चालक हा रिक्षा प्रवाशी मंगल वानखेडे यांच्या मृत्युस तसेच रिक्षा चालक व सह प्रवाशी मुलगी पायल माने यांच्या गंभीर दुखापतीस कारणीभूत झाला. अपघातावेळी डंपर चालकाचे त्याच्या वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ते वाहन अपघात करून उल्हास नदीवरील गांधारी ब्रिजचा कठडा तोडुन ब्रिजवरुन नदी पात्रातील खोल पाण्यामध्ये बुडाले आहे.

सदर प्रकरणी गंभीर जखमी रिक्षा चालक निलेश वानखेडे यांचा जबाब नोंदवून डंपर वाहनावरील अनोळखी चालकाविरुध्द पडघा पोलीस ठाणे गु.रजि. नं. २१०/२०२५, भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५ (ए), १२५(ब), ३२४(४), सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १८७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये डंपर वाहनावरील चालक आरोपीस दि. २०/०५/२०२५ रोजी अटक करण्यात आली असून अटक आरोपीस दि. २१/०५/२०२५ रोजी मुदतीत मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ५०० वे न्यायालय, भिवंडी यांचे समक्ष हजर करण्यात आले होते. आरोपीस मा. न्यायालयाने दि.०३.०६.२०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर केली व तदनंतर आरोपीस जामिनावर मुक्त केले आहे. आरोपीविरुध्द तपासामध्ये सबळ पुरावे प्राप्त करुन मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भिवंडी जि. ठाणे यांचे न्यायालयात आर.सी.सी. १५२५/२०२५ अन्वये दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

तसेच अपघाती डंपर वाहनातून रस्ता रुंदीकरणाकरिता खोणी, तळोजा ,नवी मुंबई येथे खाली केलेल्या खडीचे अनुषंगाने गौणखनिज वाहतुक परवान्याच्या प्रती उपविभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी, भिवंडी यांचेकडून अधिकृत असल्याचे पत्र व डंपर वाहनाचे सर्व कागदपत्रे प्राप्त करून घेण्यात आली आहेत.

तसेच नदीच्या खोल पात्रात बुडालेला डंपर शोधण्याचे काम अग्नीशमन विभाग कल्याण यांनी दि. २४.०५.२०२५ रोजी केले परंतु शोधकार्यात त्यांना वाहन प्राप्त झाले नाही. तसेच सा.बां.वि, कल्याण यांनी गांधारी ब्रिजवर क्रेन उभे करून डंपर काढणे हे पुलाच्या दृष्टीने धोकादायक असल्याने अन्य पर्यायाचा वापर करून डंपर काढण्यात यावा असे कळविले आहे.

*****************

लक्षवेधी सुचना क्रमांक : १६९२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र.१६९२ पुढीलप्रमाणे आहे :-

" मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौ. मीरेता. जि ठाणे येथील स.नं/ग. नं १६/१,१६/२,१६/३ व १६/४ही जागा श्रीकुमार मेरे या आदिवासी बांधवांच्या मालकीचे असणे, सदर जमिनीवर विनोद वगाशिया या विकासाने श्री मेरे यांना खोटे लालच दाखवून त्यांच्या जमिनीवर इमारत विकास करण्याची परवानगी शासनाकडून प्राप्त करणे, सदर परवानगी देताना शासनाने एकूण बांधकामाच्या ३०% क्षेत्र पहिले बांधून मेरे यांना हस्तांतरित करणे बंधनकारक करण्यात येणे, परंतु विकासकामार्फत त्यांची फसवणूक करून एकही फ्लॅट मेरे यांना नदेता त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवणे, सदर विकासकाने विवेकानंद झा यांचेसोबत दि.१०-१०-२० रोजी पुणे येथे लायबेलिटी पार्टनरशिप केल्याची नोंद करणे, आपल्या अधिकृत भागीदाराला अंधारात ठेवून त्याच्या खोट्या सह्या करून बँकेत व इतर ठिकाणी नकली कागदपत्र सादर केल्या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला असणे, सन २००८ पासून अनेक लोकांकडून फ्लॅट देण्याचे नावाखाली करोड रुपये घेऊन त्यांना फ्लॅट नदेता फसवणूक केले प्रकरणी काशमीरा पो.स्टे अंतर्गत गुन्हा दाखल होणे, तसेच वाघासिया यांनी त्यांचे एक भागीदार असलेले अख्तरखान यांची देखील फसवणुक करून त्यांच्या हिस्स्याचे तब्बल ९ कोटी रुपये स्वतःच लाटल्याची FIR दाखल होणे, अशा प्रकारे आपल्याच भागीदारांची व विशेषतः आदिवासी बांधवांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांनी फसवणूक केलेल्या मालमत्ता त्वरित जप्त करून संबंधितांना न्याय देणे बाबत करावयाची कारवाई व उपाययोजना.."

---

## मा.मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांचे निवेदन

सदर प्रकरणी आरोपींनी संगणमत करुन श्री. विवेकानंद झा यांची फसवणुक केली असल्याने काशिमिरा पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे दि.०३.०३.२०२५ रोजी गु. र. क्र. ११०/२०२५ येथे भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३१६(२), ३५१(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उक्त गुन्ह्यात आरोपींना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ३५(३) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. आरोपींना मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अटक पूर्व जामीन मिळण्याकरीता १२३०/२०२५ व ११९२/२०२५ अन्वये अर्ज केले आहेत. सदर अर्जावर सुनावणी सुरु असून आरोपींना तात्पुरता जामीन मंजूर केला आहे.

सन २००८ पासून अनेक लोकांकडून फ्लॅट देण्याचे नावाखाली करोड रुपये घेऊन त्यांना फ्लॅट नदेता फसवणूक केले प्रकरणी काश्मीरा पोलीस ठाणे अंतर्गत दि.०३.०३.२०२५ रोजी गु. र. क्र. ११०/२०२५ येथे भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) सह महाराष्ट्र मालकी फ्लॅट ( बांधकाम, विक्री, व्यवस्थापन आणि हस्तांतरण प्रचाराचे नियम) अधिनियम, १९६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींच्या वेगवेगळ्या बँक खात्यांचा अभ्यास करुन तसेच साक्षीदारांकडून प्राप्त माहितीनुसार पुरावा जमा करण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

श्री. वधासिया यांचे भागीदार असलेले श्री. अख्तरखान यांची देखील फसवणुक करून त्यांच्या हिस्स्याचे तब्बल ९ कोटी रुपये स्वतःसाठी वापरल्याने काशिमिरा पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे दि.२८.०६.२०२५ रोजी गु. र. क्र. २८९/२०२५ येथे भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३३८,३३६(२), ३३६(३), ३४०(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधीन आहे.

********************************

१८६० ३२.

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
**श्री. निलेश राणे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८६० पुढीलप्रमाणे आहे:-**

राज्यात गोमातेची अवैध वाहतुक व तस्करीचे वाढलेले प्रमाण, नुकतेच माहे एप्रिल ते मे २०२५ दरम्यान अवैध वाहतूक व तस्करीचे अनेक प्रकरणे उघडकीस आलेली असणे, चिपळूण ( ता.रत्नागिरी) येथील कुंभार्ली घाटात गोमातेची तस्करी करतांना अलोर शिरगांव पोलिसांनी ट्रक पकडला असणे, रत्नागिरीमधील खेडशी येथे गायींचे अवयव सापडल्याची घटना, माहे एप्रिल, २०२५ मध्ये राजापूर मध्ये जनावरांची अवैध व विना परवाने वाहतूक करणा-या दोघांना पोलीसांनी ताब्यात घेणे, शासनाने गोसेवा आयोग लागु केला परंतु त्यांची अंमलबजावणी झालेली नसणे, गायींना राज्यमाता- गोमाता म्हणून घोषित करुनही बेकायदा कत्तली, अवैध वाहतूक, तस्करी सुरुच असणे, गोमातेच्या रक्षणार्थ सकल हिंदु समाजाने काढलेला मोर्चा, रास्ता रोको, आंदोलने केले असणे, बेकायद कत्तलीना आळा बसण्याकरिता व गोमातेच्या रक्षणार्थ कडक कायदे करण्याची नितांत आवश्यकता, तस्करी प्रकरणात सहभागी असणा-यांवर मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची गरज, तसेच गोवंश तस्करीप्रकरणी कायदयात सुधारणा करुन कडक कायदे करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्यात जानेवारी २०२५ ते मे २०२५ पर्यंत गोमातेची अवैध वाहतुक व तस्करी प्रकरणी एकूण ८२५ गुन्हे दाखल करण्यात आले असून ८३५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

चिपळुण, जि. रत्नागिरी येथील कुंभार्ली घाटात गोवंश तस्करी करतांना अलोरे शिरगाव पोलीसांनी ट्रक पकडला असून सदर घटनेच्या अनुषंगाने अलोरे शिरगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०३/२०२५ महाराष्ट्र पशु संरक्षण १९७६ कलम ५ (ए), (१),९, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० कलम ११ (क) (घ) (ड), महाराष्ट्र पोलीस अधीनियम कलम ११९, मोटार अधिनियम १९८८ चे कलम ६६/१९२ बी.एन.एस.एस ३(५) प्रमाणे दि. २२ जानेवारी २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयामध्ये एकुण ०६ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर आरोपींना जामीन मंजूर झाला

असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच, रत्नागिरी मधील खेडशी येथे गायींचे अवयव सापडल्या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध दि. १९ एप्रिल, २०२५ रोजी रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ७५/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २९९, ३२५, २३८, सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५, ५(अ), ५ (ब), ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

एप्रिल २०२५ मध्ये राजापुर येथील मौजे ओणी गावी असलेल्या पेट्रोल पंपाजवळ जनावरांची अवैध व विना परवाना वाहतुक केल्याप्रकरणी राजापुर पोलीस ठाणे गु.रजि. नं. ५८/२०२५, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९६० चे कलम ११(१) (जी) (डी) (सी) प्रमाणे अन्वये दि. ०९ एप्रिल, २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस बी.एन.एस.एस. ३५(३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. तसेच, मौजे परटवली बौद्धवाडी येथील जनावरांची अवैध व विना परवाने वाहतुक प्रकरणी राजापुर पोलीस ठाणे गु.रजि. नं. ६३/२०२५, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९६० चे कलम ११(१) (जी) (डी), सह महा. पशु.अधि. १९७६चे कलम ५(अ) अन्वये दि. १२ एप्रिल, २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०२ आरोपी यांना बी.एन.एस.एस. ३५ (३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.

तसेच, वासराच्या अमानुष हत्येमधील आरोपीला तात्काळ अटक करावी, जिल्हयातील कत्तलखाने बंद करावेत इत्यादी मागण्यांकरिता दि. ०७ जुलै २०२४ रोजी सकल हिंदु समाजाच्या वतीने रत्नागिरी जिल्ह्यामध्ये मोर्चा काढण्यात आला होता.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाची शासन अधिसूचना दि. २८ एप्रिल २०२३ अन्वये स्थापना करण्यात आली असून, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे नियमित कामकाज सुरु आहे. गोमांस, गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतुक तसेच गोतस्करी करीत असताना आढळल्यास सदर आरोपींवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सन १९७६ (सुधारित १९९५) व प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध सन १९६०, बी.एन.एस., नुसार कारवाया करण्यात येतात.

***** ************************

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री. प्रविण दटके व श्री. प्रताप अडसड, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९५५ पुढीलप्रमाणे आहे:-**

दि. ११ जानेवारी, २०२५ रोजी यवतमाळ जिल्हयातील वणी शहरातील दीपक चौपाटी परिसरात सार्वजनिक रस्त्यावर गोवंशाचे मुंडके कापून फेकल्याचे व मोठ्या प्रमाणात गोवंशाचे कत्तली करून तुकडे फेकल्याचे तसेच हे अवशेष छिन्नभिन्न अवस्थेत अवशेष सापडले असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरणे,त्यानंतर लगेच दि. १४ जानेवारी, २०२५ रोजी वणी शहरातच अवैध बिर्याणी सेंटर मधून गोवंश मांसाची बिर्याणी करून ती विक्री करत असल्याची वदीपक चौकी रस्त्यावर असणाऱ्या मंजुषा बारजवळ गोवंश आणि तसेच गोवंशाचे मांस पोत्यामध्ये बांधून टाकून ठेवले असल्याची बातमी पसरणे, पोलिसांना घटनास्थळावर गोमांस मिळाले असताना सुध्दा कत्तलखाना नष्ट न करणे, सदर जागेची व्हिडिओग्राफी न करणे, अतिक्रमित जागेवर बांधलेले शेडनष्ट न करणे, व्हिडिओ शूटिंग न करणे, आरोपीला अटक न करणे, आरोपीकडून सदर जागेचा किती वर्षापासून किती दिवसापासून वापर होतआहे याची चौकशी न करणे, प्रदूषण नियंत्रण मंडळाची मदत न घेता, जागा जेसीबी लावून नष्ट करणे, यावरून पोलिसांनी आरोपींवर कारवाई न करता फक्त पुरावे नष्ट करणे किंवा आपला निष्काळजीपणा उघडकीस न यावं या दृष्टिकोनातून कार्यवाही केल्याचे आढळणे,तसेच राज्यामध्ये गो-तस्करी रोखण्यासाठी (गोरक्षा स्कॉड) निश्चित करणे, जिल्हयातील अतिरीक्त पोलीस अधिक्षकस्तराचे पोलिस अधिकारी यांना गोरक्षाचे नोडल अधिकारी घोषित करणे,पोलीस अधीक्षक कार्यालय व पोलीस आयुक्तालयांनी प्रशिक्षण आयोजित करणे, आवश्यक धोरणात्मक बदल घडवून आणणे, याबाबत सरकारने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक ११/०१/२०२५ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील वणी शहरात दिपक चौपाटी परिसरात गोवंशाचे दोन मुंडके व दिपक चौपाटी चे परिसरात मटण मार्केटच्या मागच्या बाजुला टिनच्या शेडमध्ये गोवंशाचे मुंडके/कातडे/हड्या ठेवलेले दिसून आल्याने फिर्यादीच्या रिपोर्टवरुन पो.स्टे वणी येथे अप.क्र २९/२०२५ कलम ५A(१), महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वणी शहरात बिर्याणी सेंटर मध्ये गोमांस मिळाल्या प्रकरणी दिनांक १४/०१/२०२५ रोजी आफताब बिर्याणी सेंटर, लाल पुलीया परिसर, चिखलगांव वणी या बिर्याणी सेंटरमध्ये

३५ किलो गोमांस मिळाल्याप्रकरणी पो.स्टे वणी येथे अप.क्र ३३/२०२५ कलम ५(ब), ५(क), ५(ड), ९१(ए) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये तसेच के.जी.एन बिर्याणी सेंटर, चिखलगांव वणी या बिर्याणी सेंटरमध्ये ५ किलो गोमांस मिळाल्याप्रकरणी पो. स्टे वणी येथे अप.क्र ३४/२०२५ कलम ५(ब), ५(क), ५(ड), ९(ए) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये असे दोन गुन्हे नोंद आहेत.

सदर गुन्ह्याचे घटनास्थळावर पोलीसांना मिळालेल्या गोमांस मधून पशुधन विकास अधिकारी यांच्या मदतीने मांसाचे नमुने जप्त करून रासायनिक परिक्षणाकरीता पाठविण्यात आले आहे. सदर घटनास्थळावर कुठलाही कत्तलखाना आढळून आलेला नसून अतिक्रमीत जागेवरील शेड नष्ट करण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांना विचारपुस केली असता महाराष्ट्रात गोहत्या कायदा लागू असल्याने त्यांनी सुचाभडीच्या झाडाझुडपाचे वनात टिन शेड लपवून ठेवले होते. त्यामध्ये ते कत्तल केलेल्या प्राण्यांचे अवशेष ठेवत होते. घटनेच्या दिवशी ३०० ते ४०० लोकांचा जमाव जमा झाल्याने कायदा व सुव्यवस्था बिघडू नये याकरीता घटनास्थळावरुन प्राण्यांचे हाडाचे आणि मांसाचे अवशेष तात्काळ हटवून नष्ट करणे गरजेचे असल्याने प्राण्यांच्या हाडांचे आणि मांसाचे अवशेष डम्पींग ग्राउंडमध्ये पुरण्यात आले. पोलीसांनी कुठलेही पुरावे नष्ट केलेले नाहीत.

गोतस्करी, गोमांस व गोहत्या संबंधाने वेळोवेळी शासनाकडुन प्राप्त होणारे निर्देश/सुचना व महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ आणि इतर प्रचलित कायदयातील तरतुदीचे अनुषंगाने योग्य तो कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे.

**********

लक्षवेधी सुचना क्रमांक :२०९८ गृह विभाग/पोल-११

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती सुलभा गायकवाड, वि.स.स यांच्या लक्षवेधी सूचना क्र.२०९८ पुढीलप्रमाणे आहे :-

"उल्हासनगर (जि.ठाणे ) आशेळे पाडयात मंगळवारी १/७/२०२५ रोजी सकाळी अचानक संपूर्ण शहर हादरले अशी घटना घडणे, नशेखोरांची एक टोळी चाकू,चॉपर, लोखंडी रॉड आणि धारदार शस्त्र घेऊन आशेळेपाडा परिसरात धुडगुस घालुन रस्त्यावर चालणारे सामान्य नागरिक, महिला, लहान मुल, गाडया, दुकान जे दिसेल त्यावर बेछुट हल्ला करणे, रस्त्यांवर काही अवघ्या मिनिटांत रक्ताचे डाग, किंचाळणारे जखमी आणि धडपडणारे लोक असे दृश्य असणे, अचानक घडलेल्या हिंसक कृतीमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरलेले असणे, टोळक्याने थेट रस्तावर चालणा-या लोकांवर, दुकानावर हल्ला करुन दहशत निर्माण करणे, २५ ते ३० गाडयांची तोडफोड करुन मोठया प्रमाणात मालमत्तेचेही नुकसान करणे, चार चाकी, रिक्षा, दुचाकी गाडया फोडल्या, या हल्ल्यात सहा जण गंभीर जखमी होणे, दिवसाढवळया झालेल्या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भितीचे वातवरण, सदर घटनेची गांभीर्याने चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, टोळीला तात्काळ अटक करण्याची नितांत आवश्यकता असणे, तसेच नुकसानग्रस्तांना व जखमींना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

मा.मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांचे निवेदन

उल्हासनगर मधील विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक १०/०६/२०२५ रोजी ४ नशेखोरांनी हातात हत्यारे घेऊन काही कारण नसताना परिसरातील वाहनांची तोडफोड करून व येणारे जाणारे लोकांना शिवीगाळ व मारहाण, गंभीर दुखापत केली असल्याने विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४१५/२०२५ भारतीय न्याय संहिता मधील कलम १०९, ११८(२), ३२४ (४), ३५२, ३५१(२), ३(५) सह फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम १९३२ चे कलम ७ आणि महा. पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच आरोपीत यांनी संगणमत करून फिर्यादी यांचे अनंता कडु चाळ, चाळ नं. ६/७, रूम नंबर ३१, आशेळेपाडा, उल्हासनगर-४ येथील घरात घुसून फिर्यादी व त्यांच्या नातीला शिवीगाळ करून मारण्याचा प्रयत्न करून त्याचे हातातील लोखंडी रॉड घराचे खिडकीचे काचेवर मारून काच फोडली. तसेच सदर इसमानी फिर्यादी यांचे चाळीत येतांना दहशत माजवुन चाळीत उभ्या असलेल्या रिक्षाच्या काचा, मोटर सायकल व चाळीमधील कुंडयाची तोडफोड करून चाळीत राहणारे सुर्यकांत रामदास काकडे, संजय दिगंबर अहीरे यांना त्यांच्या हातातील हत्याराने मारहाण करून दुखापती केल्या व

महिला भाग्यश्री पंकज पाटील यांना रॉड दाखवुन धमकावले आहे. तसेच फिर्यादी यांचे मदतीला आलेल्या चाळीतील लोकांना वरील इसमांनी त्यांचे हातातील हत्यारे हवेमध्ये फिरून धाक दाखवुन जीवे मारण्याची धमकी दिली असल्याने विठ्ठलवाडी पोलीस ठाणे गु.र.नं. ४१६/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (१), ३३३, ३५१(२), ३५१ (३), ३२४ (४), ३(५) सह आर्म्स ॲक्ट ४, २५ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम मधील कलम ३७ (१), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनास्थळी जखमींचे रक्ताचे डाग, आरोपीत यांनी गुन्हयात वापरलेले हत्यारे धारदार चाकु, लोखंडी झान्या असे दिसुन आल्याने सदर ठिकाणी फॉरेन्सिक पथकास पाचारण करून घटनास्थळावरून पंचासमक्ष रक्ताचे डाग, हत्यारे जप्त करण्यात आले आहेत

गु.र.क्र. ४१५/२०२५ मध्ये व गु.र.क्र. ४१६/२०२५ ओमकार धोंडीराम जगदाळे, सार्थक भास्कर अहिरे, मोहम्मद इलियास तन्वीर अन्सारी उर्फ साहील या ०३ विधिसंघर्षित बालकांना दिनांक ११/०६/२०२५ रोजी ताब्यात घेवून मुदतीत मा. बाल न्याय मंडळ, भिवंडी येथे हजर करण्यात आले आहे. सध्या ते मा. न्यायालयाचे आदेशाने जामीनावर आहेत. तसेच सदर विधिसंघर्षित बालकांविरुध्द गुन्हा केल्याच्या सबळ पुराव्यासह अहवाल मा. बाल न्याय मंडळ, भिवंडी येथे सादर करण्यात आला आहे. तसेच दोन्ही गुन्ह्यातील पाहिजे आरोपी सुनिल उर्फ लाल सुनिल कदम याचा शोध सुरु आहे. सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

********************

लक्षवेधी सूचना क्र.४४६.

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे) पावसाळी( अधिवेशन

**श्री.सुधीर मुनगंटीवार व श्री. मोहन गोपाळराव मते, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-**

"छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील सिध्दार्थ उद्यानात दिनांक ११ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास हृदय पिळवटून टाकणारी घटना घडणे, उद्यानाच्या आतल्या एका जुनाट भिंतीचा भाग अचानक कोसळणे, या दुर्घटनेत दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू होणे, या दोघीही उद्यानात काम करणाऱ्या महिला कर्मचारी असणे, स्वाती खैरनाथ आणि रेखा गायकवाड असे मयत झालेल्या महिलांची नावे असणे, या दुर्घटनेत आणखी पाचजण गंभीर जखमी होणे, या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याची व जबाबदार व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, मृतकांच्या कुटुंबियांना व जखमींना तातडीने अर्थ सहाय्य देण्याची आवश्यकता, या घटनेमुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## -: मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या सिध्दार्थ उद्यानाच्या समोरच्या बाजूने सुमारे ७००० चौ.मी क्षेत्रावर बी.ओ.टी. तत्वावर दुकाने, उपहारगृह, मनोरंजन केंद्र आणि वाहनतळ इत्यादी प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा प्रक्रियेनूसार श्री.प्रकाश डेव्हलपर्स ॲण्ड (जे.व्ही.) यांच्यासोबत दि.२७.९.२००६ रोजी महानगरपालिकेमार्फत करारनामा करण्यात आला आहे.

यानुसार महानगरपालिकेच्या हिश्श्यातील वाहनतळाचे बांधकाम पूर्ण होऊन सदर दि.२०.६.२००७ रोजी ताबा पावतीद्वारे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या मान्यतेने श्री.प्रकाश डेव्हलपर्स ॲण्ड (जे.व्ही.) यांनी पुढील काम करणेकरीता मे.अथर्व आणि सुनील डेव्हलपर्स यांच्या सोबत दि.२३.६.२००९ रोजी करारनामा केलेला आहे. करारनाम्या नुसार मे.अथर्व डेव्हलपर्स व सुनील डेव्हलपर्स यांनी काम केले नसल्यामुळे श्री.प्रकाश डेव्हलपर्स ॲण्ड (जे.व्ही.) यांनी पुन्हा प्रकल्पाचे कामकाज हाती घेतले असल्याबाबत महानगरपालिकेला कळविले आहे.

विकासक मेसर्स श्री.प्रकाश डेव्हलपर्स ॲण्ड (जे.व्ही.) यांनी मागणी केल्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे विकासक मेसर्स श्री.प्रकाश डेव्हलपर्स ॲण्ड (जे.व्ही.) यांना दि.१२.११.२०२० रोजी सुधारीत बांधकाम परवानगी निर्गमित केली आहे. या परवानगीमध्ये

महानगरपालिकेच्या हिश्श्याचे वाहनतळ, विकासकाच्या हिश्श्याचे दुकान केंद्र व मनोरंजन केंद्र इ. बाबीचा समावेश आहे.

वरील प्रमाणे सुधारीत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेवर करण्यात आलेल्या बांधकामाकरीता भागश: भोगवटा प्रमाणपत्र दि.८.७.२०२१ रोजी अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. या भोगवाटा प्रमाणपत्रामध्ये प्रवेशद्वाराकरीताचे फक्त रेखांकन दर्शविण्यात आले असून त्याचे संरचना, Elevation, Section दर्शविण्यात आलेले नाही.

तद्नंतर पुढील बांधकामाकरीता भागश: भोगवटा प्रमाणपत्र दि.२३.६.२०२२ अन्वये अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. यामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या दुकान केंद्र समावेश आहे. याही भागश: भोगवटा प्रमाणपत्रामध्ये केवळ प्रवेशद्वाराचे रेखांकन दर्शविण्यात आले आहे. परंतू गेट कसे असावे याबाबत कोणतेही संरचना Elevation, Section विकासकाकडून दर्शविण्यात आलेले नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.

विकासकाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व वास्तुविशारद यांच्या सल्ल्याने प्रवेशद्वार व त्यावरील घुमट व लगतच्या त्रिकोणी भिंतीचे बांधकाम केल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे, असे महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि, या संपूर्ण प्रकल्पास अंतीम भोगवटा प्रमाणपत्र अद्याप निर्गमित करण्यात आलेले नाही. तसेच विकासकाने सदर प्रकल्पाचे आर.सी.सी. संरचना व नकाशा यांचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेतलेले नाही.

सदर उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वारावरती त्रिकोणी भिंत असून सिध्दार्थ उद्यान भागात झालेल्या जोरदार वादळी वाऱ्याने उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वारावरती त्रिकोणी भिंत कोसळल्यामुळे तसेच त्यादरम्यान प्रवेशद्वारा खालून जाणाऱ्या नागरिकांपैकी स्वाती खैरनार, रेखा गायकवाड व शेख अखिल शेख रहीम यांना गंभीर दुखापत झाली. उपचारा दरम्यान स्वाती खैरनार व रेखा गायकवाड यांचा मृत्यू झाला व शेख अखिल शेख रहीम यांना उपचारा नंतर घरी पाठविण्यात आले असल्याबाबत महानगरपलिकेने कळविले आहे.

सदर बी.ओ.टी. प्रकल्पाचे विकासक, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व वास्तू विशारद या घटनेत प्रथमदर्शनी जबाबदार असल्याचे दिसून आल्याने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून त्यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन, क्रांतीचौक येथे प्रथम खबर क्रमांक (FIR) ०१५६ कलम १०५, १२५(A), १२५(B), ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या घटनेमध्ये मृत्यू पावलेल्या स्वाती खैरनार व रेखा गायकवाड यांच्या पात्र वारसदारास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून प्रत्येकी ०५.०० लक्ष इतकी मदत जाहीर केली असून सदरची रक्कम त्यांना देण्याची महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

******************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक - ५७३**

**श्री. रईस शेख वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ अंतर्गत सुमारे १५९ कि.मी लांबीचा वेगवेगळया व्यासाच्या मल:निस्सारण वाहिन्या टाकणे व ४ ठिकाणी ९९ द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेचे (एस.बी.आर.) मलशुध्दीकरण केंद्र बांधणे, ७ ठिकाणी पंपिंग स्टेशन, ११०९ मीटर लांबीची outer tail Sewer टाकणे, २८३० लांबीची रिंग वाहिनी आदि कामे या योजनेअंतर्गत सुरु असलेली कामे अदयापही अपूर्ण अवस्थेत निकृष्ट दर्जाची होत असल्याचे निदर्शनास येणे, मलनिसारण वाहिन्या ठराविक ठिकाणी घालण्यात आल्या असून काही भाग जोडले गेलेले नसल्याचे निदर्शनास येणे, तर काही ठिकाणचा भाग सोडण्यात आलेला असणे, सदर कामामुळे रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था झाली असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होणे, सदर कामाचे नियोजन नसल्याने कामास होत असलेले विलंब, परिणाम कामास विलंब होत असल्याने, वाहतुक कोंडी निर्माण होऊन नागरिकांना नाहक त्रास, सदरहू योजनेंतर्गत झालेल्या निकृष्ट व अपूर्ण कामासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंची दिनांक २५/०१/२०२५ रोजी मा. उपमुख्यमंत्री महोंदयाकडे पत्रव्यवहार करुनही कोणतीच कारवाई न होणे, याबाबत शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, यास जबाबदार व दोषी असणाऱ्याविरुध्द कडक कारवाई करण्याची नितांत गरज, तसेच कामाची पाहणी करुन नव्याने अहवाल तयार करुन नविन योजना राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

**-: <u>मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u> :-**

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत भुयारी गटार (टप्पा-२) प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत असून सदर प्रकल्पात १५९ किमी लांबीच्या वेगवेगळ्या व्यासाच्या मलनिःस्सारण वाहिन्या टाकणे, एकूण ९९ द.ल.लि. क्षमतेचे ४ मलशुद्धीकरण केंद्र (एस.टी.पी.) बांधणे, ७ ठिकाणी पंपिंग स्टेशन बांधणे, सुमारे १.१ किमी लांबीचे आऊटफॉल सिव्हर टाकणे व इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे. सदर प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून योजनेंतर्गत कामांची त्यांच्याकडून नियमित गुणवत्ता तपासली जात असून त्यांच्या देखरेखीखाली प्रकल्पाचे काम सुरू आहे.

प्रस्तुत प्रकल्पातील समाविष्ट ४ मलशुद्धीकरण केंद्रापैकी ३० द.ल.लि. क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले असून ते सन २०२२ पासून कार्यान्वित आहे. २९ द.ल.लि. क्षमतेच्या मलशुद्धीकरण केंद्राचे व त्यास संलग्न दोन पंपिंग स्टेशनचे काम पूर्ण झालेले असून सदरील मलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित करण्याचे चाचणी परीक्षण सुरू आहे. तसेच, ३१ द.ल.लि. व ९ द.ल.लि. क्षमतेच्या दोन्ही मलशुद्धीकरण केंद्राचे स्थापत्य व इलेक्ट्रो मेकॅनिकल वर्कचे काम पूर्ण झाले असून विद्युत जोडणीचे काम सुरू आहे. तसेच, प्रकल्पातील सर्व सात पंपिंग स्टेशनची कामे १०० % पूर्ण झालेली आहेत. सदर योजनेंतर्गत एकूण ६४१३ चेंबर बांधण्याचे काम, १३९ किमीच्या मलवाहिन्या अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे. आउटफॉल सिव्हर वाहिनी एकूण ६५० मी. अंथरण्यात आलेली

आहे. तसेच, १५०.१ किमी लांबीच्या खोदण्यात आलेल्या रस्त्यांपैकी १४५.९० किमी रस्ते पूर्ववत करण्यात आले असून ७०० मी. इतक्या रस्ते दुरुस्तीचे काम प्रगतिपथावर असून उर्वरित लांबीच्या मलवाहिन्या मुख्य नाले व खाडी लगत अंथरण्यात आल्यामुळे रस्ता दुरुस्तीचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर प्रकल्पांतर्गत अंतर्भूत मलवाहिन्यांची कामे करताना स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे गॅप वर्कचे राहिलेले काम नागरिकांशी संवाद साधून पूर्ण करण्यात आलेले असून सुमारे ११३ मी. इतक्या लांबीचे गॅप वर्कचे काम नागरिकांच्या विरोधामुळे प्रलंबित आहे. तसेच, प्रकल्पाच्या कामांतर्गत मलवाहिन्या अंथरणेकरिता खोदण्यात आलेल्या रस्त्यांची दुरुस्ती वेळोवेळी करण्यात आलेली आहे. सदर रस्त्यांमुळे शहरात वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झालेला नाही. शहरातील अरुंद रस्त्यांमधून होणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे व भिवंडी शहर हे औद्योगिक नगरी असल्यामुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होतो.

सदर प्रकल्पांतर्गत अंतर्भूत कामे मंजूर प्रकल्प अहवालातील नमूद तपशीलानुसार केलेली असून झालेल्या कामांचे तांत्रिक लेखापरीक्षण आय.आय.टी., मुंबई व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या नामांकित संस्थेमार्फत त्रयस्थ तांत्रिक परीक्षण झालेले आहे. तसेच, त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणांतर्गत काम गुणवत्तापूर्वक झाले असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच कंत्राटदारास वेळोवेळी देयके प्रदान करण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत, सदर योजनेची आर्थिक प्रगती ९७.१९ % व भौतिक प्रगती ९८.८३ % झालेली आहे. तसेच, सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने शासन स्तरावरील कार्यवाही सुरू आहे.

भिवंडी शहर हे एम.एम.आर.डी.ए. कार्यक्षेत्रात समाविष्ट असून शहर परिसरातील वाढते नागरीकरण व विकास विचारात घेता भविष्यात सदर योजनेंतर्गत अंतर्भूत असलेले मलशुद्धीकरण केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर त्यातून निर्माण होणारे प्रक्रिया केलेल्या पाण्यावर दुय्यम प्रक्रिया होणार असून त्यानंतर शहरातील वस्त्र उद्योगाकरिता आवश्यक असलेले पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तृतीयक सांडपाणी प्रक्रिया करून औद्योगिक वापरास उपलब्ध करून देण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५७४ खालीलप्रमाणे आहे:**

" भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सीसीटीव्ही बसविण्याकरिता रस्ता खोदाईचे काम श्री सिध्दार्थ इन्फ्राटेक, हैद्राबाद यांना देण्यात येणे, ठाणे शहर पो. विभागाचे सीसीटीव्ही प्रकल्पासाठी इंटरनेट फायबर व इलेक्ट्राक पॉवर सप्लायसाठी केबल टाकणे व सहायक पोलीस आयफकत बिनतारी संदेश विभाग ठाणे यांनी रस्ता खोदाईसाठी विनाशुल्क परवानगीकरिता केलेला अर्ज, प्रस्तावास मंजूरी देणे, मंजूरीच्या अनुषंगाने उक्त संस्थेकडून रस्ते खोदाईकरिता कोणत्याही प्रकारे शुल्क आकारण्यात आलेले नसणे, या कामाकरिता रस्ता खोदाईचे काम करतांना संस्थेने महानगरपालिकेची जलवाहिनी, इलेक्ट्रीक केबल नादुरुस्त करणे, परिणामी महानगरपालिकेला नाहक आर्थिक भुर्दंड, सदर काम करणा-या संस्थेने शहरातील मुख्य दळणवळणाचे रस्ते जेसीबी मशिनद्वारे खोदले असून त्याठिकाणी जमा झालेले डेब्रीज मटेरियल उचलले नसल्याने ये-जा करणा-या नागरिकांची होणारी गैरसोय, जागोजागी मातीचे ढिगारे, वाहतूकीस अडचणी निर्माण होऊन वाहतूक कोंडीसह प्रवाशांना अडचणीचे ठरत असणे, याकडे महानगरपालिकेचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष व संताप, महापालिकेल रस्ता दुरुस्तीकरिता अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने संस्थेमार्फत केबल टाकणेकामी खोदलेल्या रस्ता दुरुस्तीचा आर्थिक भार पडल्यामुळे महापालिका आर्थिक संकटात, कंपनीस एकूण १३७.८८ कि.मी लांबीचा रस्ता खोदाईस परवानगी, त्याकरिता अंदाजे रक्कम रु ३५,०१,४२,६८२/- इतका खर्च अपेक्षित, रस्ता खोदई कामात वाढलेल्या दुरुस्ती कामाकरिता निधी उपलब्ध व्हावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधि यांनी दि.२४/४/२०२४ रोजी मा.उपमुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, पो.आयुक्त, ठाणे यांना केलेला पत्रव्यवहार शासनाने तातडीने लक्ष घालून निधी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

गृह विभाग, शासन निर्णय दि.०५ जानेवारी, २०२४ अन्वये, ठाणे शहर पोलिस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration) ४ व ५ या विभागात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारण्याच्या रुपये ४९२.८९ कोटी रक्कमेच्या प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच, शासन पूरकपत्र दि.०५ जुलै, २०२४ अन्वये उक्त प्रकल्पाचा सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांच्या Feed च्या बदल्यात ROW Charges, प्रकल्प क्षेत्रात अंतर्भूत असलेल्या ठाणे व इतर महानगरपालिकांनी, नगरपरिषदांनी माफ करण्याची कार्यवाही करावी असे नमूद आहे. त्याअन्वये, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पोलिस विभागाचे सी.सी.टी.व्ही. प्रकल्पासाठी फायबर केबल व इलेक्ट्रीक पॉवर सप्लायसाठी रस्ता खोदाई परवानगी मिळणेस्तव मे. सिध्दार्थ इन्फ्राटेक ॲण्ड सर्व्हिसेस प्रा. लि. हैद्राबाद या कंत्राटदार कंपनीने त्यांच्या दि.०६ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये रस्ता खोदाई करण्याकरिता परवानगी मागितली होती. त्याअनुषंगाने सदर कंत्राटदारास दि.२८ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये, १३७.८८ कि.मी. लांबीचा रस्ता खोदाई परवानगी देण्यात आलेली आहे. गृह विभाग, शासन निर्णय दि. ०५ जानेवारी, २०२४ व पूरकपत्र दि. ०५ जुलै, २०२४

मधील तरतुदीनुसार, रस्ता खोदाई पोटी सदर कंत्राटदारास महानगरपालिकेव्दारे कोणतेही रस्ता दुरुस्त शुल्क आकारण्यात आलेले नाही.

सदर कंत्राटदाराने कामाला सुरुवात केली असता, महानगरपालिकेचे जल वाहिनी तसेच केबल नादुरुस्त केलेले असून, ऐन सणांच्या कालावधीत रस्ता खोदाई केल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय झाली होती त्याबाबत लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिक यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने, नादुरुस्त जलवाहिन्या व नळजोडण्या संबंधित कंत्राटदारामार्फत दुरुस्त करुन घेऊन तक्रारींचे निराकारण करण्यात आलेले आहे. तसेच, रस्त्यावरील डेब्रीज उचलण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात आलेली आहे. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील सी.सी.टी.व्ही. प्रकल्पाचे काम सुमारे ९५ टक्के पूर्ण झाले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्वसामान्य जनतेची सुरक्षितता, आपत्कालीन परिस्थितीत तातडीची मदत, वाहतुकीचे नियमन, गुन्हेगारी प्रवृतीस आळा, कायदा व सुव्यवस्था, सुरक्षेच्या दृष्टीने सर्वेक्षण करणे, विविध स्वरुपाचे बंदोबस्त या सर्व व्यापक जनहिताच्या दृष्टीने सदर सीसीटीव्ही प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे.

सदर सी.सी.टी.व्ही. प्रकल्पामुळे नादुरुस्त झालेले रस्ते दुरुस्त करण्याकरिता अंदाजे रक्कम रु.३५.०१ कोटी इतका खर्च अपेक्षित असून, त्यासाठी निधी मिळणेकरिता शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून उपलब्ध निधी आणि स्विकृत दायित्व या अनुषंगाने निधी उपलब्धता तपासून निधी मंजुरीची कार्यवाही करण्यात येते.

******

महाराष्ट्र विधानसभा

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे. :-

"राम मंदिर, गोरेगाव पश्चिम येथील एमएमआरडीएने प्रकल्पबाधितांसाठी उभारलेल्या सिग्मा १ आणि २ इमारतींमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार एम एम आर डी ए चे आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे माहे जून २०२५ मध्ये करण्यात येणे, सदर तक्रारीच्या अनुषंगाने, भिवंडी ठाणे-कल्याण परिसरातील १५ ते २० प्रकल्पबाधितांना गोरेगावमधील सिग्मा १ मध्ये दलालांच्या मदतीने घरे देण्यात आली असणे, मात्र, ठाण्यातील प्रकल्पबाधितांना त्यांच्या परिसरातच पुनर्वसन घरे मिळायला हवी होती ती ना मिळणे, सिग्मा १ इमारतीतील १०५,२०५,३०५,४०५, ५०५, ६०५, ७०५, १००५ या सदनिकांचा बेकायदेशीर विक्री व्यवहार झाला असून, मूळतः पी-५ विभागातील धोकादायक झोपड्यांमधील रहिवाशांना हलवण्याचा निर्णय झाला असणे, मात्र त्या निर्णयाची अंमलबजावणी न करता दलाल आणि काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने सदनिकांची विक्री असणे, गौरव राणे यांनी दिलेल्या निवेदनात, बीएनएस कलम ६१(१), ६१(२), ६२, ३३१. ३३८ अंतर्गत बनावट नाव, कागदपत्रे वापरून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत असणे, एमएमआरडीए सारख्या सरकारी संस्थेच्या इमारतीतील घरे जे सामान्य जनतेच्या करातून बांधली जातात, ते दलाल चार ते पाच एजंटां मार्फत ४० ते ५० लाखांन विकण्याचा प्रकार करत असणे, त्यामुळे संबंधित सदनिकांचा पंचनामा करून दोषी असलेल्या अधिकारी व संबंधितांवर करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर क्षेत्रामध्ये महत्वाच्या प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे. सदरहू प्रकल्पांमध्ये बाधीत होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याकरिता राम मंदिर गोरेगांव पश्चिम येथे एमएमआरडीएने उभारलेल्या सिग्मा आर-१ व आर-२ या इमारती मे. सिग्मा लॅंडकॉन एल.एल.पी. या विकासकाने विकसित केल्या असून सदर इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) अनुक्रमे इमारत क्र.आर-१ ला दि.१४.०६.२०२४ व इमारत क्र. आर-२ ला दि.०८.१२.२०२२ रोजी प्राप्त झाले आहे. सिग्मा आर-१ आणि आर-२ या इमारतीमध्ये प्रत्येकी २०२ या प्रमाणे एकूण ४०४ सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी आर-१ या इमारतीमध्ये ११७ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केलेले असून ८५ सदनिका सद्यस्थितीत रिक्त आहेत. तसेच आर-२ या इमारतीमध्ये २०२ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले असून त्यामध्ये कोणतीही सदनिका रिक्त नाही.

ओशिवरा वंडरलैंड येथे इमारत क्र. पी-१, पी-२, पी-५, पी-६, पी-८, पी-९, पी-१० अशा एकुण ०७ इमारती आहेत. प्राधिकरणाने आय. आय.टी. पवई, मुंबई यांच्याकडून दि.२०.११.२०१९ रोजी स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट तयार करून घेतला असून त्यामध्ये ओशिवरा वंडरलैंड येथील इमारत क्र. पी-५, पी-९ व पी-१० या राहण्यास अयोग्य व धोकादायक असल्यामुळे या इमारतीमध्ये

रहिवाश्यांचे तात्पुरते पुनर्वसन मे. पांडे घनवट डेव्हलपर्स, मालाड इमारत क्र. आर-३. स्कायलाईन डेव्हलपर्स, आरएनए इमारत क्र. १६ व सिग्मा गोरेगांव इमारत क्र. आर-१ या इमारतीमध्ये रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

ओशिवरा वंडरलँड येथील प्राधान्याने पी-५ इमारतीमधील एकुण १४७ रहिवाश्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन स्कायलाईन आरएनए येथील इमारत क्र. १६ मध्ये करण्याचे निश्चित केले असून त्यापैकी ९६ रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. उर्वरीत ५१ रहिवाश्यांचे पुनर्वसन संबंधित रहिवाशींसोबत चर्चा केल्यानुसार मालवणी महाकाली नगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, मालाड पश्चिम व मे. पांडे घनवट डेव्हलपर्स, इमारत क्र. आर-३ मध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर ५१ रहिवाश्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन त्यांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

मुंबई मेट्रो प्रकल्प हा शासनाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असुन प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे प्रकल्प पुर्ण होण्यास विलंब होत असल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ होते. म्हणून प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार उपलब्ध सदनिकामध्ये त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. मुंबई मेट्रो मार्गिका - ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) अंतर्गत सद्यस्थितीमध्ये कापुरबावडी, ठाणे ते धामणकरनाका, भिवंडी पर्यंत मार्ग - १ चे काम प्रगतीपथावर आहे. सदर मार्गिकेच्या बांधकामाकरिता बाधित व पुनर्वसनासाठी पात्र ठरलेल्या एकुण २८४ प्रकल्पग्रस्तापैकी २३० प्रकल्पग्रस्त पात्र आहेत. सदर प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार मेट्रो टप्पा -५ करीता राखीव ठेवण्यात आलेल्या मे. ॲक्मे, मानपाडा, ठाणे येथील इमारत क्र. १ मध्ये एकुण ११७ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केलेले आहे. तसेच मे. हबटाऊन, माजिवडे, ठाणे येथील इमारत क्र. ३ मध्ये २७ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केलेले आहे. तसेच सिग्मा आर-१ या इमारतीमध्ये १५ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केलेले असून असे एकुण १५९ प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आले आहे. उर्वरित ७१ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सिग्मा आर-१ व आर-२ या इमारतीबाबत यापूर्वी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने दि.११/०४/२०२५ रोजी प्राधिकरणामार्फत स्थळपाहणी करण्यात आली आहे. सदर स्थळपाहणीनुसार सदनिकाधारकांना नोटीसा बजावण्यात आल्या असुन त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. झोपडीधारकांनी बनावट कागदपत्रे सादर करुन पुनर्वसनाचा लाभ घेतला आहे, अशा आशयाचे निवेदन दि.१९/०६/२०२५ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने देखील सविस्तर चौकशी प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

******

नगर विकास विभाग                                                    लक्षवेधी सूचना क्रमांक- ७६४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुभाष देशमुख, श्री. देवेंद्र कोठे व श्री. प्रविण दटके, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७६४ खालीलप्रमाणे आहे :-**

"सोलापूर शहरात शासनाने दोन कोटी रुपये खर्च विजापूर रोड परिसरात साकारलेला आंतरराष्ट्रीय जलतरण तलाव कोरडा पडला असल्याची बाब माहे जून २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे या तलावात उड्या आणि पोहण्याचा अभिनय करून क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी आंदोलन करणे, शहरात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत भाग घेणारे जलतरणपटूंचा सराव आणि नवे जलतरणपटू घडवण्यासाठी शासनाने दोन कोटी रुपये खर्च करून जलतरण तलावाची निर्मिती करून जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या ताब्यात असलेला हा तलाव महापालिकेला कंत्राटी तत्वावर देण्यात येणे, मात्र महापालिकेने या तलावाची देखभाल दुरुस्ती न केल्याने तलावाची दुरावस्था झाल्याने पुन्हा क्रीडा विभागाला देण्याचा निर्णय घेतला असणे, हा निर्णय वादादित असुन गेली चार वर्षे तलाव बंद असल्याने जलतरण पटूंची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असणे, यासाठी शासनाने महानगरपालिका व क्रीडा क्षेत्रात समन्वय घडवून पुन्हा जलतरणपटूसाठी तात्काळ खुला करण्याची गरज निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही.."

---

मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

सोलापूर शहरातील सुंदरम नगर, विजापूर रोड येथील स्थित जलतरण तलाव हा जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर यांच्याकडून दि.३१/१/२०१९ ते दि.३१/१/२०२४ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी महानगरपालिकेकडे चालविण्यास देण्यात आलेला होता.

परंतु सदर जलतरण तलावामध्ये पाणी लिकेज होत असल्याकारणाने या जलतरण तलावासाठी देखभाल व दुरुस्ती करणेकामी खर्च मोठ्या प्रमाणात होत होता. हा खर्च महानगरपालिकेस आर्थिकदृष्ट्या न परवडणारा असल्याने दि.३१/१/२०१९ रोजीच्या करारनाम्यातील अट क्र.१४ नुसार सोलापूर महानगरपालिकेने जलतरण तलाव करार

संपुष्टात आणून तलाव परत घेण्यासाठी दिनांक ०२.०१.२०२३ रोजी जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर यांना पत्र पाठविले.

तथापि, जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर यांनी ताबा न घेतल्यामुळे, सोलापूर महानगरपालिकेने जिल्हा क्रिडा कार्यालयासोबत वेळोवेळी पत्रव्यवहार केला. अनेकवेळा पत्रव्यवहार करुनही जिल्हा क्रिडा कार्यालय, सोलापूर यांनी ताबा न घेतल्यामुळे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दि.०५.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये याबाबत अवगत करण्यात आले व करार संपुष्टात आल्याने दिनांक ६.०५.२०२५ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी, सोलापूर यांच्याकडे जलतरण तलावाचा ताबा देण्यात आलेला आहे.

***********

नगर विकास विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक- ७६५

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुभाष देशमुख, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७६५ खालीलप्रमाणे आहे :-

"सोलापूर शहरातील धर्मवीर संभाजी तलाव संवर्धन करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी (दक्षिण सोलापूर) डीपीआर मिळवण्यापासून आतापर्यंत कोट्यावधी रुपये खर्च करुनही या तलावाचे संवर्धन झाले नसल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, धर्मवीर संभाजी तलावाभोवती चेकलिंक फेनसिंग करणे, तलाव परिसरात स्वच्छता गृह, धोबी घाटची व कंपाउंड वॉल दुरुस्त करणे, रिटेनिंग वॉल दुरुस्त करणे, तलाव परिसरात सोलार लाईट बसवणे, मूर्ती विसर्जनाकरिता व्यवस्था करणे, तलाव परिसरात झाडे लावणे, तलावातील गाळ काढणे, तलावातील जलपर्णी काढणे, तलावाच्या पाण्याची गुणवत्ता तपासणे, एरिएशन सिस्टीम बसवणे व अन्य कामे करून तलावाची संवर्धन करण्याची आवशक्यता असतानाही हि सर्व कामे महापालिकेने केल्याचे दिसत नसणे, या तलावाची दुरावस्था झाल्याने येथील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

---

मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विजापूर रोड लगत धर्मवीर संभाजी तलाव (कंबर तलाव) आहे. सदर तलावाच्या संवर्धनासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन विभागाकडून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय जलीय पर्यावरण संवर्धन योजनेअंतर्गत National Plan for Conservation of Aquatic Eco-systems (NPCA) रु.१२.२१ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पास दिनांक १२.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

सदर योजनेअंतर्गत धर्मवीर संभाजी तलावातील गाळ काढणे, जलपर्णी काढणे, पाण्याची गुणवत्ता तपासणे, एरिएशन सिस्टीम बसवणे, तलाव परिसरात सोलार लाईट बसवणे, मूर्ती विसर्जनाकरिता कुंड व्यवस्था करणे इत्यादी कामे करण्यात आली आहेत.

सदर प्रकल्प हा सप्टेंबर २०२३ मध्ये पूर्ण झाला असून त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास दि.१२.०६.२०२५ रोजी सादर करण्यात आलेले आहे. सदर तलावामधील जलपर्णी सोलापूर महानगरपालिकेकडून नियमितपणे काढली जाते. तसेच तलावातील पाण्याची गुणवत्ता महानगरपालिकेकडून वेळोवेळी तपासली जाते. तलावामधील एरिएशन सिस्टीम नियमितपणे कार्यरत असून स्थापत्य कामांची आवश्यकतेनुसार देखभाल व दुरुस्ती करण्यात येते.

सोलापूर शहरातील धर्मवीर संभाजी तलाव येथे उद्यान विभागामार्फत बागेतील गवत काढणे, बाग स्वच्छ करणे, सदर बागेत आवश्यकतेनुसार शोभेची व स्थानिक प्रजातीची रोपे लावण्यासह सुशोभिकरणाची दक्षता घेण्यात येत आहे.

छत्रपती संभाजी तलाव व परिसर सुशोभिकरण करुन नागरिकांना विरंगुळा केंद्र/पर्यटन केंद्र विकसित करण्याच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सोलापूर महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

***********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

७००

लक्षवेधी सूचना क्रमांक - ७७४

**श्रीमती सुलभा गायकवाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सन २०१५ मध्ये समोवश झालेल्या गावांचा पाणी समस्या सोडविण्यासाठी केंद्र शासनाच्या अमृत योजनेच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्याकरि ता पाण्याची पाईपलाईन तसेच जलकुंभ बनविण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून सुरु असणे, सदर काम अत्यंत संथ गतीने व निकृष्ट दर्जा होणे, अदयापी काम पूर्ण न होणे, सदर कामाकरिता वापरण्यात येणारे साहित्य निकृष्ट दर्जाचे वापरले जात असणे, महापालिकेच्या नियमानुसार पाईप खोल खोदकाम करुन पी.पी.सी न करता टाकण्यात येणे, नियमाचे उल्लंघन करुन कामात अनेक त्रुटी करुन कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम न करता संबंधीत ठेकेदार, अधिकारी यांनी शासनाची केलेली फसवणूक, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन दोर्षीविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच उक्त काम त्वरित पूर्ण करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

-: <u>मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u> :-

केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सन २०१५ साली समाविष्ट झालेल्या २७ गावांसाठी पाणीपुरवठा करण्याच्या प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा कल्याण डोंबिवली महानगरपालिका व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण काम पाहत आहे. सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत राबवून दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. तद्नंतर, कोव्हीड-१९ ची महामारी व आनुषंगिक कारणांमुळे प्रकल्पाचे काम पुरेशा गतीने करता आले नाही. तथापि, सद्यस्थितीस जलकुंभाच्या जागा महानगरपालिकेस उपलब्ध झाल्यामुळे सद्यस्थितीस प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे.

सदर प्रकल्पाच्या बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर कॉंक्रेटची टेस्टिंग करण्यात येत असून या अंतर्गत कॉंक्रेट क्युब टेस्टिंगचे अहवाल समाधानकारक आल्यानंतरच पुढील कामे करण्यात येत आहेत. तसेच, कॉंक्रीटच्या कामात वापरण्यात येणाऱ्या साहित्याची तपासणी शासकीय तंत्रनिकेतन ठाणे, व्हीजेटीआय अभियांत्रिकी संस्था, कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रयोगशाळा येथे करण्यात येत असून सदरील चाचण्यांचे अहवाल समाधानकारक असल्याचे महानगरपालिकेने प्रमाणित केले आहे.

प्रस्तुत पाणीपुरवठा प्रकल्पातील वापरण्यात येणाऱ्या डी.आय. व एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नोंदणीकृत पुरवठादाराकडून करण्यात येत असून पाईपचा पुरवठा करण्याअगोदर मजीप्राच्या पॅनलवरील त्रयस्थ तपासणी यंत्रणेकडून तपासणी व प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर पाईपचा पुरवठा करण्यात येत आहे. यामुळे पाईपच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड करण्यात येत नाही. तसेच, सदर प्रकल्पाच्या निविदेत पाईपच्या खाली पी.सी.सी. करण्याची अट व तरतूदीचा समावेश नसून त्याऐवजी डी.आय. व एच.डी.पी.ई. पाईपच्या खाली मुरूम बेडींग करण्याची अट आहे व त्याप्रमाणे कामे सुरू आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रस्तुत पाणीपुरवठा प्रकल्पातील कामाचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण व्हीजेटीआय अभियांत्रिकी संस्थेकडून वेळोवेळी करण्यात येत असून त्यांनी प्रकल्पाचे काम समाधानकारक असल्याचे अहवालात नमूद केलेले आहे. तसेच, व्हीजेटीआय संस्थेकडून तपासणी दरम्यान उपस्थित मुद्यांची पूर्तता केल्यानंतरच ठेकेदाराच्या देयके अदा करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

सद्यस्थितीस सदर प्रकल्पाची भौतिक प्रगती ७२ % झालेली असून प्रकल्पाचे काम दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ अखेर पूर्ण करण्याचे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे नियोजन आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १०७०

श्री.अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

जोगेश्वरी पूर्व विधानसभा कार्यक्षेत्रातील आरे कॉलनीतील फिल्म सिटी परिसरात दिनांक २०.०२.२०२५ रोजी लागलेली भिषण आग, फिल्म सिटीमधील सेटचे सामान आणि जुने लाकडी सामान ठेवण्याच्या गोदाम कारणीभूत असल्याचे समोर येणे, सदर आगीमुळे येथील झोपडपट्यांचे मोठे नुकसान होणे, २०० ते २५० नागरिकांचे तात्पुरत्या स्वरुपात महापालिका शाळेत पुनर्वसन करणे, येथील संताष नगर परिसरात मागील कांही महिन्यांपासून अनधिकृत लाकडांचे गोदाम असणे, याबाबत सातत्याने महापालिकेच्या पी दक्षिण विभागास तक्रारी करुनही कोणतीच कारवाई न करता गोदामांना संरक्षण देण्याचा होत असलेला प्रयत्न, उक्त पी दक्षिण विभागांमध्ये अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असतांनाही पालिकेच्या अधिका-यांकडून कारवाई करण्यास जाणीवपुर्वक होत असलेले दुर्लक्ष, संतोष नगरमधील संत निरंकारी मार्गावर मोठ्या प्रमाणात अनधिकृत झोपड्या तसेच गोदामे वाढलेली असणे, यास पी दक्षिण महापालिकेचे असलेले अभय, याठिकाणी कुठलीही अग्निसुरेक्षची उपाययोजना नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर आगीत नुकसान झालेल्या झोपडपट्टीवासियांना अभय देऊन त्यांचे पुनर्वसन व आर्थिक मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून अनधकृति गोदामावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

जोगेश्वरी पूर्व क्षेत्रात गोरेगाव पूर्व येथे आरे कॉलनी असून यामध्ये ५२१ क्षेत्रफळावर दादासाहेब फाळके चित्रनगरी वसविण्यात आलेली आहे. या चित्रनगरीमध्ये १६ बांधीव कलागारे (स्टुडीओ) व ७२ बाह्य चित्रीकरण (आऊटडोअर शुटींग) क्षेत्र आहे. चित्रनगरीच्या प्रवेशद्वारापासून २०० मीटर अंतरावर नागरमोडीपाडा असून, सदर ठिकाणी आदिवासी व इतर नागरिकांचे वास्तव्य आहे. नागरमोडीपाडा हा चित्रनगरीच्या हद्दीतील आदीवासी पाडा आहे. येथे अंदाजे ३०-४० कुटूंबांचा रहीवास आहे. या पाड्यामध्ये अनधिकृतपणे अंदाजे १५ ते २० तात्पुरत्या स्वरुपात बांधलेले गोदामे सदृश्य गाळे असून यामध्ये लाकडी सामान, एल पी जी सिलेंडर व इतर ज्वलनशील वस्तु चार चाकी टेम्पो डेकोरेशनचे सजावटीचे व चित्रीकरणाचे साहित्य यांचा साठा करण्यात आलेला होता.

या गोदामांपैकी काही गोदामांना दिनांक २०.०२.२०२५ रोजी ११ वा. २७ मिनिटांनी आग लागल्याची सूचना दूरध्वनीवरून मुंबई अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षास मिळाली, आग १००० * १००० फुट इतक्या मोठ्या प्रमाणात पसरली होती. सदर आगीची व्याप्ती व तिव्रता यानुसार ही आग लेवल २ वर्दीची होती. याअनुषंगाने एकूण ८ फायर इंजिन, १० जम्बो वॉटर टँकर,२ Articulated Water Tower Tender (AWTI), १ जलद प्रतिसाद वाहन (ORV) इत्यादी अग्निशमन वाहनांच्या मदतीने अंदाजे तीन ते साडे तीन तासामध्ये नियंत्रण मिळवून आग विझवण्यात आली. सदर आगीच्या ठिकाणी कोणतीही व्यक्ती जखमी झालेली नाही, सदर आगीचा मुंबई अग्निशमन दलाकडून तपास केला असता आगीचे संभाव्य कारण हे सदोष विद्युत प्रणाली असे नमूद करण्यात आले आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधीच्या विनंतीवरून सदर ठिकाणावरील बाधीत अंदाजे ३०-४० लोकांची सदर ठिकाणावरून जवळ असलेल्या यशोधाम मनपा शाळा येथे एक रात्रीकरिता तात्पुरत्या स्वरूपात सोय करण्यात आली होती.

नागरमोडी पाडा येथील गोदामे अदिवासी पाड्याच्या मध्यवर्ती भागात बांधण्यात आलेली असून बांधकामास दादासाहेब फाळके चित्रनगरी व्यवस्थापनाकडून कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. सदर बांधकामे अनधिकृत आहेत. सदर अनधिकृत गोदामाचे पाडकाम करण्याकरिता महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ स्तरावर कार्यवाही हाती घेण्यात आलेली होती. तथापि स्थानिक आदिवासी नागरिकांकडून तीव्र विरोध झाल्यामुळे कार्यवाही पूर्ण करता आली नाही. उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण निष्कासन यांच्या कार्यालयाकडून चित्रनगरी परिसरातील झोपडपट्यांच्या सर्वेक्षणाचे काम हाती घेऊन सन १९९५ पर्यंत पात्र / अपात्र झोपडपट्टी धारकांची पात्रता निश्चित करण्याकरिता सर्वेक्षण करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या होत्या. सदर सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. त्यानंतर सन २००० पर्यंतच्या पात्र /अपात्र झोपडपट्टी धारकांची पात्रता निश्चित करण्याकरिता सर्वेक्षण अहवाल महामंडळास प्राप्त न झाल्याने व्यवस्थापकीय, संचालक महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादीत यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दि. १३ ऑक्टोबर, २०१७ दि.२२.०५.२०१८ च्या पत्रान्वये सदर कार्यवाही तातडीने करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, सदर कार्यवाही करण्यास मोठा विरोध झाल्याने पात्रता/ अपात्रता पूर्ण होऊ शकली नाही. सदर कार्यवाही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत करण्याकरिता ही प्रयत्न करण्यात आला तथापि, शक्य न झाल्याने सक्षम प्राधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारी यांनी दि.०३.०३.२०२५ च्या पत्रान्वये सर्वेक्षण करण्याची कार्यवाही आदिवासी संशोधन संस्था, पुणे यांच्या समवेत करावे, असे कळविले. सद्यस्थितीत आदिवासी विकास विभागामार्फत चित्रनगरीतील आदिवासींचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. सदर सर्वेक्षणाअंती अनधिकृत बांधकामाबाबत संख्या निश्चीती झालेनंतर पुढील कारवाई करणे शक्य होणार आहे.

आदिवासी व्यतिरिक्त इतर रहिवासांच्या बाबत सर्वेक्षण करुन याठिकाणी झोपडपट्टी पुर्नविकास योजना राबविण्याकरिता महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत दि.२०.०६.२०२५ रोजीच्या कार्यादेशाद्वारे सल्लागाराची नेमणुक करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन करण्याकरिता संबंधित सल्लागाराकडुन एका ते दोन महिन्याच्या कालावधीत विस्तृत प्रकल्प अहवाल येणे प्रस्तावित आहे.

दादासाहेब फाळके चित्रनगरी महामंडळामार्फत अग्नीसुरक्षा प्रतिबंधक उपाययोजनेसाठी मे. ओम टेक्नॉलॉझी पुणे. यांची विस्तृत प्रकल्प अहवाल बनविण्यासाठी ई-निविदेद्वारे दि.३०.०९.२०२४ रोजी नेमणूक करण्यात येऊन मे. रामसंगम प्रोजेक्ट्स प्रा. लि. या कंत्राटदाराची ई-निविदेद्वारे दि.०७.०५.२०२५ रोजी नेमणूक करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीमध्ये अग्नीसुरक्षा प्रतिबंधक उपाययोजनेचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

गोरेगाव पूर्व पी उत्तर येथे संतोषनगर अंदाजे ०.४५ चौरस किलोमिटर क्षेत्रावर असून येथे बैठ्या चाळीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची वसाहत आहे. सदर परिसरामध्ये अनधिकृत लाकडाचे गोदामे असल्याचे आढळून आले नाही. महानगरपालिकेच्या पी उत्तर विभागास व पी दक्षिण विभागास यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी कोणतीही तक्रार ऑनलाईन अथवा इतर कोणत्याही पध्दतीने दिलेली असल्याचे दिसून येत नाही.

पी/उत्तर विभागामधील संतोषनगर या भागातील संत निरंकारी भवन मार्गावर अनाधिकृत झोपड्या असून यावर महानगरपालिकेद्वारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुर्नविकास) अधिनियम, १९७१ अन्वये निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते. संतोषनगर पासून १ ते १.५ किलोमिटर अंतरावर अग्निशमन केंद्र असून याद्वारे अग्नि दुर्घटनेच्या काळात तातडीने उपाययोजना करण्यात येते. सन २०२४ ते २०२५ या कालावधीमध्ये संतोषनगर परीसरामध्ये कोणतीही आग लागल्याची घटना घडल्याचे आढळून आले नाही.

******

नगर विकास विभाग लक्षवेधी सूचना क्र. ११९५

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. हेमंत रासने, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११९५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या वसाहतीची दुरावस्था झाली असून माझ्या कसबा मतदार संघामध्ये एकूण इमारतीची संख्या ४४ असून यामध्ये पूरग्रस्त ४ बैठी चाळी ४ असणे, पुणे शहरात ७८ चाळी व इमारती बैठी घरे असून बैठी घरे वसाहती १० आहेत. एकूण सदनिका ३४५९ असून यामध्ये नादुरस्त सदनिका ची संख्या १८७ असणे, अनेक इमारतीमध्ये मनपा सेवक बिगर महानगरपालिका सेवक सेवानिवृत्त सेवक राहत असून त्यांना अनेक मूलभूत सोयी-सुविधापासून वंचित रहावे लागणे, यामध्ये प्रामुख्याने पाण्याची व्यवस्था नसणे, ड्रेनेज लाईनची व्यवस्था नसणे, इमारतीमध्ये स्लॅब गळती होणे,काही इमारतीमध्ये स्लॅब पडल्यामुळे नागरिकांना अनेकवेळा दुखापत झाल्याच्या घटनाहीघडणे,महापालिकेला भाडे भरनही सोयी सुविधांपासून नागरिकांना वंचित रहावे लागणे,पुणे महानगरपालिकेने काही वसाहतीचे उदाहरणार्थ राजेंद्र नगर येथील वसाहतीचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरू केलेली असून,परंतु त्या ठिकाणी राहत असलेल्या नागरिकांनी मालकीहक्काने घरे द्या तसेच या ठिकाणी पूरग्रस्त सुध्दा रहातअसून त्यांचाही निर्णय प्रशासन अद्यापपर्यंत घेऊ शकला नाही तसेच अनेक अडचणींना महापालिका प्रशासनाकडून कोणीतीही सकारात्मक उत्तरे अथवा कारवाई अद्यापपर्यंत करण्यात न येणे, परिणामी या नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण,याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेउन येथील नागरिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिकेत कसबा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात ४३ बहुमजली इमारती व ३ बैठ्या चाळी आहेत. या वसाहतीमध्ये मनपा सेवक व बिगर मनपा प्रकल्पबाधित सदनिका धारक भाडेतत्वाने राहतात. सदर वसाहती किमान ५० ते ६० वर्षापूर्वी बांधण्यात आल्या आहेत. या वसाहतींमधील इमारती बैठ्या स्वरूपाच्या तसेच तळ+२ मजले स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे इमारती जुन्या झाल्याने या ठिकाणी टेरेसस्लॅब व शौचालयाच्या स्लॅब मधून पाण्याची गळती होणे, ड्रेनेज लाईन/ पाण्याची लाईन नादुरुस्त होणे, भिंत छताचे प्लास्टर पडणे, फरशी तुटणे असे प्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे. या इमारती जुन्या झाल्याने त्यांची आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी दुरुस्ती करण्याची दक्षता पुणे मनपाच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत घेण्यात येत आहे. त्यानुषंगाने पुणे मनपाच्या प्रत्येक वर्षीच्या अंदाजपत्रकात सुद्धा यासाठी तरतूद करण्यात येते.

या अंदाजपत्रकीय तरतुदी अंतर्गत सदरची दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे महापालिकेमार्फत दरवर्षी क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येत आहेत. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये "पुणे मनपाच्या असलेल्या वसाहतीमध्ये विविध दुरुस्ती करणे" या अर्थसंकल्पीय शिर्षकाखाली र.रु.३ कोटी एवढी तरतूद पुणे

महानगरपालिकेने केली आहे. या अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी अंदाजे १.०० कोटी रक्कम पुणे महानगरपालिकेत कसबा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील वसाहतींच्या देखभाल दुरुस्तीसाठी भवन विभागाकडून क्षेत्रीय कार्यालयांना लॉकिंग करून देण्यात येणार असून त्यातून देखभाल दुरुस्तींची कामे करण्यात येत आहेत.

पुणे मनपाच्या वसाहतींमधील इमारती जुन्या झाल्यामुळे यातील काही इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची कार्यवाही चालू आहे. सदर इमारती जुन्या व जीर्ण असल्याने दुरुस्तीचा खर्च जास्तीचा होत असल्याने या इमारतींचा पुर्नविकास करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच ही कार्यवाही टप्याटप्याने पूर्ण करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे. ही प्रक्रिया कमी कालावधीत होणे शक्य नसल्याने दरम्यानच्या काळात येथील नागरिकांचे पुणे मनपाच्या ताब्यातील इतर मिळकतींमध्ये पुनर्वसन करण्याचेही प्रयत्न करण्यात आले होते. परंतु नागरिक त्यांची मूळ जागा सोडून इतर ठिकाणी राहण्यास तयार नाहीत. मूळ ठिकाणीच पुनर्वसन करणे व त्या सदनिका मालकी हक्काने देणे अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

कसबा विधानसभा मतदारसंघातील वसाहतीपैकी साने गुरुजी वसाहत येथील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेत वाढीव इमारत बांधण्यात येत असून या ठिकाणी ११ मजली इमारतीमध्ये १५२ सदनिका बांधण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच घोरपडे पेठ मनपा कॉलनी क्रमांक ८ व ९ मधील १६ इमारतीपैकी तीन इमारतींचे देखील पुर्नविकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. या सदनिकाधारकांना तात्पुरत्या स्वरुपात ट्रांझिट कॅम्प मध्ये स्थलांतरित करण्याचे काम हाती घेण्यात येऊन या ठिकाणी नवीन एका इमारतीमध्ये १५० सदनिका उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच गंजपेठ येथील मनपा कॉलनी क्र. ६ BOT तत्वावर विकसित करण्यात आलेली असून त्याठिकाणी २३१ मनपा सदनिकाधारक यांना भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

बिगर मनपा प्रकल्पबाधित सदनिका धारक यांना पुर्नविकास केलेल्या इमारतीमधील सदनिकांचे वाटप करण्याबाबतचे धोरण मालमत्ता व व्यवस्थापन विभाग मार्फत निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. बिगर मनपा प्रकल्पबाधित सदनिका धारक यांना सदनिका पुर्नविकास केलेल्या इमारतीमधील सदनिका या मालकी हक्काने द्यावयाच्या झाल्यास याबाबत नियमावली / धोरण निश्चित करावे लागणार आहे.

*********

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १२५०**

श्री. तुकाराम काते, मा.वि.स.स यांनी नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १२५० पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई शहर व उपनगरांमधील झोपडपट्टयांमध्ये साफसफाई व स्वच्छता करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सन २००१ साली दत्तक वस्ती योजना सुरू केली असणे त्यामध्ये सन २००१ मध्ये रुपये नऊशे मानधन देऊन नऊ हजार काडमगार काम करीत असणे पुढे सन २०१३ पर्यंत ४८०० रुपये पर्यंत मानधनामध्ये वाढ झाली व दीपावली बोनस रुपये २००० मिळत असणे पण सन २०१३ साली महापालिकेने जुनी दत्तक वस्ती योजना बंद करून नवीन स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान वस्ती स्वच्छता योजना या नावाने योजना अंमलात आणली असणे या योजनेमध्ये सध्या १२००० कामगार काम करीत असणे या कामगारांनी फक्त रुपये ५४०० मासिक पगार मानधन म्हणून दिले जात असणे या कामगारांना पूर्वी दिल्या जाणारा दिवाळी बोनस सुद्धा बंद करण्यात आला असणे मनपाच्या सफाई कामगारांप्रमाणेच काम करत असताना देखील त्या कामगारांप्रमाणेच या कामगारांना वेतन मिळत नसल्याचा अहवाल कामगार आयुक्तानी महापालिकेला दिलेला असणे, त्याची अंमलबजावणी महापालिकेकडून होत नसणे अनेकदा या सफाई कामगारांच्या जीवाला धोकाही होत असतो अशा परिस्थितीत हे कामगार काम करत असतात ही अत्यंत गंभीर बाब असून या कामगारांना किमान वेतन व आरोग्य विमा, सुरक्षा विमा कवच सुविधा मिळण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया"

---

### मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मुंबई शहरातील ६० टक्के नागरिक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. झोपडपट्टयांतील अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर व पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम टाळण्याक्रिता २००१ पासून दत्तक वस्ती योजनेची सुरुवात झाली. सन २००१ ते २०१२ पर्यंत सदर योजना कार्यरत होती. सदर योजनेमध्ये कामगार ही संकल्पना नसून प्रत्येक २०० घरा मागे ०१ एकक नेमण्यात आले होते. त्यांना वेतन व इतर लाभ मिळत नसत. सदर योजनेत त्रुटी असल्यामुळे ही योजना सन २०१३ मध्ये बंद करण्यात आली आहे.

"स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" योजनेची अंमलबजावणी ०१ फेब्रुवारी, २०१३ पासून संपूर्ण मुंबई शहरात करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत ८३५ (१०४०१ एकक) स्थानिक संस्था कार्यरत आहे. नागरी सहभागातून परिसर स्वच्छ ठेवणे हा सदर योजनेचा उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत स्थानिक संस्थांना वस्तीतील रहिवाशी आणि व्यावसायीकांकडून लोकवर्गणी द्वारे निधी उपलब्ध होतो व या व्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देखील आर्थिक सहाय्य केले जाते.

लोकसहभागातून सेवाभावी इच्छेने काम करत असलेल्या व्यक्तींवर वेळेचे बंधन नसून वेतनाची व्याख्या लागू नसल्यामुळे वेतन व पगार देणे किंवा वाढवणे योजनेच्या परिक्षेत्रात नाही.

स्थानिक अशासकीय संस्थांना एका एककाकरीता (१५० कुटुंब किंवा ७५० लोकसंख्या म्हणजे एक एकक प्रति महा अनुदान रु.५४००/- यादराने (स्वच्छतेकरीता साहित्य व अवजारे यांची खरेदी, स्वयंसेवकांसाठी सुरक्षासाधने, दैनंदिन स्वच्छता, पर्यवेक्षण आणि व्यवस्थापन खर्च) अधिदान करण्यात येते. तसेच योजना कामामध्ये प्रबोधन, लोकसहभाग, जनजागृती, वातावरण निर्मिती इत्यादी अनुशंगीक खर्च करणे शक्य व्हावे; म्हणून एका एककाकरिता प्रतिमहा रु.६००/- इतके अतिरिक्त अनुदान अधिदान करण्यात येते व त्याखेरीज संस्थांना जबाबदारी दिलेल्या कार्यक्षेत्रात स्वच्छतेच्या लोकसेवा पुरावित असताना संस्थेसाठी त्यांनी निवासी कुटुंबाकडून जास्तीत जास्त रु. २०/-प्रतिमहा व अनिवासी गाळेधारकाकडुन रु.५०/- प्रतिमहा लोकवर्गणी जमा करण्याची मुभा आहे. सदर योजनेअंतर्गत कामगाराना विमा व इतर आरोग्य सुविधा पुरविण्यात येत नाही.

सदर योजनेबाबत अद्याप कामगार आयुक्तांकडून कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल कामगार आयुक्तांकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. सफाई कामगाराच्या जीवाला धोको या अनुषंगाने महापालिकेने या योजनेंतर्गत वस्तीतील दोन फुटांच्या आतील चॅनेल मधील जे गटार साफसफेचे काम केले जाते, त्यासाठी सुरक्षा साधने तसेच या योजनेअंतर्गत मानधन दिले जाते. सदर योजनेत कामाच्या स्वरूपामध्ये तसेच वेळेत बदल करण्याकरिता तसेच वेतन निश्चिती याबाबत काही सुधारणा महापालिकेच्या विचाराधीन असून त्याबाबत विचार केला जात आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र.१२५१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. भास्कर जाधव, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२५१ पुढीलप्रमाणे आहे:**

"सन २०२० मध्ये कोविड -१९ च्या साथीच्या काळात ठाणे महापालिकेने १० कोटी रुपये खर्च करून कोविड सेंटर उभारले असणे, २०२२ मध्ये कोविड सेंटर बंद झाल्यानंतर कोट्यावधी रुपये खर्च करून खरेदी केलेले बेड, आय.सी.यु. उपकरणे, गाद्या आणि इतर वैद्यकीय साहित्य महापालिका मालकीच्या विशाल पार्किंग प्लाझाच्या चौथ्या आणि पाचव्या मजल्यावर धूळ खात पडलेले असणे, एकीकडे रुग्णालयांत बेड तसेच वैद्यकीय साहित्य उपलब्ध नसणे तर कोविड काळात कोट्यावधी रुपये खर्च करून घेतलेले रुग्णालयाचे नवे, कमी वापरलेले तर काही उपकरणांची अद्याप कव्हर न काढलेले साहित्य न वापरामुळे भंगार स्थितीत असणे, पार्किंगच्या सहाव्या मजल्यावर ४० ते ५० चार चाकी गाड्या मागील तीन वर्षापासून विनावापर पडलेल्या असून अक्षरशः सडण्याच्या मार्गावर असणे, त्या गाड्यांवर ठाणे महापालिकेच्या सभापतींच्या नावाच्या पाट्या असणे, या नुकसानीस जबाबदार संबधितांची चौकशी करून कारवाई करण्याची होत असलेली मागणी, ठाणेकरांच्या करातून उभारलेल्या या महापालिकेच्य मालकीची पार्किंग असलेल्या इमारतीचा साहित्य ठेवण्यासाठी गैरवापर होत असणे, आधीच शहरात वाहतूक कोंडीमुळे वाहन तळासाठी जागा उपलब्ध नसताना विशाल पार्किंग प्लाझाचा वाहन तळासाठी उपयोग होत नसून त्याचा साहित्य ठेवण्यासाठी वापर होत असल्याचे पाहून नागरिकांमध्ये प्रशासनाबद्दल चिडीची भावना निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

जागतिक कोरोना महामारी (कोविड-१९) कालावधीत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही महानगरपालिकेची निकड होती. त्याअन्वये, ठाणे महानगरपालिका अंतर्गत एकूण ०७ ठिकाणी तात्पुरती रुग्णालये व विलगीकरण केंद्रे (Quarantine Center) स्थापित करण्यात आली होती. त्यापैकी एक डेडिकेटेड कोविड सेंटर ॲवलॉन पार्किंग प्लाझा येथे स्थापित करण्यात आले होते. ॲवलॉन पार्किंग प्लाझाची तळमजला + १० मजले अशी इमारत ठाणे महानगरपालिकेच्या मालकीची व मध्यवर्ती ठिकाणी आहे. सदर इमारतीच्या चौथ्या व पाचव्या मजल्यावर कोविड रुग्णालयाची स्थापना करून, त्यात एकूण १२१३ खाटा होत्या. त्यापैकी, २३६ खाटा अतिदक्षता विभागाच्या व उर्वरित ९७७ खाटा ऑक्सिजन बेड स्वरुपात होत्या. त्यावेळची निकड लक्षात घेऊनच रुग्णांच्या सेवेकरिता विहित पद्धतीचा अवलंब करून आवश्यक ते साहित्य खरेदी करण्यात आले होते.

माहे, मार्च २०२१ पासुन जागतिक कोविड महामारीच्या दुसऱ्या व तिसऱ्या लाटेचा अर्थात जागतिक कोविड महामारीचा प्रादुर्भाव हळूहळू कमी झाला. त्यामुळे स्थापित करण्यात आलेली तात्पुरती कोविड रुग्णालये टप्प्या-टप्प्याने बंद करण्यात आली. पार्किंग प्लाझा येथील डेडीकेटेड कोव्हिड सेंटर माहे, फेब्रुवारी २०२३ पासून बंद करण्यात आले आहे. प्रस्तुत तात्पुरती सातही रुग्णालये व विलगीकरण केंद्रे बंद

करण्यात आल्यानंतर तेथील वैद्यकीय साहित्य जमा करून ते ॲवेलॉन पार्किंग प्लाझा इमारतीच्या तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या मजल्यावर सुरक्षित व्यवस्थितपणे ठेवण्यात आलेले आहे. त्यापैकी बहुतांशी साहित्य ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ०६ प्रसूतीगृहे व ०४ मोठी रुग्णालये यांना आवश्यकतेनुसार वित्तरीत करण्यात आले आहे. तसेच, ठाणे महापालिका क्षेत्रातील महापालिकेच्या मालकीच्या रुग्णालयात बेड व वैद्यकीय साहित्याची कमतरता नाही. या साहित्याची ठाणे मनपाच्या रुग्णालयात आवश्यकता नव्हती, ते साहित्य वाया जावू नये म्हणून ठाणे व पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयांना मोफत उपलब्ध करून देण्यासाठी संबंधितांशी संपर्क साधून ग्रामीण भागातील अनेक रुग्णालयांना कोविड कालावधीतील साहित्यापैकी काही साहित्य आवश्यकतेप्रमाणे वितरित केले आहे. सदर साहित्य वितरीत केल्यानंतर शिल्लक वैद्यकीय साहित्य ॲवलॉन पार्किंग प्लाझाच्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावर एकत्रित करुन व्यवस्थित सुरक्षित ठेवण्यात आले आहे. सदर शिल्लक साहित्याची योग्य त्या मार्गाने विल्हेवाट लावण्याची दक्षता घेण्यात आली आहे. यामुळे वापर न केलेले वैद्यकीय साहित्य भंगार अवस्थेत असल्याची बाब खरी नाही.

ठाणे महानगरपालिकेची दैनंदिन वापरातील साधारणतः २० ते २५ वाहने पार्किंग प्लाझाच्या सहाव्या मजल्यावर पार्किंग करण्यात आली आहेत. सदरची वाहने ही दैनंदिन वापरातील असून रोज वाहनांची पार्किंग सहाव्या मजल्यावर केली जाते. सदर वाहनांमध्ये कार व जीप वाहनांचा समावेश असून सदर वाहनांची दैनंदिन साफसफाई यांत्रिकी विभागाकडून केली जाते. ठाणे महानगरपालिका दि.०६ मार्च, २०२२ रोजी विसर्जित झालेली असून, यापूर्वी विविध समित्यांच्या सभापतींसाठी व इतर पदाधिकाऱ्यांच्या वापरासाठी असलेल्या वाहनांना त्यांच्या पदनामाच्या पाट्या लावण्यात आलेल्या होत्या. सदर पाट्या काढून सदरची वाहने महापालिकेच्या अधिकाऱ्यांसाठी वापरण्यात येत आहेत.

ठाणे शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग कार्यालय, ठाणे नगर पोलीस स्टेशन व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कार्यालय यांचा एकत्रित पुनर्विकास करणे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास ३ वर्ष कालावधी लागणार असल्याने या कार्यालयांची तात्पुरती व्यवस्था पार्किंग प्लाझा इमारतीत मजला क्र. ७, ८ व ९ वर करण्यात आली आहे. तसेच, मजला क्र.१० वर सदर शासकीय कार्यालयांची वाहने पार्क करण्यात येतात. या इमारतीमधील मजला क्र. ६ चा उपयोग इतर शासकीय कार्यालयांची वाहने, तसेच ठाणे महापालिकेची वाहने पार्क करण्यासाठी होत आहे. या अनुषंगाने मजला क्र.६ ते १० साठी अंशतः पूर्णत्वाचा दाखला दिला आहे.

मजला क्र.४ व ५ वर कोविड कालावधीतील वैद्यकीय साहित्य तात्पुरत्या स्वरुपात सुरक्षित ठेवण्यात आली आहे. तसेच, मजला क्र.५ वरील वैद्यकीय साहित्य मजला क्र.४ वर स्थलांतरीत करण्याचे काम सुरु आहे, जेणेकरून मजला क्र.५ रिकामा होईल. मजला क्र.१.२, व ३ वरील कोविड रुग्णालयाची तात्पुरती स्थापत्य कामे निष्कासित करण्यात येत आहे. सदर निष्कासनानंतर मजला क्र.१,२,३ व ५ हे प्रत्यक्षात पार्किंग प्रयोजनासाठी वापरात आणण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. पुढील ६ महिन्यात तळमजला १ ते ६ मजले रिकामे करून तसेच, आवश्यक ती डागडुजी करून हे मजले सार्वजनिक वापरासाठी उपयोगात आणण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

**********************

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **सूचना क्र. १४५६**

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. राजेश मोरे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४५६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्र मधील १४ गावे नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करून ०१ वर्षाचा कालावधी लोटला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे आम्हाला विकासाच्या दृष्टीने अनेक अपेक्षा होत्या : पायाभूत सुविधा रस्ते, पाणी पुरवठा, ड्रनेज, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणा इत्यादी. मात्र एका वर्षात या भागात कोणतेही ठोस विकास कामे झालेली नाहीत, जुनेच रस्ते उखडलेले आहेत, पाणी पुरवठा नियमित नाही, कचऱ्याचे व्यवस्थापन नाही आणि यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तरी आपल्यास नम्र विनंती आहे की कल्याण ग्रामीण विभागसभा क्षेत्र मधील १४ गावे नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करून या भागातील विकासकामे तातडीने सुरू करण्यात यावी आणि संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात यावे."

### मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

कल्याण, (जि. ठाणे) तालुक्यातील (दहिसर, मोकाशी, वालिवली, पिंपरी, निघू, नावाळी, वाकलण, बामार्ली, नारीवली, बाळे, नांगाव, भंडार्ली, उत्तर शिव व गोटेघर) ही १४ गावे, नवी मुंबई महानगरपालिकेत दि.०७.०३.२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये समाविष्ट करण्यात आलेली आहेत. सदर १४ गावांचे एकुण महसुली क्षेत्र २०.८९ चौ.कि.मी. इतके असून, सन २०११ चे जनगणनेनुसार १४ गावांची एकूण लोकसंख्या १५६२३ इतकी आहे.

तद्नंतर शासनाने महाराष्ट्र प्रदेश व अधिनियम,१९६६ अन्वये नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेल्या १४ गावांचे क्षेत्रासाठीची एमएमआरडीएची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून केलेली नियुक्ती मागे घेऊन, सदर १४ गावांचे क्षेत्राकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे. उक्त नमूद १४ गावांकरीता नागरीसोयी सुविधा पुरविणे करीता व सुधारणा करीता विकास आराखडा तयार करणेचे काम प्रगतीपथावर असून, सदर १४ गावांचा विकास आराखडा तयार करण्याकरीता मे. टेककॉम अरबन मॅनेजमेंट कंसल्टंट ॲण्ड सर्विस प्रोव्हायडर या सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत विकास आराखडा तयार करण्याकरीता आवश्यक असणारे GIS प्लॉन तयार करण्याचे व त्याकरीता सर्वेक्षणाचे काम सदर सल्लागारामार्फत करण्यात येत आहे.

तसेच, सदर १४ गावांकरीता झोन दाखले, भाग नकाशे देण्याची कामे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरू केले असून, महानगरपालिकेस प्राप्त बांधकाम परवानग्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

१४ गावांपैकी १० गावांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत सन २०१९ मध्ये पाणी पुरवठा योजना राबविण्यात आलेली असून, उर्वरीत ४ गावांकरीता सप्टेंबर २०२४ मध्ये पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर दोन्ही योजनेकरीता कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण काम पाहत आहे. सदर १४ गावांकरीता सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या उक्त पाणी पुरवठा योजनेची वस्तुस्थिती जाणून घेऊन, उक्त दोन्ही योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घेण्याची महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

१४ गावांना एमआयडीसीमार्फत सद्य:स्थितीत पाणी पुरवठा होत असून, पाणी आरक्षण अपुरे असल्याने, सध्याची व भविष्यातील लोकसंख्येचा विचार करता वाढीव पाणी आरक्षण मिळणेकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरू आहे.

१४ गावांमध्ये सद्य:स्थितीत सार्वजनिक शौचालय व वैयक्तिक शौचालयाची सुविधा असून, त्याकरीता Septic Tank चा वापर करण्यात येत आहे. या गावांमध्ये मलनि:सारण वाहिनीची सुविधा सद्य:स्थितीत उपलब्ध नाही. प्रत्येक गावांमध्ये आवश्यक सार्वजनिक शौचालय बांधणेसाठी जागेच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही प्रस्तावित आहे.

सदर १४ गावांच्या समावेशाबाबतची अधिसूचना दि.०७.०३.२०२४ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झाली होती. तथापि, दरम्याच्या कालावधीत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ ची आदर्श आचारसंहिता, तद्नंतर कोकण पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाची आदर्श आचार संहिता तसेच, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ ची आदर्श आचारसंहिता लागु झाल्याने, जवळपास ६ महिन्यांचा कालावधी आदर्श आचारसंहितेमध्ये गेला, ही वस्तुस्थिती आहे.

नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या १४ महसुली गावांमधील विकसित / प्रस्तावित / सुरु असलेली कामे, मालमत्ता, भूखंड / जमीन, नागरी / पायाभूत सोयी-सुविधा, निधी, योजना, दस्तऐवज हस्तांतरण, इत्यादी विषयाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, विविध विभागांचे अधिकारी / प्रतिनिधी व महानगरपालिका यांची संयुक्त बैठक संपन्न झाली असून, याअनुषंगाने जिल्हा परिषद ठाणे यांचेशी समन्वय साधून सदर कामे तात्काळ पुर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

तसेच, नवी मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये उपरोक्त १४ गावांसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे. यावर्षी या तरतूदी मधून प्राधान्याने शाळा, नागरी आरोग्य केंद्र, पाणी पुरवठा व मलनि:सारण, दिवाबत्ती, पायवाटा, रस्ते इ. अत्यावश्यक नागरी सुविधा निर्माण करण्याची कामे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहेत.

*********

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. प्रविण दटके, मा. विधानसभा सदस्य व इतर यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१६२२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नागपूर शहरात महानगरपालिका व नागपूर सुधारण्यास प्राधिकरण या दोन अधिकार संस्था कार्यरत असल्याने प्रशासनाला अंमलबजावणी करताना क्लिष्टता येत असणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्याचे धोरण पंचायत राज विधेयकांमध्ये असताना प्राधिकरणामुळे लोकप्रतिनिधींच्या अधिकारांवर मर्यादा येत असून प्रशासकीय कामात अडचणी येत असणे, शहरात २ विकास संस्था कार्यरत असल्याने विकास कामे करताना नोडल एजंसी ठरवण्यास संदिग्धता निर्माण होणे तसेच डूप्लीकेशन ऑफ वर्क होणे यामुळे निधी खर्च करण्यात अडचणी येत असणे, विकास कामे न होता नागपूर सुधार प्रन्यास कडून विकास शुल्काची आकारणी होत असणे, शहरात महानगरपालिका आणि शहर हद्दवाढ क्षेत्रात म्हणजेच NMRDA क्षेत्रात एनआयटीची प्राधिकारी संस्था अशी विभागणी करून सदर प्रश्न सोडवण्याबाबत लोकप्रतिनिधीकडून होत असलेली लेखी मागणी आणि पाठपुरावा, सदर क्लिष्टता संपवून एनआयटी बरखास्त करणे अथवा महापालिका क्षेत्राबाहेरील कार्यक्षेत्र निश्चित करण्यबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" "

---

मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महोदयांचे निवेदन

नागपूर शहरात नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास व शहराबाहेरील क्षेत्राकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA) हे नियोजन प्राधिकरण कार्यरत आहेत.

नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका हे त्यांचे कार्य त्यांच्या संबंधित अधिनियमांनुसार करत आहे. शासनाने नागपूर सुधार प्रन्यासला दि. २७ फेब्रुवारी, २००२ व दि. ०९ एप्रिल, २०२१ च्या च्या अधिसूचनेद्वारे नागपूर महानगरपालिकाला क्षेत्रातील वेगवेगळे योजनांचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यानुसार दोन्हीही प्राधिकरण हे नागपूर शहराच्या नियोजनबद्ध पध्दतीने विकास करण्याकरिता स्वतंत्रपणे कार्य करीत आहे. त्यामुळे कामाची द्विरुक्ती (Duplication of work) होण्याची शक्यता नाही. नागपूर सुधार प्रन्यास ही स्वायत्त संस्था असून, या संस्थेच्या आस्थापनाविषयक व अनुषांगिक खर्चासाठी शासनाकडून कोणताही निधी दिला जात नाही.

नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यासद्वारे आपल्या परिक्षेत्रातील बांधकामांकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम १२४ नुसार विकास शुल्काची आकारणी करण्यात येते.

नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम, १९३६ च्या कलम ५७ (२) च्या तरतुदीनुसार एखाद्या योजनेचा विकास नागपूर सुधार प्रन्यासने पूर्ण केल्यानंतर ही योजना महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात येते. त्यानंतर सदर योजनेची देखभाल व दुरूस्ती नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येते. नागपूर सुधार प्रन्यासद्वारे नागपूर शहराचा नियोजनबध्द विकास करण्याकरीता नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आलेल्या व पूर्ण झालेल्या ४५ योजना नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

शासनाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसारच नागपूर सुधार प्रन्यासद्वारे विकास कामे करण्यात येतात. लोकप्रतिनिधींद्वारे महानगरपालिका आणि शहर हद्दवाढ क्षेत्रात म्हणजेच NMRDA क्षेत्रात एनआयटीची प्राधिकारी संस्था अशी विभागणी करण्याबाबत मागणी प्राप्त नाही.

राज्य शासनाने दि.०९ सप्टेंबर, २०१९ रोजी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर ही संस्था "तत्वतः बरखास्त करण्यासंदर्भात" अध्यादेश प्रख्यापित केला होता. तथापि, मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.६८/२०१८ च्या सुनावणीदरम्यान सदर निर्णयाचा पुर्नविचार करण्यासंदर्भात दि.१० ऑक्टोबर, २०१८ अन्वये पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अधिसूचना दि. ९ एप्रिल २०२१ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासचे नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार पूर्ववत करण्यात आले. सदर अधिसूचनेत नमूद ७ योजनांकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर सुधार प्रन्यास कार्यरत आहे.

**********************

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग सूचना क्र. १६२९

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. नरेंद्र मेहता, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मिरा-भाईंदर क्षेत्रातील मौजे उत्तण या गावाला ऐतिहासिक वारसा लाभलेला असून हे गाव निसर्गाच्या विविधतेने नटलेले असणे, सदर उत्तण गावात ऐतिहासिक धारावी किल्ला धारावी मातेचे मंदिर व वेलंकणी चर्च असे प्रसिध्द स्थळ असणे, दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पर्यटक आणि भावीक सदर ठिकाणी भेट देत असणे, अशा विविधतेने नटलेल्या उत्तण गावात सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामाचा सुळसुळाट झालेला असणे, विशेषता एका विशिष्ट समुदायांच्य समाजकंटकांकडून ही अनधिकृत बांधकामे करण्यात येणे, यामध्ये प्रामुख्याने शासनाच्य जागेवर अतिक्रमण करून व खाजगी जागेवर जोर जबरदस्तीने अनधिकृत बांधकाम करत असल्याचा प्रकार घडणे, सदर बांधकाम करताना मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात येणे, याबाबत स्थानिक नागरिकांकडून व लोकप्रतिनिधींकडून महापालिका व महसूल प्रशासनाकडे वारंवार तक्रार दाखल करून देखील प्रशासनाकडून कोणतीही कारवाई न करणे, यामध्ये प्रामुख्याने येथील प्रभाग अधिकारी व कनिष्ठ अभियंता यांचा अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांसोबत असलेल्या आर्थिक संगणमतामुळे येथे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम होत असणे, यामुळे येथील नागरिकांमध्ये प्रशासनाप्रति मोठ्या प्रमाणात पसरत चाललेला असंतोष याकरता शासनाने तातडीने संबंधितांवर MRTP अंतर्गत गुन्हे दाखल करून अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करावयाची कारवाई व उपाययोजना"

मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

उत्तन परिसरात सर्वधर्मिय स्थानिक लोक राहत असून त्यांच्या खाजगी जागेतील जुन्या अस्तित्वात असलेल्या राहत्या घरांची पावसाळ्यापुर्वी दुरूस्ती/डागडुजी करण्याची कामे स्थानिक नागरीकांमार्फत सुरू असतात.

उत्तन परिसरात खाजगी मालकीच्या जागेत नव्याने सुरू केलेले बांधकाम निदर्शनास आल्यावर त्यावर प्रभाग सहायक आयुक्त यांचेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम मधील तरतूदी अंतर्गत अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करण्यात येते. जानेवारी २०२५ ते आजपावेतो सदर परिसरात तळ + २ मजल्यापर्यंतची एकूण २३ बांधकामांवर तोडक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच जोत्याची एकूण २८ बांधकामांवर तोडक कारवाई करण्यात आलेली आहे व पत्राशेडची एकूण ६ बांधकामे तोडण्यात आलेली असून ३ कुंपणभिंतींवर तोडक कारवाई करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे उत्तन परिसरातील एकूण ६० अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

सदर परिसरात अनधिकृत बांधकाम करताना मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. सद्यस्थितीत उत्तन परिसरात नविन आढळून आलेल्या अनधिकृत बांधकामांवर नियमितपणे निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे.

मौजे उत्तन, येथील शासनाचे मालकीचे एकूण ३७ सर्वे नंबर असून, त्याचे एकूण क्षेत्र ८१५-८७-१० हे. आर आहे. सदर एकूण क्षेत्रापैकी अंदाजित अतिक्रमीत क्षेत्र ३६-२२-६० हे. आर वर पूर्वी पासूनचे निवासी प्रयोजनासाठीचे अतिक्रमण आहेत. तसेच व्यवसायिक कारणास्तव झालेले मौजे उत्तन, येथील स.नं. २०१/अ या शासकीय जागेवरील एकूण ०९ अतिक्रमीत रुमच्या अतिक्रमणधारकास नोटीस बजावून सदरचे अतिक्रमण हे त्यांनी स्वतःहून दुर न केल्याने, अपर तहसीलदार, मिरा-भाईंदर कार्यालयामार्फत दि. १२.०७.२०२४ रोजी निष्कासित करण्यात आलेले आहे.

तसेच, मौजे उत्तन, येथील शासकीय स.नं. ३५० या जागेवरील एकूण ०७ व्यावसायिक अतिक्रमणधारकांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम (३) प्रमाणे सरकारी जमिनीवर केलेले अनधिकृत बांधकाम हे दि.१०.०७.२०२५ पर्यंत स्वतःहून दुर करणेबाबत अपर तहसीलदार, मिरा-भाईंदर कार्यालयामार्फत दि.२५.०६.२०२५ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे. सदर अतिक्रमण हे दि.१०.०७.२०२५ पर्यंत अतिक्रमणधारक यांनी स्वतःहून दुर न केल्यास, सदरचे अतिक्रमण अपर तहसीलदार, मिरा-भाईंदर यांचे कार्यालयामार्फत निष्कासित करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

*********

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१६९८

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.हिरामण खोसकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१६९८ पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेमार्फत माझी वसुंधरा योजनेअंतर्गत एक झाड ३०० रुपये प्रमाणे ३ हजार झाडे लावण्यात आल्याचे दाखवून सुमारे १.५० कोटीचे बिल काढण्यात येणे, प्रत्यक्षात पाहणी करतांना केवळा १००० झाडे लावण्यात आल्याचे आढळून येणे, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेचे सीईओ यांनी गाडीच्या पावत्यांची वसूली करणाऱ्यांकडून त्यांच्या वैयक्तिक परिवारासाठी देवदर्शन व इतर खर्चासाठी १,५०,००० रुपये इतका खर्च करुन घेण्यात येणे, पेढे विक्री करणारे छोटे/मोठे दुकानांदाराकडून प्रत्येकी १००० रुपये हप्ता घेणे, त्र्यंबकेश्वर नगरपालिका हद्दीत मंदिर परिसरात चप्पल स्टँडचे टेंडर काढून स्वतःच्या पतीला देण्यात येणे, त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या प्रत्येक निविदा ही त्यांच्या पतीस देण्याकरिता सीईओ मॅडमचा सहभाग असणे, एकूणच त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेमध्ये अनेक प्रकारे गैरव्यवहार होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन सीईओवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

पर्यावरणाचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी "माझी वसुंधरा" अभियान राज्यामध्ये दि.०२ ऑक्टोबर, २०२० पासून मिशन मोड पध्दतीने राबविण्यात येते. या अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या योजना प्रभावीपणे व राबविण्यासाठी दरवर्षी स्पर्धा घेण्यात येते. त्यानुसार त्रिबंक नगरपरिषदेस माझी वसुंधरा अभियान ३.० (सन २०२२-२३) मध्ये नगरपरिषद व नगरपंचायत गट (१५ हजार पेक्षा कमी) यामध्ये विभागस्तरीय रू.१.०० कोटी बक्षिस प्राप्त झाले. माझी वसुंधरा अभियान ४.० (सन २०२३-२४) मध्ये राज्यस्तरावर उत्तेजनार्थ रू.१.५० कोटीचे बक्षिस प्राप्त झाले असून सदरचा निधी खर्च करण्यात आला नाही.

माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत सन २०२३ मध्ये प्राप्त बक्षिसातील रक्कम पर्यावरण संवर्धन विषयक बाबींसाठी वापरणे आवश्यक असल्याने या मोहिमेकरीता रु.८२.८७ लक्ष रुपयांची २२ कामे व रु.१७.१२ लक्ष रुपयांची बांबू वन तयार करणे, झाडे लावणे या कामांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने दि.२३ फेब्रुवारी, २०२४ व दि. ६ ऑगस्ट, २०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली. यापैकी रु.३९.५७ लक्ष इतकी रक्कम खर्च करुन शहरात विविध प्रजातीची ५४०० झाडे लावण्यात आली. या सर्व कामांवर रु.८६.६१ लक्ष इतकी रक्कम खर्च झाली असून, याकरीता एका झाडावर सरासरी रु.७३२/- इतका खर्च आला आहे. त्रिंबक नगरपरिषद हद्दीत बेल उद्यान व स्मृती वन याठिकाणी स्थानिक नागरिकांनी स्वतःची जनावरे सोडल्याने तर नगरपरिषद हद्दीतील रिंगरोड याठिकाणी रस्त्यांचे काम करतांना काही झाडे नष्ट झाली आहेत.

मुख्याधिकारी, त्रिंबक नगरपरिषद यांनी त्यांच्या वैयक्तिक परिवाराच्या देवदर्शन व इतर खर्चासाठी, पावत्यांची वसुली करणाऱ्यांकडून व पेढे विक्री करणाऱ्या दुकानदारांकडून पैसे घेतले असल्याची बाब निदर्शनास आली नाही. त्रिंबक नगरपरिषद हद्दीतील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर देवस्थान लगत चप्पल स्टँड सुविधा चालविण्याकरीता नगरपरिषदेमार्फत नोव्हेंबर, २०२३ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये प्राप्त निविदांपैकी पात्र निविदाकारास निविदा प्रक्रिया राबवून दि.०१ डिसेंबर, २०२३ रोजीच्या कार्यादेशान्वये दि.०१ डिसेंबर, २०२३ ते दि.३० नोव्हेंबर, २०२६ या कालावधीकरीता चप्पल स्टँड सुविधा चालविण्याचा ठेका देण्यात आला आहे.

मुख्याधिकारी, त्रिंबक नगरपरिषद यांच्या कामकाजाबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे प्राप्त विविध तक्रारींच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दि.०९ मे, २०२५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांना उप विभागीय अधिकारी यांचेमार्फत सर्व तक्रारींची चौकशी करण्याबाबत कळविले. त्यानुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दि.२८ मे, २०२५ च्या आदेशान्वये सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली. या समितीने सादर केलेले प्राथमिक चौकशीचे अहवाल जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक १८ जुन व २६ जून, २०२५ रोजी विभागीय आयुक्त, नाशिक यांना दिले असून या प्रकरणी संपुर्ण चौकशी पुर्ण होऊन अंतिम अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

* * * * * * *

महाराष्ट्र विधानसभा

**श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे. :-**

"मुंबईतील एमएमआरडीए च्या रस्त्यांच्या कामात सबग्रेड लेअरच्या व फाईल फाऊंडेशनची फाईलची कामे अपूर्णावस्थेत असून ठेकेदारांनी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अंदाजे ६०० कोटी रुपयांची बिले अदा करण्यात आल्याची बाब माहे जून २०२५ च्या दरम्यान निदर्शनास येणे, सबग्रेड लेअरची कामे केलेली नसून पाईल फाऊंडेशन च्या पाईल डेप्ट मध्ये २ ते ३ मीटरचे काम करण्यात आलेली नसणे, या प्रकरणी अनेक तक्रारी करुनही कोणतीच कारवाई न होणे, उलटपक्षी तक्रारदारांना धमकविण्याचा तसेच त्यांना कार्यालयात येण्यापासून अडविण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांकडून करण्यात येणे, सदरच्या भ्रष्टाचार सिध्द करण्यासाठी तक्रारदारांनी समक्ष सर्व कामाची ओपन ट्रायल पीट घेऊन चौकशी करण्याची मागणी करुनही अधिक्षक अभियंता श्री. अर्जुन खोतगावकर यांना पाठीशी घालण्यासाठी तक्रारदारांना जाणीवपूर्वक दडपण्याच्या प्रयत्न केला जात असल्याने व बिनधिकतपणे तसेच राजरोजपणे एमएमआरडीए मध्ये आर्थिक गैरव्यवहार होत असून शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान केले जात असतानाही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्यशासनाने तातडीने सखोल सखोल चौकशी करुन एमएमआरडीए मधील भ्रष्ट अधिकारी व अधिक्षक अभियंतावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रीया."

**मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगरपालिका हद्दीबाहेरील क्षेत्रामध्ये विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (Extended MUIP) व बाह्य रस्ते विकास प्रकल्प (Outer Area Road Development Scheme, OARDS) या दोन योजनांतर्गत नागरी सुविधांची विकास कामे केली जातात. या मध्ये रस्ते, पुल, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, इत्यादी प्रकारच्या कामांचा समावेश आहे. यातील काही कामे स्थानिक संस्थांना (महानगरपालिका, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद) प्राधिकरणामार्फत निधी उपलब्ध करून देऊन तर काही कामे प्राधिकरणामार्फत करण्यात येतात. प्राधिकरणामार्फत अंमलात येणारे सर्व कामांवर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय दर्जाच्या सल्लागाराची नेमणूक केली जाते व त्यांच्या देखरेखीखाली कामे पूर्ण केली जातात.

लोकप्रतिनिधींकडून प्राधिकरणाच्या Extended MUIP व OARDS या योजनांतर्गत केलेल्या कामांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यास्तव प्राधिकरणामार्फत एकुण ६१ कामांची यादी आवश्यक त्या कागदपत्रांसहित आय.आय.टी. मुंबई या नामांकित संस्थेकडे पाठविण्यात आली. सदर तक्रार मुख्यत्वे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या Extended MUIP प्रकल्प व OARDS प्रकल्प यामधील रस्त्यांच्या सबग्रेड लेअर व पाईल फाऊंडेशनच्या पाईल डेप्ट या कामात अनियमिततेबाबत आहे.

सदर विषयी आय.आय.टी. मुंबई या संस्थेमार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी करून कंत्राटातील तरतूदींनुसार कामे करण्यात आली आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात आली आहे. त्यानुसार आय.आय.टी मुंबई (IIT Bombay) दि. २४/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल प्राधिकरणास सादर करण्यात आलेला असून आय.आय.टी., मुंबई (IIT Bombay) यांच्या अहवालामध्ये सदर तक्रारीच्या अनुषंगाने विषयांकित कामे ही कंत्राटातील तरतुदीनुसार करण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे. तसेच आय.आय.टी., मुंबई (IIT Bombay) ने या कामांमध्ये काही उपाययोजना सूचावल्या असून त्याबाबतची कार्यवाही प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

*******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८४४ पुढीलप्रमाणे आहे:-**

"विद्यमान मुख्यमंत्री यांना वि.स.स. लोकप्रतिनिधी यांनी केलेली मागणीत्या प्रमाणे मुख्यमंत्री सचिवालयाचे ई ऑफिस पत्र क्र.८४७९०८४ दि.१०/०६/२५रोजी जिल्हाधिकारी अमरावती यांना कार्यवाही करण्यासंबंधाने दिलेले निर्देश. निर्देश प्रमाणे जिल्हाधिकारी अमरावती यांनी त्यांचे पत्र क्र.२१९/२५ दि.२४/०६/२५ रोजी मुख्यमंत्री सचिवालय मुंबई येथील कक्ष अधिकारी यांना पत्र पाठविले असणे. ज्या पत्रामध्ये मौजा बडनेरा जिल्हा अमरावती येथील सर्वे नंबर ११० मधील ०२:३८ हे आर शासकीय जमीन अमरावती मनपाला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई.बस योजनेअंतर्गत ई बस डेपो व चार्जिंग च्या वापराकरिता प्रस्तावित जागा विनामूल्य अथवा नाममात्र दराने एक रुपया भाडेतत्वावर देण्यासाठी शासन स्तरावरुन आदेश देण्याची मागणी वरील जिल्हाधिकारी अमरावती यांचे पत्रात नमूद असणे. या संबंधाने तातडीने घ्यावायाचा निर्णय, करावयाची कार्यवाही व शासनाची या संबंधाने प्रतिक्रिया "

---

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मा.श्री.रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी त्यांच्या दि.०७.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना मौजा बडनेरा सर्व्हे क्र. ११० मधील २.३८ हे.आर जागा महानगरपालिका,अमरावती यांना पी.एम.ई बस योजने अंतर्गत ई-बस डेपो व चार्जिंगच्या वापरा करिता विनामूल्य अथवा नाममात्र एक रुपया भाडेतत्वावर देण्याबाबत विनंती केली होती. सदर पत्रावर मा.मुख्यमंत्री महोदयांनी " जिल्हाधिकारी, अमरावती तपासून कार्यवाही करावी." असे निर्देश दिले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी त्यांच्या दि.२४.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कक्ष अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय यांना सदर प्रकरणी प्रस्तावित जागा विनामूल्य देण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार शासन स्तरावर असल्याकारणाने सदर प्रस्ताव यापूर्वीच अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे सादर केला असल्याबाबत अहवाल सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, अमरावती यांनी त्यांच्या दि.१५.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई बस योजने अंतर्गत ई-बस डेपो व चार्जिंगच्या वापरा करिता मौजा बडनेरा सर्व्हे क्र. ११० मधील २.३८ हे.आर शासकीय जागा महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्तावित जागेचे येणारे बाजारमूल्य भरणा करण्यास महानगरपालिका, अमरावती तयार आहे किंवा नाही याबाबत मा. अ.मु.स.(महसूल) यांनी दिलेल्या निर्देशानुसार नगर विकास विभागाला अभिप्राय देण्याबाबत विनंती करण्यात आली असता अमरावती महानगरपालिकेकडे स्वत:चे उत्पन्नाचे स्त्रोत अत्यंत कमी स्वरुपाचे असल्याने तसेच अमरावती महानगरपालिकेवर आर्थिक दायित्वे मोठ्या प्रमाणात असल्याने अमरावती

महानगरपालिकेस मूल्यांकन रक्कमेचा भरणा करणे शक्य होणार नसल्याने प्रस्तावित जागा विनामूल्य अथवा नाममात्र १ रु भाडेपट्ट्याने देण्याबाबत नगरविकास विभागाने विनंती केली होती.

प्रस्तावित जमिनीचे येणारे मूल्यांकन रु. १.००/-कोटीपेक्षा जास्त असल्यामूळे सदर प्रकरणी वित्त विभागाचे अभिप्राय आवश्यक असल्याने सदर प्रकरणी वित्त विभागाला अभिप्राय देण्याची विनंती केली असता वित्त विभागाने प्रस्तावित जागेबाबतची अमरावती महानगरपालिकेकडून प्रचलित बाजारमूल्यानुसार येणारी किंमत वसुल करुन जागा हस्तांतरीत करावी असे अभिप्राय दिले होते. वित्त विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदय यांना अवलोकनार्थ तथा आदेशार्थ सादर केला असता मा.मंत्री(महसूल) यांनी " विनामूल्य भाडेतत्वावर देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे" असे प्रस्तावित केले व सदर प्रस्तावास मा.मुख्यमंत्री (महोदय) यांनी संमती दर्शविली. तरी, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने प्रस्तावित जागा पी.एम.ई. बस योजनेंतर्गतच्या ई-बस डेपो व चार्जिंगच्या वापराकरिता महानगरपालिका, अमरावती यांना मूल्यरहित पध्दतीने भोगवटदार वर्ग-२ या धारणाधिकारावर ३० वर्षासाठी भाडेपट्याने देण्याबाबतचे ज्ञापनाचा मसुदा तयार करुन वित्त विभागाकडे अभिप्रायार्थ सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने, प्रस्तावाधीन जमीन अमरावती महानगरपालिकेस मूल्यरहित पध्दतीने भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर ३० वर्षासाठी भाडेपट्ट्याने द्यावयाची असल्यास मा. मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करुन उचित निर्णय घ्यावा असे अभिप्राय सादर केले होते.

सदर वित्त विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने मौजा बडनेरा, ता.जि. अमरावती येथील सर्व्हे क्र.११० मधील २.३८ हे. आर शासकीय जमीन अमरावती महानगरपालिकेस केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई. बस योजनेंतर्गत ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशन या प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३८, व ४० व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ नियम ५ व नियम ३५ मधील तरतुदींन्वये प्रचलित अटी व शर्तींच्या अधीन राहून ३० वर्षासाठी विनामूल्य भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव दि.०७.१०.२०२५ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीसमोर सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने सदर प्रस्ताव मा.मंत्रिमंडळ बैठकीत मान्य होऊन शासन निर्णय दि.२७.१०.२०२५ अन्वये प्रस्तावित जागा महानगरपालिका, अमरावती यांना पी.एम.ई. बस योजनेंतर्गत ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशन या प्रयोजनासाठी मूल्यरहित पध्दतीने ३० वर्षासाठी भाडेपट्ट्याने प्रदान करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

*-*-*-*

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. २००४**

श्री. उत्तमराव जानगर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"बोरिवली पश्चिमेतील रोशननगर येथे असलेल्या गुर्जर अपार्टमेंट CHSL (अल्का) या इमारतीत मंजूर आराखड्याच्या पलीकडे बेकायदेशीर ८ वा मजला उभारण्यात आलेला असणे, सदर बांधकाम हे I.O.D., C.C., MMC कायदा १८८८, MCGM इमारत नियम, तसेच अग्निशमन विभागाच्या तरतुदींचे उल्लंघन केले असणे, सदर प्रकरणात MCGM अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई करण्यात आली नसणे, खोटी माहितीद्वारे अहवाल सादर करून विषय दाबण्याचा प्रयत्न करण्यात येणे, संबंधित ADFO व अन्य अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी न करता अहवाल सादर करणे, बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांना अप्रत्यक्ष संरक्षण दिले जात असणे, बिल्डरने लाच दिल्याचा दावा केल्यामुळे संपूर्ण प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झाला असल्याचे निदर्शनास येणे, मनपाने या बेकायदेशीर मजल्याच्या पुनर्बांधणीला मान्यता दिली असणे, ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासकीय प्रथा, कायदे यांचा अवमान असणे, सदर गंभीर प्रकरणाची CBI /ED मार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात येणे, दोषी MCGM अधिकाऱ्यांवर "महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९" व "कर्मचारी कार्य विलंब प्रतिबंधक कायदा २००५" अंतर्गत कठोर प्रशासकीय कारवाई करण्याबाबत तसेच संबंधितावर FIR दाखल करून, बेकायदेशीर कृत्यांवर कायदेशीर निबंध घालण्याचीही मागणी करण्यात येणे, सदर बिल्डर/डेव्हलपरच्या इतर प्रकल्पांचीही CBI/ED चौकशी करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

याप्रकरणी विषयांकित भूभाग अंतिम भूखंड क्र.९३, नगर नियोजन के. I बोरीवली (पश्चिम) तसेच न.भू.क्र. ५००, ५००/१ ते ४ मौजे बोरीवली येथील इमारतीमधील २ पातळी तळघर (स्टँकपार्किंग + तळमजला (IT Office) + पहिला मजला (IT Office + Society Office) + दूसरा मजला (IT Office + Fitness Center) + तिसरा मजला ते सातवा निवासी वापरासाठी फाईल क्र.CHE/A-५२८५/BP(WS)/AP दिनांक ०६.०८.२०१५ अन्वये भोगवटा प्रमाणपत्र (OCC) मंजुर करण्यात आले होते.

सदर इमारतीमध्ये मंजुर भोगवटा प्रमाणपत्रापुढे अतिरिक्त बांधकाम केल्याबाबत ब-याच तकारी प्राप्त झाल्या होत्या, सदर तक्रारी प्रचलीत धोरणानुसार पुढील कार्यवाहीसाठी सक्षम प्राधिकारी पदनिर्देशित अधिकारी आर/मध्य विभाग यांना पाठविण्यात आल्या होत्या, त्याअनुषगांने पदनिर्देशित अधिकारी आर/मध्य विभाग यांच्या मार्फत सदर इमारतीवरील अनधिकृत बांधकामाबाबत MRTP Act-१९६६ मधील कलम ५३ (१) अन्वये दिनांक १९.०६.२०२३ नोटीस बजावण्यात आली असल्याचे आढळून आले.

तदनंतर, मालकाने नेमणूक केलेल्या वास्तुविशारदामार्फत सदर इमारतीतील सातव्या तसेच आठव्या मजल्याचे पाडकाम करून त्यांची पुर्नबांधणी करण्याबाबत विकास नियंत्रण नियमावली-२०३४ अंतर्गत अनुज्ञेय असणा-या विविध सवलतीसाठी मा. आयुक्तांची मंजुरी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता व सदर अनुज्ञेय असणा-या फक्त सवलतींच्या प्रस्तावास दिनांक २३.०८.२०२३ रोजी ना. आयुक्तांची मंजुरी प्राप्त झाली होती. सदर मंजुरीच्या अनुषंगाने वास्तुविशारदामार्फत IOD (प्रारूप नकाशे) व बांधकाम परवाना (C.C.) यासाठी विहित अधिमुल्याचा भरणा महानगरपालिकेस करणे अपेक्षित होते. परंतू सदर विहित अधिमुल्याचा भरणा केला नसल्याने आजमितिस सदर परवानगी देण्यात आलेली नाही.

आर/मध्य विभागातील नमूद गुर्जर अपार्टमेंट को.ऑ. हो. सो. (अल्का) एफ.पी. नं. ९३. टी.पी. एस. नं. ५००, ५००/१ ते ४, रोशन नगर, बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९२ येथील आठव्या मजल्याच्या अनधिकृत बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ५३ (१) क्र. RC/DOIRC/०१५/५३-१-MRTP ACT/ RQ९५NO१/१९-०६-२०२३ dated १९.०६.२०२३ अन्वये संबंधित मालक/ताबेदार यांना नोटीस बजाविण्यात आली असून सदर नोटीसच्या विरोधात पक्षकाराने मा. नगर दिवाणी न्यायालयात क्र. २१८८ ऑफ २०२३ अंतर्गत दावा दाखल केला आहे. सदर प्रकरणी मा. न्यायालयाने दिनांक ०५.०९.२०२३ रोजी सद्यस्थितीत सदर इमारत जैसे थे ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने सहाय्यक विधी अधिकारी आर/मध्य यांना वेळोवेळी करण्यात आलेल्या पत्रान्वये सद्यस्थितीत मा. न्यायालयात क्र. २१८८ ऑफ २०२३ अंतर्गत न्यायप्रविष्ठ असलेल्या दाव्याची सुनावणी जलदगतीने करुन स्थगिती आदेश लवकरात लवकर रद्द करण्याबाबत कार्यवाहीकरिता कळविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत सदर प्रकरण मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून पुढील सुनावणी दिनांक २८.०८.२०२५ रोजी ठेवण्यात आली आहे. सबब, पुढील योग्य ती कार्यवाही मा. न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात येईल.

******

नगर विकास विभाग लक्षवेधी सूचना क्र. २०१९

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुरेश धस, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०१९ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पुणे म.न.पा. च्या नगर अभियंता या पदावर श्री प्रशांत मधुकर वाघमारे गेल्या २० ते २५ वर्षापासून कार्यरत असणे, या पदाचा गैरवापर करुन हजारो कोटींची स्थावर व जंगम मालमत्ता त्यांनी जामा केल्याबाबत पुणे शहरातील व राज्यातील अनेकांनी राज्य शासन, सी.आय.डी. इन्कम टॅक्स, सी.बी.आय. इत्यादींकडे वारंवार केलेल्या तक्रारी, त्यांचे मित्रपरिवार-नातेवाईक व संबंधितांच्या माध्यमातून अनेक बोगस-कंपन्या स्थापन करून त्याच्यामाध्यमातून मोठी गुंतवणूक करणे भ्रष्टाचाराच्या-मार्गातून कोट्यावधी रुपयांची माया-जमवल्या मुळे यापूर्वी त्यांच्यावर क्रिमिनल, एंटी-करप्शन, सी.आय.डी. सी.बी.आय. मार्फत गुन्हे दाखल होऊन चौकशी सुरू असणे, एवढे गंभीर गुन्हे दाखल असून ही प्रशांत वाघमारे त्याच पदावर अजूनही कायम असणे, श्री.प्रशांत वाघमारे यांची गेल्या २५ वर्षापासून एकाच जागी नेमणूक शासन करीत असल्यामुळे पुणे-शहरातील लाखो करदाते नागरिक यांनी म.न.पा. तसेच राज्य-शासनाकडे वारंवार-तक्रारी करुनही प्रशांत वाघमारे यांची बदली करण्यात न येणे, तसेच भ्रष्टाचार विरोधी विभागांनी त्यांची चोकशी करुन गुन्हे दाखल होऊनही त्यांच्या विरोधात कोणतीच कारवाई करण्यात येत नसल्याने जनतेच्या मनात शासन हेतुता हा चाल ढकल व हलगर्जीपणा करत असल्याबद्दल निर्माण झालेला ठाम विश्वास शासन हेतू परस्पर कारवाई करत नसल्याबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड, व संताप, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

शहर अभियंता हे पद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ नुसार भरायचे संविधानिक आणि एकाकी पद आहे. श्री. वाघमारे प्रशांत मधुकर यांची सदर पदावर दि.०२/०८/२००३ रोजी शासनच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर पद हे एकाकी असलेमुळे बदलीपात्र ठरत नाही.

श्री.प्रशांत वाघमारे यांनी मित्रपरिवार नातेवाईक यांचे माध्यमातून बोगस कंपन्या स्थापन केल्याबाबत कोणत्याही तक्रारी पुणे महानगरपालिकेकडे प्राप्त नाहीत. एंटीकरप्शन, सी.आ.डी., इन्कम टॅक्स, सी.बी.आय. या शासनाच्या स्वतंत्र अधिकारिता असलेल्या संस्था आहेत, या संस्थांकडे प्राप्त तक्रारीनुसार कार्यवाही करण्याचा अधिकार व प्रक्रिया स्वतंत्र आहे. अशा संस्थांकडे काही तक्रारी प्राप्त झाल्याबाबत कोणतीही माहिती पुणे महानगरपालिका नाही.

श्री.प्रशांत वाघमारे यांच्याबाबत अशा स्वरुपाच्या कोणत्याही तक्रारी व गुन्हे दाखल नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ नुसार भरायचे संविधानिक आणि एकाकी पद असल्यामुळे त्यांची अन्यत्र बदली करण्याचा वा उपरोक्त प्रमाणे कोणतीही माहिती नसल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

********

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक २०३३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. देवेंद्र कोठे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०३३ खालीलप्रमाणे आहे :-

"मौजे. करंजे तर्फ सातारा येथील स.नं. ८५ संपूर्ण शासकीय मिळकत (सर्व धर्मिय मसनवाटा) असणे. सदर जमिनीचे क्षेत्र बगिचा याकारणास्तव आरक्षित असणे. परंतु सदर जागेत काही व्यक्तींनी शासनाच्या कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची पुर्व परवानगी न घेता मस्जिद, कंपाऊंडवॉल, संडास टाकी, फाऊंडेशनचे बांधकाम केलेले असणे. सदरजागेत अनधिकृत धार्मिक स्थळ बांधणाऱ्यां कडून इतर धर्मियांना येण्यास मज्जाव होणे. त्यामुळे असंतोषाची भावना निर्माण होणे, मौजे. करंजे तर्फ सातारा येथील स.नं. ८५ येथील अनाधिकृत धार्मिक स्थळाचे निष्काशील करणे बाबत समस्त करंजे ग्रामस्थांनकडून दि. ०२-११-२०१९ रोजी जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक आणि नगरपरिषद यांना निवेदन दिलेले असणे,दि. ०४-११-२०१९, रोजी सातारा नगरपरिषद प्रशासनाद्वारे सदर अनाधिकृत धार्मिक बांधकाम निष्कासीत करण्याबाबत नोटीस बजावलेली असणे.सदर नोटीसी विरोधात संबंधित धार्मिक स्थळाच्या विश्वस्तांकडून वक्फ न्यायालयात दाद मागितली गेलेली असणे. संबंधित धार्मिक स्थळांच्या विश्वस्त मागणी न्यायालयाने फेटाळलेली असणे. तरीही अद्याप सदरचे अनाधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सातारा नगर परिषद प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेली नसणे. यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली असंतोषाची भावना त्यामुळे निर्माण होणारा सामाजिक असंतोषयाप्रकरणी शासनानेतातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मौजे करंजे तर्फ सातारा, ता. सातारा, जि. सातारा येथील ग. नं. ८५ असलेल्या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर मसनवाटीकडे ( मुसलमान आणि बोहरी लोकांचे ) अशी मूळ नोंद होती. तथापि, सन १९८९-९० नंतर भोगवटादार म्हणून कब्रस्थान मुस्लीम संस्था करंजे अशी नोंद ७/१२ उताऱ्यावर आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) नुसार सातारा शहराच्या प्रारुप विकास योजनेमध्ये ग. नं. ८५ मधील ०.८६ हे.आर क्षेत्रापैकी ०.४१ हे.आर क्षेत्र आरक्षण क्र. 1/२९ बगीचा या कारणासाठी तर ०.२१ हे.आर क्षेत्र रहिवासी वापरासाठी व उर्वरीत ०.२४ हे.आर क्षेत्र अस्तित्वातील कब्रस्थानसाठी आरक्षित दर्शविण्यात आला आहे. सदर प्रारुप विकास योजनेस अद्याप अंतिम मान्यता प्राप्त झालेली नाही. या पडीक जमिनीवर अनधिकृत बेकायदेशीर व विनापरवाना धार्मिक स्थळाचे

बांधकाम होत असल्याबाबत ग्रामस्थांनी सातारा नगरपरिषदेकडे दि.०२.११.२०१९ रोजी तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने या जागेवरील वॉल कंपाऊंड, संडास टाकी व फाउंडेशन ही अनधिकृत बांधकामे काढून टाकण्याबाबत संबंधितांवर नगरपरिषदेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ व ५३ नुसार दि.०४.११.२०१९ रोजी नोटीस बजावण्यात आली. सदर नोटीशी विरोधात संबंधित संस्थेने मा.वक्फ न्यायाधिकरणात दावा दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये अंतिम निर्णय झाला नसल्याने व मा.न्यायाधिकरणाने अनधिकृत बांधकाम पाडण्यास कोणतीही स्थगिती न दिल्याने सदर जागेवर असलेले अनधिकृत बांधकाम नगरपरिषदेमार्फत दि.०२.०५.२०२३ रोजी पाडण्यात आले. दरम्यान सदर जागेवर कब्रस्थान मुस्लीम संस्था करंजे यांनी केलेले अनधिकृत अतिक्रमण काढून टाकण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.१४९/२०२४ दाखल झाली. या याचिकेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सातारा यांनी सदर प्रकरणी अतिक्रमण निश्चित करण्यासाठी संबंधित जमिनीची पाहणी करुन तसेच संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची व कागदपत्रे सादर करण्याची संधी देऊन सुनावणी घेऊन, सदर जागा सार्वजनिक असल्याचे आढळून आल्यास या जागेवरील अतिक्रमण नियमानुसार हटविण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दि.२३.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दिले. त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी, सातारा यांच्या दालनात दि.१०.०६.२०२५ रोजी सुनावणी झाली असून, सुनावणीमध्ये जिल्हाधिकारी, सातारा यांनी उप विभागीय अधिकारी, सातारा यांना सदर प्रकरणी चौकशीसाठी प्राधिकृत केले आहे. उप विभागीय अधिकारी, सातारा यांनी सदर प्रकरणाची सुनावणी घेऊन सदर क्षेत्रातील कबरी व्यतिरिक्त असणारी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन नियोजन प्राधिकारी सातारा नगरपरिषद यांनी निष्कासित करावे असे आदेश दिले होते. सदर आदेशाच्या विरुध्द संबंधित संस्थेने मा. उच्च न्यायालय मुंबई, सर्किट बेंच, कोल्हापूर येथे रिट पिटिशन दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

...........................

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. २०५६**

**मा.श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०५६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबईतील कांदिवली पश्चिम येथील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील तत्कालिन उपाध्यक्षाच्या श्री. रामकृष्ण मंडळ, या न्यासास स्वदेशी इलेक्ट्रोक वॉच, आश्रम शाळा व शेती या प्रयोजनाच्या अटी व शर्तीवर सीएस क्र.१६४/१/११ या प्रदान केलेल्या १८ एकर १२ गुंठे क्षेत्रफळाच्या भुखंडाच्या वापराबाबत न्यासाने अनियमितता, गैरप्रकार केल्याचा प्रकार नुकताच निर्दशनास येणे,उक्त भुखंड ज्या प्रयोजनासाठी शैक्षणिक संस्थेस प्रदान केलेला होता त्याचा वापर न करता विकासकाचे अर्थिक हित जपण्यासाठी बेकायदा वापर करण्यात येणे, संस्थेच्या भुखंडातून जाणारा अंतर्गत रस्ता व डीपी रोड यामधून मिळालेल्या टीडीआरचा विकासकाने गैरवापर करुन अर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी संस्थेला प्राप्त तक्रारींनुसार वेळोवेळी शासनाने दंड ठोठावणे व माफ करणे, धर्मादाय आयुक्ताने कारवाई करण्याकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करणे, अमराठी विकासकाने व्यावसायीक कारणासाठी श्री. रामकृष्ण मंडळ न्यासाचा ताबा घेऊन भुखंड ताब्यात घेणे, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी विरुध्द कारवाई करण्यात येऊन सदर भुखंड जनहिताच्या कामासाठी ताब्यात घेऊन महापालिकेस हंस्तातरण करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन**

कांदिवली (प), सर्व्हे. क्र. १६४/१/११ (नवीन न.भू.क्र. ११००/A, ११००/B, ११००/C, ११००/E, ११००/G/४, ११००/G/५) या भूखंडांवर दोन अभिन्यास बृहन्मुंबई महापालिकेने मंजूर केले आहेत. यापैकी अभिन्यास क्र. CHE/११८७/LOR अंतर्गत भूखंडावर प्राथमिक व माध्यमिक शाळा, सभागृह इमारत व ६ रहिवाशी इमारतींना महापालिकेने मंजुरी दिली आहे.

मंजूर विकास योजना-२०३४ नुसार न.भू.क्र ११००/A ते ११००/F वर अस्तित्वातील प्राथमिक/माध्यमिक शाळा (EE१.२) असे निर्देशन आहे व सद्यस्थितीत तेथे नरवणे शाळा व विद्यालय आहे. तसेच, सदर भूखंड १३.४० मी. (२ nos), व १८.३० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधित आहे. सदर भूखंड १३.४० मी. (२ nos) रुंद रस्ता रुंदीकरणाने बाधित असून रहिवाशी क्षेत्रात स्थित आहे. सदर भूखंड मंजूर २७.४५ मी. रुंदीच्या महात्मा गांधी रस्त्याने बाधित आहे. सदर भूखंड EP-RS५६ मध्ये समाविष्ट करण्यात आला असून सदर EP-RS५६ शासनाने दि. १२.०९.२०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर केले आहे. सदर मंजूरीनुसार प्रस्तावित १३.४० मी. रुंदीचा विकास नियोजित रस्ता अस्तित्वातील विकसित रस्त्याच्या मार्गरेषेनुसार प्रस्थापित/कायम केला आहे.

प्रस्तुत अभिन्यासा अंतर्गत १३.४० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित साधारणत: २१२१.३० चौ.मी. जागेचा आगाऊ ताबा मालकाने महापालिकेला हस्तांतरित केला आहे.

मंजूर अभिन्यास क्र.CHE/WS-II/५८१०/R/S/३०२ या अभिन्यासा अंतर्गत भूखंडावर प्राथमिक शाळा विकसित करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे व उर्वरित भूखंड वैद्यकिय महाविद्यालयासाठी, इतर संस्था, खेळाचे मैदान, प्राथमिक व माध्यमिक शाळेकरिता आरक्षित आहे.

मंजूर आराखडा २०३४ नुसार न.भू.क्र. ११००G/१ ते ११००G/५ वर RR२.१ (पुनर्वसन व पुनर्स्थापन), ROS१.४ (खेळाचे मैदान) (मोठ्या आकाराच्या आरक्षणाचा भाग), RE१.२ (प्राथमिक/माध्यमिक शाळा), RE४.४ (इतर संस्था) (मोठ्या आकाराच्या आरक्षणाचा भाग) व RE४.२ (वैद्यकीय संस्था) (मोठ्या आकाराच्या आरक्षणाचा भाग) ही आरक्षणे आहे. तसेच, सदर भूखंडावर EE१.२ (अस्तित्वातील प्राथमिक/माध्यमिक शाळा) असे निर्देशन आहे. सदर भूखंड १८.३० मी. (४ nos) व १३.४० मी. (३ nos) रूंदीच्या विकास नियोजित रस्त्याने बाधित आहे. सदर भूखंड १३.४० मी. (२ nos) रुंद रस्ता रुंदीकरणाने बाधित असून रहिवाशी क्षेत्रात स्थित आहे. सदर भूखंड EP-RS१२३ मध्ये समाविष्ट करण्यात आला असून सदर EP-RS१२३ शासनाने दि. १२/०९/२०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर केले आहे. सदर मंजूरीनुसार न.भू.क्र. ११००G/५ हा भूखंड खेळाच्या मैदानासाठी (ROS१.४) आरक्षित केलेला आहे.

सदर अभिन्यासांतर्गत डी. पी. रस्त्याने बाधित जागेचा आगाऊ ताबा जमीन मालक श्री. रामकृष्ण शिक्षण मंडळ यांनी महापालिकेस हस्तांतरीत केला असून, त्यानुषंगाने प्रस्तुत प्रकरणी, संस्थेच्या भूखंडातून जाणारा अंतर्गत रस्ता व डीपी रोड यामधून निर्माण झालेल्या टीडीआर पर्यंतची कार्यवाही महापालिकेमार्फत झाली असल्याचे महापालिकेचे अहवालात नमूद आहे.

.....................................

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २२२५

श्री.अशोक पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील उपनगरातील भांडुप पश्चिम रेल्वे स्थानकाच्या जवळचे असलेल्या जी. के. डब्ल्यू या कंपनी वाजूच्या भांडुप पश्चिम ते भांडुप पूर्व सी.जी.एस कॉलनी पर्यंत नवीन ब्रिज बनवण्यास मंजुरी मिळणे, मंजुरी मिळून देखील ब्रिज बांधण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ होणे, या ~~गंभीर~~ प्रकरणी भांडुप विभागातील लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांमधील वाढत असलेला तीव्र असंतोष, ब्रिज बांधण्यास विलंब होत असल्याबाबतची कारणे याबाबत चौकशी करण्याची नितांत गरज व शासनाची याबाबत प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मुंबई उपनगरातील भांडुप पूर्व ते भांडुप पश्चिम येथे जाण्यासाठी भांडुप रेल्वे उड्डाणपूल बांधण्यासाठी महानगरपालिकेने दि.१६.१०.२०२३ रोजी कार्यादेश दिलेले आहेत. सदर पुलाचे बांधकाम प्रगतीपथावर असुन सदर काम करण्यासाठी पश्चिमेकडील जी. के. डब्ल्यू. कंपनीची जमीन हस्तांतरण करून तेथे काम सुरू करण्यात आलेले आहे. सदर पुलाच्या पूर्वेकडील बांधकामासाठी केंद्र शासनाच्या मालकीची खार जमीन हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच पूर्वेकडील उड्डाणपुलाची पायाभरणी करण्याकरीता सध्या अस्तित्वात असलेल्या जलवाहिन्या याचा अडथळा निर्माण होत असल्याने प्रथमतः जलवाहिन्या स्थलांतरण करण्याकरीता जल अभियंता या विभागामार्फत स्थलांतर करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. रेल्वेच्या भागातील रेल्वे उड्डाणपूलाचे आराखडे मंजुरी साठी मध्य रेल्वे कडे पाठविण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर पुलाचे काम २० टक्के पूर्ण झालेले आहे. सदर रेल्वे उड्डाणपुलासाठी आवश्यक असलेली केंद्र शासनाच्या मालकीची जागा हस्तांतरीत झाल्यानंतर तसेच रेल्वे उड्डाणपूलाच्या आराखड्यास मध्य रेल्वेची मंजुरी प्राप्त करून मार्च २०२७ पर्यंत सदर उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन



लक्षवेधी सूचना क्रमांक - २३७२

**सर्वश्री. महेश (दादा) किसन लांडगे, रोहीत पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अमिन पटेल, बापूसाहेब पठारे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इंद्रायनी नदी सुधार प्रकल्पास नगरविकास विभागांतर्गत अमृत योजनेतून तत्वत: मान्यता मिळाली असणे, सदर प्रकल्प प्रशासकीय मान्यतेसाठी SLTC (State Level Technical Committee) मध्ये प्रलंबित असणे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) तर्फे इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प अहवाल सादर होणे, तसेच, पिंपरी-चिंचवड महानरगपालिका हद्दीत पवना नदी प्रदूषण रोखण्यासाठी सीएमई भोसरी, ताथवडे आणि मामुर्डी या तीन ठिकाणी STP(Sewage Treatment Plant) प्रस्तावित असणे, त्याचा प्रकल्प अहवालास महानगरपालिकेने राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडे पाठविला असणे, NRCD केड प्रकल्प अहवाल व प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची व केलेली कार्यवाही.""

-: <u>मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u> :-

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इंद्रायणी नदी सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पास केंद्र शासनाच्या शिखर समितीने मान्यता दिली असून सदर प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत गठित राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक ०३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत समितीने प्रस्तुत प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या मार्गदर्शक सुचनानुसार सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पाशी संबंधित अनुज्ञेय घटकांचा समावेश करून फेरसादर करण्याचे निर्देश दिले असून त्यास अनुसरून प्रस्ताव फेरसादर करण्याची कार्यवाही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय (NRCD) अंतर्गत इंद्रायणी नदी संवर्धनाचा रुपये ५७७.१६ कोटी किंमतीचा प्रस्ताव पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव राज्यस्तरीय सचिव स्तरावरील प्रदत्त समितीच्या शिफारशीनुसार मंजूरीसाठी दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन असल्याचे तसेच, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी इंद्रायणी नदी प्रदूषण प्रतिबंध व नदी पुनरुज्जीवन करण्यासाठीचा रुपये १६३१ कोटी किंमतीचा एकत्रित सविस्तर प्रकल्प अहवाल व राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा पुणे शहरातील पवना नदी प्रदूषण प्रतिबंध व नदी पुनरुज्जीवन करण्यासाठीचा रुपये ९७८ कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल असे दोन्ही प्रस्ताव पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर करण्यात आले असून यावर विभागस्तरावर छाननी सुरू असून सदर प्रस्ताव सचिव स्तरावरील प्रदत्त समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात येणार असून समितीच्या शिफारशीनंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात येतील असे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने कळविले आहे.

*****

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र. २३७५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुनिल कांबळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३७५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पुणे महानगरपालिकेत ८ ते १० जणांची एक टोळी माहिती अधिकाराचा सातत्याने हेतुपुरस्सर गैरवापर करत असून, वारंवार एकाच स्वरूपाची माहिती मागवून अधिकाऱ्यांना धमकावते व थोर पुरुषांच्या जयंतीच्या नावाखाली अवाजवी आर्थिक मागण्या करते. यामुळे शासकीय अधिकाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून कार्यक्षमतेवर परिणाम झाला आहे. या प्रकाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी प्रशासक व आयुक्तांकडे तक्रारी करूनही समाधानकारक कार्यवाही झालेली नसणे. मा. राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांनी अशा प्रकारावर कठोर भूमिका घेत एक महत्त्वाचा निकाल दिला असणे, ज्यात जनहित नसलेल्या व त्रासदायक द्वितीय अपिलास फेटाळण्यात आले असणे. सदर प्रकार हा संघटित स्वरूपात होत असल्याने माहिती अधिकाराच्या नावाखाली शासकीय यंत्रणेला वेठीस धरणाऱ्या टोळीवर मकोका सारखा कठोर कायदा अथवा तत्सम कडक धोरण अवलंबणे आवश्यक असणे, शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शासकीय यंत्रणेला सुरक्षित, पारदर्शक व कार्यक्षम वातावरण मिळण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिकेत सर्व विभागातील माहिती अधिकाराच्या कामकाजा संदर्भात माहिती अधिकार समन्वय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रस्तुत लक्षवेधी सूचनेमध्ये नमुद केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेत ८ ते १० जणांची टोळी वारंवार एकाच स्वरुपाची माहिती मागवून अधिकाऱ्यांना धमकावते व थोर पुरुषांच्या जयंतीच्या नावाखाली अवाजवी आर्थिक मागण्या करते अशा स्वरुपाची तक्रार मनपा अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली नाही. तथापि पुणे मनपाच्या आरोग्य विभागाकडून एक अर्जदार एकाच विषया संबंधी वारंवार माहिती मागवून व वैयक्तिक माहिती मागवून त्रास देत असल्याची तक्रार समन्वय अधिकारी यांचेकडे प्राप्त झाली होती. वरील तक्रार विचारात घेता व माहिती अधिकार अधिनियमातील तरतूद विचारात घेता एखाद्या नागरिकाने एखाद्या विषयावर वारंवार माहिती मागविल्यास त्यांचे विरुद्ध कारवाई करण्याची माहिती अधिकार अधिनियमात तरतूद नाही किंबहुना सदर कायद्याने त्यांना प्रत्येक वेळी माहिती उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त ठरते. तसेच व्यापक जनहीत नसलेली व वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली गेल्यास माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ मधील योग्य ती तरतूद वापरुन माहिती नाकारात येवू शकते.

********

नगर विकास विभाग लक्षवेधी सूचना क्र. २३७६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुनिल कांबळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३७६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"पुणे महानगरपालिका स्थापत्य विभागात काही शाखा अभियंत्यांना उप अभियंता पदावर पदोन्नती देण्यात आली असणे यामध्ये आर्थिक देवाण घेवाण झालेली असणे या प्रक्रियेत काही अभियंत्यांना पदोन्नतीनंतर पुन्हा त्यांच्या मूळ खात्यातच नियुक्त करण्यात आले आहे. यामागे आर्थिक देवाण-घेवाण झाल्याचे सांगितले जात असून, यासंबंधी वृत्तपत्रांमध्येही बातम्या प्रकाशित झालेल्या असणे. तसेच मलनि:सारण विभागाच्या ११ गावांच्या प्रकल्पासाठी अभियंत्यांची नेमणूक करताना, उप अभियंत्यांना 'प्रभारी कार्यकारी अभियंता' पदभार देण्यात आला असणे, जेव्हा की विभागात कार्यरत कार्यकारी अभियंते उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे यापैकी एक अभियंता सध्या सहाय्यक आयुक्त पदाचा कार्यभारही सांभाळत असून, त्यांच्याकडे या प्रकल्पाचे अतिरिक्त पदभारही देण्यात आलेला असणे. या नियुक्त्यांमध्ये दोन कनिष्ठ अभियंत्यांचाही समावेश आहे, जे सध्या पथ विभाग व भवन विभागात कार्यरत असूनही त्यांची नियुक्ती मलनि:सारण प्रकल्पावर करण्यात आली असणे. परिणामी, यामध्ये नियोजनाचा अभाव आणि प्रशासनिक अनियमितता दिसून येते. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, सदर पदोन्नती आणि नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता न राखता, ठराविक व्यक्तींना लाभ होईल अशा पद्धतीने निर्णय घेण्यात आल्याचा संशय निर्माण होतो. त्यामुळे, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, दोषी अधिकाऱ्यांवर आवश्यक ती शिस्तभंग व कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता तसेच संदर्भित आज्ञापत्रे रद्द करून ती नव्याने, पारदर्शकतेने आणि नियमानुसार काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

### मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अभियांत्रिकी संवर्गातील शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावरून उप अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देण्यात आलेली असून सदर पदोन्नतीने पदस्थापनेचे आज्ञापत्र दि.१२/०३/२०२५ अन्वये महापालिका आयुक्त यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आलेले आहे.

सदर आज्ञापत्रामध्ये दिव्यांग असलेल्या दोन अधिकाऱ्यांना ते शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर कार्यरत असलेल्या खात्यामध्ये पदोन्नतीने पदस्थापना दिलेली आहे. याव्यतिरिक्त अन्य ४ अभियंता यांना

तत्कालीन महापालिका आयुक्त यांनी त्याच विभागामध्ये कार्यरत ठेवण्याबाबत केलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ठ झालेल्या ११ गावांसाठी मैलापाणी वहन व्यवस्था करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद बांधणे व पाच वर्षे देखभाल दुरुस्ती करणे या प्रकल्पीय कामकाजाकरीता यापूर्वीच दि.२३.०६.२०२२ च्या आज्ञापत्राने अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. त्याच आज्ञापत्रातील संबंधित कामाचा अनुभव असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना सदरच्या प्रकल्पीय कामकाजामध्ये अंशतः बदल करून सुधारित आज्ञापत्राद्वारे कामकाज सोपविण्यात आलेले आहे. यामध्ये अधीक्षक अभियंता पदावरील अधिकारी वगळता अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचा नव्याने समावेश करण्यात आलेला नाही. संबंधित अधिकाऱ्यांकडे सदर प्रकल्पावर केलेल्या कामाच्या अनुभवाच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त यांनी सुधारित कामकाज व्यवस्था दिलेली आहे. यामध्ये प्रशासकीय अनियमितता दिसून येत नाही.

उपरोक्त प्रमाणे पदोन्नती व नियुक्ती प्रक्रीयेमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता नाही. त्यामुळे स्वतंत्रपणे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

********

लक्षवेधी सूचना क्र.१३९

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.भास्कर जाधव, श्री. राजु तोडसाम व श्री. सुधीर मुनगंटीवार मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर विकास आणि लॉजिस्टिक पार्क प्रकल्प उभे राहत असणे, या विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणात दगड, खडी, विटा, वाळू बांधकाम साहित्यासाठी परिसरात नव्याने दगडखाणींना परवानगी देण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आली असणे, परवानगी दिलेल्या दगडखाणींना आदिवासी ग्रामस्थांनी दि. १६ ऑगस्ट, २०२४ रोजी ग्रामसभा आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेत दगडखाणींना विरोध करण्यात आला असतांनाही त्याची स्थानिक पातळीवर दखल घेतली जात नसणे, अनेक अनधिकृत दगडखाणीमुळे प्रदूषण आणि भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने विनाविलंब नुकसानभरपाई मिळावी, तसेच अनधिकृत दगडखाणी कायमस्वरूपी बंद करण्यात याव्यात म्हणून कुर्ले ग्रामपंचायत ग्रामस्थांनी, पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या दगडखाणी तात्काळ बंद करण्यासाठी तक्रारी वजा निवेदन मा. मुख्यमंत्री महोदयांकडे देण्यात येऊनही सदरहू बेकायदा गौण खनिज, दगडखाण मालकांवर दंडात्मक फौजदारी कारवाही करण्याबाबत महसूल अधिकाऱ्यांकडून करण्यात येत असलेले हेतुपुरस्कर दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक आदिवासी ग्रामस्थांमध्ये शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची भावना, याबाबत पालघर जिल्ह्यात अवैधरीत्या सुरु असलेल्या दगडखाणींना आळा घालण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

पालघर जिल्हयात वाढवण बंदर विकास व लॉजिस्टीक पार्क उभे राहत आहे. वाडा तालुक्यात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, खाण व खनिज अधिनियम १९५७ व महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन व विकास विनियमन २०१३ मधील तरतुदींनुसार आवश्यक परवानग्या / कागदपत्रे याची पूर्तता केल्यानंतर अर्जदार यांना जिल्हाधिकारी स्तरावर गौणखनिज उत्खनन परवानगी देण्यात येते. संबंधित अर्जदार यांना ग्रामपंचायत गुहीर-कुर्ले कार्यक्षेत्रातील मौजे कुर्ले येथील ग.नं. ७० मधील क्षेत्रात क्रशर मशिन व क्षेत्र २.००.०० हे. आर या जमिनीत दगडखाण सुरू करणेसाठी दिनांक १६.०८.२०२४ रोजीचा ठराव क्रमांक ५/२ अन्वये दिनांक २३.०८.२०२४ अन्वये ग्रुप ग्रामपंचायत गुहीर-कुर्ले यांनी ना-हरकत दाखला दिलेला आहे. तद्नंतर दिनांक ३१.१२.२०२४ च्या ग्रामसभेमध्ये दिनांक १६.०८.२०२४ रोजी केलेला ग्रामसभा ठराव रदद् केला आहे. तथापि, शासनाच्या दिनांक ११.१२.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये पेसा अधिसूचित ग्रामपंचायती मध्ये गौणखनिज उत्खननाची परवानगी घेणेकरिता ग्रामसभा नाहरकत घेणेबाबतची तरतुद आहे. सदरचे परिपत्रकानुसार एकदा एखाद्या ग्रामपंचायतीने नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर ते कोणतेही कारणास्तव रदद् करता येणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत कुर्ले मधील ग्रामस्थ यांचे क्रशर मशिन व उत्खननाच्या अनुषंगाने दिनांक २७.१०.२०२४ रोजीच्या तक्रारी अर्जात तथ्य न आढळल्याने दिनांक ०६.०६.२०२५ रोजी तहसिलदार वाडा, यांच्याकडून लेखी उत्तर देवून तक्रार अर्ज निर्णयित करण्यात आलेला आहे. तसेच, जिल्हाधिकारी

पालघर यांना दिनांक २०.०२.२०२५ रोजी प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी पालघर यांचेकडून प्रत्यक्ष पहाणी करून दिनांक २१.०३.२०२५ रोजी तक्रारीत तथ्य न आढळल्याने निकाली काढण्यात आलेला आहे. दिनांक २०.०५.२०२५ रोजीच्या गुहीर-कुर्ले ग्रामस्थ यांच्या दिनांक २१.०३.२०२५ रोजीचा तक्रार अर्जाच्या अनुषंगाने नायब तहसिलदार (रेतीगट शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, जिल्हा खनिकर्म अधिकारी पालघर व तहसिलदार वाडा यांनी दिनांक ०९.०६.२०२५ रोजी ग्रामस्थांचे तक्रारीच्या अनुषंगाने स्थळ पहाणी दरम्यान कोणतेही तथ्य आढळले नसल्याचा अहवाल जिल्हाधिकारी, पालघर यांना सादर केलेला आहे.

वाडा तालुक्यात अनधिकृत दगडखाणीमुळे प्रदुषण आणि भात शेतीचे नुकसान होवून नुकसान भरपाई मिळणेबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही. मौजे कुर्ले येथील स.नं. ७० मधील क्रशरला महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडील दिनांक १४.१०.२०२४ अनुसार CONSENT TO ESTABLISH बाबत परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि अहवालानुसार आजरोजी पर्यंत सदरचे क्रशर सुरू केलेले नाही. तसेच तक्रारदार यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने चौकशीची कार्यवाही करण्यात येऊन तक्रारदार यांना कळविण्यात आलेले आहे.

मौजे कुर्ले, ता. वाडा येथील ग.नं. ७० क्षेत्र ७.०९.८ हे. आर पैकी २.००.०० हे. आर मध्ये जिल्हाधिकारी पालघर यांचेकडून अर्जदार यांना दिनांक ०२.०५.२०२५ रोजी १००० ब्रास व दिनांक १४.१०.२०२५ रोजी २०,००० ब्रास मुरुम माती उत्खनन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. सदरचे उत्खनन केलेली मुरुम माती मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्गाकरीता वापरण्याकामी तात्पुरती गौणखनिज परवानगी देण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्याअंतर्गत अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण व आळा घालण्याचे दृष्टीने जिल्हा तसेच तालुका स्तरावर फिरते भरारी पथक नियुक्त करण्यात आले असून पालघर जिल्ह्याअंतर्गत अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूकीबाबत क्षेत्रिय यंत्रणेमार्फत वेळोवेळी तपासणी करून दंडनीय कारवाई करण्यात येते.

१४८

लक्षवेधी सूचना क्र.९०४

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीम. सुलभा गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"अंबरनाथ तालुक्यातील द्वारलीपाडा येथील श्रीस्वामी समर्थ कॉम्प्लेक्स हौ. सोसायटीच्या बाजुला सर्व्हे क्र २२ वरिल शासकिय (गुरचरण) जागेवर भूमाफियांनी अनधिकृतपणे जीन्स कारखाने, चाळी, गोडावून, फार्म हाऊस तयार केल्याचे नुकतेच माहे जुन, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, तसेच गावठी दारुच्या भट्टयादेखील सुरु असणे, याठिकाणी राजरोसपणे अनधिकृतपणे बांधकामे सुरु असणे, अनधिकृत बांधकामाना आलेला पेव, सदर अतिक्रमित बांधकामांमुळे आरक्षित भुखंड नामशेष होऊन येथील स्थानिक नागरिक मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित राहण्याची शक्यता, उक्त जमीन ही शासकिय (गुरचरण) असल्याने महानगरपालिका कारवाई करण्यास करित असलेली टाळाटाळ, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २/०६/२०२५ रोजी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, ठाणे यांच्याकडे केलेला पत्रव्यवहार, पत्राच्या अनुषंगाने अदयाप कोणतीच ठोस कारवाई न होणे, तसेच अनधिकृत बांधकामासंदर्भात संतोषीमाता महिला बचत गट व ओमसाँ महिला बचत गट व स्थानिक नागरिकांनी संबंधित विभगाकडे तक्रार वजा निवेदन देऊनही कोणतीच ठोस कारवाई न होणे, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर एमआरटीपी अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

### श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मौजे व्दारली, ता. अंबरनाथ येथील सर्व्हे नंबर २२, एकुण क्षेत्र ३.९०.० हे.आर. चे ७/१२ सदरी धारणाप्रकार सरकार असुन भोगवटादार सदरी "प्रांतिक सरकार" अशी नोंद आहे. सदर मौजे व्दारली, ता. अंबरनाथ येथील सर्व्हे नंबर २२ चे सर्व क्षेत्र हे कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये येत असून सदर क्षेत्रापैकी ०.२०.०० हे.आर. अतिक्रमणरहित क्षेत्राचा आगाऊ ताबा जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दि.२०/०९/२०२२ रोजीच्या आदेशान्वये अमृत योजनेतंर्गत जलकुंभ उभारणीसाठी दि.२४/०२/२०२३ रोजी कार्यकारी अभियंता, कल्याण डोंबिवली, महानगरपालिका यांना देण्यात आला आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाकडून मौजे व्दारली, ता. अंबरनाथ येथील स.न.२२ येथील जीन्स वॉश कारखान्यावर दि. १०/१०/२०२४ रोजी निष्कासनाची कारवाई करुन त्यांच्या स्तरावर विद्युत पुरवठा खंडीत केला होता. तदुनंतर महानगरपालिकेकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्यासोबत दि. २७/०६/२०२५ रोजी संयुक्त कारवाई करुन जीन्सच्या गोडावून मधील विद्युत पुरवठा कायमस्वरूपी खंडीत करुन विद्युत मीटर जप्त करण्याची कारवाई केलेली आहे.

सदर जागेवरील चाळींचे व फुटींगचे अनधिकृत बांधकाम महानगरपालिकेकडून दि. ०८/०२/२०२५ रोजी व गोडाऊनचे बांधकाम दि. ०६/०५/२०२५ रोजी निष्कासित केले आहे. तसेच त्यांच्या ताब्यातील ०.२०.०० हे.आर जागेतील अंशतः झालेल्या अतिक्रमणावर महानगरपालिकेकडून एम.आर.टी.पी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात अलेला आहे.

मौजे व्दारली, ता. अंबरनाथ येथील ०.०५.०० हे.आर. क्षेत्रावर सुमारे २० वर्षापासून तीन गाळ्यांचे बांधकाम दिसून येत असून सदर गाळे हे स.नं. २२ मधील प्रांतिक सरकार च्या क्षेत्रावर आहेत या खाजगी जागेवर आहेत याबाबत अनिश्चितता आहे. त्यामुळे तहसीलदार, अंबरनाथ यांनी दि. ०१/०७/२०२५ रोजी उपअधिक्षक भुमी अभिलेख, अंबरनाथ यांना मौजे व्दारली येथील स.नं.२२ वरील अतिक्रमित क्षेत्राची निश्चिती करण्यासाठी शासकीय मोजणी करुन नकाशा व अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत कळविले आहे. उपअधिक्षक भुमी अभिलेख, अंबरनाथ यांच्याकडून प्राप्त मोजणी नकाशा व अहवालानुसार जर सदर तीन गाळ्यांचे बांधकाम सरकारी जमिनीवर असल्याचे निश्चित झाल्यास सदर अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनयम, १९६६ चे कलम ५०(३) अन्वये कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. तसेच मौजे-द्वारली येथील स.नं. २२ मधील उपरोक्त ३ गाळे असलेले ०.०५.०० हे.आर क्षेत्र सोडून उर्वरित ३.६५.०० हे.आर क्षेत्र हे अतिक्रमणविरहित आहे.

सहायक आयुक्त तथा वॉर्ड ऑफिसर, आय वॉर्ड, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी दि. ०२/०१/२०२५ रोजी केलेल्या पाहणीमध्ये कुठेही, गावठी दारुच्या भट्टया दिसून आलेल्या नाहीत.

प्रकरणी स्थानिक माननीय आमदार यांच्या दिनांक ०२/०६/२०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने चौकशी करुन प्रचलित कायदे व शासन निर्णयांच्या अधिन राहून नियमोचित कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १६/०६/२०२५ च्या पत्रान्वये तहसीलदार अंबरनाथ यांना कळविण्यात आले आहे.

******

## महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये लक्षवेधी सूचना
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**महसूल व वन विभाग/ई-४अ**

**श्रीम.देवयाणी फरांदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९५८ :-**

"तहसीलदार शोभा पुजारी यांनी कुठलीही शहानिशा नकरता पाथर्डी शिवारातील भोलेनाथ आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालकी हक्कात माधव सखाराम डामसे या मृत व्यक्तीचे नाव आदेश पारित करुन लावल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, याप्रकरणी मंडळअधिकारी निलकंठ उगले यांची भूमिका देखील संशयास्पद असून, मंडळ अधिकाऱ्यांनी चक्क मृत असलेल्या व्यक्तीचा जबाब घेणे, संस्थेच्या सभासदांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून देखील कुठलीही कारवाई नकरणे, भोलेनाथ आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे पाथर्डी शिवारातील सर्वे नं. २०५/२ या मिळकतीवर तब्बल ३४ भूखंड असणे, असे असताना मिळकतीच्या सातबारा वरुन संस्थेचे नाव कमी करुन त्या ऐवजी माधव सखाराम डामसे या मृत व्यक्तीचे नाव मालकी सदरात लावण्यासाठी अर्ज दाखल करणे, माधव डामसे हे दि.२७ जून, २०२१ रोजी मृत पावले असताना त्यांच्या नावाचा अर्ज दि.२४ ऑगस्ट २०२१ रोजी म्हणजेच डामसे मृत पावल्यानंतर दोन महिन्यांनी तहसीलदार कार्यालयात दाखल करण्यात येणे, तहसीलदार यांनी चुकीचे आदेश काढल्याचे निदर्शनास आणून देखील ठोस कारवाई नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांच्यामार्फत चौकशी करून सदर चौकशी तहसीलदार दोषी असल्याचे स्पष्ट होणे तहसीलदार व तत्कालीन मंडळ अधिकारी यांना निलंबित करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची असणारी आवश्यकता प्रशासनाचे सदर बाबीकडे होत असणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष याबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाचीभावना याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

श्री. माधव सखाराम डामसे यांचे नावे दि.२४.०८.२०२१ रोजी तहसीलदार नाशिक यांचेकडे मौजे-पाथर्डी ता.जि. नाशिक येथील स.नं. २०५/२/प्लॉट नं. १ ते ३५ या मिळकतीस "चिफ प्रमोटर नियोजित भालेनाथ आदिवासी गृहनिर्माण संस्था मर्यादित नाशिक "ऐवजी" माधव सखाराम डामसे" असे नाव

लावणेबाबत अर्ज सादर केला होता. सदर अर्जानुसार तहसीलदार नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र दि.०३.०९.२०२१ रोजीच्या पत्राअन्वये चौकशी करुन ८ दिवसात अहवाल सादर करणेबाबत मंडळ अधिकारी, पाथर्डी यांना कळविण्यात आलेले होते. त्यानुसार मंडळ अधिकारी पाथर्डी यांनी दि.३०.०९.२०२१ अन्वये तहसिल कार्यालयास अर्जदार श्री. माधव सखाराम डामसे यांचा जबाब पुर्वी घेण्यात आलेला असुन अर्जदार यांचे अर्जाबाबत आपले स्तरावरुन पुढील कार्यवाही करणेबाबत अहवाल सादर करण्यात आला दरम्यान, तहसीलदार नाशिक यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था नाशिक यांचेकडुन दि.२३.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आले. त्यानुसार उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक यांनी सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी अर्जदाराने मागणी केलेल्या दुरुस्तीबाबत या कार्यालयाची हरकत नाही, असे अभिप्राय दिले.

अर्जदार यांचा अर्ज, मंडळ अधिकारी पाथर्डी यांचा चौकशी अहवाल व उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक यांचे अभिप्रायानुसार तहसिलदार नाशिक यांनी दिनांक ०७. ०८.२०२४ अन्वये मौजे-पाथर्डी ता.जि. नाशिक येथील स.नं. २०५/२/प्लॉट नं. १ ते ३५ या मिळकतीस चिफ प्रमोटर नियोजीत भोलेनाथ आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नाशिक ऐवजी माधव सखाराम डामसे अशी दुरुस्ती करणेबाबत आदेश पारीत करण्यात आला व सदर आदेशानुसार अधिकार अभिलेखात नोंद नं. ३४५५४ दि.०१.०१.२०२५ प्रमाणित झालेली आहे.

उपरोक्त आदेशाविरुध्द लोकप्रतिनिधी व इतर खाजगी व्यक्तींच्याकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने विभागीय आयुक्त, नाशिक यांना दि.०४.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणाची त्रयस्त उच्च अधिकारी यांचेमार्फत चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. त्यानुसार दिनांक २०.६.२०२५ अन्वये सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांची नेमणूक करण्यात आली होती. उपविभागीय अधिकारी दिंडोरी यांनी दिनांक २५.०६.२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे.

अर्जदार श्री. माधव सखाराम डामसे हे दि.२७.०६.२०२१ रोजी मयत झाले असताना, मौजे-पाथर्डी येथील स.नं. २०५/२/प्लॉट नं. १ ते ३५ या मिळकतीस चिफ प्रमोटर नियोजीत भोलेनाथ आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नाशिक यांच्या ऐवजी मृत असलेले माधव सखाराम डामसे हे हयात असल्याचे दाखवून मालक सदरी दाखल घेण्याचे तहसिलदार यांनी आदेश पारित केले असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी मंडळ अधिकारी पाथर्डी यांची प्रकरण हाताळणेची कार्यपध्दती निश्चितपणे संशयास्पद दिसून येते तसेच तहसीलदार नाशिक यांचे कार्यालयातील महसूल सहायक, जमाबंदी अव्वल कारकुन, नायब तहसीलदार व तहसीलदार, नाशिक यांनी प्रचलित शासन नियमाशी विसंगत कार्यवाही केली असल्याचे निदर्शनास आले आहे.

उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांचा चौकशी अहवाल विचारत घेवून जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दि.२६.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक तसेच अपर तहसीलदार, नाशिक यांना याप्रकरणी निर्देश दिले आहेत. त्यानुसार सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नाशिक यांनी त्यांचेकडील आदेश दि.३०.०६.२०२५ अन्वये अपील क्र.०१/२०२५ कामकाजातुन काढून अपर तहसीलदार नाशिक यांना फेरचौकशी करण्याबाबत दिलेले निर्देश मागे घेतलेले असून अपेलंट संस्थेने नाव साधर्म्यांचा फायदा घेवून विषयांकित मिळकतीशी हितसंबंध दर्शवून प्रशासनाची दिशाभुल करणेचा प्रयत्न केल्यामुळे अपेलंट भोलेनाथ आदिवासी सहकारी गृहनिर्माण सोसायटी तर्फे श्री.रमेश केरु पाडेकर विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत अपर तहसीलदार नाशिक यांना आदेश दिले आहेत. तसेच, अपर तहसीलदार, नाशिक यांनी त्यांचेकडील आदेश दि.३०.०६.२०२५ अन्वये तहसीलदार नाशिक यांनी दि. ०७.०८.२०२४ रोजी पारीत केलेला आदेश रद्द केलेला असून विषयांकित मिळकतीचे बेकायदेशीर हस्तांतरण होवू नये याकरिता सदर मिळकतीच्या इतर अधिकारात "सक्षम प्राधिकारी यांचे पुर्व परवानगीशिवाय हस्तांतरणास बंदी" शेरा दाखल करणेबाबत आदेश केले आहेत. सदर आदेशानुसार फेरफार नोंद क्र.३५१९७, दि.०३.०७.२०२५ अन्वये सद्यस्थितीत अधिकार अभिलेखाची मुळ परिस्थिती कायम करण्यात आली आहे.

मौजे-पाथर्डी येथील मिळकतीच्या अधिकार अभिलेखात संबंधित गृह निर्माण सोसायटीचे नाव कमी करुन मयत व्यक्तीचे नाव दाखल करणे ही बाब गंभीर स्वरुपाची असल्याने या अनियमितेस जबाबदार तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार नाशिक यांचे कार्यालयातील महसूल सहायक, जमाबंदी अव्वल कारकुन, प्रभारी नायब तहसीलदार व तत्का. तहसिलदार या सर्व संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

*****

टीप ccs – ९अ

<u>लक्षवेधी सूचना क्र. ११७५</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**मा. श्री. मोहन मते, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"महसूल विभागाचे कल्याण उपविभागीय अधिकारी व कार्यालयातील कर्मचारी यांच्या मार्फत भूसंपादन, तसेच सातबारा फेरफार संबंधी विविध कामे हाताळण्यात येणे, सदरहू कामे करताना या कार्यालायतील श्री. विश्वास गुजर व श्री. भाऊसाहेब नांगरे या भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून नगरिकांकडे प्रत्येक कामासाठी केली जात असलेले पैशाची मागणी, पैशांची पूर्तता न करणाऱ्या नागरिकांची कामे प्रलंबित ठेवण्यात येणे, त्यामुळे सदरहू कार्यालयात अनेक प्रकरणे न्यायासाठी प्रलंबित असल्याची बाब माहे जून २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, परिणामी सामान्य जनतेस न्याय मिळण्यात निर्माण झालेला अडसर, सदर न्यायाधिकरणातील दाव्याच्या सुनावणीस सातत्याने मिळत असलेल्या तारखा, दाव्याच्या सुनावणी जलदगतीने निर्णीत होत नसल्याने पक्षकारांच्या मनात निर्माण झालेली नाराजीची भावना, यास्तव संबंधित अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभारांची तातडीने सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

उप विभागीय अधिकारी, कल्याण या पदावर श्री. विश्वास गुजर कार्यरत असून त्यांच्या कार्यालयातील श्री.भाऊसाहेब नांगरे, महसूल सहायक हे अर्धन्यायिक अपिलांचे काम पाहतात. श्री. विश्वास गुजर हे उप विभागीय अधिकारी या पदावर दि.३१/०८/२०२३ रोजी हजर झाले असून त्यांचे कालावधीतील अर्धन्यायिक प्रकरणांचा गोषवारा पुढील तक्त्यात आहे:-

| दाव्याचा प्रकार | माहे ऑगस्ट २०२३ अखेर प्रलंबित दाव्यांची संख्या | दाखल दावे व आदेश पारीत केलेल्या दाव्यांची संख्या | | | | | | एकूण शिल्लक दावे | रकाना क्र.९ मधील दाव्यांचा कालावधीनिहाय प्रलंबिततेचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०१/०९/२०२३ ते ३१/१२/२०२३ | | ०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ | | ०१/०१/२०२५ ते ३०/११/२०२५ | | | | | |
| | | आवक | निकाली | आवक | निकाली | आवक | निकाली | | रकाना क्र.९ पैकी १ वर्षाखालील प्रलंबित प्रकरणे | रकाना क्र. ९ पैकी १ ते २ वर्षामधील प्रलंबित प्रकरणे | रकाना क्र.९ पैकी २ वर्षावरील प्रलंबित प्रकरणे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| आर.टी.एस. | १९३ | ६९ | २५ | १७७ | १२२ | ३१० | २८१ | ३२१ | २५१ | ४७ | २३ |
| टेनन्सी | ५५ | २६ | ४ | ४९ | ३२ | ७८ | ७६ | ९६ | ५६ | २७ | १३ |
| **एकुण** | **२४८** | **९५** | **२९** | **२२६** | **१५४** | **३८८** | **३५७** | **४१७** | **३०७** | **७४** | **३६** |

उपरोक्त तक्त्यातील रकाना क्र.९ मध्ये नमूद दाव्यांपैकी काही दावे आदेशासाठी बंद करण्यात आले आहेत. तथापि त्यामध्ये अंतिम आदेश पारीत न झाल्याने सदर दावे प्रलंबित मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

शेटा टाय ९३०-१ (७४०-१-२०२५)

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५५ व २५७ मधील सुधारणेनुसार अर्धन्यायिक प्रकरण १ वर्षाच्या आत निकाली काढण्याची कालमर्यादा निश्चित करून देण्यात आलेली आहे. तसेच, विहित कालमर्यादेत काही प्रकरणे निकाली न निघू शकल्यास संबंधित नियंत्रक प्राधिकारी यांच्या मान्यतेने हा कालावधी जास्तीत जास्त सहा महिन्यांकरिता वाढविण्यात येईल, अशी तरतुद आहे. सदर तरतूद व महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि. १७/१२/२०१५ व शासन परिपत्रक दि. ०३/०८/२०१६ च्या अनुषंगाने प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी कालावधी वाढवून मिळणेबाबत उप विभागीय अधिकारी, कल्याण यांचेकडून सादर झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र दि. २२/०४/२०२५ व दि. ३०/१०/२०२५ आणि शासन पत्र दि. ३०/०५/२०२५ अन्वये प्रत्येकी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकांमध्ये सहायक निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी अशा पदांच्या जबाबदारीची कामे हाताळणे, विविध न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मा. दिवाणी न्यायालय इत्यादी प्राधिकारणांसमोर होणाऱ्या सुनावणीस हजर राहणे, तसेच भूसंपादन विषयक प्रकरणांमध्ये वेळोवेळी बैठकींना हजर राहणे, अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये पक्षकार यांच्याकडून बाजू मांडण्यास अधिकचा वेळ वाढवून मागणे यांमुळे अर्धन्यायिक प्रकरणे निकाली काढण्यास अधिकचा कालावधी लागतो.

उपविभागीय अधिकारी, कल्याण या कार्यालयातील कोणत्याही कर्मचारी / अधिकारी यांनी कोणाकडेही पैशाची मागणी केली नसून सर्व कामे ही प्रचलित शासन नियम व तरतुदी विचारात घेऊन करण्यात येत आहेत, असे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

** **********

लक्षवेधी सूचना क्र.२२३५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"ग्रुप ग्रामपंचायत डोंहाळे हद्दीतील मौजे कोशिंबी येथे वैष्णवी देवी मंदिर परिसरात अॅन्टोव्ह हाऊसिंग लिमिटेड या कंपनीने गॅस पाईपलाईन व पाटबंधारे विभागाच्या जलवाहिनी (कॅनल) वर करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम, सदरहू बांधकाम हे पूर्णतः बेकायदेशीर असून ग्रामपंचायती, पाटबंधारे या विभागाची पूर्वपरवानगी घेण्यात येणे, सदर अनधिकृत बांधकामामुळे सार्वजनिक मालमत्तेबरोबरच जलवाहिनी, गॅस सुरक्षेच्या दृष्टीने धोका निर्माण होण्याची शक्यता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यासंदर्भात लोकप्रतिनिधिंनी दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडे केलेला पत्रव्यवहार, पत्राच्या अनुषंगाने अदयाप कारवाई न होणे, याबाबत शासनाने तात्काळ चौकशी करुन सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक असलेले अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

---

### श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मे.अॅन्टोनोव्ह वेअरहाऊसिंग पार्क्स प्रा.लि. यांच्या प्रकल्पामध्ये समाविष्ट होत असलेल्या मौजे डोहळे, ता.भिवंडी येथील स.नं.४२/४/ब व मौजे कोशिंबी, ता.भिवंडी स.नं.५०/३ व इतर एकुण क्षेत्र १,११,८६७.४८ चौ.मी जमिनीस जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाच्या दि.०४/०५/२०२३ रोजीच्या आदेशान्वये अर्जदार मे. अॅन्टोनोव वेअरहौसिंग पार्क्स प्रा.लि. यांना गोडाऊन या प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. सदर बांधकाम परवानगी ही सक्षम अधिकारी/कार्यकारी अभियंता, भातसा कालवा विभाग व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांचेकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याच्या अटीच्या अधीन राहून देण्यात आली आहे.

मे. अॅन्टोनोव्ह वेअरहौसिंग पार्क्स प्रा.लि. यांचेकडून सदर गोडावून प्रकल्पामध्ये समाविष्ट "भारत पेट्रो.कॉ.लि. कडून हक्क संपादन" अशी नोंद असलेल्या जमिनीमध्ये पेव्हर ब्लॉक रस्ता व पाण्याचा निचरा चे बांधकाम करण्याकरिता भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांचेकडून दि.१४ जुलै २०२०, दि.१ जुन २०२१ व दि.१३ जुन २०२४ रोजी नाहरकत दाखले प्राप्त करून घेतले आहेत. त्यानुषंगाने पेव्हर ब्लॉक (सिमेंटचे ठोकळे) चा अंतर्गत वापराचा रस्ता बांधण्यात आला आहे. सदरचे बांधकाम गॅस पाईप लाईनच्या वर करण्यात आलेले नसल्याकारणाने सदर बांधकामामुळे गॅस सुरक्षेच्या दृष्टीने तसेच जलवाहिनीमुळे धोका निर्माण होत असल्याचे दिसून येत नाही.

मे. अॅन्टोनोव्ह वेअरहौसिंग पार्क्स प्रा.लि. यांच्या गोडावून प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये भातसा कालव्याचे लाभक्षेत्र येत नसल्याबाबत कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, शहापुर यांनी दि.२५/०९/२०१९ रोजी दाखला दिलेला आहे. तसेच प्रस्तुत प्रकल्पाकरिता ग्रामपंचायतीकडील नाहरकत दाखला प्राप्त करून घेणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये तरतुद नाही असे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या अहवालामध्ये नमुद केले आहे.

सदर क्षेत्राच्या अनुषंगाने स्थानिक विधानसभा लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयास दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली असता, प्रस्तुत जागेवर जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडील बांधकाम परवानगी आदेशानुसार मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम सुरू असून सदर बांधकाम बेकायदेशीर नसल्याचे चौकशीत दिसून येत आहे.

******

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**डॉ. किरण लहामटे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २४२१ पुढीलप्रमाणे आहे:-**

"दिनांक ६ जुलै, २०२५ रोजी वा त्यासुमारास ७७१७ या एकाच नंबरच्या सतरा गाडया भरुन अनेक लोक अकोले तालुक्यातील मौ.कळस येथील प्रवरा नदीत जेसीबी वाहनासह वाळू तस्करीसाठी आलेले असणे, त्यांनी मौ. ढोकरी येथील घरकुल लाभार्थ्यांसाठी वाळू नेत असल्याचे सांगण्यात येणे, त्याबाबत शासकीय कामासाठी वाळू नेतांना संबंधित गावाला (मौ.कळस) अथवा ग्रामपंचायतीला न विचारतांच वाळू घेण्यांत येणे, त्याबाबत संबंधित तहसिलदार यांना विचारणा केली असतां, वाळू घरकुलांसाठी आहे, वाळू तस्करांना सोडून देण्याचे त्यांचेकडून सांगण्यात येणे, तथापि त्याबाबत गावचे सरपंच, संबंधित तलाठी व कोणालाही याबाबत माहिती नसतांना तहसिलदार यांनी सोडून द्या, त्यांनी कशाच्या आधारे सांगितले ? असा प्रश्न गावकऱ्यांमध्ये निर्माण झाला असणे, त्यामुळे भारतीय न्याय संहिता २०२३, पर्यावरण संवर्धन अधिनियम १९८६, खाण व खनिज नियमन १९५६ नुसार दंड आकारण्यात व फौजदारी गुन्हा दाखल करण्यात न आल्याने हा गुन्हा दाखल कोणावर करायचा व दंड वसुल कोणाकडून करावया असा प्रश्न निर्माण होणे, परिणामी संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, तसेच हा वाळू तस्करीचा हा नवा फंडा पाहतां, गावकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व तीव्र चिडीची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

## श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

दिनांक ०८.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण -२०२५ निर्गमित केले आहे. सदर धोरणानुसार शासनाच्या गृहनिर्माण योजनेअंतर्गत पात्र घरकुल लाभार्थ्यांना स्वामित्वधन न आकारता कमाल ५ ब्रासपर्यंत वाळू उपलब्ध करुन देण्याची तरतूद केली आहे. तसेच याबाबत तहसिलदार यांनी उपलब्ध करुन दिलेले ऑनलाईन पासेस (Online) डाऊनलोड करुन संबंधित ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांच्यामार्फत १५ दिवसांच्या आत घरकुल लाभार्थ्यांना घरपोच उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक ३०.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये तरतूद केली आहे.

पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय,भारत सरकार यांच्या दिनांक २८.०३.२०२० च्या अधिसूचनेतील APPENDIX-IX मधील अनुक्रमांक ४ च्या तरतुदीनुसार निश्चित केलेले वाळू गट तसेच पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळू गटांपैकी जे वाळू गट लिलावामध्ये गेलेले नाहीत असे वाळू गट तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने निश्चित करुन त्यामधून घरकुल लाभार्थी व इतर स्थानिक वापरासाठी वाळू उपलब्ध करुन देण्याची तरतूद धोरणामध्ये केली आहे. त्यानुसार वाळू उत्खननाची व वाहतुकीची सपूर्ण जबाबदारी अर्जदार/लाभार्थी यांची आहे.

सदर धोरणानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यामधील प्रवरा नदीपात्रामधील मौजे सुगाव (बु.) येथील १०० ब्रास, कळसु (बु.) येथील ५०० ब्रास व मुळा नदीपात्रामधील वाघापूर येथील ४० ब्रास परिमाणाचे वाळू गट तहसिलदार,अकोले यांनी घरकूल लाभार्थी व इतर स्थानिक वापरासाठी निश्चित करुन राखीव ठेवले आहेत. त्यापैकी मौजे कळस (बु.) या वाळू गटामधून उपलब्ध ५०० ब्रास पैकी १३० ब्रास मौजे कळस (बु.) व कळस (खु.) येथील घरकूल लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर वाळू गटामधील वाळू ही घरकुल योजनेतील लाभार्थी यांच्यासाठीच असल्याची पूर्व कल्पना संबंधित गावकऱ्यांना होती. तसेच, दिनांक ०६.०७.२०२५ रोजी सदर वाळूगटाच्या अनुषंगाने ग्राम महसुल अधिकारी यांनी याबाबत संबंधित गावाला याबाबत कल्पना दिलेली होती.

मौजे कळस (बु.) व कळस (खु.) येथील घरकूल लाभार्थ्यांची वाळूची मागणी संपल्याने मौजे कळस (बु.) येथील वाळूगटामधील उर्वरीत वाळू ही मौजे ढोकरी, ता. अकोले येथील एकुण १३ पात्र घरकुल लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी तहसिलदार, अकोले यांनी मंडळ अधिकारी, भाग संभोडी यांच्या मार्फत १३ लाभार्थ्यांना घरपोच वाहतूक पास उपलब्ध करुन दिले होते. त्यापैकी ४ लाभार्थी दिनांक ०६.०७.२०२५ रोजी मौजे कळस (बु.) येथील नदीपात्रामध्ये वाळू उत्खननासाठी गेले असता, ग्रामस्थांनी केलेल्या विरोधामुळे वाळू उत्खनन अथवा वाहतूक न करता सदर वाहने रिकामी परत गेली आहेत. तथापि, एकाच नंबरच्या १७ गाड्या मौजे कळस येथे वाळू उत्खनन करुन वाहतूक केल्याचे दिसून आलेले नाही.

वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ च्या अनुषंगाने तहसिलदार, अकोले यांनी स्थानिक वापरासाठी राखीव ठेवलेल्या वाळू गटामधून नियमानुसार घरकूल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करण्यासाठी कार्यवाही केली आहे. दिनांक ०६.७.२०२५ रोजी मौजे कळस (बु.) येथील नदीपात्रामधून कोणत्याही प्रकारचे अवैध वाळू उत्खनन व वाहतूक झालेली नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

*************

लक्षवेधी सूचना क्र. १५०२

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२५ द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

### श्री. शिवाजी पाटील, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १५०२ खालीलप्रमाणे

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदारसंघातील ताम्रपर्णी व हिरण्यकेशी या नद्यांना पावसाळ्यामध्ये सतत महापुर येत असणे, नद्यांचा पूर नियंत्रणासाठी पंचगंगा नदीचे कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूर नियंत्रणाचे काम जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने केले जाणार असणे, त्या धर्तीवर कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदारसंघातील सतत महापूर येणाऱ्या ताम्रपर्णी व हिरण्यकेशी या नद्यांचा समावेश असणे, कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदारसंघातील ताम्रपर्णी व हिरण्यकेशी या नद्यांना दरवर्षी पावसाळ्यात येणाऱ्या पुरामुळे मनुष्यहानी, वित्तहानी व पशुहानी, तसेच शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, त्यामुळे ताम्रपर्णी व हिरण्यकेशी या नद्यांना येणाऱ्या महापुराच्या नियंत्रणासाठी "महाराष्ट्र लवचिकता विकास कार्यक्रम" (MRDP) यामध्ये समावेश करणे, यावर शासनाने करावयाची ठोस उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री यांचे निवेदन

शासन निर्णय महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) दिनांक १३/०३/२०२४ अन्वये कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा व भीमा नदी खोऱ्यातील भविष्यातील आपत्ती निवारण्यासाठी क्षमता बांधणी आणि पूर व अन्य धोके क्षमविण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (Maharashtra Climate & Floods, Drought & Resilience Improvement Project) (MRDP) हा प्रकल्प राबविण्यास मान्यता प्राप्त झाली असून सदर प्रकल्प राबविण्याची संयुक्त जबाबदारी मदत व पुनर्वसन विभाग तसेच जलसंपदा विभागाची आहे.

महाराष्ट्र राज्यास ७० : ३० या निधी सूत्रानुसार निधी प्राप्त होणार आहे. म्हणजेच ७० % तरतूद ही जागतिक बँककडून कर्ज स्वरुपात उपलब्ध होणार असून उर्वरित ३० % तरतूद ही राज्यास उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे. सदर प्रकल्पाची एकूण किंमत रु. ३२०० कोटी इतकी असून त्यापैकी रु. २२४० कोटी निधी जागतिक बँक या वित्तीय संस्थेकडून कर्ज स्वरुपात प्रस्तावित असून राज्य शासनाचा हिस्सा रु. ९६० कोटी इतका राहणार आहे.

कृष्णा व पंचगंगा नदी खो-यातील सन २०१९ च्या महापूराच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या दि.१७/१०/२०२३ च्या तत्वतः मान्यतेने मंजूर करण्यात आलेल्या प्राथमिक प्रकल्प अहवालानुसार (PPR) सदर प्रकल्प (MRDP) राबविण्यात येत आहे.

सदरील प्रकल्पांतर्गत कृष्णा व पंचगंगा नदी खो-यातील पूर सौम्यिकरण कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम प्रगतीत असून त्याअंतर्गत सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

चंदगड विधानसभा मतदारसंघातील ताम्रपर्णी व हिरण्यकेशी नद्यामुळे येणाऱ्या पुराबाबत व त्यामुळे होणाऱ्या परिणामाबाबत तसेच उपाययोजनेबाबत स्वतंत्रपणे अभ्यास करणे आवश्यक आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र. १५०७

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. शिवाजी पाटील, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. १५०७** पुढीलप्रमाणे आहे :-

"माहे एप्रिल २०२५ मध्ये निदर्शनास आल्याप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदारसंघातील गडहिंग्लज तालुक्यामधील पूर्व भागातील कमी पाऊस पडणाऱ्या हलकर्णी परिसरातील ४० हुन अधिक गावांना पिण्याचे तसेच शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची टंचाई नेहमी जाणवत असणे, गडहिंग्लज पूर्व भाग हा कमी पावसाचा असणे, मागील वर्षातील पर्जन्यवृष्टी पाहता पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले असल्याने हा भाग दुष्काळग्रस्त राहिला असणे, गडहिंग्लज पूर्व भागातील ४० हुन अधिक गावांना शासकीय योजना राबवून धरण किंवा इतर ठिकाणाहून पाणी आणणे आवश्यक असणे, यावर शासनाने करावयाची ठोस उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

सद्य:स्थितीत गडहिंग्लज तालुक्यातील पुर्व भागामध्ये तेरणी, येणेचवंडी व नरेवाडी हे तीन लघु प्रकल्प पुर्ण झालेले आहेत. सदर भाग हा कमी पर्जन्यमानाचा असल्याने ल. पा. तलाव पुर्ण क्षमतेने भरत नाहीत. वरील प्रकल्पांमुळे सिंचीत होणारे क्षेत्र तेरणी- ३२७ हेक्टर, येणेचवंडी- ३४० हेक्टर, नरेवाडी- ३८४ हेक्टर असे एकुण १०५१ हेक्टर इतके क्षेत्र वगळता गडहिंग्लज तालुक्याच्या पुर्व भागासाठी इतर क्षेत्राकरिता शाश्वत स्त्रोत नाही.

गडहिंग्लज तालुक्याचा भाग हा कृष्णा खोऱ्याच्या घटप्रभा उपखोऱ्यात येतो. कृष्णा पाणी तंटा लवादाने या उपखोऱ्यात ७ टीएमसी एवढ्या पाणीवापराची मर्यादा घातलेली आहे. सध्य:स्थितीत या अनुज्ञेय ७ टीएमसी पाणीवापराचे नियोजन झालेले असून या उपखोऱ्यात लवादाच्या बंधनामुळे नवीन प्रकल्प हाती घेण्यासाठी पाणी शिल्लक नाही.

भविष्यात अन्य पर्यायाने पाणी उपलब्ध झाल्यास पाणी उपलब्धता निश्चितीअंती सविस्तर क्षेत्रीय सर्वेक्षण व अन्वेषण करण्यात येईल.

******

<u>लक्षवेधी सूचना क्र.२१००</u>

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय अधिवेशन (पावसाळी)

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. विजयबापू शिवतारे, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२१०० पुढीलप्रमाणे आहे :-

"पुणे जिल्ह्यातील पुरंदर भोर वेल्हा तालुक्यासाठी मंजूर गुंजवणी प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम १९९९ साली सुरु होणे, २००२ साली बंद पडणे, १३ वर्षाच्या विलंबानंतर २०१५ साली पुन्हा काम सुरु होणे, अडीच वर्षात धरण पूर्ण होणे, प्रकल्पात राज्यातील पहिली बंद जलवाहिनी मंजूर होणे, लार्सन अँड टुब्रो कंपनीला जलवाहिनीचा ठेका मिळणे, २०१९ नंतर पुन्हा काम ठप्प होणे, २०२४ पर्यंत जलवाहिनीच्या कामात कुठलीच प्रगती नसणे, दुष्काळी भागातून जाणाऱ्या मुख्य वितरिकेत २०२० साली अधिकारी व कंपनी यांच्या संगनमताने बदल करणे, कंपनीच्या फायद्यासाठी १४७ किमी लांबीची जलवाहिनी केवळ ८७ किमी करणे, जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी जवळपास ४०० कोटींचा घोटाळा करणे, पुरंदर तालुक्यातील स्थानिक शेतकऱ्यांची तीव्र आंदोलने होणे, निर्धारित मुख्य वितरिकेत बदल केल्याने वंचित शेतकऱ्यांनी काम बंद पाडणे,वितरीकेची दिशा बदलणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी होण्याची आवश्यकता, बंद कामाला संपूर्ण आर्थिक तरतूद करण्याचे मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांचे आश्वासन, आश्वासन न पाळले गेल्याने प्रकल्प अद्याप ठप्प असणे, १३०० कोटीचा प्रकल्प विलंबामुळे २००० कोटीपर्यंत जाणे, सतत पाठपुरावा करूनही कृष्णा खोरे महामंडळ, राज्य तांत्रिक सल्लागार समिती,जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता यांचे अक्षम्य दुर्लक्ष, शेतकरी हित डावलून जलवाहिनीत बदल करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची आवश्यकता असताना त्यांना पदोन्नती देऊन सन्मानित करणे, शेतकरी वर्गात तीव्र संताप असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

कानंदी नदीवर मौजे घानेप ता.वेल्हे, जि.पुणे येथील गुंजवणी प्रकल्पास शासन निर्णय दिनांक १६/१०/१९९३ अन्वये ८६.७७ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता व दिनांक ०३/१०/२००३ अन्वये प्रथम सुप्रमा व दि.०३/०८/२०१८ अन्वये रु.१३१३.७३ कोटी रकमेस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. गुंजवणी प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा ३.६९ अघफू इतका असून ४.१७ अघफू पाणी वापर प्रस्तावित आहे. सन २००२ ते २०१५ दरम्यान प्रकल्पग्रस्तांच्या प्रखर विरोधामुळे धरणाचे काम बंद होते व त्यानंतर २०१५ ते २०१७ मध्ये धरणाचे काम पूर्ण करण्यात आले. सन २०१८ पासून प्रकल्पामध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात येत आहे.

गुंजवणी प्रकल्प, ता वेल्हे, जि. पुणे. - EPC (Engineering, Procurement & Construction) निविदेद्वारे गुंजवणी प्रकल्पांतर्गत नारायणपुर उपसा सिंचन योजनेसह कालवे व वितरण प्रणालीचे काम बंदिस्त नलिकेद्वारे करणे व पाच वर्षासाठी देखभाल, दुरुस्ती व परिचालन करणे तसेच सदर वितरण व्यवस्था पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करणे, या कामास दि.३१/१०/२०१९ रोजी M/s L & T (WET) Construction Ltd, Chennai यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले.

EPC निविदा शर्ती नुसार अभिकरणास बंद नलिका आणि इतर बाबींचे संकल्पन करून काम करण्याचे स्वातंत्र्य आहे. डाव्या बंद नलिका कालव्याची लांबी ७१/६६५ किमी (द्वितीय सुप्रमा नुसार

८३ किमी) आणि उजवी बंद नलिका कालवा लांबी १८/२७६ किमी (द्वितीय सुप्रमा प्रमाणे २० कि.मी.) इतकी होती. त्यामुळे डावा मुख्य कालवा वितरिका व उजवा मुख्य वितरिका लांबी ही १४७ कि.मी इतकी नसून मान्यता प्राप्त द्वितीय सुप्रमा अहवालातील अंदाजपत्रानुसार १०३ कि.मी. इतकी होती त्याऐवजी सविस्तर संकल्पनाअंती सदर लांबी ९० कि.मी. इतकी झाली. तसेच या संकल्पनास CDO, मेरी नाशिक मार्फत तपासणी व मुल्यार्पण करुन मुख्य अभियंता यांनी मान्यता प्रदान केली. त्यामुळे कंपनी किंवा अधिकारी यांचे कोणतेही संगनमत नाही तसेच EPC निविदेच्या अनुषंगाने संकल्पन करुन सक्षम स्तरावर मान्यता घेण्यात आली असल्याने कोणताही घोटाळा होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

प्रकल्पाच्या मंजूर द्वितीय सुप्रमा च्या तुलनेत EPC अभिकरणा द्वारे संकल्पित संरेखा, सुमारे चार किलोमीटर खाली नदीच्या कडेने घेवून वेल्हा, भोर आणि पुरंदर तालुक्यामध्ये काही ठिकाणी अभिकरणामार्फत कामास सुरुवात करण्यात आली. या कामास संरेखा खालील बाजूस असल्याने मुख्य जलवाहिनी संकल्पनानूसार लाभक्षेत्राच्या मध्यभागातून संकल्पीत होऊन दोन्ही बाजूस आवश्यक दाबाने प्रत्येक चकला पाणी देणे अशी होती. परंतू लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी जलवाहिनींच्या एका बाजूस (वरील बाजूस) पाणी मिळणार नाही म्हणून विरोध केला. त्याबाबत लाभार्थी, विभागाचे प्रतिनिधी व कंत्राटदार मे. लार्सन & टुब्रो यांचे प्रतिनिधी यांच्या बैठका घेऊन सर्व संबंधितांना प्रकल्पाची माहिती देण्यात आली. तसेच भोर व वेल्हा तालुक्यात वाजेघर, वांगणी व शिवगंगा या तीन उपसा सिंचन योजनेचे काम सुरू केल्याशिवाय बंद नालिकेचे काम करू नये या मागणीच्या अनुषंगाने शासन पत्र दि. १५/०३/२०२१ अन्वये काही अटींच्या आधीन राहून तत्वत: मान्यता दिलेली आहे. वाजेघर, वांगणी व शिवगंगा या तीन उपसा सिंचन योजनांचे सविस्तर सर्वेक्षण, संकल्पन तयार करण्यात येऊन त्यास सक्षम स्तरावर मान्यता प्राप्त असून तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यते मध्ये या योजना समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

त्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधी व लाभधारक शेतकरी यांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने डाव्या बंद नलिका कालव्याची लांबी ७३/३५३ किमी व उजव्या बंद नलिका कालव्याची लांबी १९/२१९ किमी इतकी सुधारीत करण्यात आली. पुरंदर तालुक्यात सुमारे ६ ठिकाणी बंदिस्त वितरण प्रणालीचे काम प्रगतीपथावर असून, गुंजवणी उजवा व डाव्या बंद नालिकेचे काम पूर्ण करुन प्रत्यक्षात सिंचनाचे लाभ देण्याचे नियोजित आहे.

गुंजवणी प्रकल्पाच्या द्वितीय सुप्रमा (रू.१३१३.७३ कोटी) च्या तुलनेत जीएसटी मधील फरक व वाजेघर, वांगणी व शिवगंगा या तीन उपसा सिंचन योजनांच्या कामामुळे झालेली वाढ तसेच भाववाढ या प्रमुख कारणांमुळे प्रकल्पाची किंमत वाढलेली असून, गुंजवणी प्रकल्पाचा रु.१९९२.४१ कोटी इतक्या किंमतीचा तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावावर पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

उपरोक्त सर्व कार्यवाही बंद नलिका व उपसा सिंचन बाबत प्रचलित सर्व शासन निर्णय, नियमांचे पालन करुन तसेच मान्य निविदा शर्तीच्या अनुषंगाने पार पाडली असल्याने कोणताही घोटाळा अथवा कोणत्याही अधिकाऱ्याची चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

************************

<u>लक्षवेधी सूचना क्र. २१६०</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. रोहित पाटील, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. २१६०** पुढीलप्रमाणे आहे :-

" आपल्या महाराष्ट्र राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांचे काम विश्वासार्हतेच्या टक्केवारीनुसार पूर्ण झाले असले तरी प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये दुष्काळ आणि पूर या दोन्ही अतिरेकी परिस्थिती एकाचवेळी दिसून येतात. मध्यम प्रकल्पांसाठी ७५% व लघुपाटबंधारे प्रकल्पांसाठी ५०% विश्वासार्हता गृहीत धरून नियोजन झाले असले तरी सध्या राज्यातील ४० ते ४२ तालुके दुष्काळग्रस्त तर १८७ तालुके दुष्काळसदृश परिस्थितीत असते ~~आहेत~~. दुसरीकडे, काही जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. याच उदाहरण सांगली जिल्हयाच आहे, पावसाळ्यात सांगली भाग बऱ्याचवेळीस पाण्याखाली जात असतो तर काही जिल्ह्यात उन्हाळ्यात टँकर सुरू करावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर, पावसाळयात वाहून जाणाऱ्या पाण्यातून हे तलाव / बंधारे टप्याटप्प्याने भरून घेणे. या प्रकल्पात साचलेल्या गाळाची अत्याधुनिक उपकरणाद्वारे निश्चित करून सदरचा गाळ काढणे. या तलावांच्या परिसरात भूजल विकास यंत्रणेमार्फत भूगर्भातील पाणी पातळी वाढविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणेबाबत यासंदर्भात शासनाने या पाणलोट व्यवस्थापनासाठी कोणती तातडीची उपाययोजना आखलेली आहे का या वाहून जाणाऱ्या पावसाच्या पाण्यापासून दुष्काळग्रस्त भागांच्या समस्यांवर शाश्वत उपाय शोधण्यासाठी शासनाची तातडीने करावयाची कारवाही यांनी भूमिका आणि प्रतिक्रिया "

---

### मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यांतर्गत मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प ७५% विश्वासार्हतेने व लघु पाटबंधारे प्रकल्प ५०% विश्वासार्हतेने बांधण्याचे नियोजन करण्यात येते. महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने प्रति हेक्टर पाणी उपलब्धतेनुसार सर्व नदीखोऱ्यांचे अतितुटीचे, तुटीचे, सर्वसाधारण व विपुलतेचे असे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार १०.५०% क्षेत्र अतितुटीचे व 32% क्षेत्र तुटीच्या प्रकारात येते. त्यामुळे राज्याच्या काही भागात दुष्काळ व दुष्काळसदृश परिस्थिती तर काही भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. याकरिता ज्या ठिकाणी शक्य आहे अशा ठिकाणी पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अस्तित्वातील कालव्यांचा वापर करून लाभक्षेत्रातील तलाव बंधारे भरून घेण्याची कार्यवाही करण्यात येते.

सांगली जिल्ह्यातील काही तालुक्यांना पावसाळ्यात पूर परिस्थितीचा सामना करावा लागतो व याचवेळी इतर तालुक्यांमध्ये पाणी टंचाई भेडसावत असते. या पार्श्वभूमीवर पावसाळयात वाहून जाणाऱ्या पाण्यातून हे तलाव/बंधारे टप्याटप्प्याने भरून घेणेच्या दृष्टीने सन २०१९-२०२५ या वर्षात पूर कालावधीत टेंभू, ताकारी व म्हैसाळ या उपसा सिंचन योजनांद्वारे एकूण २५.२७४ टीएमसी इतके पाणी उचलणेत आले. यामुळे तलाव भरण्यासोबतच तलावांच्या परिसरात भूगर्भातील पाणी पातळीत वाढ होण्यास मदत झाली.

टेंभू उपसा सिंचन योजनेद्वारे पावसाळी हंगामात एकूण ११.१०७ टिएमसी पाणी उचलून त्याव्दारे सातारा जिल्ह्यातील कराड, सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, आटपाडी, खानापूर, तासगांव, कडेगाव व सोलापूर जिल्हयातील सांगोला या तालुक्यातील तलाव भरुन देण्यात आले आहेत. तसेच ताकारी उपसा सिंचन योजनेद्वारे पावसाळी हंगामात एकुण २.२३५ टिएमसी पाणी उचलून त्याव्दारे सांगली जिल्ह्यातील खानापूर, तासगांव ,मिरज, पलूस, कडेगांव व वाळवा या तालुक्यातील तलाव भरुन देण्यात आले आहेत. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्वारे पावसाळी हंगामात एकूण ११.९३२ टिएमसी पाणी उचलून त्याव्दारे सांगली जिल्हयातील मिरज, कवठेमहांकाळ, तासगांव, जत व सोलापूर जिल्हयातील सांगोला व मंगळवेढा या तालुक्यातील तलाव भरुन देण्यात आले आहेत.

वर नमूद उपायोजनां व्यतिरिक्त पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत केंद्र शासनाच्या जलशक्ती अभियान अंतर्गत "कॅच द रेन" योजनेमध्ये भूजल आधारित पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या शाश्वततेकरिता भूजल पुनर्भरणाची उपाययोजना राबवण्याबाबत आराखडा तयार करण्यात आलेला आहे. याआराखड्यानुसार कामे हाती घेण्याचे नियोजित आहे.

राज्यातील जलसंपदा विभागाच्या धरणातील गाळाची निश्चिती करून गाळ काढण्याबाबत तसेच वाळू निष्कासनाबाबतचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

सद्यस्थितीत मृद व जलसंधारण विभागाच्या प्रचलित शासन निर्णयानुसार गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत ग्रामपंचायत व अशासकीय संस्थाच्या मागणीनुसार गाळ उपसा करणेची कार्यवाही करणेत येते. यानुसार सांगली जिल्ह्यातील एकूण ९१ तलावातील गाळ काढण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्याद्वारे एकूण ३६.७५ लक्ष घनमीटर एवढा गाळ काढणे नियोजित आहे. त्यापैकी सद्यस्थितीत काढण्यात आलेल्या गाळाचे परिमाण १९.४३ लक्ष घनमीटर एवढे आहे. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

यासोबतच मृद व जलसंधारण विभागामार्फत पाणलोट व्यवस्थापनासाठी जलयुक्त शिवार टप्पा-२ ही योजना प्रगतीत असून यामध्ये सांगली जिल्यामधील एकूण १५४ गावांचा समावेश आहे. सदर गावात जलसंधारणाची एकूण ३७१० कामे प्रस्तावित होती त्यापैकी आज आखेर ३५०१ जलसंधारण कामे पूर्ण झाली आहेत. अटल भुजल योजनेअंतर्गत १८ कामांचा समावेश होता व सद्यस्थितीत सर्व कामे पूर्ण आहेत.तसेच पंतप्रधान कृषी सिंचन योजना टप्पा -२ हि योजना प्रगतीत असून सदरची योजना १३ गावांसाठी आहे. या व्यतिरिक्त जलयुक्त शिवार टप्पा-३ तसेच पंतप्रधान कृषी सिंचन योजना टप्पा-३ प्रस्तावित आहेत.

दुष्काळग्रस्त भागांसाठी वरीलप्रमाणे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

******

लक्षवेधी सूचना क्र.२२६९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.हिरामण खोसकर, श्री. राजु खरे, श्री. सुरेश भोळे, श्री. सु रेश धस, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२६९ पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक सिंचन विभागातील पुणेगाव कालवा उपविभागा अंतर्गत डाव्या कालव्याचे काम पूर्ण न करताच कालव्याचे कार्यकारी अभियंता, उप अभियंत्या, शाखा अभियंता, लेखा शाखेतील कर्मचारी यांनी १२ कोटी रुपयांची बोगस बिले सादर करुन त्यापैकी ८कोटी रुपये न झालेल्या कामाचे बिल पास करुन भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस येणे, पुणेगाव डावा कालवा ० ते ६३ कि.मी. चे मातीकाम बांधकाम व अस्तरीकरणाचे काम सुरु असून या कालव्याच्या प्रवाहाच्या टप्प्यात येणाऱ्या बहुतांश गावांमध्ये कामे झालीच नसल्याचे आढळून येणे, याप्रकरणी मा.मुख्यमंत्री, मुख्य अभियंता, यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात येऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराशी संगनमत करत कालव्याच्या ठिकाणी प्रत्यक्षात कामकाज न करता तब्बल १२ कोटी रुपयांचे बोगस बिल संभाजीनगर कार्यालयाकडे सादर करणे, सिंचन विभागात मार्च एण्डच्या नावाखाली अनेक गैरप्रकार होत असल्याचे यापूर्वी अनेकदा उघड होऊनही कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात न येणे, या गैरव्यवहाराची व्याप्ती पाहता याप्रकरणी शासनाने १२ कोटी रुपयांची बोगस बिले सादर करणारे नाशिक सिंचन विभागातील कालव्याचे कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता, लेखा शाखेतील कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी लोकप्रतिनिधींकडून होत असलेली मागणी, तसेच ठेकेदार शारदा यांनी केलेल्या कामाची संबंधीत यंत्रणेकडून पहाणी करुन त्यांना काळ्या यादीत टाकण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

नांदूर मधमेश्वर प्रकल्प विभागांतर्गत पुणेगाव डावा कालवा किमी ० ते ६३ चे मातीकाम, बांधकामे व अस्तरीकरणाचे नुतनीकरण करणे या कामाकरीता निविदा क्र. ब १/२२/ सन २०२३-२४ नुसार रू. ९०,८१,६४,८९९ इतक्या रक्कमेच्या निविदेस विहित मान्यतेअंती दि. ०६.११.२०२३ रोजीच्या कार्यारंभ आदेशान्वये अशोका शारदा संयुक्त उपक्रम ( जे. व्हि. ), पुणे या अभिकरणास कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदर निविदेचा कालावधी हा दि. ०६.११.२०२५ पर्यंत (२४ महिने) आहे. सदर निविदे अंतर्गत कालव्याचे मातीकाम, अस्तरीकरण व कालव्यावरील बांधकामे करणे प्रस्तावित आहेत. सदरहू कामाच्या क्षेत्रीय प्रगतीनुसार कामाची देयके क्षेत्रीय स्तरावर अदा करण्यात आलेली आहेत.

मार्च, २०२५ अखेर पर्यंत झालेल्या कामाचे देयक उपविभागीय स्तरावर मोजमाप पुस्तकात अभिलेखित करून शाखा अभियंता, उप अभियंता यांची १००% मोजमापाची तपासणी करून रु. ११.७६ कोटी रक्कमेचे ५ वे चालू देयक विभागीय स्तरावर सादर करण्यात आले. विभागीय स्तरावर प्रकल्प शाखेतील शाखा अभियंता, उप कार्यकारी अभियंता, लेखा परीक्षक, विभागीय लेखापाल यांनी देयकाची तपासणी करून कार्यकारी अभियंता यांनी प्रचलित नियमानुसार देयकाची

५% पडताळणी करून प्राधिकरण कार्यालयामार्फत महामंडळ कार्यालयास विहित नमुन्यात सादर केले. तदनंतर सदर मागणीपोटी रु. ८.०० कोटी इतका प्राप्त निधी अभिकरणास क्षेत्रीय स्तरावर अदा करण्यात आला.

सदर पुणेगाव डावा कालव्याचे शेवटच्या भागातील पाण्यापासून वंचित शेतकऱ्याला सिंचनाचा लाभ होण्याच्या दृष्टीने एकूण कामाच्या ६५% काम पूर्ण केले आहे. विहित निविदा कालावधीत उर्वरित काम पूर्ण करण्याचे क्षेत्रीय स्तरावर नियोजित आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर तपासणी केली असता प्रक्षेत्रावर प्रत्यक्षात झालेल्या कामापेक्षा कुठल्याही प्रकारचे जादाचे देयक अदा करण्यात आलेले नाही. परंतु: निधी उपलब्धते अभावी रु. ८.०६ कोटीचे देयक अदा करणे अद्यापही प्रलंबित आहे.

पुणेगाव डाव्या कालव्याच्या सदर निविदेअंतर्गत झालेल्या कामामुळे पुणेगाव धरणातून दरसवाडी धरणात एकूण ६३ कि.मी. व दरसवाडी धरणातून एकूण ८८ कि.मी. लांबीचा प्रवास करून डोंगरगाव साठवण तलावात पाणी पोहचले आणि कालव्याच्या शेवटच्या भागातील शेतकऱ्यांची अनेक वर्षांची प्रतिक्षा संपली.

**********************************************************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२४७१

**श्री. संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील -**

---

"शासकीय महाविदयालय नागपूर येथील सहयोगी प्राध्यापक नेत्र शल्य चिकीत्सक विभाग येथे डॉ.कविता धाबर्डे या कार्यरत असणे, त्यांना त्यांच्याच विभागातील प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ.नंदकिशोर राऊत हे महिला म्हणून दुय्यम वागणूक देत असणे, गत दहा ते अकरा महिन्यापासून येथील विद्यार्थी कर्मचारी यांच्या समोर सदर विभाग प्रमुख अपमानित करीत असणे, त्यांच्या कर्तव्यात अडथळे निर्माण करीत असणे, मानसिक खच्चीकरण करीत असणे, त्यांच्या पूर्वीच्या गोंदीया येथील कार्यालयात त्यांची वागणूक वादग्रस्त राहिलेली असणे, त्यामुळे सदर महिला डॉक्टरांनी अधिष्ठाता शासकीय महाविदयालय व आयुक्त व प्रधाव सचिव वैद्यकीय शिक्षण यांच्याकडून वारंवार तक्रार करुनही कारवाईस होत असलेला विलंब परिणामी येथील प्राध्यापक महिलेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व असुरक्षितेची भावना याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रीया."

---

### मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

डॉ. कविता धाबर्डे ह्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर संस्थेमध्ये नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभागा मध्ये सहयोगी प्राध्यापक या पदावर कार्यरत असून डॉ. नंदकिशोर राऊत हे या संस्थेत प्राध्यापक या पदावर दिनांक २१.०९.२०२३ पासुन कार्यरत आहेत. डॉ. कविता धाबर्डे यांनी दिनांक ०८.०८.२०२४ च्या पत्रान्वये डॉ. नंदकिशोर राऊत हे जवळपास १० महिन्या पासुन मानसिक प्रतारना करीत असून सहकारी अध्यापकांपुढे व कनिष्ठांपुढे समोर त्यांना अपमानित करतात अशा स्वरुपाची तक्रार केलेली आहे.

डॉ. कविता धाबर्डे, सहयोगी प्राध्यापक, नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग यांच्या तक्रारीची चौकशी करण्याकरिता अधिष्ठाता यांनी दिनांक १२.०८.२०२४ अन्वये पाच सदस्यीय प्राथमिक चौकशी समिती गठित करण्यात आली. सदर प्राथमिक चौकशी समितीने चौकशी करुन त्यांचा अहवाल दिनांक १३.११.२०२४ अन्वये अधिष्ठाता यांना सादर केला. सदर चौकशी अहवाला मध्ये चौकशी समितीने डॉ.नंदकिशोर राऊत यांच्याविरुध्द काही निष्कर्ष नोंदविले आहेत. डॉ. नंदकिशोर राऊत यांच्या विरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय स्तरावरुन दि.२९.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये चौकशी समिती गठित करण्यात आलेली असून समितीच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही करणे संकल्पित आहे.

********

लक्षवेधी सूचना क्र. ६६४

## महाराष्ट्र विधानसभा

## श्री. सुनिल प्रभू व श्री. मोहन गोपाळराव मते, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६६४ पुढीलप्रमाणे आहे.

"मुंबई विद्यापीठाच्या १६ ते ३० एप्रिल या कालावधीत विधी अभ्यासक्रमाच्या उत्तर पत्रिका न तपासताच अनेक प्रश्नांना "एनए" म्हणजे सदर प्रश्न सोडवलेच नाहीत असा शेरा देऊन विद्यार्थ्यांना अनुतीर्ण केल्याचा धक्कादायक प्रकार दि.१८.०६.२०२५ रोजी उघडकीस येणे, विधी अभ्यासक्रमाच्या १० व्या सत्राच्या "करविषयक कायदा" आणि "भारतीय साक्ष अधिनियम" या विषयाची विद्यार्थ्यांनी परिक्षा दिल्यानंतर सदरहू परिक्षेचा दि. ०९ जुन, २०२५ रोजी जाहीर होणे, यामध्ये अनुतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतीसाठी अर्ज केला असता, प्राप्त झालेल्या माहितीनुसार विद्यापीठ प्रशासनाने अनुतीर्ण विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकांची तपासणीच करण्यात आली असून, उत्तरे लिहूनही शेवटी अनेक प्रश्नांना "एनए" शेरा दिल्याची बाब उघड झाल्यामुळे उत्तर पत्रिकांचे लवलवकर पुर्नमुल्यांकन करुन शैक्षणीक प्रगतीमध्ये विलब टाळण्यासाठी पुर्नमुल्यांकनाचा निकाल विनाविलंब जाहिर करण्याची विद्यार्थ्यांनी मागणी करणे.विद्यापीठाच्या हलगर्जीपणामुळे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अनुतीर्ण केल्याचा हा प्रकार गंभीर असून यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्य आणि करिअर धोक्यात येणे, सततच्या चुकानंतर मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा व मुल्यमापन मंडळाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## मा.श्री. चंद्रकांत पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन

मुंबई विद्यापीठाने मे 2017 पासून On Screen Marking (OSM) ही संगणक आधारित उत्तरपत्रिका मूल्यमापन प्रणाली स्वीकारली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून परीक्षकांना त्यांच्या महाविद्यालयातील संगणक प्रयोगशाळेत बसून ऑनलाईन पद्धतीने उत्तरपत्रिका तपासता येतात. मूल्यमापन करताना जर उत्तरपत्रिकेतील काही प्रश्न विद्यार्थ्यांकडून न सोडवलेले असतील, किंवा काही पाने कोरी असतील, तर त्या ठिकाणी परीक्षक NA (Not Attempted) असा शेरा System मध्ये नोंदवतात.

विद्यार्थ्यांना कमी गुण मिळाल्याची किंवा उत्तरांचे मूल्यमापन पूर्ण झाले नसल्याची शंका असल्यास, विद्यापीठाने पुनर्मूल्यमापन व तक्रार अर्ज करण्यासाठी व्यवस्था उपलब्ध करुन दिली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत विद्यार्थ्यांनी असे अर्ज सादर करायचे असतात. त्यानंतर संबंधित विषयाचे परीक्षक बोलावून विद्यार्थ्यांचे उत्तरपत्रिकेचे पुनरावलोकन करण्यात येते आणि आवश्यक असल्यास निकालात सुधारणा केली जाते.

विधी अभ्यासक्रमाच्या १० व्या सत्राच्या "करविषयक कायदा" आणि "भारतीय साक्ष अधिनियम" या विषयाची विद्यार्थ्यांनी परिक्षा दिल्यानंतर सदरहू परिक्षेचा दि. ०९ जुन, २०२५ रोजी जाहीर करण्यात आला होता. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे उत्तरपत्रिकांचे विद्यापीठाकडून पुनरावलोकन केल्यावर प्रश्न क्रमांक 01 (i) आणि प्रश्न क्रमांक 4(c) यांचे मूल्यमापन संबंधित परिक्षकांकडून केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधित परीक्षकांना विद्यापीठाकडून समज देण्यात आली असून पुढील कारवाई सुरु आहे.

विद्यापीठामध्ये उत्तरपत्रिका तपासणीच्या अनुषंगाने उद्भवणारे प्रश्न, अडचणी यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाकडून On Screen Marking (OSM) या संगणक आधारित उत्तरपत्रिका मूल्यमापन प्रणाली मध्ये AI Based Detection system Incorporate करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी व गुणवत्तापूर्ण मूल्यांकनासाठी कटिबद्ध आहे. भविष्यात मूल्यमापन अधिक अचूक व पारदर्शक व्हावे, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सतत व निरंतर करण्यात येत आहेत.

शासनाने मुंबई विद्यापीठातील परिक्षांमधील गैरप्रकारांसंदर्भात विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांसोबत दि. १८.०६.२०२५ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये विद्यापीठातील परिक्षांसंदर्भात वारंवार उपस्थित होणाऱ्या मुद्यांच्या अनुषंगाने परीक्षा कार्यपद्धती सुधारण्याबाबत ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश मुंबई विद्यापीठाला दिले आहेत.

*************

लक्षवेधी सूचना क्र.१७६८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

**मा. श्री. श्याम खोडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १७६८ पुढीलप्रमाणे:-**

"विदर्भातील सरळ खरेदी धारक प्रकल्पग्रस्तांना मंजूर झालेला ८३२ कोटी रुपयाचा सहानुग्रह अनुदानाचा निधी अद्याप मिळालेला नसणे, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विदर्भातील सरळ खरेदीधारक प्रकल्पग्रस्तांना प्रति हेक्टर पाच लक्ष रुपये दराने १६६३३ हेक्टर आर क्षेत्राकरिता ८३२ कोटी रुपये वितरित करण्याचे आदेश होऊनही विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने खरेदी धारकांच्या खात्यावर हा निधी वर्ग केलेला नसणे, त्यामुळे विदर्भातील असंख्य सरळ खरेदी धारक प्रकल्पग्रस्तांना सानुग्रह अनुदान न मिळाल्याने ते आर्थिक अडचणीत येत असणे, त्यामुळे त्या शेतकऱ्यांना शेतीच्या हंगामाकरिता बँकेकडून अथवा सावकारांकडून कर्ज काढावे लागत असणे ते कर्जही त्यांना मिळत नसल्याने ते मोठ्या आर्थिक समस्येत येणे, त्यामुळे विदर्भातील सरळ खरेदी धारक प्रकल्पग्रस्तांनी आंदोलनाचा इशारा दिला असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री, जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

महामंडळाचे नियामक मंडळाच्या ८५ व्या बैठकीत ठराव क्र.८५/१७ अन्वये सन २००६ ते २०१३ दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने संपादीत क्षेत्राकरीता रु.५.०० लक्ष प्रती हे. दराने अंदाजे १६६३३.४२ हे. आर. क्षेत्राकरीता रु.८३१.६७१ कोटी रुपये सानुग्रह अनुदान स्वरुपात भुगतान करण्याकरीता नियामक मंडळाची मान्यता प्राप्त झाली. त्या अनुषंगाने महामंडळ कार्यालयाच्या दि. १५/१०/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये महामंडळांतर्गत सर्व अधीक्षक अभियंता यांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

सानुग्रह अनुदान हे सरळ खरेदीने संपादीत भूधारकांना देण्यात येत असून, सरळ खरेदी प्रकल्पांमध्ये न्यायालयीन दाद मागण्याची मुभा नाही. सबब, नैसर्गीक न्यायाचे तत्व लागु करुनच सहानुभुतीपुर्वक निर्णय घेवुन शासनाने विशेष बाब म्हणुन सानुग्रह अनुदानाची मागणी मान्य केली आहे. सदरचे अनुदान वाटप करण्याकरीता क्षेत्रफळ, लाभधारक, मृत लाभधारकांचे वारसदार इत्यादी आवश्यक बाबींच्या दृढीकरणासाठी आवश्यक दस्तऐवज आणि प्रतीज्ञालेख घेण्यात येत असून, याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करुन प्रकल्पनिहाय उपलब्ध निधीमधून टप्प्या टप्प्याने अनुदान वाटप सुरु करण्यात आलेले आहे.

सद्यः स्थितीमध्ये प्रकल्पाच्या शीर्षावर उपलब्ध निधीमधुन रु.१४१.४४ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. सदर निधीचे वितरण दस्तऐवजाची पुर्तता करुन करण्यात येत आहे. आजतागायत लाभार्थ्यांना रु.५६.२० कोटी रुपयाचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित सानुग्रह अनुदानाचे वाटप निधीचे उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजित आहे.

********************

रोके H/660 (750 - 7-25)

लक्षवेधी सूचना क्रमांक १७९४

**महाराष्ट्र विधानसभा**
**पावसाळी अधिवेशन, २०२५**
**श्री.किशोर पाटील, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा**
**नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७९४ खालीलप्रमाणे**

---

"मौजे वरसाडे प्र.बो. दहिगांव, डोकलगाव, ता.पाचोरा, जि.जळगांव येथील शेतकऱ्यांच्या जमिनी दहिगांव गिरणा बंधा-यासाठी सन १९६० साली संपादित करणे, दहिगांव बंधारा भरल्यानंतर गिरणा नदीला पूर आल्यावर आजतागायत जवळपास ६० वर्षात भरपूर पूर आले पण संपादित जमिनीमध्ये पाणीच न येणे, या गावातील शेतकरी आजही या जमिनी कसत असून त्यांनी २०१५ पर्यंत त्याचा शेतसारासुध्दा भरलेला असणे, सदर जमिनीवर मूळ मालक म्हणून महाराष्ट्र महसूल खाते या नावाने सगळ्यांच्या ७/१२ उता-यावर नाव लागले असल्याने जमिन कसत असतांनाही या शेतक-यांना कोणत्याही बँकेचे पीककर्ज न मिळणे, याकरिता हे शेतकरी त्यांच्या जमिनचा शासनातर्फे मिळालेला सन १९६० सालचा मोबदल्यानुसार शासनास ५ पटीने देण्यास तयार असणे, तसेच भविष्यात या जमिनीमध्ये पुराचे पाणी आल्यास शासनाकडून नुकसान भरपाई मागणार नाही, असे हमी पत्र लिहून देण्यास तयार असणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि.२५.३.२०२५ रोजीच्या सुमारास लेखी निवेदन देऊन कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी या शेतक-यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**मा.मंत्री (जलसंपदा) (विदर्भ,तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) यांचे निवेदन**

मौजे वरसाडे प्र.बो. दहीगांव, डोकलगांव, ता.पाचोरा, जि.जळगांव येथील शेतकऱ्यांच्या जमिनी दहीगांव गिरणा बंधाऱ्यासाठी सन १९६० साली संपादीत केलेल्या आहेत. सदर जमिनी तत्कालीन दहीगांव बंधाऱ्यासाठी प्रचलित भूसंपादन नियमानुसार संभावित, संकल्पित वारंवारतेचा पूर अभ्यासानुसार संपादीत केल्या गेल्या होत्या. गिरणा प्रकल्पात आतापर्यंत आलेल्या पूराचा विचार करता आजतागायत दहिगांव बंधाऱ्यांच्या ठिकाणापर्यंत संकल्पीत परिमाणाचा पूर आलेला नाही. त्यामुळे सदर जमिनीपर्यंत पाणी आलेले नाही. तथापि, सर्व संभाव्य शक्यता विचारात घेऊन जमिनीचे नुकसान टाळण्यासाठी सदर जमिनी संपादीत केल्या गेल्या होत्या. सद्य:स्थितीत गिरणा प्रकल्पाचा केंद्रीय जल आयोग यांच्यामार्फत सुधारीत पूर अभ्यास करण्यात आलेला आहे. सुधारीत पूर अभ्यासातील पूराचा परिमाण विचारात घेता गिरणा धरण, जामदा बंधारा, दहिगांव बंधारा यांचे मजबुतीकरण करणे आवश्यक राहील. त्यासाठी संपादीत जमिनीची जलसंपदा विभागास आवश्यकता आहे.

तहसिलदार पाचोरा यांच्याकडील प्राप्त अहवालानुसार भुसंपादन करण्यात आलेल्या जमिनीचे मिळकतदार यांनी सन-२०१५ पर्यंत शेतसारा भरणा केला आहे किंवा कसे, याबाबत ग्राम महसूल अधिकारी

यांच्याकडे शेतसारा पावतींचा शोध घेण्याची कार्यवाही सुरू असून तहसिलदार पाचोरा यांच्याकडील अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

सन-२०२० मध्ये गिरणा प्रकल्पाचा केंद्रीय जल आयोगामार्फत सुधारीत पूर अभ्यास करण्यात आला असून त्यानुसार पूर विसर्ग १७९०३ क्युमेक्स (घ.मी. प्रती सेंकद) इतका आहे. सदर पूर अभ्यास हा मूळ प्रकल्प अहवालानुसार निश्चित पूर ८२९१ क्युमेक्स (घ.मी. प्रती सेंकद) पेक्षा २ पटीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत ८२९१ क्युमेक्स (घ.मी. प्रती सेंकद) या पूर विसर्ग क्षमतेस अनुसरून भूसंपादन केलेल्या जमिनीची विभागास आवश्यकता आहे.

*********

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. किशोर पाटील, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. १९८९** पुढीलप्रमाणे आहे :-

"हिवरा मध्यम प्रकल्प (खडकदेवळा धरण) (जि. जळगांव) हा दरवर्षी पावसाळ्यामध्ये पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर त्यांचे पाणी सरळ गिरणा नदीत जात असणे, प्रकल्प भरल्यानंतर नदीजोड प्रकल्पांतर्गत हे पाणी काही प्रमाणात मौजे शेवाळे शिवारातील सुकळेश्वर पाझर तलावाकडून बहुळा प्रकल्पात टाकल्यास बहुळा प्रकल्प दरवर्षी १०० टक्के भरता येईल, सदर प्रकल्पाचा नैसर्गिक प्रवाह (नाला) असल्याने त्यांस खर्चही कमी लागणे, याकरिता या प्रकल्प नदीजोड योजनेअंतर्गत मंजूर झाल्यास शेवाळे, वाडी, निंभोरी, निंभोरी तांडा, वाणेगाव, मोढाळे, डोंगरगाव आदि परिसरातील गावातील शेतक-यांना मोठ्या प्रमाणात सिंचनाचा शेतीसाठी फायदा होणे, याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २९.१.२०२५ च्या सुमारास मा. जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन देण्यात येणे, यासंदर्भात अद्यापही शासनाने कोणताच निर्णय घेतला नसल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन**

हिवरा (खडकदेवळा) मध्यम प्रकल्प हा मौजे खडकदेवळा, ता. पाचोरा, जि. जळगांव या गावाजवळ हिवरा नदीवर बांधण्यात आलेला आहे. हिवरा नदी गिरणा नदीची प्रमुख उपनदी आहे.

मा. लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरील प्राथमिक पाहणी व टोपोशिटच्या अभ्यासानुसार सुकळेश्वर पाझर तलाव हा बहुळा मध्यम प्रकल्पाच्या वरील बाजूस आहे. हिवरा (खडकदेवळा) धरण हे बहुळा प्रकल्पाच्या शेजारील पाणलोट क्षेत्रात आहे. त्यामुळे प्रवाही पध्दतीने हिवरा नदीपात्रातुन सुकळेश्वर पाझर तलावात पाणी सोडणे शक्य होणार नाही.

सुकळेश्वर पाझर तलावाची एकूण साठवण क्षमता अल्प (०.२४ दलघमी) असून अप्रत्यक्ष सिंचन क्षमता ५१ हे. आहे. त्यामुळे सुकळेश्वर तलावाच्या वरील बाजूस असलेल्या शेवाळेवाडी, निंभोरी तांडा, वाणेगाव, मोढाळे, डोंगरगाव या गावांना सिंचनाचा लाभ देणे शक्य नाही. बहुळा मध्यम प्रकल्पामध्ये

मागील ५ वर्षात सरासरी ९५% पेक्षा जास्त पाणीसाठा झालेला आहे. तसेच मा. लोकप्रतिनिधींनी सिंचनाची मागणी केलेली गावे हि बहुळा प्रकल्प व सुकळेश्वर पाझर तलावाच्या वरील बाजुस येतात.

उपरोक्त बाबींचा विचार करता हिवरा नदीपात्रातुन सुकळेश्वर पाझर तलावात पाणी टाकणे शक्य होणार नाही.

*********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. अमित साटम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९९१ पुढीलप्रमाणे आहे :-

"मालाड परिमंडळातील मौजे मालाड संपादित वन क्षेत्रामध्ये क्रमांक २३९/१ पैकी मातंगगड येथे शहेनशहा पहाडी पीर हजरत मलंग शाह तुलने दूल्हे चॅरिटेबल ट्रस्टचा बेकायदेशीर दर्गा अस्तित्वात असणे, सदर दर्गा अंदाजे एक हेक्टर क्षेत्रावर अतिक्रमण करून बांधलेला असणे, या दर्ग्याचे शहंशाह पहाडी पीर हजरत मलंग शाह दुल्हे चॅरिटेबल ट्रस्ट यांचे नावे सहाय्यक धर्मदाय आयुक्त बृहन्मुंबई विभाग मुंबई यांचे कडे नोंदणी ३ जानेवारी २००७ रोजी केलेली असणे, परंतु १९९९ पासून सदर जागा ही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासाठी संपादित केलेली असून वनक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेली असणे,मुंबई उच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन क्रमांक ३०५ / १९९५ बॉम्बे एन्व्हायरमेंटल ॲक्शन ग्रुप आणि इतर विरुद्ध श्री. ए. आर. भारती डेप्युटी कन्सरवेटरऑफसंजय गांधी नॅशनल पार्क यामध्ये डिव्हिजन बेंच ने दिनांक ७ मे १९९७ च्या आदेशामध्ये नॅशनल पार्क म्हणून संरक्षित वनक्षेत्र घोषित झालेल्या क्षेत्रामध्ये इतर कोणत्याही गतीविधी करण्यात येऊ नयेत अथवा अशा कोणत्याही गतीविधी होत असतील तर त्या तात्काळ थांबवण्यात याव्यात याची दखल सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी घेऊन त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी असे आदेश पारित केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, शासनाची भुमिका व आवश्यक उपाययोजना. ."

---

श्री. गणेश नाईक

मा. मंत्री (वने)

### निवेदन

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या मालाड नियतक्षेत्रामध्ये मौजे मालाड संपादित वन स.क्र. २३९/१ पै. मध्ये मातंगगड येथे शेहेनशाह पहाडी पीर हजरत मलंग शाह दुल्हे चॅरिटेबल ट्रस्ट चा दर्गा अस्तित्वात आहे. मौजे मालाड सर्व्हे क्र. २३९/१ चे क्षेत्र मे. दिनशॉ ट्रस्ट यांचेकडून दि.१०/०९/१९७५ रोजी संपादित करण्यात आलेले आहे. सदर दर्गा अंदाजे १.०० हे. क्षेत्रावर अतिक्रमण करून करण्यात आलेला आहे. तत्कालिन वनपाल मालाड यांनी त्यांचेकडील अहवाल क्र. १९/सन २००६-०७ दि.२१/०४/२००६ रोजी वनक्षेत्रपाल तुळशी यांना वन क्षेत्रातील मंदिरे व मस्जिद यांची माहिती सादर केलेली आहे. सदर प्रपत्रात भादुकली पाडा (आदिवासी पाडा) बाबोजी दर्गा दाखविलेला असुन तो ३२ वर्षापूर्वी पासून अस्तित्वात असल्याचे नमूद केले आहे. यावरुन सदरचा दर्गा मे. दिनशॉ ट्रस्ट यांचेकडून संपादित करण्याचे पूर्वीपासून सदर ठिकाणी अस्तित्वात होता हे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच दर्ग्याचे शेहेनशाह पहाडी पीर हजरत मलंग शाह दुल्हे चॅरिटेबल ट्रस्ट च्या नावे सहाय्यक धर्मादाय आयुक्त बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे नोंदणी दिनांक ०३.०१.२००७ रोजी केलेली दिसून येते. तसेच वनक्षेत्रपाल तुळशी यांचेकडील पत्र क्र. तुळशी/जमीन/अति/२०९६ दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये संबंधितांना अतिक्रमण काढून घेणेबाबत नोटीस बजावण्यात आलेली असुन अतिक्रमण निष्काषन करताना कायदा व सुव्यवस्थेची शक्यता विचारात घेता वन कायदयान्वये पुढील योग्य ती विधीवत कार्यवाही करुन अतिक्रमण निष्काशन बाबत कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

*****

② HB-2164/1-1/760 प्रती.

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- २१८९**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. राजु तोडसाम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २१८९ पुढीलप्रमाणे आहे :-

"मौजा नवरगाव, जि. वर्धा येथील पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बाधित झालेल्या कुटुंबांना पुनर्वसन पॅकेज अंतर्गत रु. १० लाख रुपयांचा लाभ देण्याबाबत जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीने दिनांक २६/०७/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन पात्र लाभार्थ्यांबाबत निर्णय घेणे, याच गावातील संजय राजेराम सिडाम, प्रशांत राजेराम सिडाम आणि दीपक राजेराम सिडाम यांना जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीने 'अपात्र' ठरवले असणे, त्यांना अपात्र ठरवण्याचे कारण देताना असे नमूद केले आहे की, त्यांचे वडील राजेराम सकूजी सिडाम यांच्या नावावर नवरगाव येथील घर क्रमांक १४७ ऐवजी १५१ हा चुकीचा सादर केल्यामुळे स्वत:च्या मालकीचे घर नाही आणि तहसीलदार सेलू यांच्या यादीत नाव नसणे, वडिलोपार्जित मालमत्ता ही वारसाने मुलांकडे हस्तांतरित होते, हा मूलभूत कायदेशीर नियम से असतानाही केवळ चुकीचा घर क्रमांक नमूद झाल्याच्या तांत्रिक कारणास्तव आणि तहसीलदार यांच्या यादीत नाव नसल्याच्या सबबीखाली या तीनही कुटुंबांना अपात्र ठरवणे, या अपात्रतेमुळे या तीनही कुटुंबांना पुनर्वसन पॅकेज अंतर्गत मिळणाऱ्या रु.१० लाख लाभापासून वंचित राहावे लागत असणे, शासनाने या गंभीर बाबीची तात्काळ दखल घ्यावी आणि जिल्हाधिकारी, वर्धा व जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीने घेतलेला हा अन्यायकारक निर्णय रद्द करून तीनही कुटुंबांना तात्काळ पात्र घोषित करून त्यांना पुनर्वसन पॅकेज अंतर्गत रु. १० लाखाचा लाभ मिळवून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री. गणेश नाईक**

**मा. मंत्री (वने)**

### निवेदन

शासनाने, शासन निर्णय दिनांक ०३.११.२०१२ अन्वये अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने तथा अन्य वनप्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबतचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार बोर व्याघ्र प्रकल्पातील नवरगावचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून दिनांक ०६.८.२०१५ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. तदनंतर नवरगाव मधील २९४ कुटुंबांनी पर्याय-१ स्विकारला आहे.

उपरोक्त पर्याय क्रमांक-१ नुसार प्रत्येक कुटुंबाला रु. १०.०० लक्ष प्रमाणे रक्कम देय आहे. त्याकरीता गावाच्या पुनर्वसनाची अधिसूचना निर्गमित झालेल्या तारखेच्या अगोदर ५ वर्षापासून सदर गावात राहत असल्याचे पुरावे देणे आवश्यक आहे. तदनंतर पुनर्वसनाकरीता पात्र व्यक्तींची यादी जिल्हा पुनर्वसन समितीमार्फत तयार करण्यात येते. प्रस्तुत लक्षवेधी सुचनेत उल्लेखीत व्यक्तींनी पुनर्वसनाचा लाभ मिळणेबाबत मागणी केली असून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कडून प्राप्त अहवालानुसार त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

- श्री. प्रशांत राजेराम सिडाम यांनी सचिव नवरगाव यांचे दिनांक ०४.१०.२०१६ रोजीचे रहिवाशी प्रमाणपत्र सादर केले आहे. सदरचे प्रमाणपत्र अधिसूचना निर्गमित झालेल्या दिनांकानंतरचे आहे. तसेच तहसिलदार सेलू यांचे दिनांक १४.१०.२०१६ रोजीच्या मुळ यादीत नाव नसल्यामुळे अर्जदार यांना अपात्र करण्यात आले आहे.
- श्री. दिपक राजेराम सिडाम व श्री. संजय राजेराम सिडाम हे शासकिय नोकरीस्तव बाहेरगावी राहत असल्यामुळे जिल्हा पुनर्वसन समितीने अर्जदार यांना अपात्र करण्यात आले आहे.

दिनांक १८.१२.२०१८ रोजी आयोजित जिल्हा पुनर्वसन समितीच्या बैठकीमध्ये नवरगाव येथिल व्यक्तींनी सादर केलेले पुरावांची फेरतपासणी करुन दिनांक १६.०७.२०२१ रोजीच्या जिल्हा पुनर्वसन समितीच्या बैठकीमध्ये पुनर्वसनास पात्र व्यक्तींची यादी अंतिम करण्यात आली आहे.

सदर पुनर्वसनास पात्रता अंतिम यादीनुसार एकूण २९४ पात्र व्यक्तींना पर्याय-१ नुसार मोबदला अदा करण्यात आला आहे. श्री. प्रशांत राजेराम सिडाम, श्री. दिपक राजेराम सिडाम व श्री. संजय राजेराम सिडाम या तीन व्यक्ती पुनर्वसनाकरीता अपात्र असल्याने पुनर्वसनाचा लाभ देण्यात आलेला नाही, ही वस्तुस्थित निदर्शनास येते.

*******

③ HB-2164/1-1/760 प्रती.

# महाराष्ट्र विधानसभा
## सन- २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.१७४१

श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७४१ पुढीलप्रमाणे आहे:-

"मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना वि.स.स. लोकप्रतिनिधी यांनी दि. १२/०५/२५ रोजी च्या दरम्यान लेखी पत्र देऊन त्या पत्रामध्ये अमरावती येथील उद्योजकांना त्यांच्या उद्योगसाठी विस्तारीकरण करण्यासाठी अमरावती एमआयडीसी च्या बाजूला असलेली शासनाची १३ एकर जागा असल्याचे समजते त्या जागे मधील प्लॉट मिळणेबाबतची मागणी वरील पत्रात केली असणे. या पत्रातील मागणीची दखल घेत विद्यमान मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना त्यांचे कार्यालयाचे दि.१०/०६/२५ रोजीचे पत्राद्वारे तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असणे, यावर शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, जेणेकरून अमरावती एमआयडीसीचे उद्योगाला गती येईल यासाठी शासनाने घ्यावयाचा निर्णय या संबंधाने करावयाची कार्यवाही व शासनाची या संबंधाने प्रतिक्रिया"

## मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे झालेल्या दि.२२.०७.२०२४ व दि.२१.०३.२०२५ रोजीच्या बैठकीत अध्यक्ष अमरावती इंडस्ट्रीयल असोसिएशन यांनी अमरावती ते बडनेरा जुना बायपास रोडवर अमरावती औद्योगिक क्षेत्राचे हद्दीलगत असलेल्या मौजे निंभोरा खुर्द येथील शासकीय सर्व्हे नंबर ३० क्षेत्रफळ ६.१६ हे.आर एफ-क्लास जागा अमरावती औद्योगिक क्षेत्राचे विस्ताकरीता भूसंपादन करणेबाबत सुचविले होते.

त्यानुसार मौजे निंभोरा खुर्द येथील शासकीय सर्व्हे नंबर ३० क्षेत्रफळ ६.१६ हे. आर एफ-क्लास जागेची पाहणी करण्यात आली असून, सद्यस्थितीत सदर जागेवर ब-याच प्रमाणात पक्के घरे व इतर रहिवासी वस्तीचे अतिक्रमण, वीटभट्टी व मूर्ती कारखान्याचे अतिक्रमण आहे. तसेच सदर जागेवर ७/१२ उता-यावर १.८९, ०.७१२, ०.७०, ०.२७, १.०५ हे. आर जमीन पी.जी. स्मशान, प्रा. शाळा हायस्कूल म.न.पा. अंतर्गत एकूण ४.६२२ हे. आर क्षेत्र राखीव जागेचे स्थान मोक्यावर दिसून येत नाही. याबाबत मऔवि महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाच्या दि.१३.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, अमरावती यांना कळविण्यात आले असून, त्यांचेकडून अभिलेख प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

त्यामुळे मौजे निंभोरा खुर्द येथील शासकीय सर्व्हे नंबर ३० क्षेत्रफळ ६.१६ हे. आर एफ-क्लास सरकारी जागा अमरावती औद्योगिक क्षेत्राच्या विस्ताराकरीता संपादन करावयाची झाल्यास सदर शासकीय जागेवरीलअतिक्रमण राजस्व विभागामार्फत निष्कासित करुन, मऔवि महामंडळास विनामूल्य जागा हस्तांतरीत केल्यास उक्त जागा अमरावती औद्योगिक क्षेत्राच्या विस्ताराकरीता संपादन करणे योग्य राहील, सदर अटीनुसार मौजे निंभोरा खुर्द ता.जि. अमरावती येथील शासकीय सर्व्हे नंबर ३० क्षेत्रफळ ६.१६ हे. आर एफ-क्लास जमिनीचा भूसंपादनाचा प्रस्ताव मऔवि महामंडळाच्या मुख्यालयास प्राप्त झाला असता, सदर जागेवर अतिक्रमण असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अतिक्रमण काढून देण्यास तयार असल्याबाबत अभिप्राय सादर करण्याकरिता दि.२०.०८.२०२५ च्या पत्रान्वये प्रादेशिक अधिकारी, मऔवि महामंडळ, अमरावती यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने सदर क्षेत्र संपादन करणेबाबत पुढील कार्यवाही मऔवि महामंडळाकडून करण्यात येईल.

-----------

महाराष्ट्र विधानसभा
सन- २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२४४३

श्री. विलास तरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२४४३ पुढीलप्रमाणे आहे:-

"पालघर जिल्ह्यातील बोईसर तारापूर एमआयडीसी मध्ये वस्त्रोद्योग, केमिकल, अभियांत्रिकी, औषधेनिर्माण अशा प्रकारची साधारण १२१६ कारखाने असणे, यात कंपन्यांमधून घातक रसायनिक सांडपाणी नदीनाल्यात, समुद्र, डोंगरात, बोरवेल करून खड्ड्यामध्ये हे जमिनीत घातक पाणी सोडण्यात येणे, सांडपाणी वर प्रक्रिया करण्यासाठी फक्त २५ MLD क्षमतेचे एसटीपी केंद्र सुरू असणे, जुने २५ MLD केंद्र बंद असणे व अधिकचे २५ MLD क्षमतेचे एसटीपी प्लांट सुरू गरज असून एकूण ७५ एमएलडी क्षमतेचे केंद्र सुरू करण्याची आवश्यकता असणे, त्याचबरोबर वस्त्रोद्योगाला शासनाकडून मिळणारे भांडवली व विजेचे अनुदान अद्यापही मिळालेले नसणे, त्याचबरोबर केमिकल कंपनी यांना गुजरात राज्य प्रमाणे सुविधा न मिळाल्याने अनेक कंपन्या गुजरात राज्यात स्थलांतरित होणे, त्याचबरोबर अभियांत्रिकी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना अद्यापही ईएसआयसी रुग्णालय उपलब्ध नसणे, त्यामुळे भाजलेल्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचारासाठी जावे लागणे यात रुग्ण दगावणे, तसेच या कंपन्यांमध्ये वारंवार आग लागत असणे, याकरिता अग्निशामक यंत्रणा अपुरी पडत असणे, तसेच या एमआयडीसीमध्ये रस्त्यांची दुरवस्था असणे, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणे यावर स्थानिक ग्रामस्थ व नागरिकांमध्ये चिडीची भावना यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

म.औ.वि.महामंडळाने तारापूर औद्योगिक क्षेत्रात सर्व प्रकारच्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत ज्यामध्ये पाणी पुरवठा योजना, भूमिगत जलनि:सारण योजना, डांबरीकरण केलेले रस्ते, पथदिवे, सामायिक सुविधा केंद्र, अग्निशमन केंद्र इत्यादी सुविधांचा समावेश आहे.

तारापूर औद्योगिक क्षेत्रात सुमारे २१०६ भूखंड आरेखीत केले असून, भूखंड विविध उद्योगांच्या उभारणीकरीता वितरीत करण्यात आले आहेत. त्यापैकी बहुतांश कारखाने उत्पादन करीत आहेत. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील सुमारे ४०% कारखाने मुख्यत: रासायनिक प्रकारचे उत्पादन करतात.

महामंडळाने औद्योगिक क्षेत्रात विविध प्रभागातील कारखान्यामधून उत्पादन प्रक्रिये दरम्यान निघणाऱ्या सांडपाण्याचे संकलन व निचरा करण्यासाठी भूमिगत सांडपाणी संकलन व्यवस्था पुरविलेली आहे. या व्यवस्थे अंतर्गत औद्योगिक क्षेत्रात निर्माण होणारे सांडपाणी गुरूत्ववाहिनीद्वारे जमा करण्यासाठी साठवण टाक्या बांधलेल्या आहेत. सदर टाक्यांमध्ये एकत्रित झालेले सांडपाणी प्रक्रियेसाठी उदंचनाने सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये वाहून नेले जाते. तारापूर एन्व्हायरमेंट प्रोटेक्शन सोसायटी मार्फत सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये औद्योगिक सांडपाण्यावर म.प्र. नि. मंडळाच्या निकषाप्रमाणे प्रक्रिया करणे अभिप्रेत आहे.

तारापूर औद्योगिक क्षेत्रामधील उद्योग पूर्ण क्षमतेने सुरू झाल्याने या औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातून बाहेर पडणारे औद्योगिक सांडपाण्यात वाढ झाल्याने मे. तारापूर एन्व्हायरोमेंट प्रोटेक्शन सोसायटी (M/s. TEPS) द्वारे जुने कार्यरत असलेले २५ दलली क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्राची (CETP) क्षमता वाढ करुन नविन ५० दलली प्रति दिन क्षमतेचे सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे ठरल्या नुसार प्रथम टप्प्यात २५ दलली प्रति दिन क्षमतेचे केंद्र कार्यांवीत झाले आहे.

/..

जुने २५ दलली क्षमतेचे सामाईक सांडपाणी केंद्र व नविन ५० दललि क्षमतेच्यापैकी उर्वरित २५ दलली सामाईक सांडपाणी केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक आर्थिक साहाय्य महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मे. टीईपीएस (M/s. TEPS) ह्यांना कर्जाच्या स्वरूपात देवू केले असून मे. टीईपीएस (M/s. TEPS) मार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे लवकरच भविष्यात तारापूर औद्योगिक क्षेत्रात ५० दलली क्षमतेचे सांडपाणी व जुने २५ दलली क्षमतेचे सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वीत होणे अपेक्षित आहे. सदर प्रकल्प उभरण्या कामी व कार्यान्वीत करण्याकामी मऔविम यांची भूमिका सुविधा देणारा (Facilitator) अशी आहे.

समुद्री विज्ञान संशोधन (NIO) या राष्ट्रीय संस्थेकडून शास्त्रीय अभ्यास करून (EIA) या औद्योगिक सांडपाण्याचे नि:सारण ठिकाण हे नवापूर किनाऱ्यापासून ७.१० कि.मी. खोल समुद्रात ठरवून दिल्यानुसार मऔवि महामंडळातर्फे प्रक्रियायुक्त सांडपाणी नव्या एचडीपीई वाहिनीमार्फत समुद्रामध्ये ७.१० कि.मी. अंतरावर सोडण्यात येण्याच्या योजनेचे काम पूर्ण झाले. सदर १००० मि.मी. व्यासाची एचडीपीई वाहिनी टाकण्याचे काम पुर्ण झाले असून सदर वाहिनी सप्टेंबर २०२४ पासुन कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

तारापूर औद्योगिक क्षेत्रात म.औ.वि. महामंडळाचे स्वत:चे सुसज्ज अग्निशमन केंद्र कार्यरत असून आवश्यक मनुष्यबळ व अग्नि विरोधी यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्यात आलेली असून तारापूर औद्योगिक क्षेत्राव्यतिरिक्त या अग्निशमन केंद्राद्वारे पालघर जिल्हयातील इतरत्र ठिकाणी अग्निशमनाचे कार्य पार पाडण्यात येत आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ज्या औद्योगिक वसाहतीत ज्वालाग्राही रसायने, वस्त्रोद्योग, महा प्रकल्प, विदेशी गुंतवणुकीचे प्रकल्प, इत्यादी मोठे उद्योग व कारखाने जास्त प्रमाणात आहेत, अशा औद्योगिक वसाहतीमध्ये सुसज्ज असे अग्निशमन केंद्रे उभारुन यंत्रसामुग्रीसह सदर अग्निशमन केंद्र महामंडळामार्फत कार्यान्वित करण्यात आलेले आहे. महामंडळामार्फत तारापूर औद्योगिक क्षेत्रासाठी सन १९७९ पासून अग्निशमन सेवा पुरविण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत ESI चे पालघरला केंद्र सुरु असून तारापूर एमआयडीसी क्षेत्राच्या लगत हॉस्पीटलसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून ७ एकर जागा देण्यात आली आहे.

महामंडळास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून दर्जा प्राप्त असुन महामंडळाचे स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली आस्तित्वात आहे. तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००८ पासुन शासनाने लागू केला आहे. सदर कायद्यानुसार महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीतील इमारतींचे नकाशे मंजूर करताना तात्पुरत्या अग्निशमन ना- हरकत प्रमाणपत्रामध्ये अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविल्या जातात. सदर अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांची पुर्तता केल्याची खात्री केल्यानंतर सदर कारखान्यास अग्निशमन अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले जाते.

महामंडळाच्या तारापुर अग्निशमन केंद्राकरीता शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार २८ पदे मंजूर असुन त्यापैकी १४ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. महामंडळामार्फत उर्वरीत पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तारापूर औद्योगिक क्षेत्राअंतर्गत ५८ कि.मी लांबीचे रस्ते असून पैकी यापुर्वी १३.५ कि.मी. रस्त्याचे कॉक्रीटीकरण केले असून, १४ कि.मी. मुख्य रस्त्याचे चौपदरी सिमेंट कॉक्रीटीकरण, पावसाळी गटार, फुटपाथ व दिवाबत्ती इत्यादी स्वरूपाचे काम करारनामा क्र. बी-२/९५ २०२३-२०२४ अन्वये प्रगतीपथावर आहे. उर्वरित ३०.५० कि.मी. डांबरी रस्त्याचे उन्नतीकरण करणे प्रस्तावित आहे. तारापूर औद्योगिक क्षेत्रात रस्त्यावर खड्डे निर्माण झाल्यास ते भरण्याकामी करारनामा क्र. बी-२/०४ २०२५-२०२६ अन्वये ठेकेदाराची नियुक्ती केली असून त्याच्या मार्फत रस्त्यावरील खड्डे भरून रस्ते पुर्ववत करण्यात येत आहेत.

*************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन- २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

### लक्षवेधी सूचना क्र.२४५०

**श्री.सिध्दार्थ खरात, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२४५० पुढीलप्रमाणे आहे:-**

" महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सन १९६२ च्या स्थापनेपासून कायदेशीर सल्लागार महाव्यवस्थापक तथा विभाग प्रमुख (विधी व कामकाज) पदाची निर्मिती करण्यात आलेली असणे, २०१६ मध्ये महामंडळाने विहित अर्हता धारक महिला उमेदवाराची सरळसेवेने निवड करुन या पदावर नियुक्ती केलेली असणे, आठ वर्षांच्या कालावधीत संबंधित महिला अधिकारी यांनी या पदाचे "अधिकार आणि कर्तव्ये" याचा भाग असलेल्या खटल्यांचे व्यवस्थापन करताना शासनासाठी १०० टक्के यश मिळवून दिलेले असणे, तथापि, संबंधित महिला अधिकारी यांचेविरुद्ध चारित्र्यहनन, अश्लील लिखाण करून निनावी तर एका व्यक्तीने नावासह दाखल केलेल्या तथ्यहीन तक्रारीची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विहित पद्धतीने विल्हेवाट लावण्याऐवजी थेट विभागप्रमुखाचे "अधिकार आणि कर्तव्याचे" शैक्षणिक-तांत्रिकदृष्ट्या अपात्र व विहीत अर्हता नसलेल्या त्यांच्या अधिनस्त कनिष्ठ व्यवस्थापकांना work distribution करून दिल्याने या महिला अधिकारी यांचेवर अन्याय होऊन महामंडळाच्याही कार्य परिणामांवर अत्यंत प्रतिकूल परिणाम झालेला असणे, यामुळे संबंधित २१/१०/२०२४ ची वर्क डिस्ट्रीब्यूशन ऑर्डर तात्काळ रद्द करुन उक्त महिला अधिकारी यांना त्यांच्या धारण पदानुसार पूर्ववत अधिकाराने काम करु देण्याची आवश्यकता आणि कामाच्या ठिकाणी महिला अधिकाऱ्यांविरुद्ध अधिकार कक्षेबाहेर जाऊन कटकारस्थानपूर्वक चारित्र्यहनन मोहीम राबविणाऱ्या महाव्यवस्थापक (म.ब.वि) व संबंधितांना निलंबनाधीन ठेवून त्यांची विभागीय चौकशी लावणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया "

#### मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

मऔवि महामंडळात कायदेशीर सल्लागार (अर्धवेळ) या पदाची निर्मिती मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठक क्र.१, दि.१८/०८/१९६२ रोजीच्या बैठकीमधील ठराव क्र.७ नुसार करण्यात आली होती. तद्नंतर सहाय्यक विधी अधिकारी या पदाची निर्मिती संचालक मंडळाच्या बैठक क्र.१६१, दि.२२/०६/१९७९ रोजीच्या बैठकी मधील ठराव क्र.१६५८मध्ये झालेल्या निर्णयानुसार करण्यात आली आहे.तसेच मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळ बैठक क्र.१६६, दि.२२/०६/१९७९ रोजीच्या बैठकीमधील ठराव क्र.१७५८मध्ये झालेल्या निर्णयानुसार सदर पद दि.०१/०३/१९८० ते दि.२८/०२/१९८३ या कालावधीपर्यंत सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर बैठकीमधील ठराव क्र.१७७८ नुसार सहाय्यक विधी अधिकारी या पदास विधी व कामकाज विभागाचे प्रमुख घोषित करण्यात आले होते. तद्नंतर संचालक मंडळाच्या बैठक क्र.१८७, दि.२१/०३/१९८४ रोजीच्या बैठकीमध्ये श्री. एस. जी. कापरे हे सहाय्यक विधी अधिकारी असल्याचा उल्लेख आढळून येतो.दि.२८/०५/१९८१ संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये महाव्यवस्थापक (विधी) या पदाची निर्मिती करण्यात आली. संचालक मंडळाच्या बैठक क्र.१८८, दि. २८/०६/१९८४ रोजीच्या बैठकीमध्ये श्री. शंकर कापरे हे महाव्यवस्थापक (विधी) असल्याचा उल्लेख आढळून आलेला असल्याने सदर पद हे सदर कालावधीपासून महामंडळामध्ये अस्तित्वात आहे.

मऔवि महामंडळाच्या आस्थापनेवरील महाव्यवस्थापक (विधी) या रिक्त पदावर पूर्ण वेळ अधिकाऱ्याची नियुक्ती करणेकामी सदर पद सरळसेवा भरतीद्वारे भरणेकरीता दि.११/०७/२०१६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दि.२९/०९/२०१६ रोजी पात्र उमेदवारांची मुलाखत घेतली होती. सदर मुलाखतीच्या निकालाअंती श्रीमती. स्मिता आनंद चावरे यांना सर्वाधिक गुण मिळाल्याने त्यांना महाव्यवस्थापक (विधी) या पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने श्रीमती. स्मिता आनंद चावरे यांची महामंडळामध्ये महाव्यवस्थापक (विधी) या पदावर दि.१६/११/२०१६ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

श्रीमती बोरीकर यांच्या विरोधात त्यांची महाव्यवस्थापक (विधी) या पदावरील नियुक्ती बेकायदेशीररित्या असल्याबाबतची तसेच त्यांनी सदर पदाचा गैरवापर करुन केलेल्या अनियमिततेबाबत तक्रार प्राप्त झालेली होती. श्रीमती. बोरीकर यांचेविरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींवर मऔवि महामंडळाने सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने कार्यवाही केलेली असून तक्रारीमध्ये असलेल्या आक्षेपार्ह लिखाणाचा उल्लेख कोणत्याही टिप्पणी अथवा पत्रामध्ये करण्यात आलेला नाही.तद्नंतर पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्रातील आकुर्डी, तालुका-हवेली, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नं.१३७१२ च्या भूसंपादन प्रकरणी मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यास विलंब केला असल्याचे निदर्शनास आले. यावरुन विधी विभागातील कामाची प्रलंबितता मोठ्या प्रमाणावर असल्याचे निदर्शनास आल्यामुळे विधी व कामकाज विभागातील दैनंदिन कामकाजाचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी तसेच सदर विभागातील प्रलंबितता कमी करणेसाठी प्रशासकीय कारणास्तव कामकाजाच्या सुलभतेसाठी सदर विभागातील दैनंदिन कामकाजाचे महाव्यवस्थापक (विधी) व व्यवस्थापक (विधी) यांचेमध्ये वर्गीकरण करण्यात आलेले असून सदर वर्गीकरण केल्यामुळे महामंडळाच्या विधी विभागातील दैनंदिन कामकाजाची प्रलंबितता कमी झालेली आहे. दि. २१/१०/२०२४ रोजी कार्यालयीन आदेश निर्गमीत करण्यात आले असून त्यानुसार श्रीमती स्मिता बोरीकर, महाव्यवस्थापक (विधी) यांना विदर्भ विभाग, श्री नितीन कातोरे,व्यवस्थापक (विधी) यांना पुणे विभाग, श्री. अखिलेश खराबे, व्यवस्थापक (विधी) यांना कोकण विभाग व श्रीमती प्रज्ञा जोशी, व्यवस्थापक. (विधी) यांना मराठवाडा विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे.

सदर कामकाज वर्गीकरण आदेशानुसार सद्यस्थितीत मऔवि महामंडळाच्या विधी विभागातील कामकाज सुरळीतपणे सुरु असून कामकाजाची प्रलंबितता कमी झालेली आहे. कामकाजाच्या वर्गीकरणाचा दि. २१/१०/२०२४ रोजीचा कार्यालयीन आदेश रद्द करण्याची विनंती श्रीमती. बोरीकर यांनी त्यांच्या दि.२९/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये केलेली होती. तथापी सदर आदेश हा दैनंदीन कामकाजामध्ये सुसुत्रता आणुन कामामध्ये गतीमानता आणण्याच्या हेतूने प्रशासकीय सुलभतेसाठी निर्गमित केलेला असल्याने श्रीमती. बोरीकर यांनी केलेली विनंती ही सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने रद्द करण्यात आलेली आहे. श्रीमती. बोरीकर यांच्या विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये त्यांचेविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले होते. सबब उक्त प्रकरणी कार्यवाही करताना मऔवि महामंडळाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रशासकीय बाबींवर प्राथमिक चौकशी करणेसाठी तक्रारीमध्ये नमूद केलेल्या विविध विभागांकडून माहिती मागविणे बाबतची प्रशासकीय कार्यवाही केलेली आहे. सदर कार्यवाही करताना मऔवि महामंडळाचा श्रीमती. बोरीकर यांना त्रास देणेबाबतचा अथवा इतर कोणताही हेतू नाही.

************************

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग **लक्षवेधी सूचना क्र.१९८**

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. चेतन तुपे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभु, श्रीमती रजनाताई (संजना) जाधव, श्रीमती सना मलिक, श्री. मुरजी (काका) पटेल श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९८ पुढीलप्रमाणे आहे:-

राज्यात माहे फेब्रुवारी ते एप्रिल २०२५ दरम्यान ८९ दिवसांपैकी ४९ दिवस मुंबईच्या हवेतील पीएम-१० ची पातळी राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकापेक्षा जास्त असणे म्हणजे एकुण कालावधीमध्ये ५५% दिवस हवेची गुणवत्ता पातळी निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक असणेबाबतची माहिती केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीच्या विश्लेषणातून सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अ‍ॅण्ड क्लिन एअर या संस्थेने या आकडेवारीचे केलेले विश्लेषण, या आकडेवारीनुसार फेब्रुवारी महिन्यात सर्वच्या सर्व २८ दिवसांमध्ये पीएम-१० च्या पातळीने राष्ट्रीय मानकाच्या निर्धारित पातळीचे केलेले उल्लंघन, हवेमध्ये आढळणारे घन आणि द्रव कण हे इतके सूक्ष्म असतात की ते सहज फुफ्फुसापर्यंत पोहचू शकतात आणि श्वसन व हृदयविकारासारख्या आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकतात, बांधकामामधून उडणारी धूळ, रस्त्यावरील धूळ, वाहनांमधून होणारे उत्सर्जन, औद्योगिक क्रिया, आणि कचरा जाळणे या कणांमुळे डोळ्यामध्ये, घशात आणि नाकात निर्माण होत असलेली खवखव, विशेषत: लहान मुले, जेष्ठ नागरिक यांना आणि दमा फुफ्फुस विकार असलेल्या व्यक्तींना निर्माण होत असलेला अधिकचा धोका लक्षात घेता, मुंबईसह राज्यातील सर्व नागरिकांचे हवेतील धुळीमुळे होणारे रोग कमी करण्याकरिता शासनाने या प्रदुषणाची होणारी वाढ रोखण्यासाठी प्रतिबंधक कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भुमिका.

---

**मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.**

सर्वसाधारणपणे पावसाळयामध्ये हवेतील प्रदूषणकांची पातळी सर्वात कमी व हिवाळयात सर्वाधिक असते. पावसाळयात पावसाच्या पाण्याबरोबर मिसळल्याने व समुद्रावरुन येणाऱ्या वेगवान नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे हवेतील धुलीकणांचा निचरा होतो. हिवाळयात कमी तापमानामुळे व वाऱ्याची गती कमी असल्याने जमिनीलगतची प्रदूषके ही उंचावरील हवेत मिसळल्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे तयार होणाऱ्या प्रदूषकांचा निचरा न झाल्याने मुंबई, मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे व मुंबई महानगर परिसरातील हवेतील प्रदूषणात वाढ होते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राष्ट्रीय वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रम/ राज्य वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत असून मंडळामार्फत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी संयंत्रणेची (CAAQMS) यंत्रणा उभी केली आहे. त्यापैकी मुंबई व मुंबई उपनगरे परीसरातील हवेची गुणवत्ता तपासण्याकरीता मंडळाकडून १४ ठिकाणी सतत हवा गुणवत्तता तपासणी केंद्रे उभारलेली आहेत. सदर यंत्रणेमधून प्राप्त होणारी आकडेवारी मंडळाच्या व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली जाते. तसेच मुंबई शहरामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने ५ व नवी मुंबई महानगरपालिकेने १ ठिकाणी व भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (IITM SAFAR) यांनी १०ठिकाणी सतत हवा गुणवत्ता तपासणी केंद्रे उभारलेली आहेत.

सतत हवा तपासणी केंद्रांच्या (CAAQMS) प्राप्त पृथ्थःकरण अहवालानुसार, मुंबई शहरातील हवेच्या गुणवत्तेबाब PM 10 या प्रदूषणकाचा मासिक सरासरी अहवाल हा माहे फेब्रुवारी ते एप्रिल 2025 दरम्यान काही वेळेस राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकांपेक्षा जास्त व काही वेळेस विहित मर्यादेत दिसून येत असून वर्गवारी प्रमाणे तो समाधानकारक ते मध्यम स्वरुपाचा आहे. तसेच माहे फेब्रुवारी 2025 या महिन्यामध्ये PM 10 या प्रदूषकाचा अहवाल राष्ट्रीय मानकापेक्षा जास्त असला तरी तो वर्गवारी प्रमाणे समाधानकारक ते मध्यम स्वरुपामध्ये मोडतो.

मुंबई शहरातील हवेचा दर्जा माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२३ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकनुसार काही प्रमाणात धोकादायक पातळीपर्यंत खालावल्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी Suo Motu Public Interest Litigation No.३/२०२३ मध्ये हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांना आदेश दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाने सदर याचिकेमध्ये एक तज्ञ समिती नेमली असून सदर समितीने परिस्थितीचे निरीक्षण करून अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले असून सदर समितीने ०७ वेळा सर्व

भागधारकांबरोबर बैठका घेऊन मा. उच्च न्यायालयास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शहरी स्थानिक संस्था, परिवहन विभाग आणि समितीच्या शिफारशींवर आधारित केलेल्या कार्यवाहीचा समावेश असलेला अहवाल सादर केला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, मा. आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/०२/२०२४ रोजी समन्वय समिती गठीत केलेली असून सदर समन्वय समितीच्या ०६ बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत तयार केलेल्या मुंबई शहराच्या कृती आराखड्यास मान्यता मिळाली असून सदरील कृती आराखड्यानुसार पीएम २.५ व पीएम १० हे घटक सन २०२४ पर्यंत २० % ते ३० % व सन २०२६ पर्यंत ४० % कमी करण्याबाबतचे उद्दिष्ट असून त्यांची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

**मुंबई महानगर व परिसरातील हवा प्रदूषण कमी करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या कार्यवाही बाबतचा तपशील खालीलप्रमाणे :-**

- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.१२/१२/२०२३ व दि.०५/०२/२०२४ रोजी बांधकाम व पाडकामामधून निर्माण होणाऱ्या राडारोड्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने, परिवहन आयुक्त यांना दि.१३/१०/२०२३ व दि.२१/१२/२०२४ रोजी पुन:श्च शहरात धावणाऱ्या अवजड वाहनांमधुन उत्सर्जित होणाऱ्या प्रदूषकांची नियमित तपासणी करुन PUC जारी करण्याबाबत तसेच, बांधकाम व पाडकामामधुन निर्माण होणाऱ्या राडयारोड्याची वाहतूक करणारी वाहने ही अच्छादित असावीत याबाबत खात्री करण्याकरीता मोहिम राबविण्याकरीता निर्देशित केले होते. तसेच, बांधकाम साहित्य किंवा बांधकाम व पाडकामामधुन निर्माण होणाऱ्या राडारोडा साहित्य वाहून नेणाऱ्या वाहनांमध्ये ट्रॅकिंग सिस्टीम बसवलेली आढळून न आल्यास, अशी वाहने जप्त करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.
- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.१३/०२/२०२४ रोजी बेकरी उद्योग आणि हॉटेल / रेस्टॉरंट / ढाब्यांमधील तंदूरसाठी स्वच्छ इंधन वापरण्याबाबत निर्देश दिलेले असून याबाबत कार्यशाळेचे आयोजन केले होते. सदर कार्यशाळेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कार्यरत २७८ बेकरी उद्योगांना मंडळामार्फत लाकूड व कोळसा इंधन म्हणून वापरत असल्यामुळे दि.०७/०१/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली आहे.
- मुंबई महानगर क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या रेडीमिक्स कॉंक्रिट प्लांट्स, स्टोन क्रशर, हॉटमिक्स प्लांट्स व हवा प्रदूषणकारी उद्योगांची आढावा बैठक घेऊन सर्व भागधारकांना हवा प्रदूषण होऊ नये, याकरीता सुचित करण्यात आले होते.
- महाराष्ट्र राज्यामध्ये क्लीन कन्स्ट्रक्शन टूलकिट तयार करण्याकरिता क्रेडाई नॅशनल, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलोपमेंट कौंसिल, MSRDC, PWD, सिडको, इत्यादी भागधारकांची बैठक दि.०८/११/२०२४ रोजी घेण्यात आलेली आहे. मुंबई महानगर व परिसरात कार्यरत असणाऱ्या आरएमसी उद्योगांबाबत सुधारीत नियमावली दि.२७/११/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.
- सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक (SPs), महापालिका आयुक्त / प्रमुख अधिकारी आणि परिवहन आयुक्त यांना दि.०२/१२/२०२४ रोजी "ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन" (GRAP) च्या स्टेज-IV/III (मध्यम ते खराब / अत्यंत खराब हवेची गुणवत्ता अंतर्गत) कार्यवाही लागू करण्याबाबत कळविले आहे. मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.०७/०२/२०२५ रोजी, बेकरी उद्योगांना दि.०९/०७/२०२५ पर्यंत लाकूड व कोळसा हे इंधन म्हणून वापरणे बंद करून हरित इंधनाचा वापर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
- मुंबई महानगर परिसरातील महापालिका आयुक्त व मुख्य अधिकारी, नगरपरिषद यांना दि.०७/०२/२०२५ रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सुरु असलेल्या सर्व बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी प्रदूषण निर्देशक बसवणे बंधनकारक करण्याबाबत सूचित केले आहे.
- दि.०८/०२/२०२५ रोजी मुंबई व परिसरातील वृत्तपत्रांमध्ये लाकूड व कोळसा इंधन म्हणून वापरणाऱ्या बेकरी उद्योगांनी दि.०९/०७/२०२५ पूर्वी सी.एन.जी., गॅस, हरित इंधन इ. वापर करणे आवश्यक असल्याबाबत जाहीर सूचना देण्यात आलेली आहे.
- मुंबई महानगर क्षेत्रातील १९१ अतिप्रदूषणकारी उद्योगांचे प्रदूषण लेखा परीक्षण (Pollution Audit) केले आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील सर्व लाल संवर्गातील उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्वयं-लेखापरीक्षण

अहवाल (Self Audit Report) करण्याकरिता निर्देशित केले असून स्वयं लेखा परिक्षण अहवाल परिक्षणाचे व प्रदूषण लेखा परीक्षणाचे (Pollution Audit) कामकाज प्रगतीपथावर आहे.

- मा. उच्च न्यायालयाने दि.०९/०१/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासनाने (गृह विभाग) दि.२२/०१/२०२५ रोजींच्या शासन निर्णयानुसार मुंबई महानगर क्षेत्रामध्ये पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या वाहनांवर निर्बंध घालून फक्त सीएनजी व इलेक्ट्रीक वाहनांनाच परवानगी देण्याबाबत राज्य शासनाद्वारे परिपूर्ण अभ्यास करण्याकरीता समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक आरोग्य खाते, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई शहर आणि उपनगरातील दवाखाना व आपला दवाखाना येथे नोंद झालेल्या श्वसन विकारांच्या आजारात जसे की दमा, सर्दी आणि खोकला या आजारांच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून येत नाही.

**************

# विधानसभा सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र. १०७८

मा.श्री. अभिमन्यु पवार व मा.श्री. राहूल सुभाषराव कुल, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली विधानसभा लक्षवेधी सूचना क्रमांक १०७८ प्राप्त झाली आहे. सदर लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

**"सर्वांसाठी घरे या धोरणानुसार प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत तसेच राज्य योजनांतर्गत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजना व मोदी आवास योजना शासनाच्या वतीने राबविण्यात येत असणे महाराष्ट्रात मोठ्याप्रमाणत दिव्यांग लाभार्थी कच्या घरात राहत असणे. सदरील दिव्यांग लाभार्थीची नावे प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रपत्र ड प्रतिक्षा यादीमध्ये असणे, सदरील नोंदीत केलेली नावांची क्रमवारी बदलवता येत नसल्याने सदर दिव्यांग लाभार्थी हे प्राधान्य देण्यात आलेले असतानाही वर्षानुवर्षे या योजनेपासुन वंचित राहीले असणे, जि.प. लातूरच्या सेसनिधी अंतर्गत ५% अनुदानातून दिव्यांग लाभार्थ्यांना घरकुले मंजूर केली असणे, दिव्यांग लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादीतील संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने आणि घरकुल मंजूर होत नसल्याने नाराजीची भावना निर्माण झाली असणे, सदरील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी सर्व योजनेत स्वतंत्र प्रतिक्षा यादी करून या दिव्यांग लाभार्थ्यासाठी विशेष बाब म्हणून प्राधान्याने घरकुल योजना मंजूर करण्याबाबत किंवा दिव्यांग लाभार्थ्यांसाठी लातूर जि.प.च्या धर्तीवर राज्यशासनाच्या वतीने स्वतंत्र योजना सुरु करण्याबाबत व बेघर असलेल्या दिव्यांग बांधवाना स्वताचे पक्की घरे मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## मा. मंत्री दिव्यांग कल्याण विभाग यांचे निवेदन

- महाराष्ट्र राज्याच्या सन २०११ च्या सार्वत्रिक जनगणनेप्रमाणे दिव्यांग व्यक्तींची एकूण संख्या २९,६३,३९२ इतकी असून, ती एकूण लोकसंख्येच्या २.६३ % इतकी आहे. पूर्वी यामध्ये दिव्यांगत्वाच्या फक्त ७ प्रवर्गाचा समावेश होता. तदनंतर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार दिव्यांगत्वांचे एकूण २१ इतके प्रकार झाले आहेत.
- राज्यात शहरी व ग्रामीण भागातील लोकांना घरकुल उपलब्ध व्हावे म्हणून केंद्र व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येत आहेत. उदा. शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, रमाई आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना, मोदी आवास घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना इत्यादी. उपरोक्त योजना ह्या राज्याच्या विविध प्रशासकिय विभागांमार्फत राबविल्या जातात.
- **प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण** :- या योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड ही ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ०१ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण (SECC-२०११) माहितीच्या आधारे ग्रामसभेमार्फत तयार केलेल्या

कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) मधून व सन २०१८-१९ मध्ये प्रपत्र ड अंतर्गत झालेल्या सर्वेक्षणाच्या आधारे ग्रामसभेमार्फत तयार केलेल्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) मधून करण्यात येते. ही यादी आवास सॉफ्ट प्रणालीवर उपलब्ध आहे व त्यामधूनच लाभार्थ्यांना ग्रामपंचायत निहाय मंजूरी देण्यात येते. तसेच या दोन्ही सर्व्हेमध्ये दिव्यांग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी वेगळा टॅब उपलब्ध करून देण्यात आलेला होता. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही केंद्रपुरस्कृत योजना राबविण्यात येते. राज्यातील विविध प्रवर्गातील लाभार्थ्यांकरिता घरकुल योजना संबंधित प्रशासकीय विभागाकडून राबविण्यात येतात.

- **समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर यांचेमार्फत राबविण्यात येणारी योजना :-** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर या कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नाच्या ५ टक्के दिव्यांग कल्याण सेस निधी मधून दिव्यांग व्यक्तींना घरकूल ही योजना सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये राबविण्यात आली आहे. यामध्ये प्रति घरकुलाकरीता रक्कम रु. १,२०,०००/- एवढे अनुदान देण्यात आले.
- उपरोक्त योजना सर्वसामान्य लोकांकरीता असून, या योजनेत दिव्यांगांना ५ % आरक्षण देण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३७ (c) मध्ये शेत जमीन वाटप व घरांचे वाटप यामध्ये ५ % इतके दिव्यांग लाभार्थी असावेत, असे नमूद आहे. तथापि या आधारे दिव्यांगांना ५ % च्या प्रमाणात लाभ मिळत नसल्याचे आढळून आले आहे. याबाबत संबंधित विभागांना दिव्यांग आरक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
- याबरोबरच केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ सन २०२४-२५ ते सन २०२८-२९ या कालावधीसाठी सुरु केला आहे. याबाबत ग्राम विकास विभागाने दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याकरिता केंद्र शासनाकडून १९.६६ लाख घरकुलांचे उदिष्ट प्राप्त झाले असल्याचे नमूद आहे. त्यानुसार या योजनेंतर्गत साधारणतः ९८,३०० दिव्यांगांना लाभ मिळणे अपेक्षित आहे.

*************************

लक्षवेधी सूचना क. ८७६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

मा. श्री. भीमराव केराम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क. ८७६ खालीलप्रमाणे आहे:-

"अनुसूचित जमातीच्या ४८० विद्यार्थ्यांना दहावीनंतर अभियांत्रिकी (जेईई) आणि वैद्यकीय (नीट) प्रवेश परीक्षांचे मोफत मार्गदर्शन करण्यासाठी नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थांचे नियुक्ती करण्याचा शासन आदेश दिनांक ८ जून २०२३ रोजी निर्गमित होऊनही अद्याप ही योजना लाल फितीत अडकल्याची गंभीर बाब उघडकीस येणे,आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या प्रत्येक अप्पर आयुक्त कार्यालय स्तरावर शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम शाळा किंवा एकलव्य मॉडेल निवासी शाळेतील एक तुकडी वैद्यकीय आणि दुसरी तुकडी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकेल, अशा पद्धतीने प्रशिक्षित करण्याची योजना आखण्यात आली असणे, नीट, जेईई पात्रता परीक्षेच्या तयारी करिता योजना तयार करण्याची मागणी आदिवासींसाठी काम करणाऱ्या ट्रायबल फोरम या संघटनेने केली असणे, सरकारकडे त्याबाबत वारंवार पत्रव्यवहारही केला असल्याचे निदर्शनास येणे, मात्र अद्याप या योजनेची अंमलबजावणी झालेली नसणे, उलट आत्तापर्यंत अर्थसंकल्पात आदिवासी समाजाच्या मागण्यांना कात्रिच लावण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, अनुसूचित जमातीवर हा अन्याय असल्याने ही योजना राबवण्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करावी अशी मागणी सरकारकडे केली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" .

---

मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन.

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावी नंतर दोन वर्ष कालावधीसाठी नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या साह्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासंदर्भातील योजनेचा शासन निर्णय दिनांक ०८.०६.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला होता. मात्र, दरम्यानच्या कालावधीत केंद्र सरकारच्या जनजाती कल्याण मंत्रालयामार्फत सर्व राज्यातील अनुसूचित जमातीसाठीच्या उल्लेखनीय योजनाचे नवी दिल्ली येथे सादरीकरण आयोजित केले होते. सदर सादरीकरणात तेलंगणा राज्याने त्यांच्या राज्यात सदरची योजना राबविण्याची पद्धत व त्या केंद्रातील झालेल्या विद्यार्थ्यांची यशस्वीता सादर केली. ती योजना तेलंगणा राज्याने खुप चांगल्या पध्दतीने राबविली असल्याने तेथे प्रत्यक्ष जाऊन सदर योजनेचा अभ्यास करुन या योजनेच्या धर्तीवर आपल्या राज्यात योजना राबविण्याचा निर्णय आयुक्तालयाच्या स्तरावर घेण्यात आला.

उपरोक्तप्रमाणे झालेल्या निर्णयानुसार, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व उपायुक्त (शिक्षण), तसेच सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) यांच्या समितीने माहे एप्रिल-२०२४ मध्ये तेलंगणा राज्यात प्रत्यक्ष भेट देऊन तेथील सदर योजनेचा अभ्यास केला. दरम्यानच्या काळात या योजनेबाबत काही प्रकल्प अधिकारी यांचे सुध्दा आयुक्तालयाने अभिप्राय घेतले. या सर्व बाबींचा विचार करून आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक १२.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासन निर्णयाचा मसुद्यासह सदर योजनेबाबतचा सुधारित प्रस्ताव शासनास पाठविला. त्यानुषंगाने आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा/अनुदानित आश्रमशाळा/एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कुलमध्ये इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करुन घेणेकरिता सुधारित अटी व शर्तीचा समावेश करुन त्याप्रमाणे दिनांक १४.१०.२०२४ रोजी शासन निर्णयान्वये सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या. मात्र, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा निम्मा कालावधी संपला असल्याने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

प्रस्तुत शासन निर्णयातील तरतूदीनुसार आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या चार अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालयाच्या अधिनस्त प्रत्येकी एक अशा एकुण चार आश्रमशाळांची निवड करण्यात आली असून त्या आश्रमशाळा व प्रशिक्षण द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अपर आयुक्त | प्रशिक्षण ठिकाण | मुले/मुली | इ.११ वी प्रवेश क्षमता | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | CET/JEE | NEET |
| १. | नाशिक | शासकीय आश्रमशाळा बोपेगाव,ता.दिंडोरी, जि.नाशिक | मुले | ४० | ४० |
| २ | ठाणे | शासकीय आश्रमशाळा पिसे,ता.भिवंडी,जि.ठाणे | मुली | ४० | ४० |
| ३ | अमरावती | शासकीय आश्रमशाळा गोटेवाडी,ता. कळमनुरी,जि.हिंगोली | मुले | ४० | ४० |
| ४ | नागपूर | शासकीय आश्रमशाळा सिंधिविहीर, ता.कारंजा,जि.वर्धा | मुली | ४० | ४० |

उक्त दिनांक १४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीस अनुसरुन सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात सदरील योजना राबविण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावीनंतर दोन वर्ष कालावधीसाठी नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या साहाय्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासंदर्भातील प्रस्तावास दिनांक ३१.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये शासन स्तरावरून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

प्रस्तुत प्रशासकीय मान्यतेस अनुलक्षून दि.११.०२.२०२५ रोजी आयुक्तालयाच्या स्तरावरुन निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेत सहभागी झालेल्या ९ निविदाकारांचे कागदपत्रांची सनदी लेखापाल यांनी तपासणी केली. मात्र, सर्व निविदाकार हे निविदा फॉर्ममधील अटी व शर्ती पुर्ण करू न शकल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली.

तद्नंतर निविदा मसुद्यातील अनुभवाची अट शिथिल करून आयुक्तस्तरावरुन दिनांक ०६.०५.२०२५ रोजी पुर्ननिविदा प्रसिध्द करून दि.०९.०६.२०२५ पर्यंत निविदा भरण्यात मुदत देण्यात आली. सदर निविदेमध्ये १२ निविदाकार यांनी सहभाग नोंदविला असुन उक्त निविदाकारांचे कागदपत्र तपासणी करिता सनदी लेखापाल यांचेकडे दि.१०.०६.२०२५ रोजी देण्यात आले. सनदी लेखापाल यांनी दि.०१.०७.२०२५ रोजी दिलेल्या अहवालानुसार १२ निविदाकारांपैकी ३ निविदाकार पात्र ठरले. ३ निविदाकारांनी कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने त्यांना निविदेत अपात्र करण्यात आले आहे. तसेच ६ निविदाकारांना दि.०१.०७.२०२५ रोजी कागदपत्रांचे स्पष्टीकरण सादर करण्याबाबत कळविण्यात आले असुन दिनांक ०३.०७.२०२५ रोजी सायकांळी ७.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. अंतिम कागदपत्रांच्या आधारे १२ निविदाकारांपैकी ५ निविदाधारक अपात्र घोषित केले असुन ७ निविदाधारक पात्र झालेले आहे. प्रस्तूत निविदा अंतिम करण्याच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्यास्तरावरील खरेदी समितीमार्फत संस्था निवडीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. संस्था निश्चित झाल्यावर सदर योजनेची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा/परकीय विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठीच्या अर्हताकारी परीक्षा/परकीय भाषांचे प्रशिक्षण देणे (लेखाशिर्ष २२२५ डी ३८७) या योजनेकरीता रु.१००.०० कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

****************************************

लक्षवेधी सूचना क्रमांक १६३०

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १६३० पुढीलप्रमाणे आहे :-

"अमरावती जिल्ह्यातील सासन रामापुर ता. दर्यापूर येथील कोळी महादेव या आदिवासी जमातीचे कडून सुरू असलेली प्राचीन, दुर्मीळ शिव पार्वती महादेवाचे लग्न दरवर्षी लावण्याची प्रथा परंपरा या संबंधाने ग्रामसभा ठराव क्र. ०९/ दि. १४/०८/२३ व आदिवासी विकास निरीक्षक एम. आर, मावस्कर एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय धारणी जिल्हा अमरावती यांचा अहवाल वरील कार्यालयात प्राप्त दि. २७/०९/२३ रोजी सादर केला असणे या संबंधाने अप्पर आयुक्त सा.प्र. विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांनीही त्यांचे पत्र क्र.२१/२५ दि.२१/०१/२५ रोजी आदिवासी विकास मंत्रालयाकडे पाठवला असणे. तसेच विधानसभा सदस्य यांनी मा. आदिवासी विकास मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना मध्यवर्ती टपाल अनु.क्र. ८०९३७७८ दि. २५/०३/२५ रोजी पत्र सादर करून वरील गावातील आदिवासी समुदायाची वस्तीमध्ये सुख सुविधेचे काम रस्ता बांधकाम, आदिवासी भवन, आदिवासी हॉट, इतर कामे मंजूर करून निधी मंजूर करणे व या संबंधाने शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता असणे त्या संबंधाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा. मंत्री ,आदिवासी विकास यांचे निवेदन

सासन-रामापूर येथील आदिवासी जमातीचे लोक १०० वर्षापासून राहत असून या गावामध्ये भागेश्वर महाराजाचे पुरातन देवस्थान आहे. येथील आदिवासी जमातीकडून सुरु असलेली प्राचीन, दुर्मिळ शिव पार्वती महादेवांचे लग्न दरवर्षी लावण्याची प्रथा परंपरा आहे. सदर प्रथेची नोंद जिल्हाधिकारी गॅजेट मध्ये घेण्याबाबत सासन-रामापूर ग्रामसभेने दि. १४.०८.२०२३ रोजीचा ठराव क्र.९ पारित करुन मागणी केली आहे. त्यानुसार श्री. एम. आर. मावस्कर, आदिवासी विकास निरीक्षक, एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, धारणी जिल्हा अमरावती यांनी दि. २७.०९.२०२३ च्या पत्रान्वये प्रकल्प अधिकारी धारणी यांना अहवाल सादर केला आहे. या विषयाबाबत अपर आयुक्त, अमरावती विभाग यांचे पत्र क्र. २१/२०२५, दि.२१.०१.२०२५ आदिवासी विकास विभागास प्राप्त झाले आहे.

मा. राष्ट्रपतींच्या दि. ०६ सप्टेंबर १९५० रोजीच्या पहिल्या आदेशान्वये तसेच तद्नंतर केंद्र शासनाने वेळोवेळी अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये सुधारणा केल्यानुसार राज्याच्या बाबतीत अनुसूचित जमातीच्या याद्या सुचिबध्द केलेल्या आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती

याद्या (सुधारणा) अधिनियम १९५६(१९५६ चा अधिनियम क्र.६३) अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या राज्यनिहाय सुधारीत याद्या प्रसिध्द करण्यात येऊन सदर अधिनियमान्वये अनुसूचित जमातीचे क्षेत्र अधिसूचित करण्यात आले आहे. तद्नंतर अनुसूचित जाती व जनजाती आदेश (सुधारणा) अधिनियम १९७६ च्या अधिनियमान्वये (१९७६ क्र.१०८) अधिसुचित करण्यात आलेले क्षेत्र वगळण्यात आले असून, राज्यनिहाय अनुसूचित जाती व जमातीची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर अधिनियमान्वये ४५ जमाती समूह अंतर्गत १८१ अनुसुचित जमाती घोषीत करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक अनुसूचित जमातींची प्रथा, परंपरा, चालीरीती व विविध सांस्कृतिक बाबी भिन्न आहेत. या सर्व बाबींचा अभ्यास होणे आवश्यक असल्याने केंद्र शासनाच्या सहाय्यातून ४५ जमाती समुहांचा मानववंश शास्त्रीय अभ्यास प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. यामध्ये कोळी महादेव या जमातीचा अभ्यास देखिल समाविष्ट आहे. सदर मानववंश अभ्यास हा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याचे मार्फत संशोधन प्रकल्प सुरु आहे. तो पूर्ण झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी मा. आदिवासी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना मध्यवर्ती टपाल अनु. क्र. ८०९३७७८ दि. २२.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अमरावती जिल्हातील दर्यापूर तालुक्यातील सासन रामापूर येथे १०० वर्षे पूर्वी पासून रहिवाशी असलेले आदिवासी कोळी महादेव या जमातीतील दुर्मिळ व पुरातन चालीरीतीबाबत आदिवासी विकास विभागाकडून नोंद घेणेबाबत विनंती केली आहे.

आदिवासी समुदायाच्या वस्तीमध्ये सुख सुविधेचे काम रस्ता बांधकाम आदिवासी भवन, आदिवासी हॉट, इतर कामे मंजूर करण्यासंदर्भात अद्याप कोणताही प्रस्ताव ग्रामपातळीवरुन प्रकल्प कार्यालय एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांचेकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

*******

लक्षवेधी सूचना क्रमांक -१६७४

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती सरोज बाबुलाल अहिरे, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १६७४ खालीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक विधानसभा क्षेत्रातील महिरावणी, ता.नाशिक येथील महात्मा फुले संस्थेच्या सावित्रीबाई फुले माध्यमिक आश्रमशाळेत मोठया प्रमाणात गंभीर स्वरुपाची अनिमितता उघड होणे, दिनांक ६ मार्च, २०२५ रोजीच्या सचिव, आदिवासी विभाग यांना सादर करण्यात आलेल्या अहवालात सदर संस्थेबाबत अनेक बाबी उघड होणे, सदर संस्थेची जमीन एन.ए.केलेली नसणे, सदर संस्थेने विनापरवानगी बांधकाम करणे, सदर बांधकामास कायदेशीर परवानगी नसणे, संस्थेने अनेक बोगस कागदपत्रे तयार करुन शासनाची फसवणूक करणे, सदर संस्थेचे कार्यकारी मंडळ नियमबाहय पध्दतीने कार्यान्वित करणे, महात्मा फुले बहुउद्देशीय संस्थेने जिजाऊ प्राथमिक व सावित्रीबाई फुले माध्यमिक आश्रमशाळा महिरावणी, ता.जि.नाशिक या शाळेसाठी मौजे महिरावणी येथे भाडयाने घेतलेल्या मिळकतीवर अनधिकृत बांधकाम करुन त्याआधारे जागा मालकांना अंधारात ठेऊन शासनाकडून जादा दराने इमारत भाडे रक्कम मिळविण्याचे हेतूने जागा मालकांच्या बनावट पावत्या बनवून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर बाब उघड होणे, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन

नाशिक जिल्ह्यातील ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक, नाशिक द्वारा संचलित मौजे महिरावणी ता.जि. नाशिक येथील मान्यता रद्द करण्यात आलेली अनुदानित आश्रमशाळा महात्मा फुले महात्मा फुले बहुउद्देशीय संस्था जयनगर, ता. शहादा जि. नंदुरबार या स्वयंसेवी संस्थेला दि.२९.१२.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये आहे त्याच ठिकाणी हस्तांतरीत करून चालविण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच सदर शाळेला दि.३१.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च माध्यमिक मान्यता मिळाली आहे.

सदर आश्रमशाळेचे जागा मालक यांनी संस्थेविरोधात शासन स्तरावरील भाडे प्रस्ताव रद्द करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडे तक्रार दाखल केली होती.

सदर तक्रारीची दखल घेऊन ५ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दि.१४.०२.२०२५ रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी सदर अहवाल शासनास दि.०६.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

आश्रमशाळेसाठी श्री. डुमा चंदु खांडबहाले यांचेकडून मौजे महिरावणी येथील दीड एकर जमीन ११ वर्षाकरीता भाड्याने घेतली असून जमिनीचे वार्षिक भाडे ४,५०,०००/- इतके ठरले आहे. जमीन अकृषिक (एन.ए.) करणे, बांधकाम आराखडा सक्षम प्राधिकरी यांचेकडुन मंजुर करणे व त्यानंतर मंजूर बांधकाम आराखड्यानुसार बांधकाम करणेची जबाबदारी संस्थेची होती. संस्थेने अनुदानित आश्रमशाळेसाठी इमारत बांधकाम करण्यासाठी जमीन अकृषिक (एन.ए.) केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच इमारतीचे बांधकाम करणेपुर्वी सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन बांधकाम आराखडा मंजुर न करता विना परवानगी इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

सदर अनुदानित आश्रमशाळा ही सन २०१३-१४ ते २०२२-२३ या कालावधीत अन्य भाडे तत्वावरील इमारतीमध्ये सुरू होती. आश्रमशाळेच्या इमारतीकरीता दि.१५.०६.२०२३ या कालावधीपर्यंत भाडे अदा करण्यात आले आहे. तर वसतीगृह इमारतीकरीता दि.३१.०३.२०२२ पर्यंत भाडे अदा करण्यात आले आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून श्री. डुमाजी चंदु खांडबहाले यांच्याकडून जागा भाडेतत्वावर घेऊन त्यावर इमारत बांधकाम करण्यात आले आहे. तथापि सदर संस्थेचा इमारत भाडे मंजुरीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला नाही.

*************

लक्षवेधी सूचना क्रमांक ७३९

# महाराष्ट्र विधानसभा

द्वितीय (पावसाळी) अधिवेशन (जुलै,२०२५)

श्रीम. श्वेता महाले वि.स.स यांनी नियम १०५ अन्वये पुढीलप्रमाणे लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे:-

शासन सेवेतील माजी सैनिकांच्या मागण्याबाबतची निवेदन मुख्यमंत्री महोदयांना माहे मार्च मध्ये लोकप्रतिनिधींनी देणे, शासनाने जुनी पेन्शन योजना १९८२ रद्द करून दिनांक ३१.१०.२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवनियुक्त कर्मचाऱ्यांप्रमाणेच गृहीत धरून पुनर्नियुक्त माजी सैनिकांना डीसीपीएस योजना लागू केली असणे, दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी भारतीय सैन्य दलात कार्यरत नियुक्त असलेल्या आणि दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत पुनर्नियुक्ती झालेल्या माजी सैनिक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना १९८२ लागू करावी अशी माजी सैनिक संघटनेची मागणी असणे तसेच शिक्षण सेवक प्राथमिक आरोग्य सेवक कृषी सेवक व स्थापत्य अभी सहाय्यक या पदाकरिता सैन्याचे पदवी प्रमाणपत्र शैक्षणिक अर्हता म्हणून ग्राह्य धरणे पुनर्नियुक्त माजी सैनिकांना लागू असलेल्या तीन वर्षाचा सेवा कालावधी रद्द करून त्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करणे माजी सैनिकांना त्यांनी केलेल्या देशसेवेच्या आधारावर १०, २०, ३० वर्षाच्या लाभ ऐवजी ५, १०, १५ वर्षाच्या सेवेनंतर आश्वासित प्रगती योजनेचा लाभमंजूर करणे, या व अन्य मागण्या शासनाकडे प्रलंबित असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (माजी सैनिक कल्याण) यांचे निवेदन

### जुनी पेन्शन योजना लागू करणे

राज्यातील सैनिकांना संरक्षण दलातून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी केलेल्या देशसेवेचे कार्य लक्षात घेऊन राज्य शासनाने वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदांकरिता १५% आरक्षण उपलब्ध करुन दिलेले आहे.

राज्यातील पुनर्नियुक्त माजी सैनिकांच्या नागरी सेवेतील नियुक्तीनंतर त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) व १६२ (बी) नुसार करण्यात येत असून त्या अन्वये त्यांचे संरक्षण दलातील शेवटचे वेतन संरक्षित केले जाते.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम ४१ अनुसार जो शासकीय कर्मचारी नागरी सेवेत प्रविष्ट होण्यापूर्वी सैनिकी सेवेत होता, परंतु त्यांनी सैनिकी सेवेमध्ये निवृत्तिवेतन अर्जित केले नव्हते अशा कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने केलेली सैनिकी सेवा निवृत्तिवेतनाकरिता अर्हताकारी सेवा असल्याचे मानण्यात येते. म्हणजेच ज्या सैनिकी सेवेसाठी एखाद्या कर्मचाऱ्याला निवृत्तिवेतन मिळत असेल त्यांची सैनिकी सेवा नागरी सेवेस जोडून देता येत नाही. त्यामूळे दि.१.११.२००५ नंतर पुनर्नियुक्त माजी सैनिकांना त्यांनी दि.१.११.२००५ पूर्वी केलेल्या सैनिकी सेवेसाठी मिळत असलेले निवृत्तिवेतन लक्षात घेता दि.१.११.२००५ नंतर शासन सेवेत पुनर्नियुक्त माजी सैनिकांना सरसकट जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करणे योग्य ठरणार नाही अशा प्रकारचे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत.

## शिक्षण सेवक /प्राथमिक आरोग्य सेवक/कृषी सेवक/स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदाकरिता सैन्याचे पदवी प्रमाणपत्र शैक्षणिक अर्हता म्हणून ग्राह्य धरणे

आरोग्य सेवक या पदासाठी सैनिक कल्याण विभाग पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सैन्याचे पदवी प्रमाणपत्र ग्राह्य धरून माजी सैनिकांना आरोग्य सेवक या पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात आली असल्याबाबत असे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कळविण्यात आले आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२३.०९.१९९३ अन्वये सिव्हील इंजीनिअर पदासाठी i) Overseer (B & R) (Engrs) ii) Surveyor Trignometrical (Engrs) iii) Surveyor Topographical (Engrs) हे समकक्ष कोर्स केलेल्या उमेदवारांना स्थापत्य अभियांत्रिकी सहायक गट-क या पदावर नियुक्ती देण्याकरिता शिथिलता देवून माजी सैनिकांची पदे भरण्याबाबत जलसंपदा विभागाकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दि. २५.०२.२०१९ मध्ये प्राथमिक/ उच्च प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना शालेय अध्यापनाच्या विषयातील मुख्य विषय घेवून पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे तसेच शिक्षण शास्त्राची पदवी/पदविका आवश्यक आहे. सैनिकी पदवी ही शालेय अध्यापन विषयाबाबतची नसल्यामुळे याचा विचार शिक्षक / शिक्षण सेवक पदासाठी करता येत नाही असे शालेय शिक्षण विभागाने नमूद केले आहे.

सैनिकी पदवी ही कृषी विषयाबाबतची नाही. कृषी सेवक पदासाठी किमान शैक्षणिक अर्हता कृषी पदविका आहे, असे अभिप्राय कृषी विभागाने दिले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी दि.७.०३.२००८ रोजीच्या सेवाप्रवेश सुधारणा नियमानुसार ज्या व्यक्तीने शालांत परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि शासनाकडून किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेकडून घेण्यात येणारी किमान स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाची एक वर्ष मुदतीची पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषित केलेली अर्हता धारण केलेली आहे असे उमेदवार पात्र ठरतात. अशा प्रकारचे अभिप्राय सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले आहेत.

## पुनर्नियुक्त माजी सैनिकांना लागू असलेला तीन वर्षाचा सेवा कालावधी रद्द करून त्यांना नियमित वेतन श्रेणी लागू करणे

शिक्षण सेवक/कृषी सेवक या पदावर निवड झालेल्या उमेदवारांना ३ वर्षाच्या कालावधीकरिता मानधन तत्वावर नियुक्ती देण्यात येते. या कालावधीत त्याने पार पाडलेल्या कामगिरीचे यथोचित मुल्यमापन करुन त्यास सेवेत नियमित करण्यात येते. सदर तीन वर्षाचा कालावधी हा नियुक्त झालेल्या उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी आहे. सदर कालावधी पूर्ण झाल्यावर शिक्षण सेवक/कृषी सेवक यांना नियमित नियुक्ती देण्यात येते. त्यामुळे सदर पदावरील गुणवत्ता वाढीबाबतचे महत्वपूर्ण काम विचारात घेवून सदर पदांना लागू असणारा तीन वर्षाचा सेवा कालावधी माजी सैनिकांच्या बाबतीत शिथिल करणे उचित होणार नाही असे अभिप्राय शालेय शिक्षण व कृषी विभागाने दिले आहेत.

## माजी सैनिकांना त्यांनी केलेल्या देशसेवेच्या आधारावर १०,२०,३० वर्षाच्या ऐवजी ५,१०,१५ वर्षाच्या सेवेनंतर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करणे

सर्व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभाच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार १०, २० व ३० वर्षाच्या सेवेनंतर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे. सदर लाभ हे केंद्र शासनाच्या योजनेच्या धर्तीवर अनुज्ञेय करण्यात आले आहेत. माजी सैनिकांना ५, १०, १५ वर्षाच्या सेवेनंतर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करणे याबाबत सर्वंकष बाबी तपासणे आवश्यक आहे असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत.

******************

लक्षवेधी सूचना क्र.७५८

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुभाष देशमुख, श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७५८ पुढीलप्रमाणे आहे:-

सोलापूर जिल्ह्यात ११ तालुके असून त्यापैकी एकाही तालुक्याला क्रिडा अधिकारी नसल्याने जिल्ह्यात क्रिडा विभागाच्या कामाचा बोजवारा उडालेला असल्याची बाब माहे जून २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे शालेय स्तरावरील क्रिडा सप्ताह असो किंवा शालेय जिल्हास्तरीय स्पर्धांचे नियोजन असो यासाठी जिल्हा व तालुका कार्यालयाची अत्यंत महत्वाची भुमिका असतानाही क्रिडा अधिकार्यांची पदे रिक्त ठेवल्याने शालेय स्तरावरील खेळाडुंचे व जिल्हास्तरीय खेळणा-या महाविद्यालयीन खेळाडुंचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, क्रिडा विभागाकडून जितकी अपेक्ष केली जाते तितके मनुष्यबळ मिळत नसल्याने क्रिडा क्षेत्राचे कधीही भरुन न येणारे नुसकान होत असतानाही त्याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे, जिल्ह्यात सर्वच तालुक्यात क्रिडा संकुलाची कामे सुरु असून या संकुलांची कामे सुरु आहेत की बंद आहेत याची तपासणीही करण्यात येत नसणे, त्यामुळे सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व क्रिडा अधिकाऱ्यांची व कार्यालयात आवश्यक असणारी सर्व पदे तात्काळ भरावी अशी मागणी लोकप्रतिनिधी आणि क्रिडापट्टु व क्रिडारसीक करीत असणे, देशात खेलो इंडिया आणि इतर खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेले खेळाडू शासनास विविध पदे दान करत असताना त्याखेळाडुंना क्रिडा विभागात काम करण्याचे बंधन घालून क्रिडा क्षेत्राला न्याय दिल्यासारखे होईल, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे निवेदन

राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यातील वार्ड धरुन एकूण ३८० इतके तालुके असून प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा अधिकारी पद मंजूर करण्याचे क्रीडा धोरणात निश्चित करण्यात आले आहे. प्रथम टप्प्यात ३१ व त्यांनतर ६९ पदे अशी एकूण १०० पदे सद्यस्थितीत मंजूर करण्यात आलेली आहे.

सोलापूर जिल्ह्यात तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गात आकृतीबंधानुसार ०३ पदे (माळशिरस, पंढरपूर व बार्शी) मंजूर असून त्यापैकी २ पदे भरण्यात आली आहेत. क्रीडा मार्गदर्शकाची ३ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद भरलेले आहे. क्रीडा अधिकारी यांची ३ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद भरलेले आहे. कनिष्ठ लिपिक १ पद मंजूर असून सदर पद भरण्यात आले

आहे. तसेच, जिल्ह्यातील क्रीडा संकुलांची कामे सुरू असून त्यांची तपासणी सदर अधिकारी यांच्या मार्फत केली जाते.

तसेच, स्थानिक पातळीवरील क्रीडा शिक्षक यांच्या मार्फत विविध उपक्रम, क्रीडा सप्ताह, जिल्हास्तरीय शालेय व महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे नियोजन योग्य प्रकारे केले जाते. विद्यार्थ्यांचे व खेळाडूंचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक ०९ जुलै, २०२४ अन्वये महाराष्ट्र राज्यातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यासंदर्भात सुधारित धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार क्रीडा विभागांतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवर थेट नियुक्ती धोरणांतर्गत एकूण ५५१ पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सुधारित धोरणांनुसार क्रीडा विभागातच सदर पदांवर खेळाडूंना नोकरी देण्यात येते.

सद्यस्थितीत क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत क्रीडा अधिकारी, क्रीडा मार्गदर्शक, निम्नश्रेणी लघुलेखक व शिपाई या संवर्गातील रिक्त पदांच्या ८० टक्के प्रमाणे १०९ पदे आय.बी.पी.एस. कंपनी मार्फत भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

कनिष्ठ लिपिक या संवर्गातील २६ उमेदवारांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आली असून त्याअनुषंगाने कनिष्ठ लिपिक २६ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी १७ उमेदवारांनी नियुक्ती स्वीकारली आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचा आकृतीबंध निश्चित करण्यात येत असून तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गातील अतिरिक्त पदे नव्याने निर्माण करण्याबाबत शासनस्तरावरुन प्रस्तावित केले आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील रिक्त असलेली पदे भरण्याची तजवीज आहे.

**************

२५

२४३०

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना

श्री. शांताराम मोरे वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २४३० पुढीलप्रमाणे आहे:-

गडचिरोली जिल्ह्यात दुर्गम गावांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध ठिकाणी इमारत दुरुस्ती, रस्ते, पुलांची कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात येणे, माहे जून, २०२५ मध्ये कोरची तालुक्यातील बेलकाठी-नाडेकल-डोलीटोला या ३० कि.मी. रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास येणे, सदर कामात निकृष्ट दर्जाची गट्टी वापरल्याने रस्ता अल्पावधीतच फुटला असणे, नाडेकल ते कोहका या दोन गांवाना जोडणारा खोब्रागडी नदीवरील पुल कॉलमसह पडण्याची घटना घडणे, सदर दोन्ही कामामध्ये शासनाच्या कोट्यवधी निधीचे नुकसान होणे, सार्व.बांध.विभाग क्र.१ व उपविभाग क्र.२ येथे सन २०२० ते २०२३ या कालावधीत तत्कालिन कार्यकारी अभियंता, श्री. सुरेश साखरवाडे आणि तत्कालिन उप अभियंता, सहाय्यक अभियंता श्रेणी-१, श्री. सुमीत मुंदडा यांनी इमारत दुरुस्तीच्या अनेक कामांमध्ये दुबारे कामे दर्शवून कंत्राटदारांना देयके अदा केलेली असणे, सदर प्रकरणाची चौकशी करणेबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण, नागपूर यांनी माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये लेखी कळवून अद्याप कार्यवाही न होणे, प्रस्तुत प्रकरणातील श्री. मुंदडा यांची बदली पुनःश्च गडचिरोली जिल्ह्यातच करण्यात येणे, याप्रकरणी चौकशी करणेबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे कळवूनही कोणतीही कार्यवाही न होणे, गडचिरोली विभागातील निकृष्ट, बोगस कामे, त्यात होत असलेला गैरव्यवहाराबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी आंदोलन करुनही त्याची योग्य दखल न घेणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका.

---

**मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

जिल्हा गडचिरोली कोरची तालुक्यातील सावरगाव कोटगुल गोदरी बेटकाठी (गांगीन) नाडेकल ते रामा ३१४ (प्रजिमा ३) रस्त्याचे बांधकामास ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दिनांक ०५.०२.२०१८ च्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कंत्राटदारामार्फत काम प्रगतीपथावर असून सदर कामावर वेळोवेळी क्षेत्रिय अभियंता तसेच SQM (State Quality Monitoring) द्वारे वेळोवेळी पाहणी करण्यात येत असून, केलेल्या कामांत त्रुट्या आढळल्यास कंत्राटदारामार्फत दुरुस्त करुन घेण्यात येतात. सदर काम New Connectivity तथापि, वनक्षेत्रातील तसेच अत्यंत संवेदनशील नक्षलग्रस्त भागामध्ये असून, सदर कामास दिनांक २८.०१.२०२० रोजी प्रत्यक्ष सुरुवात केल्यानंतर कामाच्या ठिकाणी नक्षलवाद्यांकडून दिनांक १६.०६.२०२० व दिनांक २५.०२.२०२२ रोजी जाळपोळ सुध्दा

करण्यात आलेली होती. सदर कामाचे ठिकाणी वेळोवेळी नक्षल सप्ताहमुळे पोलीस यंत्रणेद्वारे कामे वारंवार बंद ठेवण्याचे आदेश प्राप्त होत असल्याने, कामाचे प्रगतीवर परिणाम होत असल्याचेही. निदर्शनास येत आहे. तथापि, सदर अडचणींवर मात करुन सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

कोरची जिल्हा गडचिरोली येथील तालुका कोरची येथील सावरगाव कोटगुल गोदरी बेतकाठी (ग्रामीण) नाडेकल ते रामा ३१४ (प्रजिमा ३) मध्ये खोब्रागडी नदीवरील किमी ४७/१०० येथे मोठ्या पुलाच्या बांधकामास ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दिनांक ०५.०२.२०१८ पत्रान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर पुलाची लांबी ५४.०० मी. (९ मी. चे ६ गाळे) आहे. सदर कामाचे ठिकाणी क्षेत्रिय अभियंताद्वारे नियतकालीन तपासणी दरम्यान P-४ Pier चा भाग क्षतिग्रस्त आढळल्याने, त्याबाबत संबंधित कंत्राटदार यांना करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार नोटीस बजावण्यात येवून, त्वरित कार्यवाहीस कळविले आहे. कंत्राटदारामार्फत सदर काम अतिदुर्गम व डोंगराळ भागात असल्याने व इतर तालुक्यांचे प्रमाणात कोरची तालुक्यामध्ये सरासरीपेक्षा पर्जन्यमान जास्त असून, डोंगराळ भागात पाण्याच्या प्रवाहात वाहून येणारे लाकडे, धोंडके यामुळे Pier ला क्षती पोहचले असल्याचे कळविले आहे. त्याबाबत सद्य:स्थितीत कंत्राटदाराचे कंत्राट जिवित असून, क्षतिग्रस्त भाग स्वखर्चाने तोडून, पुनश्च बांधणेबाबत लेखी हमीपत्र दिलेले आहे. तथापि, कामाचे ठिकाणची परिस्थिती लक्षात घेता कंत्राटदाराद्वारे नमूद Pier ची क्षतिग्रस्त बाब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर काम नक्षलग्रस्त अतिदुर्गम भागातील असून, प्रत्यक्ष कार्यारंभ आदेश जरी दिनांक २०.११.२०१९ रोजीचे असुनही सदर कामाचे ठिकाणी Road Connectivity नसल्याने, साहित्य ने-आण करणे व मशिनरी ने-आण करणे अवघड असल्याने कंत्राटदारामार्फत प्रत्यक्ष कामास दिनांक ०८.०१.२०२२ रोजी सुरुवात करण्यात आली. तसेच काम प्रगतीत असताना, नक्षल मोहिमेतर्फे दिनांक १६.०६.२०२० व दिनांक २५.०२.२०२२ रोजी जाळपोळ झाली आहे. सदर अडचणीवर मात करुन कंत्राटदारामार्फत दिनांक २१.०७.२०२३ पर्यंत पुलाचे Pier Abutment, Slab (Railing व इतर अनुषंगिक कामे वगळून) चे बहुतांशी काम पूर्ण केले. तथापि, कंत्राटदार यांनी त्यांचे दिनांक २४.०६.२०२५ चे पत्रान्वये अ) नक्षल कार्यवाहीमुळे वेळोवेळी काम बंद व कामगारांचे पलायन ब) अति संवेदनशील, नक्षलग्रस्त भाग असल्याने पोलीसांमार्फत मज्जाव करणे. क) वनविभागाद्वारे आलेल्या अडचणी ड) Covid-१९ महामारीचा काळ इ) वेळोवेळी होणाऱ्या काम बंदमुळे कामाच्या प्रगतीवर परिणाम ई) सरासरीपेक्षा अधिक पाऊस उ) सदर पुलावर जाणेकरिता अद्याप मार्ग नाही. ऊ) त्यामुळे यंत्र सामुग्री ने-आण बाबत अडचणी ए) नक्षलग्रस्त कारवाई मारहाण व धमकी इ. मुळे कामगार वारंवार पळून जाणे. ऐ) पुनःश्च काम सुरु करणेस गेले असता, माहे मे महिन्यामधील अवकाळी पावसामुळे काम वेळीच सुरु करणे शक्य झाले नसल्याचे कळविलेले आहे. क्षतिग्रस्त पुलाच्या कामाची चौकशी करणेकरिता दिनांक ०२.०७.२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखाली तीन सदस्य असलेली समिती गठीत केली आहे. सदर कामाची पाहणी करुन सदर समितीस १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर समितीद्वारे दिनांक ०८.०७.२०२५

रोजी गडचिरोली येथे भेटी दरम्यान पुलाच्या तपासणीकरिता मागणी केलेले आवश्यक दस्तऐवज मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेकडून समितीला उपलब्ध करुन देण्यात आले आहे. दि.२४.०७.२०२५ च्या शासन पत्रान्वये चौकशी समितीस दि.३१.०७.२०२५ पर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले. याअनुषंगाने मुख्य अभियंता तथा समिती अध्यक्ष सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी गडचिरोली जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणातील निरंतर पावसामुळे नदीच्या पाण्याचा प्रवाह सप्टेंबर नंतरही पुढील २ महिने तसाच राहणार आहे. त्यामुळे पुलाच्या ठिकाणी जाणे अतिशय कठीण आहे. तसेच दि.२८.०७.२०२५ ते दि.०३.०८.२०२५ या कालावधीत नक्षली बंद असल्यामुळे पोलीस विभागामार्फत तेथे जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे. याकारणांमुळे सदर पुलाची सविस्तर तपासणी नोव्हेंबर-डिसेंबर-२०२५ मध्ये करुन त्यानंतर अंतिम अहवाल देणे शक्य असल्याचे कळविले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ व उपविभाग क्र.२ येथे सन २०२० ते २०२३ या कालावधीत झालेल्या कामांची अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण, नागपूर यांचेकडून चौकशीची कार्यवाही सुरु आहे. सन २०२० ते २०२३ या कालावधीतील झालेल्या कामाची माहिती, सर्व कामाचे कार्यारंभ आदेश, शेड्युल बी, कार्याशी संबंधित सर्व देयकाची मोजमाप पुस्तिकेतील नोंदीच्या प्रती, सर्व देयकाच्या प्रती, चाचणी अहवालाच्या प्रती सहीत माहिती दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नागपूर यांचेकडे चौकशीकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने उक्त कामाची चौकशी करण्याकरिता अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नागपूर कामावर भेटी देवून संबंधित कामाची तपासणी करणार आहे.

श्री. सुमित गोविंदलाल मुंदडा, सहायक अभियंता श्रेणी-१ हे सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, गडचिरोली या पदावर दि.१२.०८.२०२० पासून कार्यरत होते. सन २०२५ च्या सार्वत्रिक बदलीमध्ये ते बदलीस पात्र असल्याने (एकूण कालावधी ४ वर्षे १० महिने) नागरी सेवा मंडळाच्या शिफारसशी अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दि.१६.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये त्यांची बदली सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आलापल्ली या रिक्त पदावर करण्यात आली असून सदर पदावर ते दि.२३.०५.२०२५ पासून कार्यरत आहेत. श्री. मुंदडा यांची पुनःश्च गडचिरोली जिल्हात झालेल्या बदलीच्या अनुषंगाने मा. लोकप्रतिनिधी महोदयांची कोणतीच तक्रार प्राप्त झालेली नाही.

क्षेत्रिय अभियंताद्वारे वेळोवेळी कामांची पाहणी करण्यात येत आहे. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ व उपविभाग क्र.२ येथील सन २०२० ते २०२३ या कालावधीत झालेल्या कामांची दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नागपूर यांचेकडून चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

..................................................

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय ( पावसाळी ) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.७४२

मा. श्रीम. श्वेता महाले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७४२ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरता केंद्र शासनाची ॲग्रीस्टॅक डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रीकल्चर योजना शासन राज्यात राबवित असणे, त्यामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांचा शेतीविषयक डेटा अद्यावत करण्यात येणे, त्यासाठी ॲग्रीस्टॅक महसूल कृषी ग्रामविकास विभाग काम करीत असून त्याद्वारे शेतकऱ्यांना भविष्यामध्ये पीक कर्ज पिक विमा पिकांची नोंदणी पीएम किसान व शेती संबंधित योजनांचा लाभ या फार्मर आयडी द्वारे देण्याची सुनिश्चितता करण्यात येणे, तथापि ॲग्रीस्टॅक पोर्टलवर स्वतःची माहिती भरताना शेतकऱ्यांना अनेक अडचणी उद्भवत असणे, शेतकऱ्यांच्या नावे सातबारा असलेल्या संपूर्ण क्षेत्राची माहिती पोर्टलवर उपलब्ध न होता फक्त विहीती क्षेत्रच त्यामध्ये दाखविण्यात येते त्यात पोट खराब क्षेत्र दर्शविण्यात येत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मालकी हक्काबाबत संभ्रम निर्माण होत असणे, त्यामुळे ॲग्रीस्टॅक योजनेत या सर्व बाबींची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून त्याची गाव तालुका जिल्हा व विभाग स्तरावर जनजागृती करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन

राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारक लाभ शेतक-यांना देणे सुलभ व्हावे याकरीता "ॲग्रिस्टॅक (Agristack) (Digital Public Infrastructure for Agriculture)" ही योजना शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग दिनांक १४.१०.२०२४ अन्वये राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत शेतक-यांचा माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लॅंड पार्सल) यांचा माहिती संच असे तीन पायाभूत माहिती संच तयार करण्यात येत आहेत. त्यामधील शेतकऱ्यांचा माहिती संच तयार करण्यासाठी महसूल अधिकार अभिलेखातील शेतकऱ्याची आणि शेताची माहिती घेऊन त्यानुसार शेतकऱ्याचा आधार क्रमांक हा त्या माहितीशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) देण्यात येत आहे.

राज्यातील कृषी गणनेनुसार अंदाजे १.७१ कोटी शेतकऱ्यांना आणि विशेषत: पीएम किसान अंतर्गत लाभधारक शेतक-यांचे अग्रीस्टॅक योजनेंतर्गत प्राधान्याने शेतकरी ओळख क्रमांक देण्यात येत

आहेत. केंद्र शासनाद्वारे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत नवीन नोंदणी करीता जानेवारी २०२५ पासून शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य असल्याचे कळविण्यात आले आहे. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग दि. ११ एप्रिल, २०२५ च्या अन्वये कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाकरिता दि. १५ एप्रिल २०२५ पासून शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य करण्यात आला आहे. त्यानुसार कृषी विभागाच्या ऑनलाईन अर्जाच्या महा-डीबीटी पोर्टल वर देखील तसा बदल करण्यात आलेला आहे.

ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत शेतकरी नोंदणी प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासाठी जानेवारी २०२५ पासून सुमारे ६२ हजार नागरी सुविधा केंद्रामार्फत शेतकरी ओळख क्रमांक करीता नोंदणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक काढण्याकरिता स्वयं नोंदणी, नागरी सुविधा केंद्र मार्फत नोंदणी हे पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. दि. ३१ मे, २०२५ अखेर शेतकरी नोंदणी झालेल्या शेतक-यांची संख्या १,०५,७७,११७ इतकी असून शेतकरी ओळखपत्र संख्या (फार्मर आयडी) १,०५,४२,४५३ इतकी आहे.

ॲग्रीस्टॅक या योजनेअंतर्गत शेतकरी नोंदणी करण्याची प्रणाली केंद्र शासनाच्या केंद्र प्रकल्प व्यवस्थापन पथक, दिल्ली (CPMU) यांनी निर्माण केली आहे. शेतकरी संचामध्ये नोंदणी करताना उद्भवणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबत केंद्र शासन आणि केंद्रिय प्रकल्प व्यवस्थापक पथक (CPMU), दिल्ली यांना वेळोवेळी अवगत करण्यात आले आहे. जमाबंदी आयुक्त कार्यालयामार्फत अधिकार अभिलेख (RoR) चा संपूर्ण डेटा हा या प्रणालीच्या कार्यान्वयनासाठी केंद्र प्रकल्प व्यवस्थापन पथक, दिल्ली यांना API व्दारे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. केंद्र प्रकल्प व्यवस्थापन पथक, दिल्ली यांना कार्यवाही करणेकरिता महसूल विभागाकडून दिलेल्या API मध्ये यापूर्वीच पोटखराब माहिती पाठविणेत आलेली आहे.

शेतकरी माहिती संच निर्मिती आणि शेतकरी ओळखपत्र तयार करण्यासंदर्भात जमाबंदी आयुक्त आणि संचालक, राज्य भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली असून त्या साठी आवश्यक निधी कृषि विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. कृषि आयुक्तालयामार्फत गावपातळीवर दवंडी देणे, ग्राम पंचायत स्तरावर पीएम किसान लाभार्थी शेतक-यांच्या याद्या प्रसिध्द करणे, स्थानिक पातळीवरील प्रचार व प्रसार माध्यमे जसे व्हॉट्सॲप गट द्वारे प्रसिध्दी देणे, शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यमातून सभासद शेतक-यांना संदेश पोहोचविणे इत्यादि बाबत आवाहन करण्यात आले आहे. सर्व विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकारी यांना शेतकरी नोंदणी आणि शेतकरी ओळखक्रमांक निर्मिती तातडीने पूर्ण करून घेण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

*********************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२३८०**

मा. श्री. समाधान आवताडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३८० पुढीलप्रमाणे आहे :-

"सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्यात ज्वारी हे प्रामुख्याने पिक घेण्यात येत असणे, तालुक्यात एकंदर ७४,३२६ हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामात ज्वारी पिक घेण्यात येणे, मंगळवेढ्यातील ज्वारी ही सुप्रसिध्द असून या पिकाला केंद्र शासनाला भौगोलिक मानांकन प्राप्त असणे, परंतू मागील ५ वर्षापासून ज्वारी पिक घेण्याचे क्षेत्र कमी झाले असणे, ज्वारी पिकाची काढणे, मोडणी, मळणे इत्यादी करिता येणार खर्च जास्त असणे यामुळे शेतकरी नाईलाजास्तव ज्वारी पिक न घेता इतर पिके घेत असणे, ज्वारी पिकाचा उत्पादन खर्च एकर किमान १३१००० इतका असणे, त्यापैकी ६४०० रु. ज्वारी काढणी व मोडणी करण्यासाठी खर्च येणे, पाऊस चांगला झाल्यास एकरी उत्पादन ५ ते ६ क्विंटल येते त्यापासुन मिळणारे उत्पन्न हे २०००० इतके मिळत असणे, वर्षाकरिता केवळ ६९००/- इतका नफा मिळत असणे, पाऊस असमाधान कारक झाल्यास एकरी उत्पन्न असमाधानकारक असते. यामुळे मंगळवेढा तालुक्याकतील ज्वारी उत्पादक शेतक-यांनी हे पिक महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समाविष्ट करण्याची मागणी करुनही याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया"

मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील रब्बी ज्वारी पिकाखालील सरासरी १४.९६ लाख हे. क्षेत्र असून सन २०२४-२५ मध्ये तृतीय पुर्वानुमाननुसार १५.४३ लाख हे. क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. याकरीता खरीप, रब्बी व ऊस हंगामाकरीता महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली, जि. रत्नागिरी या चारही कृषी विद्यापीठांकडून पिक उत्पादन खर्चाच्या प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे व विविध निविष्ठांची प्रचलित भावपातळी लक्षात घेऊन उत्पादन खर्चावर आधारित किंमती राज्य कृषी मूल्य आयोग राज्य शासनाच्या मान्यतेने, केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडे शिफारस करते. विविध राज्यांच्या आलेल्या शिफारसी लक्षात घेऊन केंद्र शासन संपूर्ण देशासाठी किमान आधारभूत किंमत जाहीर करत असते.

सन २०२५-२६ मध्ये रब्बी ज्वारी करीता रक्कम रु. ४१६१ प्रती क्विंटल याप्रमाणे उत्पादन खर्च आलेला असून त्यावर १५% नफा विचारात घेऊन केंद्रीय कृषी मूल्य आयोगास शिफारस करण्यात आलेली आहे.

मंगळवेढा तालुक्यातील ज्वारी उत्पादक शेतक-यांनी ज्वारी हे पीक, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समाविष्ट करण्याची मागणी केल्याबाबतचे अभिलेख, निदर्शनास आलेले नाहीत. शेती कामांमधील पेरणी ते कापणी पर्यंतच्या कामांमुळे जमिनींच्या उत्पादकतेत वाढ होत नाही, तसेच, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मधील [अनुसूची दोन] मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, Works which are non-tangible, not measurable, repetitive such as, removing grass, pebbles, agricultural operations, shall not be taken up. सबब,पेरणी ते कापणी ही कामे महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अंतर्गत देखील अनुज्ञेय नाहीत. म्हणून, ज्वारी या पिकाचा मनरेगा आणि राज्य रोजगार हमी योजना अंतर्गत अनुज्ञेय पीक म्हणून समावेश करता येत नाही, असे अभिप्राय रोजगार हमी योजना विभागाने दिले आहेत.

*********

लक्षवेधी सूचना क्रमांक-१७८४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-१७८४

श्री.रवी राणा, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७८४ पुढीलप्रमाणे आहे :-

"प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना अमरावती जि.प. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्या क्र. ०१ ते ०९ मागण्या शासनाकडून मान्य कराव्या या संबंधाने दि. १८/१२/२४ रोजी व दि. १०/०१/२५ रोजी संचालक, आरोग्य सेवा पुणे यांना जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. अमरावती यांनी लेखी पत्र पाठवले असणे, तसेच ग्रामविकास विभागाचे उप सचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकर्ण_२०२५, प.क्र. २९६_आस्था_७ दि. २१ मे २५ रोजी पत्रांमधील नमूद मागण्या जी.प.मधील इतर संवर्गाच्या मागण्या शासनाकडून मान्य करण्यासाठी विधानसभा सदस्य लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास विभागात मध्यवर्ती टपाल केंद्र द्वारे अ.क्र. ८४५३९८६ दि. ०५/०६/२५ रोजी पत्र दिले असणे, तसेच मा. मुख्यमंत्री यांनाही त्याच दिवशी पत्र दिले असणे, त्याच प्रमाणे विधानसभा सदस्य यानी त्यांचे पत्र. क्र.१००४ दि.१०/०३/२४ रोजी चे पत्र दि.१८/०३/२५ रोजी दिले असून जी.प. मधील जलतरण स्पर्धा संबंधी मागण्या शासनाकडून मान्य करण्यात यावे यासाठी पत्र देऊन सातत्याने पाठपुरावा होत असणे, शासनाने घ्यावायाचा निर्णय करावयाची शासनाची या संबंधाने प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

जिल्हा परिषदेकडील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या ९ मागण्या संदर्भात निवेदन सादर करण्यात आलेले होते. यात प्रामुख्याने आरोग्य सहायक पदाच्या वेतनत्रुटीमध्ये तफावत असल्याची मागणी आहे. सदर तफावत वेतनत्रुटी समिती-२०२४ (खुल्लर समिती) च्या शिफारशीनुसार शासन निर्णय दिनांक १३.१०.२०२५ नुसार दुर केली आहे. आरोग्य सहायक (स्त्री/पुरूष) असे पदनाम बदल करण्याची देखील मागणी करण्यात आली आहे. मात्र, यासंदर्भात सविस्तर प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

सद्या जलद सेवा मिळण्याकरिता, कार्यालयाचे संगणकीकरण होत असून ऑनलाईन कामे करणे अपेक्षित आहे. तालुका स्तरावर अतिरिक्त पदे निर्माण करण्याची मागणी आहे. जिल्हा परिषद आरोग्य विभागाचा आकृतीबंध हा राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि.११.१०.२००६ अन्वये आरोग्य सेवकांच्या कायम प्रवास भत्यामध्ये वाढ केली आहे. तसेच, आरोग्य सेवकांच्या

प्रवासभत्त्यामध्ये वाढ करण्यासाठी वित्त विभागाच्या मान्यतेने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांना जोखीम भत्ता व हार्डशिप भत्ता देणे, याबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभागाशी समन्वय करण्यात येत आहे.

सन २०१८-१९ मध्ये अखिल भारतीय जलतरण स्पर्धेत अतिप्राविण्य प्राप्त केलेल्या श्री. नितीन नवाथे, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, अमरावती यांना वेतनवाढ देण्याचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे अभिप्रायार्थ सादर केला आहे.

*************

लक्षवेधी सूचना क्र.२२२७

# महाराष्ट्र विधानसभा
# सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. किशोर गजानन जोरगेवार, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-**

"अन्न व औषध विभागाचे (एफडीए) अधिकारी असल्याचे भासवत तीन व्यक्तिंनी मिळून नाशिक जिल्ह्यातील सातपूर येथील उद्योग आवारात दोन ट्रक चालकांना अडवून त्यांच्याकडील मोबाईल, रोकड, वाहनांच्या चाव्या हिसकावून घेतल्याची घटना दि.११ मे, २०२५ रोजी घडल्याचे उघडकीस येणे, सदर ट्रक कर्नाटक येथून दिल्लीच्या दिशेने जात असतांना त्यांना थांबवून चौकशी करण्यात येणे, तसेच आरजे १४ जीपी ३४४५ आणि केए १४ सी ७२३९ क्रमांकाचे सदर दोन्ही ट्रान्सपोर्ट ट्रक सुमारे अडीच कोटींच्या मुद्देमालासह ताब्यात घेत कारवाई करण्यात येणे, तथापि इतर दोन ट्रकवर कोणत्याच स्वरुपाची कायदेशीर कारवाई किंवा तपासणी करण्यात न येणे, त्यामुळे या तोतया एफडीए अधिका-यांवर संशय आल्याने सदर प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येणे, तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हे अन्वेषण शाखेच्या एका युनिटने चौकशी करुन तीन संशयितांना अटक करण्यात येणे, सदर संशयित व्यक्ती हे एफडीएचे खबरी असल्याचे उघडकीस येणे, यापूर्वी केलेल्या ट्रकवरील कारवाईत हे तिघेही एफडीएच्या पथकासोबत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत एफडीएच्या वरिष्ठ अधिका-यांना विचारले असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

अन्न व औषध प्रशासनाच्या नाशिक कार्यालयास सप्तशृंगी देवीमाता मंदिराजवळ, शांती नगर, निफाड, जि. नाशिक येथे दिनांक १०.०५.२०२५ रोजी पहाटे १.३० ते २.४० च्या सुमारास वाहन क्र. आर जे १४ जी आर ५९१७ व आर जे १४ जी टी ३४९६ या वाहनातून सुपारी या अन्नपदार्थाची वाहतूक कर्नाटक येथून दिल्ली येथे होत असल्याचे आढळून आले. सदर बातमी अन्न व औषध प्रशासनास खब-यांकडून प्राप्त झाली होती. सदर दोन्ही वाहनामधील सुपारीचा साठा असुरक्षित/कमी दर्जाचा असल्याचा संशय आल्यामुळे त्यामधून सुपारीचे ०२ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेवून उर्वरित साठा सार्वजनिक आरोग्याच्या हितार्थ जप्त करण्यात आला आहे. सदर सुपारी अन्न नमुन्यांचे अहवाल अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून प्राप्त झाले असून उक्त अन्न नमुने हे कमी दर्जाचे असल्याचे घोषीत केले आहेत.

(म) HB-2135/1-2/810 प्रती

त्यानुषंगाने संबधितांविरुध्द अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियमने, २०११ मधील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, मे. इस्ट इंडिया ट्रान्सपोर्ट या कंपनीचे दोन मालवाहतूक ट्रक सुपारीचा माल घेवुन दिनांक ११.०५.२०२५ रोजी पहाटे २.०० ते ५.०० च्या सुमारास कर्नाटक ते दिल्ली जात असताना त्यादरम्यान काही अज्ञात इसमांनी अन्न व औषध प्रशासनाने खोटे अधिकारी असल्याचे सांगून सदर कंपनीच्या दोन्ही ट्रक वाहन क्रमांक आर जे १४ जी डी ३४४५ व के ए १४ सी ७२३० उदयोगभवन, सातपुर, नाशिक येथे आणले व ट्रक चालकाकडील मोबाईल फोन, ट्रकच्या चाव्या व रोख रक्कम काढुन घेतल्या. याबाबत फिर्यादीने तक्रार केल्यानंतर नाशिक पोलीस आयुक्तालयातील सातपूर, पोलीस ठाणे येथे गुरनं १४१/२०२५, दिनांक १४.०५.२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. तदनंतर मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर क्रमांकाचे दोन मालवाहू ट्रक यथास्थितीत फिर्यादीच्या ताब्यात देण्यात आलेले आहेत. गुन्हे शाखा युनिट १, नाशिक शहर यांनी सदर प्रकरणातील तीन आरोपीना ताब्यात घेवुन सातपूर, पोलीस ठाणे येथे हजर केले असता त्यांना अटक करून मा. न्यायालयात रिमांडकामी हजर करण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रकरणी सातपूर, पोलीस ठाणे यांच्यामार्फत पुढील तपास सुरु आहे.

********

लक्षवेधी क्रमांक-५१९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे ( पावसाळी ) अधिवेशन

श्री. सुनिल वामन प्रभू, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेले लक्षवेधी सुचना क्र. ५१९ पुढीलप्रमाणे:-

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील पळसगाव येथील बाबासाहेब दशरथ भोसले या शेतकऱ्याने स्वःता सरण रचून अंगावर पेट्रोल टाकून पेटवून आत्महत्या केल्याची घटना दिनांक ९ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडणे, या घटनेतील मृत शेतकऱ्याच्या पश्च्यात त्यांची आई, पत्नी, दोन मुले असा त्यांचा परिवार असणे, सदरहू शेतकऱ्याने आत्महत्या का केली अद्याप याचे कारण स्पष्ट न होणे, सदरहू घटनेचे खुलताबाद पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी नोंद घेऊन शेतकऱ्यांचा मृतदेह पंचनामा करुन वेरुळ येथील प्राथमिक केंद्रात पाठविण्यात येणे, परंतु तेथे वैद्यकीय अधिकारी नसल्याने तीन तासापेक्षा अधिक वेळ मृतदेह शवविच्छेदन गृहात पडून असणे, शेतकऱ्याच्या मृत्युमुळे त्यांच्या कुंटुंबावर कोसळलेले बेकारीचे व उपासमारीचे संकट, मृत शेतकऱ्याच्या कुटुंबास तातडीने अर्थिक मदत देण्याची होत असलेली मागणी, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुटुंबियास न्याय देण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

सरपंच तसेच पोलीस पाटील, मौजे पळसगांव, ता.खुलताबाद यांनी दूरध्वनीद्वारे पोलीस स्टेशन, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर येथे खबर दिली की, बाबासाहेब दशरथ भोसले वय ५५ वर्ष यांनी दिनांक ०८.०६.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेच्या सुमारास स्वतःचे अंगावर पेट्रोल ओतुन पेटवून घेतले आहे. त्यानंतर सदर ठिकाणी तात्काळ पोलिस हजर होऊन त्यांनी बाबासाहेब दशरथ भोसले यांना उपचार कामी प्राथमिक आरोग्य केन्द्र वेरुळ येथे दाखल केले. तपासणीअंती वैद्यकिय अधिकारी यांनी त्यांना मयत

घोषित केले. पोलीस पाटील मनोहर काशीनाथ भोसले याची लेखी खबर घेवुन सदर प्रकरणी वर नमूद केल्याप्रमाणे आकस्मित मृत्यु नोंदविण्यात आला. मयत बाबासाहेब दशरथ भोसले याचे प्राथमिक आरोग्य केंद्र वेरुळ येथे शवविच्छेदन करून त्याबाबतचा अहवाल वैद्यकिय अधिकारी यांचेकडुन प्राप्त झाला. तसेच घटनास्थळाचा दोन पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला. घटनास्थळी मयताने आत्महत्येपूर्वी लिहुन ठेवलेली चिठ्ठी हस्तगत करण्यात आली. त्यामध्ये मयत बाबासाहेब भोसले यांनी त्यांची पत्नी विजया बाबासाहेब भोसले, आई परीगाबाई दशरथ भोसले, मोठी भाऊजई सविता शिवाजी भोसले व मेव्हणा नानासाहेब नारायण पाटील यांची नावे नमुद करून सदर लोक त्याचे आत्महत्येस कारणीभुत असल्याचे नमुद केले. परंतु, वरील लोकांचा त्यांना काय त्रास होता याबाबत त्याने आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीमध्ये नमूद केलेले नाही.

२. सदर आकस्मित मृत्युचे तपासामध्ये मयताची पत्नी विजया बाबासाहेब भोसले, परीगाबाई दशरथ भोसले, भावजाई सविता शिवाजी भोसले, मुलगा दिनेश बाबासाहेब भोसले, मुलगी गायत्री ज्ञानेश्वर शेळके, मेव्हणा नानासाहेब नारायण पाटील यांचे जबाब नोंदविले असता त्यांनी त्यांचे जबाबामध्ये मयत बाबासाहेब दशरथ भोसले हा मागील काही दिवसापासुन कामधंदा करत नव्हता त्यास दारूचे व्यसन होते, सतत दारु पिऊन घरातील लोकाना मारहाण व शिवीगाळ करत असे, यापूर्वी देखील त्याने दारुच्या नशेत स्वत: दोन-तीन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेला होता. तथापि, त्यास गावातील लोकानी वाचविले होते. सतत घरातील लोकांना दारुसाठी पैसे मागणे व पैशाची मागणी पुर्ण न केल्यास तो घरातील लोकाना मारहाण व शिवीगाळ करून, आत्महत्या करण्याची धमकी देत होता. त्याच्या या सततच्या त्रासाला घरातील सर्व लोक कंटाळुन गेले होते. आई परिगाबाई दशरथ भोसले वय ८० वर्ष यांना त्यांनी काही दिवसांपूर्वी मारहाण केल्याने त्यांची सुन सविता शिवाजी भोसले यांच्याकडे छत्रपती संभाजीनगर येथे कायमस्वरूपी राहण्यास गेलेल्या होत्या. तसेच बाबासाहेब भोसले यांची त्यांची पत्नी विजया व मुलगा दिनेश यांना मागील एक ते दिड महिन्यापूर्वी बाबासाहेब भोसले यांनी मारहाण केल्यामुळे त्यांच्या त्रासाला कंटाळून पिंपळगांव, वसमत, जि.नाशिक येथे निघुन गेलेले होते व तेथेच कामधंदा करून स्वत:चा उदरनिर्वाह करीत होते.

३.	बाबासाहेब दशरथ भोसले हा एकटाच पळसगाव येथे राहत होता. गावातील प्रतिष्ठीत जनार्धन शंकरराव कर्दळ, गोरख श्रीहरी आगळे, गणेश बन्सीलाल बारगाव विष्णु पोपटराव भोसले, बद्रीनाथ रुस्तुम वाकळे यांचे जबाब नोंदविले असता, त्यानी त्याचे जबाबामध्ये बाबासाहेब भोसले हा सतत दारुचा नशेत राहत होता व गावातील लोकांना देखील दारु पिऊन तो रस्त्यावर आडवे पडुन आत्महत्या करण्याची धमकी देत होता. त्याच्या त्रासाला कंटाळून त्याची आई परिगाबाई छत्रपती संभाजीनगर येथे राहण्यास गेली होती. तर पत्नी विजया व दोन्ही मुले पिंपळगांव, वसमत, जि.नाशिक येथे निघून गेलेले होते. दारुच्या नशेतच दि. ०८.०६.२०२५ रोजी स्वतःला पेटवून घेवून आत्महत्या केलेली आहे.

४.	प्राथमिक आरोग्य केंद्र वेरुळ येथील वैद्यकीय पथक घटनास्थळी पोहोचले व तेथे तपासणी केल्यावर बाबासाहेब दशरथ भोसले यांना मृत घोषीत केले व त्याचा मृतदेह पोस्ट मॉर्टम साठी प्राथमिक आरोग्य केंद्र वेरुळ येथे सुमारे दुपारी २:३० वाजता आणले, तेव्हा प्राथमिक आरोग्य केंद्र वेरुळ प्रथम वैदयकीय अधिकारी, रजेवर होते. त्यामुळे तालुका आरोग्य अधिकारी यानी जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र गदाणा येथील कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना बोलावले व पोलिसांनी आवश्यक असलेला पंचनामा कार्यवाही पूर्ण केली. शवविच्छेदनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकाचे ताब्यात दिला.

५.	सदरच्या घटनेची माहिती मिळाल्यानंतर तहसिलदार खुलताबाद व तालुका कृषी अधिकारी, खुलताबाद यांनी मयताच्या घरी भेट देऊन पत्नी व मुले यांची विचारपूस केली तसेच गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतून मदत देणे बाबत पडताळणी केली असता सदरील मृत्यू हा कौटुंबिक वादातून, आत्महत्या असल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये निदर्शनास आले. त्यामुळे त्याच्या कुटुंबाला सदर योजने अंतर्गत आर्थिक मदत अनुज्ञेय नाही. तसेच मयत बाबासाहेब दशरथ भोसले याची आत्महत्या ही कौटूंबिक वादातून व दारुच्या नशेत नैराश्यातुन केल्यामुळे सदर प्रकरण हे शेतकरी आत्महत्या निकषात मोडत नाही.त्यामुळे मयताच्या कुटुंबास प्रचलित नियमानुसार शासकीय आर्थिक मदत अनुज्ञेय ठरत नाही.

*****

लक्षवेधी सूचना क्र. ५८४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

डॉ. जितेंद्र आव्हाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५८४ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात दिनांक १४/०६/२०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसात वीज कोसळून ९ व्यक्तींचा झालेला मृत्यू व ७ व्यक्ती गंभीर जखमी होणे, मृत्यूमुखी पडलेल्यांमध्ये यश राजू काकडे, रोहित राजू काकडे, रंजना बापूराव शिंदे, शिवराज सतीश गव्हाणे, परभणी जिल्ह्यातील पिंप्राळा येथे वीज कोसळून माणिक महादराव मिरासे, धुळे जिल्ह्यातील ताजापुरी येथील नथ्थु हरचंद सनेर, जळगाव जिल्ह्यातील मोहित जगतसिंग पाटील, शांताराम शंकर कठोरे व अमरावती जिल्ह्यातील तुरखेड येथील पवन कोल्हे यांचा झालेला मृत्यू, मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना व जबर जखमी झालेल्या व्यक्तींना अद्यापही आर्थिक मदत देण्यात न येणे, यापुर्वी सुद्धा मे २०२५ मध्ये राज्यात झालेल्या वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसामुळे ७ व्यक्तींचा वीज कोसळुन झालेला मृत्यू, मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना सुद्धा आर्थिक मदत न मिळाल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची प्रतिक्रिया व भुमिका."

---

मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

राज्यात विविध विभागात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊसात विज पडून व्यक्ती जखमी होणे व मृत्यूमुखी पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत. राज्यातील छत्रपती संभाजी नगर विभागातील छत्रपती संभाजी नगर जिल्हयात मुसळधार पावसात वीज कोसळुन दि. १४/६/२०२५ रोजी यश राजू काकडे, रोहित राजू काकडे, रंजना बापूराव शिंदे, शिवराज सतीश गव्हाणे तसेच परभणी जिल्ह्यातील पिंप्राळा येथील माणिक माधवराव मिरासे यांच्या वारसांना प्रत्येकी रु. ४ लक्ष मदतीचे वाटप केलेले आहे. छत्रपती संभाजी नगर विभागात माहे मे व जुन २०२५ मध्ये विज कोसळुन एकुण ३९ व्यक्ती मृत्यूमुखी पडले असुन २७ वारसाना मदत वाटप करण्यात आली आहे. उर्वरीतांना मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे. याशिवाय ९ जखमी व्यक्तींना निकषानुसार मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

नाशिक विभागातील धुळे जिल्ह्यातील नथ्थु हरचंद सनेर हे दि. १३/०६/२०२५ रोजी तर जळगाव जिल्ह्यातील मोहित जगतसिंग पाटील व शांताराम शंकर कठोरे हे दि. १४/६/२०२५ रोजी विज कोसळुन मयत झालेले आहेत. त्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यात आली आहे. नाशिक विभागात माहे मे २०२५ व

(2) HB/2270/1-2/30 प्रती

जुन २०२५ या कालावधीत विज कोसळुन एकुण २० व्यक्ती मृत्यूमुखी पडलेल्या असुन त्यापैकी १९ व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत दिली असुन १ व्यक्तीच्या वारसांना मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

अमरावती जिल्हयातील श्री.पवन कोल्हे यांचा दि. १४/६/२०२५ रोजी मृत्य झाला आहे. याबाबत निकषानुसार मदत देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. अमरावती विभागात माहे मे २०२५ मध्ये विज कोसळुन ८ व्यक्ती मृत्यूमुखी पडले असुन ८ व्यक्तींच्या वारसांना मदत देण्यात आली आहे. ४ जखमी व्यक्तींना निकषानुसार मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

नागपूर विभागात माहे मे व जुन २०२५ मध्ये विज पडून २१ व्यक्तींचा मृत्यू झालेला असुन १५ व्यक्तींना मदत देण्यात आली आहे. उर्वरीतांना मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे. याशिवाय ६ व्यक्ती जखमी असुन निकषानुसार मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

पुणे विभागात माहे मे व जुन २०२५ मध्ये विज पडून ४ व्यक्ती मृत्यू झाले असुन ४ ही व्यक्तींच्या वारसांना मदत दिली आहे.

कोकण विभागात माहे मे व जुन २०२५ मध्ये विज पडून ९ व्यक्ती मृत्यू झाले असुन ६ व्यक्तींच्या वारसांना मदत देण्यात आली असुन ३ व्यक्तींना मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच ३ जखमी व्यक्ती असुन २ व्यक्तींना मदत देण्यात आली आहे.

********************

लक्षवेधी सूचना क्र. ८०८

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

सर्वश्री. संतोष लक्ष्मणराव बांगर, डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड, श्री. मनोज पांडुरंग जामसुतकर, श्री. अस्लम रमजानअली शेख, श्री. अमीन पटेल, श्रीमती ज्योती एकनाथ गायकवाड, श्री. विश्वजित पतंगराव कदम, श्री. विकास पांडुरंग ठाकरे, श्री. संजय नारायणराव मेश्राम, श्री. राजकुमार सुदाम बडोले, श्री. भास्कर भाऊराव जाधव, श्री. संजय गोविंद पोतनीस, श्री. चरणसिंग बाबुलालजी ठाकूर, डॉ. आशिषराव देशमुख, श्री. संजय मुकुंद केळकर, श्री. जयंत राजाराम पाटील, श्री. अमित विलासराव देशमुख, श्री. बापूसाहेब तुकाराम पठारे, श्री. रामदास मळुजी मसराम, श्री. मोहन गोपाळराव मते, श्री. प्रतापराव गोविंदराव पाटील चिखलीकर, श्री. रोहित पवार, श्री. मंगेश रमेश चव्हाण, श्री. अमित सुभाषराव झनक, श्री. गजानन मोतीराम लवटे, श्री. महेश बळीराम सावंत, श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ८०८ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील बहुतांशी जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावणे, माहे मे, २०२५ मध्ये तसेच जून महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यात वादळी वा-यासह पडलेल्या पडलेल्या मुसळधार पावसामुळे हजारो हेक्टर शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, दि.०९ जून, २०२५ रोजी झालेल्या वादळी वारा व पावसामुळे हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी, औंढा नागनाथ, हिंगोली तालुक्यातील अनेक गावामध्ये घरांचे व शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, उक्त तालुक्यातील जवळपास ४५० ते ५०० घरांची पडझड झाली असून केळी, पपई व इतर फळबागायतीचे १५०० हेक्टरमधील पिकांचे नुकसान झालेले असणे, शेतक-यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेल्याने शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, परिणामी गेल्या कांही वर्षापासुन नैसर्गिक आपत्ती, शेती पिकाल मिळत असलेला कवडीमोल भाव, कर्जबाजारीपणा इत्यादीमुळे आधिच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी पुन्हा नैराश्याच्या खाईत जाणे, शासनाने नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याची मागणी राज्यातील शेतकरी, विविध शेतकरी संघटनांसह लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेल्या असणे, शेतक-यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

राज्यामध्ये मे व जुन २०२५ मध्ये अवेळी पाऊस, गारपीट व वादळी वारे यामुळे शेतीपिकांचे /फळपिकांचे नुकसान झालेले आहे. सदर नुकसानीबाबत तात्काळ पंचनामे करण्याच्या सुचना देण्यात आल्या. त्यानुसार विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार रुपये हिंगोली

जिल्हयासाठी फेब्रुवारी ते मे या कालावधीकरीता ३६.०८ लाख रक्कमेचा तसेच जून ते ऑक्टोबर या कालावधीतकरीता रु.३१७ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

माहे जुन २०२५ या पूर्ण महिन्यामध्ये झालेल्या घरांच्या पडझडीमध्ये कळमनुरी तालुक्यामध्ये अंशत: पडझड झालेल्या पक्क्या घरांची संख्या ४७ असुन अंशत: पडझड झालेल्या कच्च्या घरांची संख्या ३५४, पडझड/नष्ट झालेल्या झोपड्यांची संख्या ७ व बाधित गोठ्यांची संख्या ९८ आहे. औंढा ना तालुकयात अंशत: पडझड झालेल्या पक्क्या घरांची संख्या १ असुन अंशत: पडझड झालेल्या कच्च्या घरांची संख्या १२८ व बाधित गोठ्यांची संख्या ३ आहे.

मे २०२५ व जुन २०२५ मध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसान भरपाई प्रकरणी शासन निर्णय दिनांक ३० मे २०२५ अन्वये सन २०२५-२६ वित्तीय वर्षात घरांची पडझड झाल्यास तातडीने मदत करता येणे शक्य व्हावे या करिता छत्रपती संभाजी नगर महसुल विभागातील जिल्ह्यासाठी रुपये १२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच या वित्तीय वर्षात नैसर्गिक आपत्तीमध्ये मनुष्यहानी झाल्यास मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत वाटप करणे शक्य व्हावे या करीता दि. ६ मे, २०२५ अन्वये तसेच सन २०२५-२०२६ मध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये आपदग्रस्तांच्या कपड्याच्या व घरगुती भांडी/वस्तु यांच्या झालेल्या नुकसानीकरीता विशेष/वाढीव दराने करावयाच्या मदतीचे वाटप तातडीने व्हावे या करिता दि. ३० मे, २०२५ अन्वये जिल्हाधिकारी यांना उणे (-) प्राधिकार पत्रावर कोषागारातुन रक्कम आहरित करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

********************

## लक्षवेधी सुचना क्र. १६०१

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे दुसरे (पावसाळी अधिवेशन)

श्री. रवी राणा, वि.स.स. यांनी अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्या अंतर्गत निम्नपेढी प्रकल्पांतर्गत बाधित गावठाणा मध्ये नागरी सुविधा पुरवण्याबाबत महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना खालीलप्रमाणे आहे.

"अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यात अंतर्गत निम्न पेढी प्रकल्पांतर्गत बाधित गावठाणातील बेघर कुटुंबांना भूखंड देण्याबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांनी दि. २५/०४/२५ रोजी च्या दरम्यान शासनाचे प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांना पत्र पाठवून पत्रात नमूद सुख सुविधा निम्न पेढी प्रकल्पांतर्गत मौजे आगळगाव, गोपगव्हाण, हातूर्णा.

कुंडखुर्द, सावरखेड, ततारपुर, कुंड सर्जापूर, अळंगाव, मौजा कठोरा बु, मोरांगणा, कुंडसर्जापूर, कठोरा, सावरखेड ततारपुर तालुका भातकुली व अमरावती ही गावे सुख सुविधा संबंधी शासन स्तरावरून मान्य करण्यात याव्यात अशी त्यांची मागणी असणे. यासंदर्भात विधानसभा सदस्य यांनी वारंवार शासनाकडे पत्र देऊन तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली करून वरील प्रकल्पग्रस्तांना त्या सुविधा उपलब्ध करून देण्यास संबंधाने बैठकीत निर्णय झाला असणे. सदरच्या मागण्या शासन स्तरावरील असल्याने पत्र पाठवले असणे, शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री ( मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

अमरावती जिल्हयातील कार्यान्वित असलेल्या निम्न पेढी प्रकल्पांतर्गत ७ गावे बाधित असून पुनर्वसन प्रक्रियेत आहेत. उक्त प्रकल्पांतर्गत बाधित मौजा कुंडखुर्द, गोपगव्हाण, अळणगाव, कुंड सर्जापूर व हातुर्णा चे पुनर्वसन अनुक्रमे कठोरा बु., लोणटेक, कठोरा बु., कुंड सर्जापूर व मोरांगणा रायपूर येथे करण्यात आलेले आहे. अंशतः बाधित असलेल्या मौजा सावरखेड व ततारपूर या गावाच्या पूर्णतः पुनर्वसन करण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाने मान्यता प्रदान केली आहे.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ चे भाग-४ मधील दिलेल्या निर्देशानुसार भूखंडाचे क्षेत्र निश्चित करुन त्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप करण्यात येते. त्यानुसार निम्न पेढी प्रकल्पांतर्गत एकूण १६८२ पात्र कुटूंबांना भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील तरतूदीनुसार सक्षम पुराव्याच्या आधारे बाधित गावठाणात रहिवासाबाबतचे निकषांची पूर्तता करणाऱ्या एकूण प्राप्त १०५ अर्जापैकी ५७ पात्र बेघर व्यक्तींना प्रकल्पबाधित म्हणून पुनर्वसित गावठाणात रहिवास प्रयोजनार्थ प्रत्येकी १८५ चौ.मी. भूखंडाचा लाभ देण्यात आलेला आहे.

पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम २ (२) (अ) नुसार पात्र ठरणा-या व्यक्तींना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र अनुज्ञेय आहे तसेच कलम २ (२) (ई) मध्ये नमूद तरतुदीनुसार भोगवटादार नसलेल्या भूमीसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ४ खाली अधिसुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपूर्वीच्या लगत ५ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या अखंड कालावधीसाठी गावठाणामध्ये "सर्वसाधारणतः" राहत असलेल्या व्यक्तींना भुखंडाचे वाटप अनुज्ञेय आहे. त्यानुसार कलम २ (२) (ई) नुसार पात्र असलेल्या बेघर असलेल्या गावातील रहिवासीयांना भुखंड वाटप करण्याबाबत कार्यावाही करण्यात येत आहे.

तसेच सावरखेड व ततारपूर येथील पुनर्वसना करिता मौजा वलगाव येथील कृषि विभागाच्या ताब्यात असलेली जमीनीचा आगाऊ ताबा जलसंपदा विभागास देण्याबाबत कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागामार्फत दि १५ जुलै २०२५ चे पत्रान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने, २७.३४ हे. आर जमिनी पैकी १९.३४ हे. आर जमीन जलसंपदा विभागास वर्ग करण्यात आलेली आहे. उक्त जमीन मोजणी भूमि अभिलेख कार्यालयाकडून दि. १४.०९.२०२५ रोजी पूर्ण झालेली आहे. या संदर्भात सावरखेड व ततारपूर येथील पुनर्वसित गावठाणातील अभिन्यासास सहायक संचालक, नगररचना, अमरावती यांनी दिनांक २८. १०.२०२५ अन्वये मंजूरी प्रदान केली आहे. या अनुषंगाने भुखंड वाटप संदर्भात पुढील कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ चे कलम १० (३) व कलम १० (४) चे तरतूदी नुसार पाचही गावातील (कुंडखुर्द, गोपगव्हाण, अळणगाव, कुंड सर्जापूर, हातुर्णा) देय असलेल्या १८ नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या असून उक्त नागरी सुविधांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेस करण्यात आले आहे. तसेच प्रकल्पातील पुनर्वसित गावांना महसूली दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे.

..........................

**लक्षवेधी सूचना क्र. १७६९**

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. श्याम खोडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७६९ पुढीलप्रमाणे आहे :-

"वाशिम जिल्ह्यात दिनांक २५ व २६ जून रोजी मोठ्या प्रमाणात ढगफुटी सदृश्य पाऊस पडला या पावसामुळे शेतीचे व शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, नदी काठावरील शेतामध्ये पुराचे पाणी घुसल्यामुळे शेती खरडून गेली व शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी अंथरलेली ड्रीप, स्पिंकलर पाईप व सोलर पंप प्लेट मोठ्या प्रमाणात वाहून गेलेले असणे, काही गावांमध्ये पुराचे पाणी घुसल्यामुळे घरांच्या भिंती पडल्या असून काही ठिकाणी रस्ते व पूल ही वाहून गेले असणे, बहुतांश ठिकाणी विजेचे पोल पडल्यामुळे वीज पुरवठा खंडित होणे, मोठ्या प्रमाणात पडलेल्या या पावसामुळे ही नैसर्गिक आपत्ती वाशिम जिल्ह्यातील व परिसरातील शेत पिकावर आलेली असणे, त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले असणे, याचे सरसकट पंचनामे करून झालेल्या नुकसानीची भरपाई ताबडतोब देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

---

मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

वाशिम जिल्हयामध्ये अतिवृष्टी व पूर या नैसर्गिक आपत्तीमुळे जून २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता विभागीय आयुक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार रु.२३७.१० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे, मृत जनावरे लहान ३ असून अंशतः कच्च्या ९ घरांची पडझड झालेली आहे.

तसेच या वित्तीय वर्षात नैसर्गिक आपत्तीमध्ये मनुष्यहानी झाल्यास मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत वाटप करणे शक्य व्हावे या करीता दि. ६ मे, २०२५ अन्वये तसेच सन २०२५-२०२६ मध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये आपदग्रस्तांच्या कपड्याच्या व घरगुती भांडी/वस्तु यांच्या झालेल्या नुकसानीकरीता विशेष/वाढीव दराने करावयाच्या मदतीचे वाटप तातडीने व्हावे या करिता दि. ३० मे, २०२५ अन्वये जिल्हाधिकारी यांना उणे (-) प्राधिकार पत्रावर कोषागारातुन रक्कम आहरित करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी स्तरावरुन कार्यवाही करण्यात आली आहे.

वाशिम जिल्ह्यात माहे जून २०२५ या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या वादळी वारे आणि मुसळधार पावसामुळे महावितरण कंपनीच्या सुमारे १४८ उच्चदाब व २८४ लघुदाब इतक्या खांबाचे नुकसान झाले होते. त्या सोबतच २२ रोहित्रांचे देखील नुकसान झाले होते. सुरक्षिततेच्या दृष्टीने नुकसानग्रस्त वाहिनीच्या भागाचे विलगीकरण करुन वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्यात आला. बाधित झालेल्या खांबांपैकी १३४ उच्चदाब, २०५ लघुदाब वाहिनीचे खांब व २२ रोहित्रे पुर्नस्थापित करुन वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. उच्चदाब वाहिनीचा वीजपुरवठा पर्यायी मार्गाने (रिंग सप्लाय) सुरु करण्यात आलेला असून त्यावरील घरगुती, वाणिज्य आणि इतर सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे.

१० सोलर कृषीपंपाचे नुकसान झाल्याच्या तक्रारी ऑनलाईन ग्राहक सुविधा प्रणालीमार्फत प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ०८ सौर कृषीपंपाचे दुरुस्तीचे / तक्रारीचे निराकरण संबंधित एजन्सीमार्फत करण्यात येते.

ढगफुटीसदृश पाऊस व अतिवृष्टीमुळे अनेक पुलांचे नुकसान झाले आहे. ग्रामीण भागांमध्ये काही ठिकाणी रस्त्यांचा पृष्ठभाग वाहून गेला असुन, पूलांचे संरचनात्मक नुकसान झाले, व वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ परिस्थितीची दखल घेत, पावसाचा जोर कमी होताच तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेतली आहे. यामुळे वाहतुक सुरळीत करण्यात आली आहे, अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे झालेल्या नुकसानीसाठी निकषानुसार मदत देण्यात आली आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. किशो पाटील, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. चेतन तुपे, श्री. संजय केळकर, श्री. अनंत (बाळा) नर, श्री. राम कदम, श्री. राहूल कुल, श्री. रवी राणा, श्री. सिध्दार्थ खरात, श्री. योगेश सागर, श्री. निलेश राणे विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७९५ पुढीलप्रमाणे आहे :-

"दि.११ जून, २०२५ रोजीच्या सुमारास वादळी वा-यासह झालेल्या जोरदार पावसाने जळगांव जिल्हयातील पाचोरा आणि भडगांव तालुक्यातील शेतक-यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, या नुकसानीची पाहणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रांत अधिकारी, तहसिलदार, भडगांव तहसिलदार, नायब तहसिलदार, तसेच कृषि आणि महसूल विभागाच्या अधिका-यांसोबत नुकसानीची पाहणी करुन तातडीने पंचनामे करुन शासनाकडे अहवाल लवकरात लवकर पाठविण्याचे आदेश देण्यात येणे, अद्यापही या नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर न केल्याने या नुकसानग्रस्त शेतक-यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

जळगाव जिल्ह्यात जुन २०२५ मध्ये वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे पाचोरा व भडगाव तालुक्यात केळी, पपई, फळपिके व भाजीपाला पिकांचे नुकसान झाले आहे.

जळगाव जिल्ह्यातील जुन ते ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या शेती पीक नुकसानीसाठी २.६३ लाख बाधीत शेतक-यांना रु. २२५ कोटी इतकी मदत देण्यात आली आहे.

पाचोरा तालुक्यातील ४१,७८९ बाधीत शेतक-यांना रु. ३२.६८ कोटी इतकी मदत देण्यात आली आहे व भडगाव तालुक्यातील २८८८५ बाधीत शेतक-यांना रु.२१.८८ कोटी इतकी मदत देण्यात आली आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. अभिजीत पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८३६ पुढीलप्रमाणे आहे :-

"पंढरपूर तालुक्यात (जि.सोलापूर) माहे मे, २०२४ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटील शेतीपिकांचे व फळबागांच्या नुकसानीचा पंढरपूर तालुक्यासाठीचा सुधारित अनुदान मागणी अहवाल दि.०४.१०.२०२४ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांचेकडे सादर करण्यात येणे, तथापि, संबंधित शासन निर्णयानुसार अनुदान मंजुरी आदेश अन्वये शासनाचे महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र.सीएलएस/२०२३/प्र.क्र.२८६/म-३ दि.२० सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सोलापूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देणेकामी निधी मंजूर झालेला नसणे, तसेच जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडून पंढरपूर तालुक्यात माहे मे, २०२४ मध्ये अवकाळी पावसामुळे शेतीपिकांच्या नुकसानीचे विहीत नमुन्यातील विवरणपत्र (अ,ब,क,ड) सादर करताना त्यामधील बाधित खातेदार संख्या व एकुण बाधितांची संख्या ही बरोबर असणे, परंतु अनावधनाने प्रपत्र अ,ब,क,ड मधील बाधित क्षेत्राची एकुण बेरीज चुकल्यामुळे अनुदान मागणी कमी झाल्याने जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सुधारित अहवाल शासनाकडे सादर केलेला असणे, जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सादर केलेला सुधारीत अ,ब,क,ड अनुदान मागणीचा प्रस्ताव आपत्ती, मदत व पुनर्वसन यांच्या महसूल व वन विभाग मंत्रालय यांचेकडे प्रलंबित असणे, शासनाने सदर सुधारीत अ,ब,क,ड प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

सोलापुर जिल्ह्यात मे २०२४ या कालावधीतील अवकाळी पावसामुळे व गारपीटीमुळे झालेल्या शेतीपिकांचे व फळपिकांच्या नुकसानीकरीता शासन निर्णय क्र. सीएलएस २०२५/प्र.क्र. १२८/म-३, दि. १६/०७/२०२५ अन्वये सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण २७४८ बाधित शेतकऱ्यांच्या १९७६.६७ हेक्टर बाधित क्षेत्राकरीता एकुण ४४९.०६ लक्ष (रूपये चार कोटी एकोणपन्नास लक्ष सहा हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र.२४३७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री. समाधान आवताडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे-

"सोलापूर जिल्ह्यातील कासेगाव सहित पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील द्राक्ष बाग आणि डाळींब बाग करणारा बागायतदार आर्थिकदृष्टया डबघाईला आलेला असणे, माझ्या मतदारसंघातील कासेगाव पंढरपूर व मंगळवेढा येथे ६५०० एकर द्राक्ष, ३३०० एकर डाळींब, ४२८५ हेक्टर द्राक्ष, डाळींब ४७७० हेक्टर व १५७८ हेक्टर द्राक्ष ३५१४ हेक्टर डाळींब इतके फळबाग असणे परंतु प्रशासनाच्या हलगर्जीपणा आणि निसर्गामुळे येथील बागायतदार शेतकरी तब्बल ९०० कोटी रुपयांच्या कर्जासाठी डुबलेला असणे यामुळे शेतकऱ्यांच्या सिबील खराब होऊन त्यांना नवीन कर्ज मिळत नसणे सदर बागायतदार आर्थिक संकटात आल्यामुळे याचा प्रतिकूल परिणाम येथील मजूरांवर होत असुन त्यांना हक्काच्या रोजगारापासून वंचित राहावे लागत असणे यामुळे येथील फळबागायतदार शेतकरी यात विशेषता डाळिंब व द्राक्ष ही फळे पिकवणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये प्रशासनाविषयी व शासनाविषयी असंतोषाची भावना निर्माण होणे याकरता शासनाने तात्काळ सदर बागात दरांचे कर्ज माफ करुन त्यांना आर्थिक दृष्टया स्थिरस्थावर होण्यासाठी नवीन आवश्यक कर्ज मंजूर करणे बाबत करावयाची कारवाई व उपाययोजना."

---

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

सोलापूर जिल्हयातील पंढरपूर व मंगळवेढा या दोन्ही तालुक्यामध्ये राष्ट्रीयकृत, ग्रामिण, खाजगी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३०,१९३ खातेदारांना ८८६.४८ कोटी पिक कर्ज वाटप करण्यात आले आहे. मागील येणेबाकी विचारात घेता मार्च, २०२५ अखेर ४४,१०४ खातेदारांकडुन १४८१.६६ कोटी पिक कर्जाची येणेबाकी होती. सदर येणेबाकीपैकी मार्च, २०२५ अखेर ६६८० खातेदारांचे रु. २६९.१४ कोटी कर्ज एनपीए मध्ये गेले आहे.

(5) HB/2293/1-2/750

तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात २३,७४५ खातेदारांना रु. ७०९.२४ कोटी शेतीसाठी मध्यम मुदत कर्ज वाटप करण्यात आले आहे. मागील येणेबाकी विचारात घेता मार्च २०२५ अखेर ७७,८३१ खातेदारांकडुन रू. २००१.२३ कोटी शेती मध्यम मुदत कर्जाची येणेबाकी होती. सदर येणेबाकीपैकी मार्च २०२५ अखेर ६,७५९ खातेदारांचे रु. ३१३.६९ कोटी कर्ज एनपीए मध्ये गेले आहे. अशा रितीने पंढरपूर व मंगळवेढा या दोन्ही तालुक्यामधील मार्च, २०२५ अखेर १,२१,९३५ खातेदारांकडुन येणेबाकी रु. ३४८२.८९ कोटी पैकी १३,४३९ खातेदारांचे रु. ५८२.९३ कोटी कर्ज एनपीए मध्ये गेले आहे. दोन्ही तालुक्यातील अंदाजे ११ % खातेदार एनपीएमध्ये गेले असून १७% रक्कम एनपीएमध्ये गेली आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दोन्ही तालुक्यामध्ये मिळुन द्राक्ष व डाळींब या पिकांसाठी मार्च, २०२५ अखेर ३,३२४ खातेदार सभासदांना रु ८५.६२ कोटी पिक कर्जाचे वाटप केले असुन सदर येणेबाकीपैकी मार्च, २०२५ अखेर ९६६ खातेदार सभासदांचे रु. २४.९२ कोटी कर्ज थकबाकीमध्ये गेले आहे. दोन्ही तालुक्यातील अंदाजे २९.०६ % खातेदार थकबाकीमध्ये गेले असून २९.११ % रक्कम थकबाकीमध्ये गेली आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., सोलापूर यांनी पिक कर्ज वितरण धोरण २०२४ निश्चित केले असून त्यानुसार ज्या शेतकरी सभासदांना अल्प मुदत पीक कर्ज वाटप केलेले आहे व ज्या शेतकरी सभासदांनी अल्प मुदत कर्जाची बाकी रक्कम पूर्णत: परतफेड केली आहे, अशा सभासदांना त्यांनी भरणा केलेल्या रकमेइतकेच कर्ज वाटप केले जाते. तसेच ज्या प्राथमिक विविध कार्यकारी सेवा संस्थांची बँक पातळीवर कर्जाची वसुली १००% आहे व संस्था पातळीवर ८०% पेक्षा अधिक आहे, अशा संस्थांमधील पात्र सभासद शेतकऱ्यांना बँकेच्या कर्ज वाटप निकषानुसार अल्प मुदत पिक कर्ज वाटप केले जाते.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा व पंढरपूर तालुक्यामध्ये पिक कर्ज मिळत नाही अथवा शेतकऱ्याचा सिबिल स्कोर खराब असल्याने त्यांना नविन पिक कर्ज मिळत नाही अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

******

लक्षवेधी सूचना क्र. ८१५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन
## मा.श्रीमती श्वेता महाले, महाराष्ट्र विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक. ८१५ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र कामगार कल्याण निधी १९५३ नुसार महामंडळाच्या योजना व उपक्रम राबविणे करिता मंडळ स्थापन होणे, तेव्हापासून आवश्यकतेनुसार अर्धवेळ कर्मचाऱ्यांना नेमणूक देऊन कालांतराने कर्मचाऱ्याना सेवा जेष्ठतेनुसार २०१८ पर्यन्त पूर्णवेळ नेमणूक देणे, मा. कामगार मंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दि. १३/८/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सेवाजेष्ठता आणि शैक्षणिक अहर्तेनुसार अर्धवेळ कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेणे बाबत निर्णय झालेले असणे, तसेच मंडळाचा आकृतिबंध तयार करणे, सेवाजेष्ठता यादी अद्ययावत करून प्रसिद्ध करणे, सेवाभरती नियम तयार करणे, असे असूनही ३८४ कर्मचारी मागील १५ ते २० वर्षापासून नियमित होण्याच्या प्रतिक्षेत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री(कामगार) यांचे निवेदन

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ अन्वये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सन १९७१ पुर्वी मंडळाच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा फक्त अवितरीत संचयन निधी असल्याने आर्थिक अडचणीमुळे मंजूर पूर्णवेळ पदावर नेमणुका करून मंडळाचे कार्यक्रम, योजना आणि उपक्रम चालविणे हे प्रशासकीय खर्चाच्या मर्यादेत बसविणे शक्य नव्हते. त्यामुळे मंडळाचे शिशु मंदिर, शिवण वर्ग व ग्रंथालय हे उपक्रम चार तासांकरिता असल्यामुळे अर्धवेळ कर्मचा-यांची मानसेवी पदावर नाममात्र मानधनावर आवश्यकतेनुसार मंडळाच्या ठरावान्वये वेळोवेळी नियुक्ती करण्यात येत होती. पुढील कालावधीत मंडळाची व्याप्ती वाढत गेली, तथापि त्या प्रमाणात मंडळाच्या उत्पन्नाचा स्रोत न वाढल्यामुळे नाममात्र मानधनावर तात्पुरती नियुक्ती केलेल्या अर्धवेळ कर्मचा-यांची सेवा अखंड सुरूच राहिली, त्यामुळे अर्धवेळ कर्मचा-यांची संख्या वाढत गेली. सद्य:स्थितीत मंडळात एकुण ३६८ अर्धवेळ कर्मचारी कार्यरत आहेत.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील अर्धवेळ कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत तत्कालीन मा.मंत्री (कामगार) यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. उक्त बैठकीच्या इतिवृत्तामध्ये मंडळातील अर्धवेळ कर्मचा-यांना पूर्णवेळ पदावर सामावून घेण्याच्या मागणीच्या अनुषंगाने प्राप्त झालेले विधि व न्याय विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन मंडळाने तपासणी करुन स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत व उक्त प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही

HB/2139

करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार या प्रकरणी मंडळाकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी यापूर्वी प्राप्त झालेले विधि व न्याय विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन, मंडळातील अर्धवेळ कर्मचा-यांना पूर्णवेळ पदावर नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अभिप्राय देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली होती. तथापि, वित्त विभागाने उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने काही त्रुटी उपस्थित केल्या आहेत. वित्त विभागाने या प्रकरणी उपस्थित केलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून प्राप्त माहितीनुसार सदरचा प्रस्ताव पुन:श्च वित्त विभागाकडे अभिप्रायार्थ सादर करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

तथापि, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील अर्धवेळ कर्मचा-यांना पूर्णवेळ पदावर नियुक्त करुन त्यांना सर्व सेवानिवृत्तीचे लाभ अदा करण्याच्या अनुषंगाने अध्यक्ष, राष्ट्रीय श्रमिक आघाडी यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.६६९५/२०२४ दाखल केली आहे. सदरचे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ असून, उक्त याचिका मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

******************************

**लक्षवेधी सुचना क्र.२२४५**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

श्री. महेश बालदी, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. समीर कुणावर, श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२२४५ पुढील प्रमाणे आहे:-

"१४४ इच्छुक उमेदवारांनी सन २०२०-२१ या वर्षी इतर ठिकाणी काम करत असताना Affected यामध्ये मंडळाच्या वेबसाईटवर अर्ज भरले असणे, सर्व १४४ इच्छुक उमेदवारांनी वारंवार विनंती करून टाळाटाळ केल्याने सन २०२४ मध्ये मंडळाच्या विरूध्द हायकोर्ट मुंबई येथे दावा दाखल करणे, त्यानंतर २५ जानेवारी २०२५ मध्ये हायकोर्टाने १४४ इच्छुक उमेदवारांना मंडळात नोंदीत (भरती) करण्याचे (३ महिन्याच्या आत) आदेश दिले असणे, सदर आदेश मिळाल्यानंतरही मंडळास लेखी पत्राद्वारे दोन वेळा कळवूनही नोंदीत करण्याची कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, अधिकारी वर्ग काहीही उत्तर देत नसणे, इच्छुक उमेदवारांना कामाचा अनुभव असून कोरोना काळात नोकऱ्याही जाऊन ते आज रोजी मंडळात भरती होऊ या आशेवर असणे, हे सर्वजन स्थानिक प्रकल्पग्रस्त असून दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील भूमीपुत्र असणे, त्यांची नोकरीची गरज लक्षात घेता नोंदीत (भरती) करणे कामी शासनाने रायगड सुरक्षा रक्षक मंडळास आदेश देण्याची आवश्यकता व १४४ जणांना नोकरी देऊन न्याय मिळवून देण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन

राज्यातील सुरक्षा रक्षकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच सुरक्षा रक्षकांना त्यांच्या नोकरीचे नियमन करणे व त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती व त्यांचे कल्याण यासाठी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण)अधिनियम १९८१ व त्याअंतर्गत योजना तयार करण्यात आलेली आहे. अशा सुरक्षा रक्षकांचा पुरवठा योग्य प्रकारे व्हावा, या दृष्टीकोनातून राज्य शासनाने सदरहू सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी वेळोवेळी शासन निर्णय / आदेश निर्गमित केलेले आहेत.

HB/2181 -750 प्रति

शेतकरी, कामगार सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार युनियन या संघटनेचे सभासद असलेल्या १४४ अर्जदारांनी रायगड सुरक्षा रक्षक मंडळाच्या संकेतस्थळावर परिणामीत म्हणून नोंदीत होण्यासाठी दि.०९.१२.२०२० ते दि.०९.१०.२०२१ या कालावधीत ऑनलाईन स्वरुपात अर्ज सादर केले होते. त्यापैकी १३३ उमेदवार हे रायगड जिल्ह्यातील आहेत. तसेच सदर संघटनेने त्यांच्या दि.१३.०४.२०२३ व दि.०५.०३.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे रायगड सुरक्षा रक्षक मंडळाच्या पोर्टलद्वारे/वेबसाईट ऑनलाईन प्रक्रीयेमध्ये परिणामीत म्हणून एकूण १४४ इच्छुक उमेदवारांना नोंदीत करावे अशी विनंती केली होती.

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने त्यांच्या दि.१२.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये विषयाधीन सुरक्षा रक्षकांना नोंदीत करण्याच्या अनुषंगाने सदरहू संघटनेकडे आवश्यक कागदपत्रे, पुरावे व माहिती सादर करावी व सदर कागदपत्रे सादर केल्यानंतर मंडळामार्फत पडताळणी करून परिणामीत असल्याची खात्री केल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे कळविण्यात आले होते.

दरम्यानच्या कालावधीत सदर संघटनेने दि.२६.०४.२०२४ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे या प्रकरणी याचिका क्र.६४३०/२०२४ दाखल केली होती. त्यामध्ये त्यांनी त्यांचे सभासद असलेल्या १४४ अर्जदारांना मंडळामध्ये नोंदीत करून घेण्यासाठी आदेश व्हावेत अशी प्रार्थना केली होती. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२४.०१.२०२५ रोजी आदेश दिले असून, याचिकाकर्त्यांनी मंडळात नोंदणीसाठी दाखल केलेल्या अर्जावर मंडळाने कायद्यातील तरतूदीनुसार १२ आठवड्याच्या आत निर्णय घ्यावा असे आदेश दिले होते. तथापि, संघटनेने १४४ अर्जदारांबाबतचे कोणतेही कागदपत्रे अद्यापही मंडळाला सादर केले नाहीत. सदरहू अर्जदार परिणामीत आहेत किंवा कसे, असल्यास कोणत्या आस्थापनेत काम करत होते. याबाबत मंडळात आवश्यक माहिती नसल्यामुळे मंडळाने त्यांच्या दि.१२.०३.२०२४ रोजीच्या पत्रानुसार मागितलेली कागदपत्रे संघटनेने सादर केल्यानंतर तसेच त्याची पडताळणी केल्यानंतरच त्यांना मंडळात नोंदणी करणे शक्य होणार आहे.

यासंदर्भात संबंधित संघटना यांना त्यांच्या सभासद असलेल्या १४४ अर्जदारांबाबतीत कागदपत्रांसह दि.१६.०७.२०२५ रोजी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ येथे उपस्थित राहणेबावत कळविण्यात आलेले होते. संघटनेने १४४ सुरक्षा रक्षकांपैकी १३१ सुरक्षा रक्षकांचे दस्तावेज मंडळास सादर केले आहे. त्यानुसार १३१ सुरक्षा रक्षक काम करीत असलेल्या आस्थापना व सुरक्षा रक्षक एजन्सी यांना प्रत्यक्ष भेट दिलेली आहे. त्यामध्ये सुरक्षा रक्षक, मुख्य मालक आणि सुरक्षा रक्षक एजन्सी यांच्या अभिप्रायात तफावत आढळून आली आहे. त्यामुळे १३३ सुरक्षा रक्षकांची आवश्यक कागदपत्रे तसेच मुख्य मालक आणि एजन्सी यांनी सादर केलेल्या माहितीची तसेच सर्व कायदेशीर बाबींची पुन्हा तपासणी करून पुढील योग्य ती कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येत आहे.

*******************************

लक्षवेधी सूचना क्र-२४००

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. मोहन मते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान~~परिषद~~ सभा नियम १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे.

"प्रवीण वानखेडे हे नागपूर येथील सहकारी संस्था येथे विभागीय सहनिबंधक या पदावर मागील १५ वर्षापासून कार्यरत असणे, या पदावर कार्यरत असतांना बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या संगनमताने मौजा हरपूर येथील शिट क्र.२५ सिटी सर्वे क्र.८८२ वॉर्ड नं.२० खसरा क्र.०७ मधील प्लॉट नं.२७ मेसर्स धीरजकुमार हरिदास अग्रवाल यांचे मालकीचे इमारत आराजी ६९५७.३२ चौ.फूट जागेवर बांधकाम असताना हेराफेरा करुन ३२३.०३ चौ.मी. म्हणजेच ३४७७ चौ. फूट बांधकाम दाखविण्यात येणे, सदर मालमत्तेच्या बँकेने केलेल्या जप्ती पंचनाम्यानुसार सदर प्लॉटवर तीन मजली पक्के व्याससायिक बांधकाम १०४३१ चौ.फूट बांधकाम असणे, सदर जागेवर १०४३१ चौ. फूट जागेवर पक्के व्यावसायिक बांधकाम असताना श्री. प्रवीण वानखेडे हे नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँक लि. या सहकारी बँकेवर प्रशासक असतानी त्यांनी पदाचा दुरुपयोग करुन त्यांच्या जवळचे मित्र सचिन भिमराव पारधी व श्रीमती सुवर्णा पारधी, राहणार १७६ मयुरी अपार्टमेंट आयुर्वेदिक लेआऊट नागपूर यांना रु. ४,०१,७५०००/- मध्ये दिनांक १५ मार्च २०२२ रोजी विक्री करुन देण्यात येणे, सदर जागी जमिनीचा भाव हा रुपये १००००/- प्रति चौरस फूट असताना वरील प्रमाणे पक्के बांधकाम असलेली करोडो रुपयांची व्यावसायिक इमारत अत्यंत कवडीमोल भावात स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी जि मध्यवर्ती सहकारी बँकचे नुकसान करण्यात येणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

---

### मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

श्री. प्रविण वानखेडे यांची उपनिबंधक संवर्गातून सहनिबंधक संवर्गात सन २०१२ साली पदोन्नती होऊन त्यांना सहनिबंधक, सहकारी संस्था, आदिवासी विभाग, नाशिक येथे पदस्थापना देण्यात आली होती. सदर पदावर श्री. वानखेडे हे सन २०१२ ते २०१५ या कालावधीत कार्यरत होते. तद्नंतर जून, २०१५ मध्ये श्री. वानखेडे यांची विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नागपूर या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली. सदर पदावर ते सन २०१५ ते २०२० या कालावधीत कार्यरत होते. त्यानंतर ऑगस्ट, २०२० ते ऑगस्ट,

२०२३ या कालावधीत श्री. वानखेडे प्राधिकृत अधिकारी म्हणुन नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नागपूर येथे कार्यरत होते. दिनांक ०१.०९.२०२३ पासून ते आजरोजी पर्यंत श्री. वानखेडे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर या पदावर कार्यरत आहेत.

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., नागपूर बँकेच्या गांधीबाग शाखेतून मेसर्स धीरजकुमार अ‍ॅण्ड कंपनी यांना व्यवसायाकरीता दिनांक ३१.०८.२००१ रोजी रु. १९०.०० लाख खेळते भागभांडवल मर्यादा मंजूर करण्यात आली होती. सदर कर्ज खाते थकीत झाल्यामुळे दिनांक ३१.०८.२००२ रोजी एनपीए वर्गवारीत समाविष्ट करण्यात आले होते. सदर कर्ज प्रकरणी मेसर्स धिरजकुमार अ‍ॅण्ड कंपनीची मौजा हरपूर येथील शिट क्र.२५ सिटी सर्वे क्र.८८२ वार्ड नं. २० खसरा क्र. ०७ मधील प्लॉट नं. २७ येथील मालमत्ता नोंदणीकृत गहाण करण्यात आली होती. सदरहू नोंदणीकृत गहाणपत्रकाव्दारे एकूण ६९५७.३२ चौ.फुट प्लॉट व त्यावरील तळमजला व दोन माळे अपूर्ण बांधकाम असलेली एकूण १३४८० चौ. फुट अपूर्ण बांधकाम असलेली मालमत्ता नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे गहाण ठेवण्यात आली होती.

सदरहू कर्ज थकीत होऊन एनपीए झाल्यामुळे बँकेने सरफेसी अ‍ॅक्ट अंतर्गत वसुली करण्यासाठी नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत सिक्युरटायझेशन अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत मालमत्ता विक्रिची कारवाई सुरु करुन दिनांक १४.०१.२०१० रोजी कलम १३ (२) अंतर्गत कर्जदाराला मागणी नोटीस पाठविण्यात आली होती. सदर मालमत्तेचा दिनांक २३.१०.२०१० रोजी प्रथम लिलाव, दिनांक ०८.०१.२०११ रोजी दुसरा लिलाव व दिनांक १६.०७.२०१२ रोजी तिसरा लिलाव आयोजित करण्यात आला. तथापि, सदर तीनही लिलावामध्ये मालमत्तेच्या राखीव किंमतीइतपत बोली प्राप्त न झाल्यामुळे सहरहू तीनही लिलाव अयशस्वी झाले.

सन २०१९ मध्ये जिल्हाधिकारी, नागपूर यांचे मार्फत सरफेसी कायद्यातील तरतूदीनुसार सदरहू मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला. त्यानंतर बँकेच्या पॅनेलवरील मान्यताप्राप्त मुल्यांकनकार व वास्तुविशारद श्री. रोहीत विक्रम बुटी यांच्याकडून सदर मालमत्तेचे मुल्यांकन करण्यात आले व दिनांक ०४.०१.२०२२ रोजी सादर केलेल्या मुल्यांकन अहवालानुसार सदरहू मालमत्तेचे शासकीय दरानुसार प्लॉटचे मुल्यांकन रु. ३४००/-प्रती चौ.फुट व बांधकामासहीत एकूण मुल्यांकन रु. २९० लाख होते. तसेच बाजारभावाप्रमाणे सदरहू मालमत्तेचे प्लॉट व बांधकामाचे मुल्यांकन रु. ४००.०० लाख होते.

सदर मुल्यांकन विचारात घेऊन मालमत्तेचे एकूण राखीव मुल्य रु. ४००.०० लाख निश्चित करण्यात आले. त्यानंतर विक्रीसाठी लोकमत व लोकमत टाईम्स या अग्रण्य वृत्तपत्रामध्ये निविदेच्या अटी व शर्ती नमूद

दिनांक ०७.०१.२०२२ रोजी निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या होत्या.

| निविदा सादर कर्त्याचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|
| श्रीमती श्रध्दा स्वप्निल निरुडवार | रु.४०१.०० लाख |
| श्री. रमेश नारायणराव कडू | रु. ४००.५० लाख |
| श्रीमती सुवर्णा सचिन व सचिन भिमराव पारधी | रु. ४०१.७५ लाख |

उक्त प्रमाणे प्राप्त निविदांपैकी श्रीमती सुवर्णा सचिन व सचिन भिमराव पारधी यांची निविदा सर्वाधिक दराची असल्यामुळे प्राधिकृत अधिकारी यांनी सदर निविदा मान्य करुन निविदाकारास उर्वरित रक्कम रुपये ४०१.२५ लाख जमा करण्याबाबत सूचित केले. त्यानुसार श्रीमती सुवर्णा सचिव व सचिन भिमराव पारधी यांनी दिनांक ०८.०३.२०२२ रोजी रक्कम रु. ४०१.२५ लाख रक्कमेचा भरणा केला व बँकेने दिनांक १५.०३.२०२२ रोजी विक्री प्रमाणपत्र निर्गमित करुन त्यांना मालमत्तेचा ताबा दिला.

विक्री केलेल्या मालमत्तेच्या भुखंडाचे क्षेत्रफळ ६९५७ चौ. फुट असून मुल्यांकन अहवालानुसार तळमजला व त्यावरील दोन मजल्याचे बांधकाम क्षेत्रफळ १३४८० चौ. फुट आहे. भुखंड व त्यावरील बँकेने मान्यताप्राप्त मुल्यांकन कर्त्याच्या मुल्यांकन अहवालानुसार राखीव किंमत निर्धारीत करुन जाहिरातीव्दारे संपुर्ण विक्री प्रक्रिया पार पाडली आहे. त्यामुळे सदर व्यवहारात बँकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

******

लक्षवेधी सूचना क्र. ७६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

सर्वश्री. श्री. काशिनाथ महादु दाते,श्री. अमित देशमुख, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बापूसाहेब पठारे, श्री. साजिद खान पठाण, श्री. विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, श्री. संजय मेश्राम,श्री. रामदास मसराम, श्री. अमीन पटेल, श्री. अमित झनक, श्री. विश्वजित कदम, श्री. मंगेश चव्हाण, श्री. रोहित पाटील, वि.स.स.

"राज्यात मुली व महिलावरील लैंगिक अत्याचारात वाढ झाली असून गेल्या चार महिन्यात बलात्काराचे सर्वाधिक गुन्हे मुंबई आणि पुण्यात दाखल झालेले असल्याचे माहे मे २०२५ रोजी उघडकीस येणे, तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील मागील तीन वर्षात अल्पवयीन मुलीवरील अत्याचारात वाढ झालेली असून सन २०२२ च्या तुलनेत २०२४ मध्ये वाढ झाल्याच माहे एप्रिल २०२५ रोजी उघडकीस येणे, दर महिन्याला अल्पवयीन मुलींच्या अत्याचारांचे सरासरी १५ गुन्हे नोंद झाल्याचे धक्कादायक आकडेवारी समोर आलेली असणे, अहिल्यानगर जिल्ह्यात महिलांच्या अत्याचारातही वाढ झाली असून गतवर्षी सुमारे १२१ गुन्ह्यांची नोंद झालेली असल्याचेही निदर्शनास येणे, एकेकाळी मुलींसाठी सुरक्षित असलेल्या अहिल्यानगर शहरात व जिल्ह्यात अल्पवयीन मुली व महिला आता सुरक्षित नसल्याने त्यांच्यामध्ये व त्यांच्या कुंटुंबीयांमध्ये पसरलेले भीतीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने मुलींच्या व महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कठोर कायदे करून अंमलबजावणी करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

मा. मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

राज्यातील महिलांवरील अत्याचाराची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:-

| वर्ष | २०२१ | २०२२ | २०२३ | २०२४ | मे २०२५ पर्यंत |
|---|---|---|---|---|---|
| दाखल गुन्हे | ३९५२६ | ४५३३१ | ४७१०१ | ४६४५९ | २१६६७ |
| उघड गुन्हे | ३६४८८ | ४१५९४ | ४५३९७ | ४३५४५ | १९८०४ |
| गुन्हे उघड प्रमाण (%) | ९२.३१% | ९१.७६% | ९६.३८% | ९३.७२% | ९१.४०% |

राज्यात जानेवारी, २०२५ ते मे, २०२५ या कालावधीत बलात्काराचे सर्वाधिक गुन्हे मुंबई शहरात दाखल असून त्याखालोखाल ठाणे शहरात गुन्हे दाखल आहेत. या कालावधीत मुंबई शहरात दाखल एकूण ४८५ गुन्ह्यांपैकी ४२६ गुन्हे उघड झाले असून ठाणे शहरात दाखल एकूण २३५ गुन्ह्यांपैकी २३० गुन्हे उघड झाले आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२३ मध्ये अल्पवयीन मुलींवरील बलात्काराचे (भा.न्या.सं. कलम ६४/ भा.दं.वि. कलम ३७६ सह पोक्सो अधिनियम कलम ४ व ६) एकूण १५३ गुन्हे दाखल असून सर्व गुन्हे उघड झाले आहेत. सन २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये दाखल गुन्ह्यांत (३१ ने) वाढ होऊन एकूण १८४ गुन्हे दाखल असून त्यापैकी १८२ गुन्हे उघड झाले आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२३ मध्ये महिलांवरील (१८ वर्षांवरील) बलात्काराचे (भा.न्या.सं. कलम ६४/भादवि कलम ३७६) एकूण २८० गुन्हे दाखल असून सर्व गुन्हे उघड झाले आहेत. सन २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये दाखल गुन्ह्यांत (१५९ ने) घट होऊन एकूण १२१ गुन्हे दाखल असून सर्व गुन्हे उघड झाले आहेत.

---

राज्यात महिला अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत:-

१. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचा तातडीने निपटारा होण्यासाठी सर्व आयुक्तालय व जिल्ह्यांमध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला पोलीस कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.
२. महिला व मुलींसंबंधीत येणारे सर्व प्रकारचे गुन्हे नोंदविणे, त्यांचा तपास करून निर्गती करणे, महिलांच्या संबंधीत येणा-या सर्व अर्जांची चौकशी करणे व या अनुषंगाने आवश्यक त्या ठिकाणी प्रतिबंधक कार्यवाही करणे, समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करणे या प्रकारच्या महिलांसंबंधीत समस्यांवर संवेदनशीलपणे व तात्काळ कार्यवाही करण्याकरीता सर्व पोलीस स्टेशन मध्ये महिला सहाय्य कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत.
३. महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी यांच्या मार्फत जागरुकता निर्माण करणे अशा उपाययोजना करण्यात येत आहे.

४. राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया/दामिनी पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

५. बलात्काराच्या गुन्ह्यांचे ६० दिवसांत मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याकरीता ITSSO पोर्टलद्वारे देखरेख करण्यात येते.

६. राज्यात महिला व बालकांच्या अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने एकूण ४५ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.

७. पीडित महिलांच्या सहाय्यासाठी राज्यात १२४ महिला समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.

८. बलात्कार व ॲसिड हल्यातील पीडित व्यक्तींना मनोधैर्य योजनेतंर्गत रु. १० लाखापर्यंत मदत दिली जाते.

९. हरविलेल्या बालकांना शोधण्यासाठी ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येते. राज्यात जुलै, २०१५ ते डिसेंबर, २०२४ या दरम्यान एकूण १३ मुस्कान ऑपरेशन राबविण्यात येऊन त्यात एकूण ४१,१९३ अल्पवयीन मुले/मुली यांचा शोध घेण्यात आला आहे.

१०. राज्यात हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्याकरीता प्रत्येक पोलीस उप विभागात "मिसींग सेल" स्थापन करण्यात आले आहेत.

११. बाल न्याय अधिनियम, २०१५ या कायद्याअंतर्गत राज्यातील सर्व ४९ पोलीस घटकांमध्ये एकुण ४९ विशेष बाल पोलीस पथके (Special Juvenile Police Unit) कार्यरत आहेत.

१२. राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत.

१३. डायल ११२ च्या माध्यमातून पीडित महिला व बालकांना तातडीने मदत पुरविण्यात येते.

---

लक्षवेधी सुचना क्रमांक : ५५५ गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. तुकाराम काते, वि.स.स यांच्या लक्षवेधी सूचना क्र.५५५ पुढीलप्रमाणे आहे :-

" लाल डोंगर परिसरात आरसीसी रस्त्याचे काम मुंबई महानगरपालिका ठेकेदार ईगल इन्फ्रा कंपनी करीत असणे काम सुरू असताना दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी रात्री १०.३० च्या वेळेस रस्ता काँक्रिट करण्याचे काम करणे सुरू असताना कंपनीचे सुपरवायझर यांना दारूच्या नशेत दोन अज्ञात इसमाने शिवीगाळ करून कॉलर पकडून मारहाण केल्याने डोक्याला दोन टाके पडून इजा झाली असणे, सदर प्रकरण नजीकच्या चुनाभट्टी पोलीस ठाणे येथे गेले असता जखमी सुपरवायझर यांना तीन तास बसून ठेवले, कोणतीही कार्यवाही मारहाण करणाऱ्या अज्ञात इसमानवर चुनाभट्टी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी केली नसणे, त्यामुळे विकास कामे करताना कंत्राटदारांकडून खंडणी जमा करण्यासाठी असे प्रकार घडणे व त्यावर चुनाभट्टी पोलिसांनी काहीच कार्यवाही न करणे ही गंभीर बाब असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

लाल डोंगर, चेंबुर या परीसरात रस्त्याचे कॉक्रिटीकरणाचे काम सुरु असतांना दोन इसमांनी दारुच्या नशेत येवून तेथे काम करायचे नाही असे बोलून शिवीगाळ व कॉलर पकडून हाताने मारहान केल्या प्रकरणी चुनाभट्टी पोलीस स्टेशन येथे अ.गु.र.क्र.५८०/२५ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ३५१ (२), ३५२ अन्वये नोंद करण्यात आला असून सदर अदखलपात्र गुन्हयाच्या अनुषंगाने तात्काळ रात्रपाळी कर्तव्यावर असलेले अंमलदार यांनी सदर घटनेची खात्री केली तसेच सदर ठिकाणचे काम सुरळीत चालावे याकरीता सदर परिसरात गस्त सुरु करण्यात आली.

सदर घटनेच्या अनुषंगाने विरोधक यांचा शोध घेवून विरोधक क्र.१ यास भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६८ अन्वये नोटीस देवून शांतता राखण्याची समज देण्यात आली. तसेच विरोधक क्र.२ व ३ यांच्याविरुध्द दिनांक १७.०६.२०२५ रोजी चॅप्टर केस क्र.१ सु.प्र.क्र.क्र.६७/२५ न्या.सु.का.प्र.९४५/२५ व चॅप्टर केस क्र.२ सु.प्र.क्र.क्र.६८/२५ न्या.सु.का.प्र.९४६/२५ भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १२६ अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली असून रुपये २५,०००/- एवढ्या रकमेचे एक वर्ष कालावधीकरीता शांतता राखण्याकरीताचे बंधपत्र घेण्यात आले आहे.

सदर अ.गु.र.क्र. ५८०/२५ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ३५१ (२), ३५२ अन्वये दाखल अदखलपात्र गुन्ह्याच्या पुढील तपासाकरीता मा. न्यायालयाकडून दि. १७/०६/२०२५ रोजी परवानगी प्राप्त करुन घेण्यात आली आहे. त्यानुसार तक्रारदार यांना प्रत्यक्ष पोलीस ठाण्यात बोलावून घेवून जबाब घेण्यात आला आहे. त्यानुसार तक्रारदार यांनी त्यांना कोणत्याही वस्तुने मारहाण झाली नसल्याचे सांगितले आहे. तसेच त्यांच्या सोबत काम करणारे इंजिनिअर यांचा देखील जबाब घेण्यात आला असून त्यांनी तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे हकिकत सांगितली आहे. तसेच तक्रारदार यांनी उपचार घेतलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचेकडून जखमांचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाले असून त्यामध्ये जखमांचे स्वरुप It is not grievous injury असे दिले आहे. त्यानुसार तक्रारदार यांना टाके पडल्याचे नमूद केलेले नाही. मा. न्यायालय यांच्या परवानगीनुसार सदर अदखलपात्र गुन्ह्याचा तपास सुरु असून तपासाअंती अंतिम अहवाल मा. न्यायालयात सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

सदर मारहाण प्रकरणी कोणत्याही प्रकारच्या खंडणीची मागणी करण्यात आलेली नाही. तसेच सदरची घटना प्रत्यक्षात दि. १७.०४.२०२५ रोजी २१.३० च्या सुमारास घडल्यानंतर तक्रारदार हे २३ वाजण्याच्या सुमारास खाजगी रुग्णालयात उपचारासाठी गेले व तेथून पोलीस ठाण्यात उपस्थित राहिले आहेत. त्यांच्या तक्रारीनुसार दि.१८.०४.२०२५ रोजी १.५४ वा अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे तक्रारदार यांना तीन तास पोलीस ठाण्यात बसवून ठेवले ही बाब खरी नाही.

तसेच खंडणीबाबत चुनाभट्टी पोलीस ठाणे येथे सन २०२१ पासून आतापर्यंत एकूण १९ गुन्हे दाखल झाले असून त्यामध्ये एकूण १७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. खंडणीच्या गुन्ह्यांमध्ये चुनाभट्टी पोलीस ठाण्याकडून योग्य कारवाई करण्यात येत आहे.

**************

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

विधानसभा लक्षवेधी क्रमांक- १२५४

श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२५४ पुढीलप्रमाणे आहे :

"जाती-जातींमध्ये एकोपा टिकविण्यासाठी आणि वाद टाळण्यासाठी व त्यातून ॲट्रॉसिटीचे गुन्हे घडू नयेत म्हणून पोलिस प्रशासनाने जातीय सलोखा बैठका घेण्यास सुरुवात करणे साल २०२० पासून ३ हजार ४४७ बैठका होणे, तरी १ जानेवारी २०२० ते ३१ मार्च या मागील चार वर्षांत २०२५ राज्यात १८ हजार ७०३ ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी ५९७ प्रकरणे पोलिस दफ्तरी प्रलंबित असणे. सन २०२२ पासून ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यांच्या नोंदी वाढल्याचे लक्षात येणे, राज्यामध्ये सदर गुन्ह्यांचे विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रमाण सर्वाधिक असणे. ॲट्रॉसिटीचे गुन्हे कमी व्हावेत यासाठी पोलिस ठाणे स्तरावर गेल्या चार वर्षात पाच हजारांवर कार्यशाळा घेण्यात आल्या असल्या तरी गुन्हेगारी प्रवृत्तीवर अद्यापही जबर न बसणे, वरील प्रलंबित ५९७ गुन्ह्यांपैकी अनुसूचित जाती संबंधी ४९४ तर अनुसूचित जमातींशी संबंधित १०३ गुन्हे वेगवेगळ्या कारणांनी पोलिस ठाणे स्तरावर प्रलंबित असणे, जातीय सलोखा बैठका घेण्याचा उद्देश पूर्ण होत नसल्या कारणाने शासनाने जाती-जातींमध्ये एकोपा निर्माण व्हावा यासाठी जनजागृती करण्याच्या दृष्टीने तातडीने केलेली वा करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

---

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ अन्वये दाखल झालेल्या गुन्ह्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | वर्ष | वर्षाच्या सुरुवातीस प्रलंबित असलेले गुन्हे | चालू वर्षात दाखल झालेले गुन्हे | एकुण (३+४) | दोषारोप पत्र दाखल | पोलीसांनी तपासाअंती निकाली काढलेले गुन्हे | वर्षाच्या अखेरीस पोलीस तपासावर प्रलंबित गुन्हे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२० | १२६८ | ३२५० | ४५१८ | २७२७ | ४५० | १३४१ |
| २ | २०२१ | १३४४ | ३१३५ | ४४७९ | २८८६ | ४५६ | ११३७ |
| ३ | २०२२ | ११३९ | ३५०८ | ४६४७ | २९६२ | ४२० | १२६५ |
| ४ | २०२३ | १२६७ | ३८०२ | ५०६९ | ३४८४ | ४१४ | ११७१ |
| ५ | २०२४ | ११७४ | ३९४१ | ५११५ | ३५५७ | ३९८ | ११६० |
| ६ | २०२५ नोव्हेंबर अखेर | ११६० | ३७९७ | ४९५७ | ३४५५ | ३८६ | १११६ |

सन २०२० पासून दाखल गुन्ह्यांचे अवलोकन केले असता पोलीस तपासवर प्रलंबित गुन्ह्यांची संख्या कमी होत असल्याचे दिसून येते. तसेच राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ अन्वये नोव्हेंबर, २०२५ पर्यंत दाखल गुन्ह्यांपैकी सर्वाधिक गुन्हे कोल्हापूर परिक्षेत्रातील असून त्याखालोखाल छत्रपती संभाजीनगर व नाशिक परिक्षेत्रात आहेत.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांवर होत असलेल्या अत्याचाराचे गुन्हे रोखण्यासाठी स्थानिक पोलीस ठाण्याचे अधिकारी यांच्या मदतीने समाजातील विविध घटकांच्या जातीय सलोखा बैठकांचे आयोजन करण्यात येते. राज्यात आयोजित करण्यात येणाऱ्या जातीय सलोखा बैठकांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सन | कार्यशाळा | जातीय सलोखा बैठक |
|---|---|---|---|
| १ | २०२० | १९० | ३४३ |
| २ | २०२१ | ४२६ | ३६२ |
| ३ | २०२२ | १४०३ | ८०८ |
| ४ | २०२३ | १४९३ | ८८० |
| ५ | २०२४ | १२२१ | ८०५ |
| ६ | नोव्हेंबर २०२५ पर्यंत | १०३६ | ७९४ |

अनुसुचित जाती /जमातीच्या.सदस्यांवर होत असलेल्या अत्याचाराचे गुन्हे रोखण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहे :-

१. राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ अन्वये दाखल झालेल्या सर्व गुन्हयांप्रकरणी नागरी हक्क संरक्षण विभागाद्वारे भेटी देण्यात येतात. तसेच, गुन्हा योग्य रित्या दाखल करण्यात येऊन, तपास पारदर्शकपणे होत असल्याचाबतची खात्री करुन गुन्हयातील पिडीतांना त्यांच्या कायदेशीर हक्कांबाबत माहिती देण्यात येते.
२. दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी व साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी गुन्हयांमध्ये जास्तीत जास्त प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व वैज्ञानिक पुरावा मिळविण्याकरीता प्रयत्न करण्याबाबत सर्व घटक प्रमुख यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
३. दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याकरीता गंभीर गुन्हयांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक करण्याबाबत सर्व घटक प्रमुख यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

४. राज्यात सध्या सहा ठिकाणी विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

५. जातीय तणावाच्या गुन्हयांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करताना मोहल्ला कमिटी, शांतता कमिटी, जिल्हा दक्षता समिती यातील सदस्यांना सक्रिय करुन उपाययोजना करण्याबाबत तसेच जातीय सलोखा समाजात कायम राहावा यासाठी नियमितपणे पोलीस अधिकारी व नागरीकांच्या कार्यशाळा / बैठका घेण्याबाबत सर्व घटकांना सुचित करण्यात आलेले आहे.

---

लक्षवेधी सुचना क्रमांक : १२७३ गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स यांच्या लक्षवेधी सूचना क्र.१२७३ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई शहर व उपनगर तसेच राज्यातील विविध भागांमध्ये ११ महिन्यांच्या भाडेकरारावर घरे देण्याची प्रथा मोठ्या प्रमाणात प्रचलित आहे. परंतु, अनेकदा असे आढळते की, निर्धारित कराराचा कालावधी संपल्यानंतर देखील काही भाडेकरू वेळेत घर खाली करत नसणे व मालकास नाहक त्रास सहन करावा लागणे, सदर परिस्थितीत, जेव्हा संबंधित गृहधारक पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन जातात, तेव्हा त्यांना "कोर्टातून ऑर्डर घेऊन या" असे सांगून परत पाठवले जाणे, यामुळे सामान्य नागरिक, विशेषतः जेष्ठ नागरिक, महिला, एकटे राहणारे व्यक्ती यांना कायदेशीर प्रक्रिया, वेळ आणि पैशाचा अपव्यय सहन करावा लागत असणे, भाडेकरार करताना पोलीस पडताळणी करुन घेतली जात असणे, भाडेकरार कालबद्ध असूनही वेळेवर घर खाली न करणे, पोलीस ठाण्याकडून तक्रार स्वीकारण्यास नकार, न्यायालयीन प्रक्रियेत खर्च व वेळ खूप लागत असणे, याबाबत पोलीस ठाण्यांनी भाडेकराराच्या अटींचे पालन न करणाऱ्या भाडेकरूविरोधात प्राथमिक स्वरूपात तक्रार नोंदवावी, भाडेकरारावर नोटरी अथवा रजिस्टर्ड करार असल्यास, पोलीसांनी त्यावर नोटीस देऊन आवश्यक कार्यवाही करणे, नागरिकांच्या तक्रारींवर प्राधान्याने सुनावणी घेऊन तत्काळ कारवाई करणे, तसेच राज्य सरकारने भाडेकरार संदर्भात जलद न्याय व तक्रार निवारण यंत्रणा निर्माण करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

---

## मा.मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांचे निवेदन

घरमालक व भाडेकरु यांच्यादरम्यान ११ महिन्यांचा भाडेकरार कालबध्द असूनही वेळेवर घर खाली न करणे ही बाब कराराचा भंग असून, दिवाणी स्वरुपाची आहे. राज्यामध्ये घरमालक व भाडेकरु यांचा भाडेकरार हा महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा १९९९ अन्वये करण्याची तरतूद आहे. राज्यातील सहा विभागीय स्तरावर सहा भाडे नियंत्रण कायदा न्यायालये कार्यरत असून महाराष्ट्र

भाडे नियंत्रण कायद्यातील कलम ३३ ते कलम ३७ अन्वये सदर न्यायालयांचे कामकाज हाताळले जाते. तसेच या न्यायालयांतर्गत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने न्यायालयीन सुनावणीची प्रक्रिया करण्यात येत असून सदर कायद्यातील कलम ३८ अन्वये तक्रारीच्या निवारणाकरिता विहित कालमर्यादेत न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करण्यात येतात.

समाजविरोधी घटक निवासी भागात लपून बसू शकतात त्यांच्याद्वारा सार्वजनिक शांतता, मानवी जीवनाला / सार्वजनिक मालमत्तेला धोका उद्भवू शकतो या कारणास्तव घरमालक व भाडेकरु यांच्यात भाडेकरार करताना पोलीस पडताळणी करणे बंधनकारक असून त्यासंदर्भात ६० दिवसांकरीता घरमालकाने भाडेकरूंची माहिती ऑनलाईन कळविण्यासंदर्भात वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात येतात. सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत नागरिकांची तक्रार प्राप्त झाल्यास स्थानिक पोलीस स्टेशनमार्फत तात्काळ कारवाई करण्यात येते.

*************

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

## मा. श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९७६ पुढीलप्रमाणे आहे:-

"लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी हैदराबाद वरुन जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, मुंबईच्या दिशेने निर्यातीसाठी घेऊन जात असलेले गोमांसाचे (सुमारे ५७ हजार किलो) २ कंटेनर ट्रक पकडण्यात आले असणे, सदर गोमांस मे. एशियन फुड्स मीम ॲग्रो या कंपनीकडून निर्यातीसाठी पाठविण्यात आलेले असणे, याबाबत प्राथमिक तपास व न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा संचालनालयाच्या अहवालानंतर FIR No. ८५/२०२५ दि. ३०.३.२०२५ रोजी दाखल झालेला असणे, तसेच महाराष्ट्रातील धाराशिव जिल्ह्यामधून २० ते २५ टन गोमांस तेलंगणा राज्य येथे नियमीतपणे तस्करी होत असल्याचे निदर्शनास येणे, अशा प्रकारे महाराष्ट्र राज्यात गोवंशीय प्राण्यांच्या कत्तलीस, विक्रीस व वाहतुकीस बंदी असुन सुध्दा राज्यभरामध्ये सर्रासपणे गोवंशाची अनधिकृत वाहतूक सुरु असणे तसेच राज्यामध्ये गौतस्करी राखण्यासाठी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सन १९७६ (सुधारित १९९५) व प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध कायदा सन १९६० च्या कायद्यानुसार गुन्हे नोंदविले असणे, सदर गुन्हा नोंद होत असताना अनधिकृतपणे गोमांसाची वाहतूक करणारी वाहने जप्त करण्याबाबत व वाहनांचा परवाना कायमचा रद्द करुन वाहन चालक व मालक यांच्यावर मोक्का अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करणे तसेच गोतस्करी रोखण्यासाठी स्वतंत्र नवीन कडक कायदा करणेबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दि. २५ मार्च २०२५ रोजी दुपारी १२:०० वा. मौजे कुसगाव, ता. मावळ, जि. पुणे येथील सिंहगड कॉलेजसमोर पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेवर दोन कंटेनरमध्ये एकूण ५७,०००/- किलो गोवंशीय मांस बेकायदेशीरपणे विक्रीसाठी वाहतूक करतांना आढळून आले. दि. २६ मार्च, २०२५ रोजी दोन्ही कंटेनरमध्ये असलेल्या प्रत्येकी दहा बॉक्समधून मांसाचे सॅम्पल काढण्यात आले व असे २० सॅम्पल हे प्राथमिक तपास व न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा, गणेशखिंड, पुणे येथे तपासणीकरिता पाठविण्यात आले असता, सदर मांस हे गोवंशीय मांस असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी एशियन फुड मीम ॲग्रो कंपनीचे मालक व इतर यांनी संगनमताने स्वतःचे फायद्याकरीता सदरचे मांस वाहतूक व निर्यातीकरीता आवश्यक असलेली ई-वे बिल, इनवर्डस इत्यादी बनावट कागदपत्रे तयार करून त्या कागदपत्रांवर जाणीवपूर्वक फसवणूक करण्याच्या

उददेशाने Indian halal frozen boneless buffalo offals असा उल्लेख करून त्याचा शासनाची व खरेदीदाराची फसवणूक करणेसाठी वापर केला आहे. सदर प्रकरणी दि. ३० मार्च २०२५ रोजी गु.र.नं ८५/२०२५, बी.एन.एस. कलम २०२३ चे ३२५, ६१ (२), ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३३९, ३४०(२) सह महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियम १९७६ च्या कलम ५(C) (A) अन्वये लोणावळा ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत अधिकचा तपास सुरू आहे.

धाराशिव जिल्ह्यातून गोमांस, गोवंश जनावरांची अनधिकृत वाहतूक करीत असताना महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, १९७६ (सुधारित १९९५) व प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध, १९६० अन्वये सन २०२४ मध्ये ८४ गुन्हे व २०२५ मध्ये ७६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्यात गोवंशीय प्राण्यांची कत्तल, विक्री व वाहतूक प्रकरणी सन २०२२ ते जून २०२५ पर्यंत एकूण २८४९ गुन्हे दाखल झाले असून एकूण ४६७८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, एकूण १७२४ टन गोमांस जप्त करण्यात आले आहे.

गोमांस, गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतुक तसेच गोतस्करी करीत असताना आढळल्यास सदर आरोपींवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सन १९७६ (सुधारित १९९५) व प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध सन १९६०, बी.एन.एस., अन्वये कारवाया करण्यात येतात. तसेच, बेकायदेशीरपणे वाहतूक करणारी वाहने जप्त करण्यात येऊन वाहन चालकांचा परवाना रद्द करण्यासंदर्भात प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे अहवाल सादर केला जातो.

************************************

लक्षवेधी सूचना क्र. २०४१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.संजय केळकर यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०४१ खालीलप्रमाणे आहे :

" महाराष्ट्राच्या ठाणे जिल्हयातील मुंब्रा शहरामध्ये आज रोजी मोठया प्रमाणात अनधिकृत मस्जिद व मदरसा यांचे बांधकाम झालेले असणे, या अनधिकृत मस्जिद व मदरसा यांच्याबाबत दिनांक १४ जून, २०२३ रोजी मुंब्रा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती दिलेली असणे, सदर माहितीनुसार मुंब्रा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ११२ मस्जिद व ४३ मदरसे असणे, यातील सर्व मदरसे अनधिकृत असणे, मुंब्रा शहर व लगतच्या परिसरामध्ये शासकीय व वन जमिनींवर तसेच सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करुन, बेकायदेशीररित्या काही मस्जिद व मदरसा यांचे बांधकाम केलेले असणे, याबाबत स्थानिक नागरीक, सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय संघटना यांच्याकडून वारंवार शासनास व प्रशासनास तक्रारी व निवेदने प्राप्त होत असणे, काही अनधिकृत मस्जिद व मदरसे यांमध्ये अवैध तसेच राष्ट्रीय सुरक्षेला धोका पोहचेल अशी कृत्ये सुरु असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असणे, तसेच सदर अनधिकृत मस्जिद व मदरसे यांमुळे हिंदू व मुस्लीम यांच्यातील सामाजिक सलोख्यास बाधा पोहचत असणे व त्यामुळे कायदा व सुव्यवस्था याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असणे, त्याअनुषंगाने मुंब्रा शहरातील अनधिकृत मस्जिद व मदरसे यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत शासनाची भुमिका व पुढील उपाययोजना"

---

मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा शहर व परिसरामध्ये, मुंब्रा पोलीस स्टेशन यांचेकडून प्राप्त माहितीनुसार एकूण ११२ मस्जिद, ४३ मदरसे व ०५ दर्गाचा समावेश आहे. यापैकी बहुतांश मस्जिद, मदरसे व दर्गा सन २००० पूर्वीचे असल्याचे दिसून येते. मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात आलेले नगर विकास विभाग शासन परिपत्रक दि.०५ नोव्हेंबर, २०१६ नुसार दि. २९ सप्टेंबर, २००९ पूर्वीची धार्मिक स्थळे नियमित व स्थलांतरीत करावयाची असून, दि. २९ सप्टेंबर, २००९ नंतरची धार्मिक स्थळे निष्कासित करावयाची आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा शहर व परिसरातील २९ सप्टेंबर, २००९ नंतरच्या धार्मिक स्थळांवर नियमानुसार निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. तसेच, यापैकी काही मस्जिद व मदरसे हे शासकीय व वन विभागाच्या जागेवर देखील असल्याचे निदर्शनास आले आहे. महसूल व वनविभाग, शासन परिपत्रक दि. ०७ सप्टेंबर, २०१० व शासन परिपत्रक दि. १० ऑक्टोबर, २०१३ नुसार शासकीय जमिनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे ही बाब जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे, त्या विभागाची जबाबदारी आहे. त्यानुसार जे मदरसे व दर्गा महसूल विभाग व वन विभागाच्या जागेवर आहे त्या विभागासमवेत तसेच पोलीस यंत्रणेसमवेत ठाणे महानगरपालिका स्तरावर लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येऊन आवश्यक ती कार्यवाही नियमानुसार करण्यात येणार आहे. तसेच, उक्त मस्जिद व मदरसा यापैकी खाजगी जमिनीवर असलेल्या ०१ मस्जिद व ०१ मदरसा याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. मस्जिदचे बांधकाम पक्क्या बैठ्या स्वरूपाचे असून मदरसाचे बांधकाम पोटमाळ्यासह पत्रा शेड स्वरूपाचे आहे. सदर मस्जिद च्या अनधिकृत बांधकामाबाबत श्री.परवेझ अकबर शेख यांनी दि.१२ डिसेंबर, २०२३ रोजी तक्रार केली आहे. तसेच, मदरसाच्या अनधिकृत बांधकामाबाबत श्री. मोहम्मद

शफी शेख अब्दुल रेहमान यांनी दि. २७ मार्च, २०१८ रोजी तक्रार केली आहे. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने पाहणी केली असून, सदर अनधिकृत बांधकामांस सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम २६० (१) (२) अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे व या प्रकरणी आदेश पारित करण्यात आला आहे. श्री. मोहम्मद शफी शेख अब्दुल रेहमान यांनी मदरसाचे अनधिकृत बांधकामाबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई येथे रिट याचिका क्र. ७८५६/२०१७ दाखल केली आहे. तसेच, श्री. परवेझ अकबर शेख यांनी मस्जिदच्या अनधिकृत बांधकामाबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ, मुंबई येथे रिट याचिका क्र. १६६४०/२०२४ अन्वये ठाणे महानगरपालिके विरूध्द दावा दाखल केला आहे. सद्यस्थितीत सदरची दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

*********************

लक्षवेधी सुचना क्रमांक : २३१६ गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. संजय केळकर, वि. स.स यांची लक्षवेधी सूचना क्र. २३१६ पुढीलप्रमाणे आहे :-

"ठाणे शहरात पुनविकासाच्या नावाखाली हजारो नागरिकांची आर्थिक आणि मानसिक छळवणूक होत असल्याने अनेक नागरिकांनी विकासाच्या विरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार करणे, तथापी ठाण्यातील वर्तक नगर मधील इमारत क्र ४८,४९ व ५० येथील इमारतीमधील रहिवासी १४ वर्षापासून अत्यंत हायकीच्या अवस्थेत दिवस काढत असून आदित्य इंटेरप्रायझेसचे भालेराव या विकासकडून त्यांची आर्थिक फसवणूक होऊन त्यांना प्रचंड मानसिक जाचाला सामोरे जावे लागणे, नौपाडा येथील जोशी एंटरप्रयानेस यांचे कडून देखील शेकडो राहिवाश्यांचे आर्थिक शोषण फसवणूक झाल्याचे माहे २०/०५/२०२५ रोजी तसेच माहे जून २०२५ रोजी उपड होणे, वेळोवेळी पोलिसात तक्रार करून देखील त्यांच्यावर कारवाई न होणे ढोकळी येथील तिरूपति ग्रुपचे मेरो गोल्ड इमारतीमधील राहिवाश्यांची फसवणूक केल्याचे उघड होणे १४ वर्षे प्रकल्प रेंगाळत ठेवून ५० टक्के रक्कम भरून देखील तेथील रहिवाश्यांना अद्याप हो सदनिका दिल्या गेल्यानाही, तसेच त्रिनिटी टॉवर यांनी देखील स्वनिका धारकानी पैसे भरून सुद्धा त्यांना सदनिका दिल्या गेल्या नसून यामध्ये सदनिका धारकांचे मोठे प्रमाणात आर्थिक नुकसान होऊन संबधित विकासकावर अद्याप कोणतीच दंडात्मक कारवाई झालेली नसणे, त्यामुळे राहिवाशामध्ये तीव्र संताप निर्माण होणे, या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित विकासकावर दंडात्मक कारवाई करण्याचे तीव्र मागणी होणे. याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना.

---

## मा.मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

ठाणे शहरात पुर्नविकासाच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक फसवणूक झाल्याप्रकरणी विविध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ठाणे जिल्ह्यातील वर्तकनगर येथे विकासकाकडून झालेल्या फसवणूक प्रकरणी तक्रारदार यांचे फिर्यादीवरून वर्तकनगर पोलीस स्टेशन येथे गु. र.नं. ४९५/२०२५ भा.द.वि कलम ४२०, ४०६, ३४ सह मोफा कायदा कलम ३, १३ प्रमाणे दिनांक २४/०६/२०२५ स्टेशन डायरी क्र. ०२४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे. तसेच वर्तक नगर मधील इमारत क्र.४८, ४९ मधील रहिवाशी यांचे नुकतेच तक्रारी अर्ज आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे प्राप्त झाले आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने भेट देवून आढावा घेण्यात आला आहे. सदर रहिवाशी यांची माहिती संकलित करून अधिक चौकशी करून कारवाई करण्यात येत आहे.

नौपाडा येथील जोशी एंटरप्रायजेस यांचे कडुन झालेल्या फसवणूक प्रकरणी नौपाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र ३९२/२०२५, भा.न्या.सं. कलम ३१८ (४), ३१६ (२), ३(५) प्रमाणे दि.०३.०५.२०२५ रोजी व गुन्हा रजि. नंबर ५००/२०२५, भादंविक ४२०, ४०९, ३४ सह एमपीआयडी ३ प्रमाणे दि.०५.०४.२०२५ रोजी गुन्हा दाखल असुन गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

ढोकळी येथील तिरूपति ग्रुपचे मेरी गोल्ड इमारतीमधील रहिवाश्यांची फसवणूक झाल्याप्रकरणी पोलीस विभागाकडे कोणताही अर्ज अथवा गुन्हा दाखल झालेला नाही.

त्रिनिटी टॉवर येथील फसवणूक प्रकरणी त्रिनिटी टॉवरचे विकासक यांच्याविरुध्द कासारवडवली पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३३३/२०२१ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४, ५०६ सह मोफा कायदा ३, ८, १३

अन्वये दिनांक ०६.१०.२०२१ रोजी तसेच गु.र.नं. १२३/२०२२ भादंवि कलम ४२०, ४०६ अन्वये दिनांक ०४.०४.२०२२ रोजी तसेच गु.र.नं. ३५७/२०२३ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४ सह मोफा कायदा ५, १३, १४ अन्वये दिनांक २५/१०/२०२३ रोजी असे एकूण ३ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदर गुन्ह्यांतील आरोपीस अटक करण्यात आली असून सदर तीनही गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत, तसेच ठाणे शहर पोलीस आयुक्तालय येथे प्राप्त तक्रारीनुसार वेळोवेळी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

ठाणे शहरात पुर्नविकासासाठी तत्कालीन विकासनियंत्रण नियमावलीतील (डिसेंबर २०२० पुर्वी लागू असलेल्या) विनियम क्र. १६५ अन्वये इमारतीचे पुनर्बांधणी / पुर्नविकासाकरीता Appendix R. नुसार तरतूद करण्यात आली होती. तसेच सद्य:स्थितीत लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR) विनियम क्र.७.४ व ७.६ अन्वये अनुक्रमे म्हाडा इमारतींचे तसेच धोकादायक आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुर्नविकास करण्याची तरतूद आहे.

तत्कालीन विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार किमान ७०% भोगवटाधारकांचे आणि UDCPR मधील तरतुददीनुसार किमान ५१% भोगवटाधारकांचे पुनर्बांधणीचे प्रस्तावास सहमती असणे आवश्यक आहे. सदरहू दोन्ही नियमावलीतील तरतुदीनुसार भोगवटादार सभासद तसेच भाडेकरुयुक्त इमारतीमधील भाडेकरूंच्या सहमतीने विकासकाची नियुक्ती करण्यात येते. तदनंतर संबंधितांमार्फत नोंदणीकृत विकसन करारनामा करून आणि अथवा कुलमुखत्यारपत्र देऊन विकासकांची नेमणुक करण्यात येते.

विकसन करारनामा केल्यानंतर संबंधित कुलमुखत्यारपत्रधारी / विकासक यांचेवतीने वास्तुविशारद इमारत बांधकाम प्रस्ताव मंजूरीस्तव महानगरपालिकेकडे दाखल केल्यानंतर सदर प्रस्तावास लागू नियमावलीतील तरतुदी तपासून नकाशे मंजूरी देऊन बांधकाम परवानगी अदा करण्यात येतात.

स्थावर संपदा नियामक क्षेत्रात अधिक पारदर्शकता, उत्तरदायित्व, वित्तीय शिस्त, तक्रारीचे वेगाने निराकरण व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक ८ मार्च २०१७ रोजीच्या अधिसूचना क्रमांक २३ अन्वये महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाची (महारेरा) स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पामधील सदनिकांची विक्री व हस्तांतरण महाराष्ट्र स्थावर संपदा (नियमन आणि विकास) अधिनियम, २०१६ च्या तरतुदीनुसार नियंत्रीत होतात.

*************

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. अभिजीत पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७२८ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात शेतीपंपासाठी विद्युत मोटार घेण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागाने नवीन लाईट कनेक्शन देणे बंद केले असणे, त्या ऐवजी सोलर पंप घेण्याचा आग्रह केला जात असणे, परंतु नदी व कॅनॉल कडेला जमीन सोलार लावण्यास उपलब्ध व अनुकूल नसल्याने तसेच नदीवरून ५००० ते ७००० फूट पाईपलाईन टाकूनही पाणी सोलार पंपाने पोहोचत नसणे, त्यामुळे निदान नदी, कॅनॉल लगतच्या शेतकऱ्यांना तरी शासनाने लाईट कनेक्शन देण्याची मागणी जोर धरत असणे, सोलार अर्ज करून सोलार कंपनी वेळेत जोडणी करत नसणे, प्रत्येक गावात ६३ Hp च्या DP वर १०० Hp चा लोड असणे, १०० Hp डीपी वर १२५ ते १४० Hp लोड ही वस्तुस्थिती असणे, त्यामुळे Dp जळण्याचे प्रमाण खूप जास्त असणे, जळालेली डीपी संबंधित विभाग वेळेत दुरुस्त करून वा बदलून देत नसणे, त्यामुळे शेतातील उभे पीक पाण्याविना जळून जाऊन शेतकऱ्यांना प्रचंड आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत असणे, एकीकडे शेतीपंपाची संबंधित विद्युत विभागाची अशी आजारी अवस्था असल्याने ती सुदृढ करण्याऐवजी सोलर पंपाची परिणामकारकता सिद्ध झालेली नसताना ते बसविण्याची शासनाकडून होत असलेली सक्ती या दुहेरी कैचीत शेतकरी वर्ग भरडला जात असल्याने त्याच्यामध्ये शासनाप्रती बळावलेला असंतोष दूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिवसा सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने "मागेल त्याला सौर कृषी पंप ही पर्यावरण पुरक योजना सुरु केली आहे व शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्यास प्रोत्साहीत करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत राज्यात "मागेल त्याला सौर कृषी पंप" व "पी.एम कुसुम घटक ब" योजना राबविण्यात येत असून एकूण १०,७५,००० सौर कृषीपंप आस्थापित करण्यात येणार आहेत.

पी.एम. कुसुम घटक ब योजनेअंतर्गत जलदगतीने सौर कृषी पंप आस्थापित करण्याकरीता महाराष्ट्र राज्यात महाऊर्जा (MEDA) व महावितरणद्वारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यात पी.एम. कुसुम घटक ब योजनेअंतर्गत ५,७५,००० पैकी ४,६५,१६८ सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आलेले आहेत. सौर कृषी पंप आस्थापित करण्यात महाराष्ट्र राज्य देशात अव्वल आहे. या योजनेची जलद गतीने अंमलबजावणी संपूर्ण राज्यात सुरू आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेअंतर्गत ४,८४,०६० लाभार्थींनी पैसा भरणा केला असून त्यापैकी ३,१९,३०५ अर्जदारांनी व्हेंडर निवडलेले आहेत व १,५९,४३२ सौर पंप आस्थापित करण्यात आले आहेत.

शेतकऱ्याकडे उपलब्ध असलेल्या जमीनाच्या क्षेत्रानुसार त्याला अनुदानावर मिळणाऱ्या पंपाची क्षमता ठरते. यामध्ये २.५ एकर पर्यंत भूधारणा असेल तर ३ एच पी क्षमतेचा, २.५१ ते ५ एकर भूधारणा असेल तर ५ एच पी क्षमतेचा व ५ एकर पेक्षा जास्त भूधारणा असेल तर ७.५ एचपी क्षमतेचा सौर कृषीपंप अनुदान तत्वावर शेतकऱ्याला मिळतो. त्याचबरोबर मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेअंतर्गत ७.५ एचपी पारेषण विरहित सौर पंपाकरिता पात्र असलेले लाभार्थी हे १० एचपी चा सौर पंपासाठी मागणी करु शकतात. परंतु शासकीय अनुदान हे ७.५ एचपी सौर पंप पर्यंत मर्यादित असल्याने त्यासाठी येणारा उर्वरित खर्च हा शेतकऱ्यास स्वखर्चाने करावयाचा आहे.

तसेच, २.५ एकरापर्यंत ३ एचपी पंप मिळत असल्याने अशा शेतकऱ्याला जर पाण्याची पातळी जास्त खोल असेल तर मुधारणेनुसार मिळणाऱ्या ३ एचपी पंपासोबत अतिरिक्त रक्कम भरून दुसरा ३ एचपी चा सोलर पंप "बुस्टर पंप" म्हणून घेता येईल व अधिक खोलीवरील पाणी सोईनुसार उपसता येईल. सद्यपरिस्थितीत, एक पंप अनुदानाद्वारे व दुसऱ्या बूस्टर पंपाची किमत शेतकऱ्याने संबंधित पुरवठादार कंत्राटदारास अदा करावी लागेल, असा निर्णय घेण्यात आला आहे.

ट्युबवेल अथवा नदीवरून पाणी उपसा करण्यासंदर्भात राज्यात काही ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर कार्यवाही केलेली आहे. सदर ठिकाणी सौर मोटर पंप सेटची यशस्वी चाचणी घेण्यात आलेली असून, येथे योग्य त्या दाबाने पाण्याचा विसर्ग होत आहे. तसेच, काही ठिकाणी पुर परिस्थितीचा अभ्यास करुन असणाऱ्या अडचणींवर मात करण्याच्या दृष्टीने महावितरणने प्रायोगिक तत्वावर नदीमध्ये ३ एचपी क्षमतेचा सबमर्सिबल मोटरपंप व केबलद्वारे जोडून नदीपात्रात सहाशे फूट अंतरावर पूर रेषेच्या आत जमिनीपासून २० फूट उंचीवर मोनोपोल वर सोलर पॅनल बसवले आहे. सदर सौर मोटर पंप सेटची यशस्वी चाचणी घेण्यात आली असून, येथे योग्य त्या दाबाने पाण्याचा विसर्ग होत आहे.

विद्युत पुरवठा सुरळीत व्हावा आणि रोहित्रे जळण्याचे प्रमाण कमी व्हावे या हेतुने नादुरुस्त विद्युत रोहित्र तात्काळ बदलण्यासाठी शासन निर्णय दि.०५.०३.२०२४ अन्वये निरंतर वीज योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत १५ वर्षपेक्षा जास्त जुने व तांत्रिकदृष्ट्या अकार्यक्षम असलेले विद्युत रोहित्रे बदलण्यास मंजूरी देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत २०,३२२ रोहित्रे बदलण्यात आले आहेत. तसेच, २०२५-२६ मध्ये एकुण ३८,२५९ थ्री फेज वितरण रोहित्रे नादुरूस्त झाली असुन त्यापैकी ३८,१८९ रोहित्रे बदलण्यात आली आहेत. उर्वरित ७० वितरण रोहित्रे बदलविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नादुरूस्त रोहित्रे तातडीने दुरूस्त करण्यासाठी विभाग निहाय एकूण १,८०५ रोहित्र दुरूस्त करणाऱ्या एजन्सी नियुक्ती करण्यात आल्या आहेत. वितरण रोहित्रे बदलण्यासाठी महावितरणच्या विभागीय भांडारात दुरुस्त केलेल्या १०,१५३ थ्री फेज वितरण रोहित्रांचा साठा उपलब्ध आहे. तसेच नादुरुस्त वितरण रोहित्रे वेळेत बदलण्यासाठी एकुण २७,४५३ थ्री फेज वितरण रोहित्रे चक्राकार पध्दतीने उपलब्ध आहेत. ऑईलचा मुबलक साठा उपलब्ध असून रोहित्रे दुरुस्ती किंवा कार्यान्वित असलेल्या रोहित्रासाठी ऑईलची कमतरता भासणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

महावितरण कंपनीमार्फत ग्राहकांना नवीन वीज पुरवठा देताना किंवा भारवाढीच्या प्रकरणात वितरण ट्रान्सफॉर्मर वरील (DTC) एकुण भार, तसेच LT लाईन विस्ताराची तांत्रिक अंमलबजावणी यांचा समन्वय साधून धोरण राबविण्यात येते. तसेच सन २०२५-२६ मध्ये इतर विविध योजनेंतर्गत वितरण रोहित्रे कार्यान्वित करून क्षमता वाढ करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे अतिभारात रोहित्रावरील भार कमी होण्यास मदत होणार आहे.

******************

लक्षवेधी सूचना क्र. १८४६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. रवी राणा विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १८४६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"अमरावती परिमंडल वीज वितरण मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, व इतर अधिकारी अमरावती यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दि.२६/०६/२५ रोजी च्या दरम्यान स्थानिक विधानसभा सदस्य लोकप्रतिनिधी यांनी आढावा बैठक घेऊन जिल्ह्यातील शेतकरी संबंधी अनेक विषय मार्गी लागण्यासाठी शासन स्तरावरून निधी उपलब्ध करून पाहिजे या दृष्टिकोनातून बैठकीत चर्चा झाली, असणे. तसेच मा. महसूल मंत्री यांनीही दि.२७/०६/२५ रोजी वितरण, पारेषण विज अधिकाऱ्यांची बैठक घेतली त्या मध्ये निधीची मागणी केली असणे, यापूर्वीच मुख्यमंत्री सचिवालय कक्ष विभागीय आयुक्त अमरावती येथील विशेष कार्यकारी अधिकारी यांनी मुंबई मुख्यमंत्री सचिवालय यांना त्यांचे पत्र क्र.४०/२५दि.२८/०२/२५ रोजी पत्र पाठवून पत्रामध्ये मेळघाट क्षेत्रातील गावांमध्ये वीज पुरवठा पुरविणे या कामासाठी अंदाजित ५६ कोटी रुपये मंजूर करणे, अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंप व नागरिकांच्या सोयीकरिता सुरळीत वीजपुरवठा व्हावा यासाठी ६७२ नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणे या कामासाठी ६५ कोटी रुपये मंजूर करण्यासंबंधाने शासनाकडे पत्र पाठवून निधी मंजूर करण्याची मागणी केली असणे, तातडीने शासनाने घ्यावयाचा निर्णय व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

**मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन**

अमरावती जिल्ह्यामधील अचलपुर विभागाअंतर्गत धारणी व चिखलदरा तालुक्याअंतर्गत मेळघाट भाग हा वनपरिक्षेत्राने आच्छादित आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसर हा प्रामुख्याने घनदाट जंगल, वन परिक्षेत्र व व्याघ्र प्रकल्पाची व्यापलेला अतिदुर्गम भाग आहे. येथे मेळघाट व्याघ्र राखीव वन्यजीव अभयारण्य आहे. चिखलदरा व धारणी तालुक्यातील एकुण ३२६ गावांपैकी ३०४ गावांना पांरपारिक पध्दतीने वीज पुरवठा देण्यात आलेला आहे. उर्वरीत २२ गावांमध्ये महाऊर्जा (MEDA) मार्फत सौर यंत्रणेद्वारे (Solar Panel) वीज पुरवठा करण्यात येत आहे.

मेळघाट मधील २२ गावांना यामध्ये धारणी तालुक्यातील चोपण, रंगुबेली, धोकडा, खामदा, किन्हीखेडा, कोकमार व कुंड ही ७ गावे तसेच चिखलदरा तालुक्यातील रक्षा, माखला, नवलगाव, रायपूर, सावरखेडा, मारीझरप, बोराट्याखेडा, रेट्याखेडा, चुनखडी, खडीमल, बिच्छुखेडा, भवई, मारता, सुमिता व कुटीदा या १५ गावांचा समावेश होतो. सदर २२ गावे अतिशय दुर्गम (१५ गावे Buffer व ७ गावे Core) क्षेत्रात येत असल्यामुळे पांरपारिक पध्दतीने वीज पुरवठ्याची व्यवस्था करण्याकरिता WLC (Wild Life Conservation Act १९७२) व FCA (Forest Conservastion Act १९८०) अंतर्गत वन विभागाची परवानगी आवश्यक आहे. याकरिता महावितरण कंपनीमार्फत Forest Conservation Act १९८० व Wild Life Conservation Act १९७२ अंतर्गत आवश्यक असणा-या वन परवानगीकरिता ऑनलाईन व ऑफलाईन प्रस्ताव दि.१४.११.२०२४ रोजी मा.उप वनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा यांचेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी दि.१८.०८.२०२५ रोजी पुढील कार्यवाहीसाठी अपर मुख्य सचिव (वने), महसुल व वन विभाग यांचेकडे सादर केलेला आहे. धारणी तालुक्यातील ०९ गावे आणि

चिखलदरा तालुक्यातील १३ गावे असे एकुण २२ गावांचे अपारंपारिक पद्धतीने विद्युतीकरण करण्यात आलेले आहे.

अमरावती जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सदर २२ गावांना पारंपारिक पद्धतीने वीजपुरवठा करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. सदर बाब लक्षात घेता, अमरावती जिल्हयातील चिखलदरा आणि मेळघाट तालुका क्षेत्रातील २२ गावांचे पारंपारिक पद्धतीने विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी टीएसपी आदिवासी उपयोजनेअंतर्गत महावितरणला ५८.७९ कोटी रुपयांचा निधी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

अमरावती जिल्हयामध्ये सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये जिल्हा नियोजन समितीद्वारे १८५६ नविन ट्रान्सफॉर्मर (डी.पी.) मंजूर झालेले असून त्याकरीता १४३.९७ कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे. सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये मंजूर झालेल्या नविन ट्रान्सफॉर्मर (डी.पी.) ची कामे पूर्ण झालेली आहेत. सन २०२४-२५ मध्ये ३९९ रोहित्रांची एकुण रुपये २९.४२ एवढी कामे पुर्ण झालेली आहेत. सन २०२४-२५ मधील उर्वरीत व २०२५-२६ मध्ये प्रस्तावित नविन एकुण २८९ रोहित्र रक्कम रु. ३२.८४ कोटी थी कामे प्रस्तावीत असुन, सदर कामे प्रगतीपथावर असून, त्यामुळे कृषी वीज पुरवठा यंत्रणेचे सक्षमीकरण होणार आहे.

*************************

<u>सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन</u>

**श्री.रवी राणा, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९८१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"०मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील समतानगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पात, विकासक एसडी कॉपोरेशनकडून म्हाडा अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करुन सुमारे २ लाख ३७ हजार चौ.मी. क्षेत्र असलेल्या प्रकल्पात १८ वर्षात केवळ २५००० चौ.मी. क्षेत्रावर ६ इमारती उभारण्यात आल्या असून, केवळ १००० कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आल्याबाबतची तक्रार पर्यावरण प्रेमी ॲड राजेश दाभोळकर यांनी दिनांक २३-६-२०२५ मध्ये शासनाकडे केलेली असणे, विकासकाने संपूर्ण चुकीच्या पद्धतीने शुभ लाभ प्रॉपर्टीस प्रा ली. या विकासकाकडून प्रकल्प ताब्यात घेऊन पूर्वी बांधलेल्या इमारती पाडून म्हाडाचे कोटयवधी रुपयांचे आर्थिक नुकसान केलेले असणे म्हाडा महापालिका व पोलिस यंत्रणांशी संगनमत करून २००७ पासून बनावट करार, बनावट NOC व नोंदणी न केलेल्या POA चा वापर करून पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यात येणे, एकूण १९०० रहिवाशांपैकी सुमारे ८०० रहिवाशांचे पुनर्वसन करून अवैध परवानग्या घेऊन टोलेजंग खाजगी इमारती उभ्या करुन फ्लॅट्सची विक्री करण्यात आलेली असणे, विकासकाकडून पुनर्वसनाची घरे न बांधता थेट विक्रीयोग्य घरे बांधण्यात येऊन शासकीय आदेशांचे उल्लंघन करण्यात येणे एसडी कॉर्पोरेशनकडून आजपर्यंत समतानगर, कांदिवली पूर्व येथील म्हाडाच्या जमिनीवर उभारलेल्या इमारतींच्या परवानग्या, तेथील रहिवाशांचे केलेले पुनर्वसन याकरिता शासनाने स्वतंत्र विशेष तपास पथकाने चौकशी करण्याची असलेली आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

सी.टी.एस. क्र. ८३७ ते ८४० कांदिवली (पूर्व) मुंबई येथील २,२२,८२३.५० चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीवर म्हाडाची समतानगर, कांदिवली (पूर्व) वसाहत असून या वसाहतीमधील १६० इमारतींमध्ये २९६ अत्यल्प उत्पन्न गटाच्या, १४८८ अल्प उत्पन्न गटाच्या, ७०० मध्यम उत्पन्न गटाच्या, व २४० उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका आहेत.

अभिन्यासामधील संस्थांनी एकत्रित पुनर्विकासाच्या अनुषंगाने सन १९९६ पासून प्रक्रिया सुरु केली होती. अभिन्यासातील काही संस्थांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या समतानगर सहकारी गृहनिर्माण संस्था युनियनने विकासक मे. टुली क्रिएटिव्ह डेव्हलपर प्रा.लि. यांचेबरोबर दि.३१.०१.१९९८ रोजी पुनर्विकासाकरिता विकास करारनामा केला होता.

दरम्यानच्या काळात मे. टुली क्रिएटिव्ह डेव्हलपर प्रा. लि. यांनी सदर पुनर्विकासाकरीता मे. लाभ शुभ प्रोपर्टीज प्रा.लि. यांची सह विकासक म्हणून परस्पर नियुक्ती केली होती. परंतु समतानगर सह. गृह. संस्था युनियनला पुनर्विकासासाठी मंजूर केलेल्या बांधकामापेक्षा अधिकचे अनधिकृत बांधकाम केल्यामुळे समतानगर सह. गृह. संस्था युनियनने दि.०७.०१.२००७ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मे. टुली क्रिएटिव्ह डेव्हलपर प्रा. लि. यांची नियुक्ती रद्द केली. तसेच, सदर बैठकीमध्ये नवीन विकासक म्हणून मे. एस.डी. कार्पोरेशन प्रा. लि. यांची नियुक्ती केली व त्यांचेसोबत दि.१९.०२.२००७ रोजी विकास करारनामा करण्यात आला असून दि.२३.०८.२०१० रोजी नोंदणीकृत करण्यात आला.

विकासक म्हणून नियुक्ती रद्द बातल झाल्यानंतर युनियनचे पूर्वीचे विकासक मे. टुली क्रिएटिव्ह डेव्हलपर प्रा. लि. व त्यांनी नियुक्त केलेले सह विकासक मे. लाभ शुभ प्रोपर्टीज प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालयात व मा. सर्वोच्च न्यायालयात विविध याचिका दाखल केल्या होत्या. तथापि, सदर याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांचेमार्फत पारित झालेल्या आदेशांमध्ये याचिकाकर्त्यांना कोणताही दिलासा देण्यात आलेला नाही.

पूर्वीचे विकासक मे. टुली क्रिएटिव्ह डेव्हलपर प्रा.लि. यांनी केलेल्या बांधकामाचे मे. एस.डी. कार्पोरेशन प्रा. लि. यांनी स्वखर्चाने पाडकाम केले असून अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळाकरिता अधिमुल्यापोटी म्हाडाकडे रु.२९३.०० कोटी इतक्या रकमेचा भरणा केला आहे. त्यानुसार समतानगर वसाहतीतील पुनर्विकासाकरिता मंडळाने खालीलप्रमाणे ना हरकत प्रमाणपत्रे जारी केली आहेत.

| अ.क्र. | ना हरकत प्रमाणपत्र दिनांक | बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी. मध्ये |
|---|---|---|
| १. | २९.०२.२००८ | ८४,७१४.३८ |
| २. | २०.०६.२०१४ | ६१,८३८.५४ |
| ३. | ०१.०७.२०१४ | १,५३,८५८.९६ |
| | **एकुण** | **३,००,४११.८८** |

समता नगर गृहनिर्माण संस्था युनियन लि. यांनी विकासक मे. एस.डी. कार्पोरेशन प्रा. लि. यांना समतानगर वसाहतीच्या पुनर्विकासाकरीता कुलमुखत्यारपत्र दिले असून ते दि.१३.०५.२०१९ रोजी नोंदणीकृत करण्यात आले आहे. तसेच, विकासकाने दि.०८.०७.२०२० रोजी पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले असून त्याअनुषंगाने नियोजन प्राधिकरण, म्हाडा यांनी सदर प्रकल्पास बांधकाम परवानगी दिली आहे.

पुनर्वसन इमारत क्रमांक १ चे बांधकाम पूर्ण झाले असून सदर इमारतीमधील अत्यल्प उत्पन्न गटाच्या २९६, अल्प उत्पन्न गटाच्या १४८८, मध्यम उत्पन्न गटाच्या ४० अश्या एकुण १८२४ पुनर्वसन सदनिका व इमारत क्रमांक २, ३, व ५ मधील १२६८ विक्री सदनिकांकरीता भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

उर्वरीत ६६० मध्यम उत्पन्न गटाच्या व २४० उच्च उत्पन्न गटाच्या सदनिकांच्या पुनर्विकासाचे काम अद्याप सुरु झालेले नाही. सदर सदनिकांच्या पुनर्वसन इमारतीचे बांधकाम नकाशे इमारत परवानगी कक्ष, म्हाडा यांचेकडे सादर केले असून पुनर्विकासाचे काम प्रगतिपथावर आहे..

*_*_*_*_*_*

लक्षवेधी सूचना क्रमांक २०५३

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम क्र. १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईतील मालाड पश्चिम पी-उत्तर विभागातील सीएस क्र. ६५३ (१ ते १७) या भुखंडावर एसआरए योजनेतील "सेलेस्टीयल हाईट" या विक्री इमारतीतील तसेच चेंबूर पूर्व सीएस क्र. ३४३ येथील लाल डोंगर वैभव एसआरए योजनेतील "ओडीना" या दोन्ही इमारतीचे विकासक असलेले श्रीनाथजी यांनी रेरा नियमांचे उल्लंघन करुन व जाहिरात देऊन घरे विक्री मध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैरव्यवहार केल्याचा प्रकार नुकताच निर्दशनास येणे, सदरहू दोन्ही प्रकल्पात "फ्लावरबेड" २५ ते ४० टक्के ज्यादा चटई क्षेत्र जागा देण्याच्या नावाने डीसी रुल नावाचे व विकास नियत्रंण आणि प्रोत्सहान नियमावली २०३४ चे उल्लंघन करण्यात येऊन सदनिका खरेदीदारांची अर्थिक फसवणूक करुन शासनाच्या महसूलाचे फसवणूक करण्यात येणे, "निराधार", कँटीलिव्हर प्रोजेक्शनवर बांधलेले व गैरमार्गाने मंजूरी दिलेले बांधकाम भविष्यात कोसळून जिवीत हानी होण्याचा धोका निर्माण होणे, "ओडीना" इमारतीमध्ये टेरेसवर ड्रेनेज पाईपलाईन नियमबाह्य रित्या हवेत सोडण्यात येणे, दोन्ही इमारतीमध्ये अग्नी सुरक्षा नियमाचे उल्लंघन करण्यात येणे, तसेच दोन्ही इमारतीतील मोफत मिळालेल्या सर्व पार्किंगच्या जागा तसेच व्हिजीटर पार्किंगच्या जागेची घर खरेदीदारांना नियमबाह्य रित्या विक्री करुन विकासकाने कोट्यावधीचा अर्थिक घोटाळा करण्यात येणे, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही".

## उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

महाराष्ट्र स्थावर संपदा (विकास व विनियमन) अधिनियम, २०१६ अंतर्गत महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) हे गृहखरेदीदारांच्या हितांचे संरक्षण करणे, विकासकांकडून करण्यात येणाऱ्या विक्री प्रक्रियेत पारदर्शकता राखणे तसेच विक्री करार, महारेरा चटई क्षेत्रफळ (Carpet Area) व वाटप पत्र याबाबत अधिनियमातील तरतुदींचे पालन होत आहे की नाही यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते. या अनुषंगाने महारेराने विक्री कराराचा नमुना, महारेरा कार्पेट क्षेत्रफळाची व्याख्या व वाटप पत्रासंदर्भात वेळोवेळी आदेश व परिपत्रके निर्गमित केलेली आहेत.

रेरा अधिनियमातील कलम ३१ नुसार प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींवर महाराष्ट्र स्थावर संपदा (विकास व विनियमन) अधिनियम, २०१६ नुसार कार्यवाही करण्यात येते. सदर तरतुदीनुसार सुनावणी घेऊन आदेश पारीत केले जातात. प्राधिकरणाच्या आदेशांचे पालन न झाल्यास अधिनियमात पुढील कार्यपद्धतीची तरतूद आहे. अशा प्रकरणांमध्ये प्रथम अनुपालन न केल्याबाबत अर्ज (Non-Compliance Application) दाखल करण्यात येतो, त्यानंतर न्यायनिर्णायक अधिकारी (Adjudicating Officer) यांच्याकडून सुनावणी घेण्यात येते व सुनावणीनंतर व्याज, दंड अथवा नुकसान भरपाईबाबत आदेश पारीत करण्यात येतात. पारीत आदेशांचेही पालन न झाल्यास, अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे वसुलीसाठी आरआरसी (Recovery Certificate/Warrant) निर्गमित करण्यात येतो.

मुंबईतील मालाड पश्चिम पी-उत्तर विभागातील सीटीएस क्र. ६५३, ६५३/१ ते १७ या क्रमांकांना देण्यात आलेल्या दोन प्रारंभ प्रमाणपत्र क्र. एसएचए/डीडीटीपी/१८८/पीन/पीएल/ एपी/दिनांक २२.०२.२०१२ व क्र. पीएन/पीव्हीटी/१०१३८/२०११०६१०/एपी/एसर दिनांक ०१.०६.२०२२ नुसार महारेरा प्राधिकरणाकडे क्रमांक (१) पी५१८०००००५८१२ आणि (२) पी५१८०००७९७९१ असे दोन स्वतंत्र प्रकल्प नोंदणीकृत करण्यात आलेले आहेत.

विकासक अय्यप्पा डेव्हलेपर्स प्रा. लि. यांचा "सेलेस्टीयल हाईट" (सीटीएस क्र. ६५३) हा प्रकल्प पी५१८०००००५८१२ या क्रमांकाने (प्रारंभ प्रमाणपत्र क्र. एसएचए/डीडीटीपी/१८८/पीन/पीएल/एपी) दिनांक १७.०८.२०१७ रोजी नोंदणीकृत केलेला आहे. या प्रकल्पाची पूर्ण करण्याची मुदत दिनांक ३१.०१.२०२१ होती व त्यास दिनांक २६.१२.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सद्यस्थितीत सदर प्रकल्प व्यपगत (Lapse project) आहे. या प्रकल्पात घर खरेदीदारांनी एकूण १३ तक्रारी महारेरा प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या असून त्यापैकी सर्व तक्रारींवर महारेरा प्राधिकरणाने आदेश दिले आहेत. या आदेशांपैकी ३ आदेशांची अंमलबजावणी न झाल्याने दाखल ३ तक्रारींवर (Non Compliance Application) महारेरा प्राधिकरणाने आदेश दिलेले आहेत.

महारेरा प्राधिकरणामध्ये अय्यप्पा डेव्हलेपर्स प्रा. लि. या विकासकाने "सेलेस्टीयल हाईट" फेज-२ (सीटीएस क्र. ६५३/१ ते १७) हा प्रकल्प पी५१८०००७९७९१ या क्रमांकाने (प्रारंभ प्रमाणपत्र क्र. पीएन/पीव्हीटी/१०१३८/२०११०६१०/एपी/एसर२) दिनांक २६.०३.२०२५ नोंदणीकृत झालेला आहे. या प्रकल्पाची पूर्ण करण्याची मुदत दिनांक ३१.१२.२०२९ अशी आहे. सदर गृहनिर्माण प्रकल्पास बृहन्मुंबई महानगरपालिका या नियोजन प्राधिकरणाने मंजुरी दिलेली आहे. महारेरा प्राधिकरणाकडे रेरा कायद्यातील तरतुदीमधील कलम ३१ नुसार तक्रार दाखल झालेली नाही.

तसेच, राजयोग एंटरप्राईझ या विकासकाने "ओडीना" (सीटीएस क्र. ३४३ पार्ट) प्रकल्प क्रमांक पी ५१८०००१०१७२ दिनांक २४.०८.२०१७ अन्वये नोंदणीकृत केलेला आहे. या प्रकल्पाची प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत दिनांक ३१.०३.२०१९ अशी होती व त्यास दिनांक ३०.०३.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सद्यस्थितीत सदर प्रकल्प व्यपगत (Lapse project) आहे. "ओडीना" प्रकल्पात घर खरेदीदारांनी एकूण १३ तक्रारी महारेरा प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या असून त्यापैकी सर्व तक्रारींवर महारेरा प्राधिकरणाने आदेश दिले आहेत. या आदेशांपैकी ६ आदेशांची अंमलबजावणी न झाल्याने दाखल ६ तक्रारींवर (Non Compliance Application) महारेरा प्राधिकरणाने आदेश दिलेले आहेत.

**********

 ८८

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र. २४०३

श्री. महेश सावंत, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

मुंबईतील गाव ओशिवरा,जोगेश्वरी प. येथील CTS No. DC-३ आणि १८३ (भाग) या जमिनीवर खत्री विकासकाकडून संगनजनसेवा एसआरए गृह संस्था मर्या या राबविण्यात आलेल्या एसआरए योजनेत योजनेतील मूळ लाभार्थी झोपडीधारकांना वगळून बोगस २२९ जणांना एसआरए योजनेत समाविष्ट केल्याबाबतच्या तक्रारी सय्यद हैदर इमाम, सामाजिक कार्यकर्ता यांनी सीईओ एसआरए यांचेकडे जून, २०२५ मध्ये केलेली असणे, पुनर्वसन केलेल्या बोगस रहिवाशांबाबतचा अहवाल म्हाडा मुख्य कार्य.अधिकारी यांनी ३१/१/२००८ रोजी एसआरएकडे दिलेले असणे, त्यानुषंगाने सचिव एसआरए यांनी २२९ बांधकामधारकांचे पुनश्चः सर्वेक्षण करण्याबाबत १८/७/२०१६ रोजी स्पष्ट आदेश दिलेले असणे,विकसकाने परिशिष्ट ०२ मध्ये मृत व्यक्तीच्या नावावर पात्रता मिळवून अनेक घरे बाजारभावाने विकून कोट्यवधीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे, विकासकांकडून पात्र केलेल्यापैकी १७३ झोपडीधारकांचे रेशन कार्ड रेशनिंग कार्यालयाने निर्गमित केले नसल्याचे निदर्शनास येणे, लॉटरी न घेता पुनर्वसन सदनिकांचे वाटप करून उच्चाधिकार समितीच्या आदेशाचे उल्लंघन करण्यात येणे, एसआरएच्या उपजिल्हाधिकारी कार्यालयाने दि. २३/०३/२०१५ व१३/०७/२०१५ रोजी इस्टेटविभाग, म्हाडा कडे सादर केलेल्या सर्वे अहवालात पुनर्वसन सदनिकामध्ये परिशिष्ट ०२ मध्ये नमूद लाभार्थ्याऐवजी भाडेकरू वास्तव्यास असल्याबाबत नमूद करुनही विकासकांवर कोणतीही कार्यवाही न होणे,बेकायदेशीर झोपडीधारकाना बेदखल करुन मूळ झोपडपट्टीधारकांना घरे देण्याबाबत मा.उच्च न्यायालयांनी आदेश देऊनही खत्री विकासकांकडून आदेशांचे उल्लंघन होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मौजे-ओशिवरा, ता.अंधेरी येथील न.भू.क्र. १८३/१ (पै), १/सी-३ आणि या म्हाडाच्या मिळकतीवरील संगम जनसेवा एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ५११ झोपडीधारकांचे मुळ परिशिष्ट-२ मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडून दि. ३१/०३/२००५ रोजी पारित करण्यात आले आहे. सदरहू क्षेत्रापैकी खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या क्षेत्रावरील ९५ झोपडीधारकांचे व निवासी आरक्षित जमिनीवरील ४१६ झोपडीधारकांचे परिशिष्ट-२ वेगळे करून दि.१४/०७/२००५ रोजी झोपु प्राधिकरणास पाठविण्यात आले आहे. झोपु प्राधिकरणाने सदर संस्थेच्या परिशिष्ट-२ चे पुर्नसर्व्हेक्षण व पडताळणी करण्याबाबत म्हाडा प्राधिकरणास कळविले होते. त्यास अनुसरुन, म्हाडा प्राधिकरणाने दि.३१.०१.२००८ रोजी सादर केलेल्या पडताळणी अहवालानुसार, सदर योजनेत २३६ पात्र व १८० अपात्र झोपडीधारक होते. तद्नंतर अपात्र झोपडीधारकांची पात्रता

निश्चित करण्यात आल्यानंतर एकूण २४४ पात्र व १७२ अपात्र झोपडीधारक आहेत. सदर योजनेच्या पुनर्वसन इमारतीमध्ये अन्नाधिकृत वास्तव्य असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने, पुनर्वसन इमारतीमध्ये एकूण ११ अनधिकृत वास्तव्य असलेल्या सदनिकाधारकांबाबत कलम ३ (ई) अन्वये कार्यवाही करणेबाबत झोपु प्रधिकरणाने दि.१२.०७ २०१५ रोजीच्या पत्रान्वये म्हाडा प्राधिकरणाला कळविले.

झोपु प्राधिकरणातील उच्च स्तरीय समिती-ACB मध्ये तक्रारदार श्री. टेकचंद गोपालदास खानचंदानी यांनी केलेल्या तक्रारीमध्ये उच्च स्तरीय समितीने दिनांक २८.४.२०१५ रोजी आदेश पारीत केले असुन त्यामध्ये लॉटरी काढता वितरित करण्यात आलेल्या सदनिकांमधून घुसखोरांना निष्कासित करण्याबाबत तसेच, नव्याने सोडत काढून सदनिकांचे वाटप करण्याबाबत आदेशित केले होते. सदर आदेशाविरोधात संगमजनसेवा एसआरए संस्थेने शिखर तक्रार निवारण समितीकडे अपिल केले. सदर अपिलामध्ये उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील सदनिकांचे वितरण सोडतीद्वारे झाले असल्याचे व त्या सदनिका योजनेतील झोपडीधारकांनाच वितरित केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तुर्तास सदर झोपडीधारकांचे निष्कासन करु नये, असे आदेश शिखर तक्रार निवारण समितीने दि.२७.०७.२०१८ रोजी पारित केले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी नव्याने सोडत काढण्याची आवश्यकता नाही.

प्रस्तुत प्रकरणी सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी त्यांच्या दि.१८.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये, अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांना महाराष्ट्र झोपडपट्टी (सु. नि. व पु.) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अन्वये पात्रतेविषयक प्रकरणी सुनावणी घेऊन निर्णय घेण्याबाबत कळविले होते. त्यास अनुसरुन अपर जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांची सुनावणी घेऊन गुणवत्तेवर निर्णय घ्यावा, असे सक्षम प्राधिकारी, म्हाडा यांना दि.१९.०६.२०१७ रोजी आदेशित केले होते. सदर आदेशाविरुध्द संगम जनसेवा सहकारी गृहनिर्माण संस्थेने मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिका क्र.११५१/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१४.०९.२०१९ रोजीच्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी (अति निष्का) पश्चिम उपनगरे यांचे दि.१९.०६.२०१७ रोजीचे आदेश खारिज केले आहेत.

******************************************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १३६**

श्री.भास्कर जाधव, श्री. राजु तोडसाम, श्री.सुधीर मुनगंटीवार, श्री. मिहीर कोटेचा, श्री. मोहन मते, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३६ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईतील नागरी समस्यांची सद्यस्थिती २०२५ हा अहवाल प्रसिद्ध झाला असून अहवालानुसार पालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयाची स्थिती दयनीय असणे, वर्ष २०२३च्या आकडेवारीनुसार मुंबईतील एकूण शौचालयांपैकी ६८०० शौचालयांमध्ये पाणी व वीज जोडणी नसून दर चार सार्वजनिक शौचालयांपैकी केवळ एक शौचालय स्त्रियांसाठी असणे. स्वच्छ भारत अभियान मापदांडानुसार एका पुरुष शौचालयाचा वापर ३५ पुरुषांनी व स्त्री शौचालयाचा वापर २५ स्त्रियांनी करणे अपेक्षित असून प्रत्यक्षात पुरुष शौचालय ८६ जण तर स्त्री शौचालय ८१ स्त्रिया वापरीत असणे, सन २०१५ च्या तुलनेत तक्रारींत ७० % इतकी वाढ झाली असून मागील १० वर्षांच्या आढाव्यानुसार घनकचराच्या तक्रारी ३८० टक्क्यांनी तर प्रदूषणासंदर्भातील तक्रारी ३३४ टक्क्यांनी वाढल्या असणे, मुंबईच्या तटिय पाण्याची प्रदूषण पातळी वाढलेली असून आठ सांडपाणी प्रक्रिया केंद्रापैकी सहा केंद्रांची जैविक ऑक्सीजन मागणी (बीओडी) म्हणजेच विषारी सेंद्रिय पदार्थांची तीव्रता पातळी प्रदूषण मंडळाच्या निकषाची पूर्तता करीत नसून मिठी नदीतील विष्ठा कोलिफॉर्म म्हणजे पानी दूषित करण्यासाठी पाण्यातील जिवाणू ची पातळी १०० मिली पाण्यामध्ये ५,४०,००० MPN या प्रमाणात वाढली असणे, मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरी समस्या संबंधी वाढलेल्या तक्रारींच्या प्रमाणावर शासनाने लक्ष घालण्याची आवश्यकता यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडील प्राप्त अहवालानुसार कार्यान्वित असलेल्या १४७६ सामुदायिक शौचालयांपैकी १२२१ (८२%) शौचालायांना पाणी जोडणी असून १२९८ (८८%) शौचालयांना विद्युत जोडणी आहे. "पैसे दया आणि वापरा" या तत्वावर वापरात असलेली ८८१ शौचालये असून सर्व शौचालयांना पाण्याची व वीजेची सोय आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात म्हाडाने बांधलेली ५४१७ शौचालये व इतर संस्थानी बांधलेली २९१० असे एकूण ८३२७ सार्वजनिक शौचालये आहेत. यापैकी ४३०९ शौचालयांच्या देखभालीसाठी वस्ती पातळीवरील संस्था बनविण्यासाठी अशासकीय संस्था नियुक्त करण्याचे काम सुरु आहे.

मुंबईमध्ये एकूण १०,६८४ इतकी सार्वजनिक शौचालये असून त्यामध्ये एकूण १,५९,०३६ इतकी शौचकुपे आहेत.त्यानुसार मुंबईत ४६ पुरुष व ३८ महिला यांच्यासाठी प्रत्येकी एक शौचकुप उपलब्ध आहेत.

सन २०२४ मध्ये एक लाख १५ हजार ३९६ इतक्या तक्रारी प्राप्त झाल्या असून प्रदूषण, शौचालये व घनकचरा संबंधित तक्रारींमध्ये सन २०१५ च्या तुलनेत अनुक्रमे ३३४%, २१८% व ३७०% इतकी वाढ झाल्याचे दर्शविण्यात आले आहे.

माहे जानेवारी, २०१७ मध्ये मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी नदीतील प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी नियुक्त सल्लागार मे.फ्रिशमन प्रभू यांनी सादर केलेल्या तांत्रिक व व्यवहार्यता अहवालानुसार लघु मुदत्तीची (पॅकेज-१) व दीर्घ मुदतीची (पॅकेज-२, ३ व ४) कामे सुचविली आहेत व त्यातील पॅकेज-१ मधील कामे महानगरपालिकेद्वारे पूर्ण झालेली असून, पॅकेज २ ,३ व ४ मधील कामे प्रगतीपथावर आहेत. सद्यस्थितीत पॅकेज-१ अंतर्गत असलेली कामे पूर्ण झालेली आहेत आणि जल शुध्दीकरण केंद्र माहे जानेवारी २०२३ पासून कार्यान्वित झाले आहे.

पॅकेज -२ अंतर्गत, मुख्यतः (भरती प्रवण क्षेत्र वगळता) १०६ पातमुखांद्वारे मिठी नदी मध्ये उत्सर्जीत होणारे सांडपाणी ७१ इंटरसेप्टर द्वारे अडवून ते मिठी नदीच्या किनाऱ्यालगत नियोजित मलनि:सारण वाहिन्यांद्वारे मुख्य मलनिःसारण वाहिन्यांमध्ये वळविणे, मिठी नदीचे १७६० मीटर लांबीचे रुंदीकरण व खोलीकरण, ३३२५ मीटर लांबीची संरक्षक भिंत व ९३७५ मीटर लांबीचा सेवा रस्ता बांधण्याची कामे अंतर्भूत असून ही कामे ६० टक्के पूर्ण झालेली आहेत आणि उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

मिठी नदी पॅकेज १ प्रकल्पांतर्गत पवई येथे ८ लक्ष लिटर प्रती दिन इतक्या क्षमतेच्या मलजल प्रक्रिया केंद्र जानेवारी २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यात आले आहे.मलजल प्रक्रीयेची विसर्ग मानके खालीलप्रमाणे आहेत.

| घटक | द्वितीयस्तरीय प्रक्रीया निकष | तृतीयस्तरीय प्रक्रीया निकष |
|---|---|---|
| BOD | <१० मि. ग्रॅ/लिटर | <१० मि. ग्रॅ/लिटर |
| TSS | <२० मि. ग्रॅ/लिटर | <०५ मि. ग्रॅ/लिटर |
| Feacal coliform | <१०० MPN/१००ml | Below Detectable level |

या ०७ मलजल प्रक्रीया केंद्रामुळे मुंबईच्या सभोवताली असणा-या समुद्राचे पाणी स्वच्छ होण्यास मदत होणार आहे. समुद्री पाण्याची गुणवत्ता अधिक चांगली झाल्यामुळे त्याचा अनुकूल परिणाम सागरी जीवनावर आणि सागरी वनस्पतीवर होऊन पर्यावरण पूरकता देखील साधली जाणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या अखत्यारीतील कारखाने व इमारती याद्वारे निर्माण होणारे सांडपाणी समुद्रात थेट न सोडता उपलब्ध असलेल्या मलनिसारण वाहिन्यांमार्फत प्रक्रीया केंद्रामध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या विसर्ग निकषांची पुर्तता करून सोडण्याबाबत कार्यवाही महानगरपालिकेमार्फत केली जाते. ज्याठिकाणी मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे उपलब्ध नाही अशा ठिकाणी निर्माण होणारे सांडपाणी सेप्टीक टॅंक व सोकपिट/सिव्हेज ट्रीटमेंट प्लांटद्वारे प्रक्रीया करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर करण्यात येते.

..............................................................

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १३८**

श्री.भास्कर जाधव, श्री.मोहन मते, श्री.राजु तोडसाम, श्री.सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३८ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई महानगर पालिकेमार्फत पावसाळा पूर्वच्या कामांचा भाग म्हणून नाले सफाई करण्यात येत असून अंधेरी पूर्व येथील मरोळ भागात नाले सफाई करण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदाराने बाल कामगाराकडून नाले सफाई करुन घेतल्याचा धक्कादायक प्रकार माहे १४ मे, २०२५ वा त्या सुमारास समोर येणे, बालकामगाराला हातमोजे, बूट, मुखपट्टी असा कोणताही गणवेश न देताच साफ-सफाई करुन घेणे, हे मानवी हक्कांचे उल्लंघन असुन त्याच बरोबर बालकामगार प्रतिबंध कायदा, हातानं मैला सफाई बंदी कायदे अस्तित्वात असून ही त्यांची अंमलबजावणी न करणे, तसेच मा.उच्च न्यायालयाने सन २००६ मधे नाल्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कंत्राटदाराने किंवा संबंधित यंत्रनेणी सुरक्षा साहित्य पुरविण्याचे बंधनकारक असताना कुठेच त्याचे पालन होत नसून अशा कायद्याचे ठेकेदारांकडुन नेहमीच उल्लंघन होणे, सदर प्रकरणी अशा कंत्राटदारांवर शासन व अधिकाऱ्यांकडून कोणतीच कारवाई न करणे, तसेच सफाई करणाऱ्या बालकामगारांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करुन त्यांना पुरेशा नुकसान भरपाई मिळण्याची मागणी नागरीकांकडून होणे, याबाबत शासनाने त्वरित केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मुंबई महानगरपालिकेमार्फत मान्सून पूर्व नालेसफाई कामाअंतर्गत अंधेरी (पूर्व) येथे मरोळ व अन्य परिसरात मोठ्या नाल्यांची सफाई करण्यात आली. यात एकूण १४.५० किलोमीटर लांबीचे मोठ्या नाल्यांचा समावेश असून त्याचे सन २०२५-२६ या वर्षाकरीता मान्सूनपुर्व ७२०० मेट्रीक टन इतका गाळ काढण्याचे उद्दिष्ट होते व सदरहू उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. सदर नालेसफाई कामामध्ये मोठ्या नाल्यांची साफसफाई ही मुख्यत्वे जेसीबी, पोकलेन अशा यंत्राद्वारे करण्यात येते. तथापी, ज्या ठिकाणी यंत्र पोहचणे शक्य होत नाही, अशा झोपडपट्ट्यामधील दाट वस्त्यांवरील व अरुंद ठिकाणी मोठ्या नाल्यांची साफसफाई अपवादात्मक परिस्थितीमध्ये मनुष्यबळाच्या सहाय्याने करण्यात येते. तथापि मनुष्यबळाचा वापर करत असताना सदर नालेसफाई कामांसाठी ठेकेदाराकडुन नियुक्त केलेल्या कामगारांना आवश्यक ती सर्व सुरक्षा साधने जसे की रबरी बूट, हातमोजे, मास्क, हेल्मेट आणि आवश्यकतेनुसार रेनकोट यांचे वितरण करणे बंधनकारक आहे. त्याच्या अनुपालनासाठी क्षेत्रीय अभियंत्यांमार्फत नियमितपणे कामाच्या ठिकाणी तपासणी केली जाते. तसेच कोणत्याही प्रकारच्या निष्काळजीपणा किंवा नियमभंग केल्यास संबंधित ठेकेदाराविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात येते. अंधेरी (पूर्व) येथील मरोळ परिसरात सफाईसंदर्भात बालकामगार नेमल्याची तक्रार या कार्यालयात प्राप्त झाली असता या कार्यालयामार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली. सदर ठिकाणी कोणताही नाल्यामध्ये प्रत्यक्ष

उतरुन नालेसफाई करत असल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, सदर ठिकाणी काही कामगारांमार्फत ठेकेदाराने पुरविलेल्या सुरक्षासाधनांचा वापर पूर्णत: होत नसल्याने निदर्शनास आले. त्यानुषंगाने ठेकेदारास निविदेतील अटी व नियमानुसार दंड आकारून बालकामगार (प्रतिबंध व नियमन) कायद्यानुसार स्पष्ट सूचना महानगरपालिका प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात आली.

******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. ५५९**

श्रीमती सना मलिक,श्री. योगेश सागर मा. वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५५९ पुढीलप्रमाणे आहे:-

"बृहन्मुंबई महानगर परिक्षेत्रात महानगरपालिकेचे जवळपास १६ दवाखाने असुन, या दवाखान्यांच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरविली जाते. अलिकडच्या काळात, महानगर शहरात मोठ्या प्रमाणात डेंग्यू, हिवताप, मलेरिया व अन्य प्रकारचे संसर्गजन्य आजार मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊन नागरिकांना होत असलेला त्रास, याकरिता महानगरपालिकेतर्गत असलेल्या दवाखान्यातून आजारी रुग्णांना देण्यात येत असलेली आरोग्य विषयक सेवा-सुविधा अपुर्ण असणे, त्यामध्ये विशेषतः रुग्णांच्या प्रमाणात खाटा व्यवस्था कमी असणे, औषधांचा होत असलेला अपुरा पुरवठा, दवाखान्यातील अस्वच्छता, महत्वाचे म्हणजे या दवाखान्यात अतिशय कमी प्रमाणात वैद्यकिय अधिकारी यांच्याशी संलग्न असलेले कर्मचारी, नर्सेस, पॅरा मेडीकल, विशेष तज्ञ, वॉड बॉय, आया इ. कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणावर असलेली कमतरता, यामुळे शहरातील रुग्णांना योग्य ती, वैद्यकीय मदत, या दवाखान्यामार्फत उपलब्ध न होणे, परिणामी शहरातील गोर-गरिब जनतेच्या आरोग्यावर होत असलेला परिणाम, तसेच एक्स रे, एमआरआय, सीटी-स्कॅन, रक्त तपासणी, प्रयोगशाळा, या गोष्टी अद्यावत नसणे, त्यामुळे रुग्णांना योग्य उपचार उपलब्ध न होणे, याकडे महानगरपालिकेचे व शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी, जनतेत पसरलेला असंतोष लक्षात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील दवाखान्यांमध्ये आवश्यक सेवा-सुविधा, मशिनरी, परिपुर्ण वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."

---

## मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्राथमिक स्तरावरील आरोग्य विषयक सेवा-सुविधा १९० दवाखाने, २१७ "आपला दवाखाना", ३३ 'पॉलीक्लीनीक", २७ "प्रसुती गृहे" ५ "विशेष रुग्णालये" कार्यरत आहेत. तसेच माध्यमिक स्तरावरील वैद्यकीय निदान, चाचणी, औषधोपचार व शस्त्रकिया या सेवा सुविधा पुरविण्यासाठी १६ उपनगरीय रुग्णालये कार्यरत आहेत. तसेच वैद्यकिय महाविदयालयांशी संलग्न असलेल्या ट्रॉमा केअर व कूपर रुग्णालय, केईएम, नायर व सायन हया प्रमुख रुग्णालयांत विशेष व अतिविशेष स्तरावरीन वैद्यकीय निदान, चाचणी, औषधोपचार व शबक्रिया या सेवा सुविधा कार्यान्वित केलेल्या आहेत.

यावर्षी मे महिन्यापासूनच पाऊस सुरु झाल्याने किटकजन्य व जलजन्य आजारांसाठी पोषक वातावरण तयार झाल्यामुळे २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये मलेरिया व गॅस्ट्रो आजारांच्या रुग्णसंख्येत अंशतः वाढ झाली आहे. पावसाळापूर्व प्रतिबंधात्मक उपाययोजनां अंतर्गत ढास प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन एडिस डासांची उत्पत्ती स्थाने नष्ट केली आहेत. बांधकाम आस्थापनांची विशेष

उपक्रमांतर्गत पाहणी करुन बांधकाम मजुरांची रक्ततपासणी केली असून हिवतापाने बाधित रुग्णांवर आवश्यक ते उपचार करण्यात आले आहेत.

पावसाळ्यातील आजारांवरील उपाययोजनांच्या सर्वकष अंमलबजावणी अंतर्गत फोकाय आधारित सर्वेक्षण (Foci based surveillance) घरोघरी व वस्ती पातळीवर करून ताप रुग्णांची तपासणी आणि बाधित रुग्णांना निदानानुसार तसेच लक्षणानुसार उपचार देण्यात येत आहेत.

जलजन्य आजाराला प्रतिबंध करण्यासाठी २५ विभागातील पिण्याच्या पाण्याचे दैनंदिन सर्वेक्षण करण्यात येत असून रुग्णांमध्ये शुष्कीकरण टाळण्याकरीता जल संजिवनीचे वाटप करण्यात येते. पाणी उकळून व गाळून पिण्याबाबत जनजागृती करण्यात येते. पाण्याच्या शुध्दीकरणासाठी क्लोरीन गोळ्याचे वाटप करण्यात येत आहे.

विविध आजारांवरील उपचारांकरिता महानगरपालिकेच्या प्रसूतीगृहे ५ विशेष रुग्णालय + प्रमुख रुग्णालये १६ उपनगरीय रुग्णालयांमध्ये मिळून ११५३५ खाटा कार्यान्वित असून ८ उपनगरीय रुग्णालयांच्या पुनर्विकासाची व ३ नवीन रुग्णालयांची कामे सुरू असून येत्या भविष्यकाळात अधिकच्या २९८३ रुग्णशय्यांची भर पडून एकूण १४५१८ रुग्णशय्या उपलब्ध होणार असून त्या पुरेश्या प्रमाणात आहेत.

महानगरपालिकेच्या ५ प्रमुख रुग्णालये, ५ विशेष व १६ उपनगरीय रुग्णालयामध्ये बाहयरुग्ण व आंतरुग्ण विभागामध्ये रुग्णांवर योग्य ते उपचार केले जातात. १६ उपनगरीय रुग्णालयातून रुग्णांना माध्यमिक स्वरुपाच्या विशेष आरोग्य सेवा सुविधा पुरविल्या जातात. उपनगरांतील ५ रुग्णालयांत एम.आर.आय. आणि ७ रुग्णालयांत सी.टी स्कॅन चाचणी सुविधा उपलब्ध आहेत. उपनगरीय ४ रुग्णालयात डायलेसीसची सेवा उपलब्ध आहे. तसेच ११ रुग्णालयात वैद्यकीय अतिदक्षता तसेच ६ उपनगरीय रुग्णालयात नवजात शिशु अतिदक्षता विभाग कार्यरत आहे. १६ उपनगरीय विभागात दररोज सरासरी १५००० ते २०००० रुग्ण तपासले जातात. त्याचप्रमाणे सर्व १६ रुग्णालयांत एकूण दररोज सरासरी ५०० ते ७०० आंतररुग्ण उपचारासाठी दाखल केले जातात.

महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यातर्फे १२ अनुसूचीवर ३००० पेक्षा जास्त विविध औषधे व सामुग्री दरसूची प्रसारीत करुन खरेदी केली जातात, ज्यांची दरसूची अंतिम झाली नाही त्या अनुसूचीवरील औषधे व अनअनुसुचीत औषधांची रुग्णालय स्तरावर खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करन देण्यात येत आहेत. रुग्णांना तात्काळ लागणारी महागडी जीवरक्षक औषधे गरिब रुग्ण धर्मादाय निधीमधून उपलब्ध करुन दिली जातात,

प्रसूतीगृहे, प्रमुख रुग्णालये, विशेप व उपनगरीय रुग्णालयांमध्ये परिचारिकांची रिक्त पदे नियमित तत्वावर भरण्यात असून रुग्णालयांतील विविध वैद्यकीय, निम वैद्यकीय, आणि चतुर्थ श्रेणीतील आवश्यक पदे नियमित तत्वावर भरेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्त्वावर दोन वर्षाकरीता भरण्याची कार्यवाही रुग्णालय स्तरावर सुरू आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १६ उपनगरीय रुग्णालयांमध्ये तसेच दवाखाने, आपला दवाखाना, पॉलीक्लीनीक, प्रसुती गृहे, ५ विशेष रुग्णालये यामध्ये कार्यरत असलेल्या नियमित सफाई

कामगारांव्दारे व वहिस्त्रोतीकरणाव्दारे घेण्यात आलेल्या कंत्राटी कामगार / बहुउद्देशीय कामगारांमार्फत स्वच्छतेचे काम नियमितपणे करून घेण्यात येते.

महानगरपालिकेच्या प्रमुख, विशेष व उपनगरीय रुग्णालयांत रुग्णसेवेकरीता आवश्यकतेनुसार अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यात येतात. या सर्व यंत्रांची व उपकरणांची परिरक्षण करारांतर्गत नियमित देखभाल करण्यात येत असून आवश्यकतेनुसार वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते.

******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.६१९**

**मा.वि.स.स श्री. जयंत पाटील यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे: -**

"मौजे बुऱ्हाणनगर ता. जि. अहिल्यानगर येथील जगदंबा देवी मंदिरा समोरील सर्वे क्र, १/२+१/३ मधील बिनशेती प्लॉट मधील कायदेशीर असलेले बांधकाम बेकायदेशिरपणे पाडून टाकल्यामुळे झालेले 2 कोटी रुपयांचे नुकसान, या बांधकामास दि. २२/०८/२०१२ रोजी तहसिलदार यांनी दिलेली परवानगी तसेच बांधकामास पुर्णत्वाचा मिळालेला दाखला, सर्व कर व पाणी पट्टी नियमित भरण्यात येत असणे, या बांधकामास दि. २१/०२/२०२५ रोजी रहिवास या प्रयोजनाऐवजी वाणिज्य प्रयोजनासाठी सुधारित रेखांकनास हरकत नसल्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांनी कळविले असणे, असे असतांना दिनांक २०/०२/२०२५ रोजी या कायदेशीर असलेल्या जागेवरील बांधकाम मोठ्या पोलिस बंदोबस्तात उपविभागीय अधिकारी यांनी पाडून टाकणे, त्यामुळे त्या परिसरातील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष. नियमित असलेले व सर्व कर भरत असलेले बांधकाम पाडल्यामुळे जागेच्या मालकाचे दोन कोटी रूपयांचे नुकसान, झालेल्या नुकसानीची परतफेड करण्याबाबत व ज्यांनी बांधकाम पाडले त्यांच्या विरुदध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावायाची कारवाई."

---

## मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन

""प्रस्तुत प्रकरणी मौ.बु-हाणनगर ता.जि.अहिल्यानगर येथील या मिळकतीस तहसिलदार नगर यांचेकडील आदेशान्वये रहिवास प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी देण्यात आलेली आहे. उपविभागीय अधिकारी नगर भाग, अहमदनगर यांचेकडील, दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशान्वये रहिवास प्रयोजनाकरीता प्लॉ.नं. १ ते ६ चे एकत्रिकरण व बांधकाम परवानगीचे आदेश पारीत झालेले असुन सदर प्रकरणी दाखल जनहित याचिका, सदर मिळकतीमधील अनधिकृत वाणिज्य वापर व यामुळे होणारा सामाजिक उपद्रव इ. विचारात घेता, उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर, भाग अहिल्यानगर यांचेकडील दि.१८/०२/२०२५ रोजीच्या आदेशानुसार, मिळकतीमधील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कारवाई दि. २०/०२/२०२५ रोजी करण्यात आलेली आहे."

......................

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक ७२५

**श्री. सुनिल प्रभू, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७२५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबईतील कुर्ला, ओशिवरा, कांदरपाडा, दहिसर, माहिम, मरोळ मरोशी, यारी रोड आदी सहा बस आगार व स्थानकांचा बेस्ट उपक्रमातर्फे खाजगी विकासकामार्फत करण्यात आलेल्या पुर्नविकास प्रकल्पात चार विकासकांनी १६० कोटी रुपये थकीत रक्कम बेस्ट उपक्रमास न देता, अधिकाऱ्याबरोबर संगनमत करुन अर्थिक घोटाळा केल्याची धक्कादायक माहिती दि. १२.०६.२०२५ रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, त्याचबरोबर कांदरपाडा बसस्थानक,दहिसर पश्चिम येथील बस आगार पुर्नविकास प्रकल्पातील बेस्ट उपक्रमाची ११८१.६४ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा अद्यापही विनित इस्टेट प्रा.लि.कंपनीच्या विकासकाने बेस्ट उपक्रमाला हस्तांतरित न करता फसवणूक करणे,आधीच बेस्ट उपक्रम तोटयात असतांना व त्यास मुंबई महापालिकेकडून अर्थसहाय्य देवूनही निधी कमी पडत असतांना नुकतीच बेस्ट उपक्रमाने तोटा भरुन काढण्यासाठी किमान ६ रुपयावरून १२ रुपये एसी बसचे भाडे करण्यात येणे, असे असतांनाही बेस्ट उपक्रमाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी विकासकाकडून थकीत रक्कम वसूल न करता उपक्रमाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान करणे, या संदर्भात पर्यावरण प्रेमी ॲड.राजेश दाभोळकर यांनी मा. मुख्यमंत्री, सचिव, नगरविकास, महाव्यवस्थापक बेस्ट यांना ०९.०६.२०२५ लेखी तक्रार निवेदन देवूनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

<u>मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

बेस्ट उपक्रमातर्फे कुर्ला, ओशिवरा, कांदरपाडा, दहिसर, माहिम, मरोळ मरोशी व यारी रोड या ६ बस आगारांच्या विकासका करीता अनुक्रमे मे.पार्श्वनाथ डेव्हलपर लि.,मे. विजय असोसिएटस (वाधवा),मे.विनिता इस्टेटस प्रा.लि.,मे.पार्श्वनाथ डेव्हलपर लि. आणि मे.केएसएल इंडस्ट्रीज लि. या खाजगी विकासकाची नियुक्ती करून पुर्नविकास प्रकल्प राबविण्यात आले. बेस्ट उपक्रमाने नियुक्त केलेल्या विकासकाकडून निविदा अटी व शर्तीनुसार ना परतावा रक्कम,टीडीआर,भाडे व त्यावरील व्याज आणि दंड याबाबींकरीता एकूण रू. २६१.७३ कोटी इतकी रक्कम थकबाकी आहे.

बेस्ट उपक्रमामार्फत कुर्ला व माहिम या बसआगाराच्या अनुषंगाने असलेल्या थकबाकीच्या अनुषंगाने संबधित विकासकांविरुध्द मा.उच्च न्यायालयात लवाद सुरु असून ओशिवरा, कांदरपाडा व मरोळ मरोशी येथील थकबाकीबाबत विकासकांकडून वसूलीबाबत राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधीकरण (NCLT) येथे दावा सुरु आहे.

बेस्ट उपक्रमाच्या अखत्यारीतील इमारती जीर्णावस्थेत असल्याने त्यांचा पुनर्विकास करण्याच्या अनुषंगाने खासगी विकासकांमार्फत बस आगारे,बस स्थानके,अधिकारी/निवासी वसाहती, कार्यशाळा इत्यादींचा पुनर्विकास करून उरलेले चटई क्षेत्र विकासकांना दिर्घ भाडेपट्ट्याने देण्याची

बाब बेस्ट प्रशासनाच्या विचाराधीन आहे. सद्यस्थितीत बांद्रा,देवनार व दिंडोशी बस आगार व बांद्रा स्थानकाचा टप्प्या-टप्प्याने विकास करण्याबाबत बेस्ट उपक्रमामार्फत कार्यवाही सुरू आहे.

ॲड. राजेश दाभोळकर यांनी ६ बेस्ट आगाराचा पुनर्विकास करण्यात आला अद्यापही अनेक विकासकांकडून अंदाजित १६० करोड ची थकबाकी प्रलंबित असल्याची तक्रार दिनांक ०५ सप्टेंबर २०२५ रोजी प्राप्त झाली या तक्रारीबाबत दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी महाव्यवस्थापक,बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम यांना नियमोचित कार्यवाही करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.

****

लक्षवेधी सूचना क्र.११३१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती स्नेहा पंडित दुबे, श्री. राजन नाईक, ॲड. पराग अळवणी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११३१ खालीलप्रमाणे आहे :**

"जि.पालघर अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मागील ३०-३५ वर्षापासून खाजगी जमीनींवर हजारो इमारती व चाळी अस्तित्वात असणे, यापैकी बहुतांश इमारतींमध्ये पागडी तत्वावर नागरिक राहत असणे, ३०-३५ वर्षापासून अस्तित्वात असलेल्या इमारतींची दुरूस्ती वा पुनर्बांधणी करणे आवश्यक असणे, मात्र स्थावर मिळकतीच्या वाढत्या किंमतींमुळे व नफेखोरीच्या प्रवृत्तीमुळे, मुळ जमीन मालकांकडून संरचनात्मक लेखापरिक्षकांना हाताशी धरून सरसकट या इमारती सी-१ प्रवर्गात समाविष्ट करणे, मागील तीन वर्षात ४१४ इमारती सी-१ प्रवर्गात समाविष्ट करून त्यापैकी २७४ इमारती निष्कासित करणे, मात्र इमारत निष्कासीत करून तीन वर्षे झाल्यानंतरही २७४ पैकी फक्त २ इमारतींच्या पूनर्बांधणीसाठी जागामालकांनी महानगरपालिकेची परवानगी घेणे, उर्वरीत इमारतीतील रहिवाश्यांना २-३ लाख रुपये देऊन त्यांच्याकडून घराचे हक्क सोडण्याची कागदपत्रे तयार करून घेणे, हक्क न सोडणाऱ्या घरमालकांना स्थानिक गुंडाकडून धमक्या देणे, अश्याप्रकारे जागा रिकामी करून देण्यासाठी गुन्हेगारी स्वरूपाची कार्यपद्धती वापरून वसई विरार मध्ये ३०-४० वर्षे राहणाऱ्या जवळपास १० हजार रहिवाश्यांना बेघर करणे, निष्कासित करण्यात येणाऱ्या इमारतीतील रहिवाश्यांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी निष्कासित इमारतीच्या जागेच्या ७/१२ उताऱ्यावर/ मालमत्तापत्रकावर सदनिका धारकांच्या नावाची नोंद इतर हक्कात करण्याची तसेच चुकीचे संरचनात्मक अहवाल देणाऱ्या लेखापरिक्षकांची चौकशी करण्याची आवश्यकता, यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया"

## उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

महानगरपालिकेचे क्षेत्रफळ सुमारे ३८० चौ. कि.मी. एवढे असून वसई-विरार उपप्रदेशातील भूतपुर्व ४ नगरपरिषदा व ५३ गावांचा समावेश होऊन सन २००९ मध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार १२.२२ लक्ष होती. तथापि, गेल्या १० वर्षात लोकसंख्या वाढीचा दर २२० पट झाला असून आजमितीस महानगरपालिकेची लोकसंख्या सुमारे २४ लक्ष एवढी झालेली आहे. यापैकी बहुतांश चाळी, इमारती या ग्रामपंचायत काळापासूनच्या आहेत. काही इमारती या भाडेतत्वावर व पागडी पद्धतीनुसार वापरात आहेत, असे निदर्शनास आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक/अतिधोकादायक इमारतींबाबत अधिनियमातील तरतुदी, शासन निर्णय, मा. उच्च न्यायालयाचे आदेश आणि महापालिकेने विहीत केलेली कार्यपध्दती (SOP) तसेच, शासन परिपत्रक, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ मधील तरतुदींनुसार जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत पावसाळयापूर्वी करावयाच्या कार्यवाहीनुसार जुन्या मोडकळीस आलेल्या ३० वर्षापेक्षा जास्त वयोमर्यादा असणाऱ्या मिळकतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यात येते व त्यानुसार धोकादायक इमारतींचे सी-१, सी-२ अे, सी-२ बी, सी-३ असे वर्गीकरण केले जाते.

सी-१ (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या), वसई - विरार शहर महानगरपालिकेत दरवर्षी महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतींचे आर्युमान ३० वर्ष झालेले आहे अशा इमारतींचे बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यामार्फत सर्व्हेक्षण करून जीर्ण झालेल्या व बाहेरुन पाहणी केली असता मोडकळीस आलेल्या आहेत. अशा इमारतींचे संरचनात्मक लेखा परिक्षण (Structural Audit) करण्यारिता नोटीस दिली जाते. नोटीस दिल्यानंतर महानगरपालिकेच्या संरचनात्मक लेखा परिक्षण (Structural Audit) पॅनलमार्फत इमारतींचे संरचनात्मक लेखा परिक्षण (Structural Audia) करण्यात येते. या पॅनलमध्ये तज्ञ अभियंता यांचा समावेश आहे. लेखा परीक्षण पॅनलने दिलेल्या अभिप्रायानुसार व नियमानुसार सी-१, सी-२ अे, सी-२ बी आणि सी- ३ अशाप्रकारे इमारतींचे वर्गीकरण केले जाते व वर्गवारीनुसार सी-१ व्यतिरिक्त सर्व चाळी व इमारती दुरुस्ती करुन घेण्याबाबत संबंधित इमारत धारकांना कळविण्यात येते.

महानगरपालिकेने मागील तीन वर्षात एकूण २५७ सी-१ प्रवर्गातील इमारतीवर निष्कासनाची कारवाई केलेली आहे. एकत्रीकृत विकास नियंत्रण नियमावली, २०२० कलम (७.६.१) (UDCPR-२०२०) मधील तरतुदींनुसार जुन्या व जीर्ण झालेल्या धोकादायक इमारतीचे पुर्नविकास करणेकरीता परवानगी देणेबाबत तरतूद आहे. ३० वर्षे पेक्षा जास्त वयोमान असलेल्या व सी-१ प्रवर्गात मोडणाऱ्या एकूण १६१ इमारतींना पुर्नविकासासाठी नियमानुसार परवानगी देण्यात आलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

उर्वरीत इमारतीतील रहिवाश्यांना २-३ लाख रुपये देऊन त्यांच्याकडून घराचे हक्क सोडण्याची कागदपत्रे तयार करून घेणे, हक्क न सोडणाऱ्या घर मालकांना स्थानिक गुंडाकडून धमक्या देणे अश्याप्रकारे जागा रिकामी करून देण्यासाठी गुन्हेगारी स्वरूपाची कार्यपद्धती वापरून वसई विरार मध्ये ३०-४० वर्षे राहणाऱ्या जवळपास १० हजार रहिवाश्यांना बेघर करणे विषयाबाबतचा कुठलाही अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही व तशी तक्रार सुध्दा प्राप्त झालेली नाही.

निष्कासित करण्यात आलेल्या इमारतीमधील रहिवाशांना रहिवास असलेबाबत प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून देण्यात येते. सदर प्रमाणपत्राचे आधारे या सदनिका धारकांचा भोगवटाबाबत नोंदी करणे याबाबतचे एकत्रितपणे अर्ज तहसीलदार यांचेकडे पाठविण्यात येतात्त.

महानगरपालिकेने नेमणूक केलेले संरचनात्मक लेखा परीक्षक सर्व प्रकारची तपासणी करुन व नियमानुसार लेखापरिक्षण करुन संरचनात्मक लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेस सादर करीत असतात. त्यांनी दिलेले अहवाल मान्य नसल्यास तसेच, काही इमारतीमधील रहिवाशी महानगरपालिकेने सर्व्हेक्षण केल्यानंतर स्वतः खाजगी Structural Auditor कडून पुनश्च संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करुन घेतात. महानगरपालिकेच्या पॅनलवरील संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) व खाजगी संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) यांनी केलेल्या संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) मध्ये तफावत आढळल्यास असे प्रस्ताव महानगरपालिकेने दि.२९.११.२०२१ आदेशान्वये गठीत केलेल्या त्रिसदस्यीय तांत्रिक सल्लागार समितीकडे (Technical Advisory Committee) पुर्नविलोकनासाठी पाठविण्यात येतात. तांत्रिक सल्लागार समितीने दिलेला अहवाल हा अंतिम मानला जातो व त्याप्रमाणे तो सर्वांना बंधनकारक असतो. समितीने मागील दोन वर्षांत एकूण ५८ इमारतीबाबत पुर्नतपासणी करुन लेखी अहवाल दिलेला आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.११५६**

**मा. वि.स.स श्री. संजय रामभाऊ गायकवाड यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"बुलढाणा शहराच्या सन १९९१ च्या मंजूर विकास योजना आराखड्यामध्ये सव्हे नं.४/१ मध्ये Play Ground चे आरक्षण असणे,शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक २१ डिसेंबर १९९५ रोजी राज्यातील शहराच्या विकासयोजनेमध्ये क्रिडांगणासाठी आरक्षित असणाऱ्या जागांमध्ये कोणताही फेरबदल करण्यात येऊ नये याबाबत शासनस्तरावरुन धोरणात्मक निर्णय झालेला असणे, असे असतांनाही सदर आरक्षित क्षेत्र असलेल्या काहीभागावर एका जमिन मालकाने बेकायदेशिररित्या गुंठेवारी नियमानुकुल अधिनियमाखाली नगरपरिषदेकडुन परवानगी प्राप्त करुन सदर जागेचा मंगल कार्यालय या प्रयोजनार्थ वाणिज्य वापर चालु करणे,सदर जागेवर गुंठेवारी अधिनियमाखाली भूखंड नियमानुकुल करण्याबाबत नगर परिषदेने बेकायदेशिररित्या दिलेला आदेश,त्यावर दिलेली बांधकाम परवानगी रद्द करणे,सदर भूखंडावर झालेले अनाधिकृत बांधकाम पाडणे,खेळाचे मैदान या प्रयोजनार्थ सुविधाक्षेत्र म्हणुन दर्शविलेली सदर जागा शासनाने ताब्यात घेणे, तसेच या नियमबाहय गुंठेवारी प्रकरणास जबाबदार असलेल्या तत्कालीन मुख्याधिकारी श्री. संजीव ओहोळ व संबंधित अधिकारी,कर्मचारी यांची सखोल चौकशी करावी व बुलढाणा नगरपरिषद हद्दीअंतर्गत सन १९९१ चे मंजुर विकासयोजने मध्ये सर्व्हे क्र.४१/१ अंतर्गत येणाऱ्या जमिनीवर आरक्षण क्रमांक १ क्रिडांगण या प्रयोजनार्थ आरक्षण असणे, मंजूर विकासयोजनेत सदर आरक्षण कायम असतांनाही तत्कालीन अपर जिल्हाधिकारी,बुलढाणा यांनी सदर क्रिडांगण याप्रयोजनार्थ आरक्षित असलेल्या जमिनीवरच नियमबाहयरित्या अकृषक आदेश पारीत करुन नियमांचा भंग करणे सदर नियमबाहयरित्यापारीत केलेले अकृषक आदेश रद्द करुन या प्रकरणास जबाबदार असलेल्या संबंधितांची सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मौजा बुलढाणा, सर्वे क्रमांक ४, क्षेत्र १९ एकर ७ गुंठे ही जमीन मूळतः श्री. अर्जुन लक्ष्मण लांडे यांच्या मालकीची होती. उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी दि.०६.०१.१९६६ रोजी या क्षेत्रापैकी ४ एकर ३८ गुंठे क्षेत्रासाठी अकृषक आदेश पारित केलेला असून, सदर आदेशामध्ये अर्जदारास नगररचना व मूल्यनिर्धारण विभागाकडून अभिन्यास मंजूर करून घेण्याची अट नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार शाखा कार्यालय, नगररचना, अमरावती यांनी दि.२५.०५.१९६७ रोजी संपूर्ण १९ एकर ७ गुंठे क्षेत्राकरिता मार्गदर्शक अभिन्यास मंजुरीसाठी शिफारस केली होती. तथापि, उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी केवळ ४ एकर ३८ गुंठे क्षेत्रापुरता

अकृषक आदेश दिला असून त्या क्षेत्रातील प्लॉट क्र. २० (अंदाजे २७ गुंठे) हा 'खेळाचे मैदान' म्हणून दर्शविण्यात आला होता.

यानंतर सन १९७५ मध्ये अंमलात आलेल्या मूळ विकास योजनेमध्ये तसेच सन १९९१ च्या सुधारित विकास योजनेमध्ये सर्व्हे क्र.४ मधील एकूण १९ एकर ७ गुंठे क्षेत्राकरिता शाखा कार्यालय, नगररचना, अमरावती यांनी सुचविलेला मार्गदर्शक अभिन्यास विचारत घेऊन सर्व्हे क्र.४/१ या क्षेत्रावर अभिन्यासातील विद्यमान खेळाचे मैदान (अंदाजे ५७ गुंठे क्षेत्र) दर्शविलेले दिसून येते.

सर्वे क्रमांक ४ मधील एकूण १९ एकर ७ गुंठे पैकी उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी पारित केलेल्या अकृषक आदेशाव्यतीरिक्त उर्वरित १४ एकर ९ गुंठे क्षेत्राची तुकड्य-तुकड्या मध्ये विभागणी करून विक्री करण्यात आल्याचे दिसुन येते, त्यापैकीच १५ गुंठे क्षेत्र सन १९८५ मध्ये सौ. आशा सरदार यांनी विकत घेतले, जे सन १९९१ च्या सुधारित विकास योजनेतील खेळाचे मैदान या आरक्षणात येते. सौ. आशा सरदार यांच्या विनंतीनुसार नगर परिषद, बुलढाणा यांनी सदर क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. शासनाने दि.११.०१.१९९५ रोजी सदर प्रस्तावावर कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास हरकत नसल्याचा तत्वत: निर्णय घेतला होता. त्यानुसार कार्यवाही झाल्यानंतर संचालनालयाने दि.३०.०३.२००२ रोजी प्रस्तावास अनुकूल शिफारस केली. मात्र शासनाने दि.०१.०९.२००६ रोजी प्रस्तुत जागा मार्गदर्शक अभिन्यासातील आहे व सदर जागा खेळाचे मैदान या आरक्षणामधुन वगळणेसाठी सर्व भूखंडधारकांची संमतीपत्र सादर करण्याचे आवश्यक असल्याचे नमूद केले आणि नंतर दि.१०.०३.२०११ रोजीच्या पत्रान्वये, 'क्रीडांगणाच्या आरक्षणामध्ये फेरबदल करता येणार नाही अशा मंत्रीमंडळाच्या सुचना असल्याने आपली विनंती मंजूर करता येणार नाही', असे कळविले.

त्यानंतर मुख्याधिकारी, नगर परिषद बुलढाणा यांनी सन २०१६ मध्ये सर्व्हे क्र. ४/१ मधील काही जमिनींबाबत अकृषक आदेश पारित केले, तथापि हरकतीनंतर आदेश रद्द करून पुन्हा सदर अकृषक आदेश सन २०१७ मध्ये कायम करण्यात आल्याचे दिसुन येते. त्यापैकी एक आदेश मंजूर ४ एकर ३८ गुंठे अभिन्यासातील प्लॉट क्र. २० म्हणजेच खेळाचे मैदान करीता आरक्षीत जागेपैकी असल्याचे दिसुन येते.

तद्नंतर शासनाने दि.२६.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये, 'सदर जमिनीत विविध कालावधीत बालक मंदिर व खेळाचे मैदान क्षेत्रामध्ये अकृषक आदेश व बांधकाम परवानग्या देण्यात आलेल्या असून त्यानुसार तृतीय पक्षांचे हक्क (Third Party Interests) निर्माण झाले आहेत. अशा स्थितीत नियमानुसार दिलेल्या परवानग्यांप्रमाणे कार्यवाही करावी व भविष्यातील सुधारित विकास योजनेत आवश्यक बाबी विचारात घ्याव्यात, असे निर्देश दिले गेले.

सदरप्रमाणे बुलढाणा शहराची दुसरी सुधारित विकास योजना, शासन अधिसुचना क्र.टिपीएस-२६२३/९०८/प्र.क्र.१२९/२०२३/नवि-३०, दि. ०४.०९.२०२५ रोजी भागशः मंजूर झाली असुन सदर अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ट-ब मधील ई.पी.-१६ अन्वये सर्वे क्रमांक ४/१ मधील मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्रास रहिवासी विभागात दर्शविण्याबाबत प्रस्तावीत करण्यात आले आहे.

***********

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१५४६**

**मा.विधानसभा सदस्य श्रीमती देवयानी फरांदे यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे -**

"कर्मा ग्यालेक्सी अपार्टमेट मधील रहिवासी असणाऱ्या १४० सदनिका धारकांची बिल्डर विनोद तलवार व आदित्य तलवार यांच्याकडून फसवणूक केल्याचे स्पष्ट झालेले असणे बिल्डर यांनी फ्लॅट विकताना सदनिका धारकांना दिलेले बिल्डिंग मधील एमिनिटीज बाबत विक्री करारनामा करून देणे, नोंदणीकृत विक्री कराराचे पालन न करणे, नाशिक महानगरपालिका नगर विकास विभाग अधिकाऱ्यांशी संगणमत करून सदनिका धारकांना कुठलीही कल्पना ना देता पूर्व परवानगी न घेता अमेनिटीच्या जागी रो-हाऊस बांधणे. सदनिका धारकांनी सदर फ्लॅट हे सुख सुविधा दर्शविलेल्या पाहून खरेदी केलेली असणे परंतु त्यांना सुख-सुविधा ना देता उलट त्यांची फसवणूक केली असणे, सदनिका धारकांची एक रककमी मेंटेनन्स ची रक्कम मुदत ठेव न करता कोणतीही संमती न घेता खर्च करणे, याबाबत सदनिका धारकांनी भद्रकाली पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदवलेला असणे, सदर गुन्ह्यात नोंदणीकृत दस्तावेज तयार झाल्यानंतर बांधकाम नकाशात बदल मंजूर करणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना देखील सहआरोपी करून चौकशी करण्याची असणारी आवश्यकता, पोलीस प्रशासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, सदर बांधकाम व्यवसायिक वेळोवेळी चौकशीसाठी उपस्थित न राहणे त्यामुळे अटकपूर्व जामीन रद्द करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत पोलीस प्रशासनाचे होत असणारे दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मौजे नाशिक शिवरातील सर्व्हे क्र.४००अ/५/१+४००अ/५/५+४००अ/५/६+४००अ/५/७ या एकुण १५४००.२५ चौ.मी. या क्षेत्रावर प्रथमतः दि.०५.०६.२०१२ रोजी बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली असून त्यामध्ये तळ पार्किंग + ९ मजले असे दोन इमारत/ टॉवर मिळून एकुण २१६ सदनिका होत्या. या मंजूरीमध्ये आवश्यकते प्रमाणे १०% खुली जागा (१५६४.५० चौ.मी.), ५% सुविधा भुखंड (७८३.७५ चौ.मी.) दर्शविण्यात आलेले आहे. या जागेलगतचे २००० चौ.मी. क्षेत्र या जागेत एकत्रित करुन त्यावर नव्याने इमारत क्र.२ प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यास दि.२१.०९.२०१३ रोजी सुधारित बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आली आहे.

यानंतर सदर मंजूरी दि.०९.०१.२०१७ रोजी सुधारित करण्यात येवून त्यामध्ये वर नमुद दोन टॉवर/ इमारती तळ पार्किंग + ९ मजले या ऐवजी एक टॉवर / इमारती तळ पार्किंग + १२ मजले व दुसरा टॉवर/ इमारती तळ पार्किंग + २ मजले असे एकुण १६२ सदनिका दर्शविण्यात आलेल्या आहेत. यानंतर

दि.१८.०९.२०१७ रोजी यापैकी एका इमारत / टॉवर (तळ पार्किंग + १२ मजले) यास भोगवटा प्रमाणपत्र (भागशः) मंजूर करण्यात आलेले आहे.

तद्नंतर वर नमुद दोन इमारती / टॉवर पैकी भोगवटा प्राप्त १ इमारत कायम ठेवून, खुल्या जागेचे क्षेत्र, सुविधा भुखंडाचे क्षेत्र इ. कायम ठेवून उर्वरित जागेत पुर्व मंजूरीतील रद्दप्रस्तावित करुन तसा प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झालेला होता. त्यावेळी ७/१२ उता-यावर मालकांच्यावतीने ज. मु. धारक यांनी स्वाक्षरी करुन व प्रचलित नियमावलीप्रमाणे (डि.सी.पी.आर. २०१७) सदरचा प्रस्ताव दि.११.०५.२०२० रोजी मंजूर करण्यात आलेला आहे.

वरील दोन इमारती, खुली जागा, सुविधा भूखंड या सर्व व्यतिरिक्त नव्याने इमारत क्र.३ (१० रो-हाऊस) व इमारत क्र.४ (५ रो-हाऊस) प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. तसेच यासोबत खुल्या जागेत १०% क्षेत्रात क्लब हाऊसची इमारत प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यास दि.१८.११.२०२१ रोजी सुधारित बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आली आहे. सदर इमारत क्र.३ व ४ यास दि.१२.१२.२०२३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मूळ क्षेत्र १५४६५ चौ. मी. + नंतर एकत्रित केलेले २००० चौ.मी. या क्षेत्रासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली प्रमाणे ५% आवश्यक असे सुविधा क्षेत्र (Amenity plot) दर्शविण्यात आलेले आहे. सदर भुखंडात नियमावलीप्रमाणे बांधकाम मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच सुविधा भुखंडाव्यतिरिक्त असलेल्या खुल्या जागेत (Open Space) बिल्डरने महानगरपालिकेची मंजूरी घेवून क्लब हाऊस बांधलेले आहे. सदर प्रकरणात महानगरपालिकेने केलेली कार्यवाही नियमानुसार आहे.

प्रस्तुत प्रकरणी, पोलीस आयुक्तालय, नाशिक अंतर्गत भद्रकाली पोलीस ठाणे येथे, संबंधित बिल्डरने सदनिका धारकांची फसवणूक केल्याप्रकरणी दि.०३.०९.२०२५ रोजी FIR No.१६३/२०२५ अंतर्गत भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तपासात आरोपीतांना लेखी नोटीस बजावून त्यांनी कॉर्पस फंड कोठे व कोणत्या कारणाकरीता वापरला याचे कागदपत्र, बँक स्टेटमेन्ट मागविण्यात आलेले आहे. सदर माहितीचे अवलोकन चालू असतांना गुन्ह्यातील फिर्यादी यांनी केलेल्या विनंती अर्जान्वये त्यांना सर्व कागदपत्र खाजगी लेखापरिक्षक यांचे मार्फत पडताळणी करुन घेण्या करीता सुपूर्द करण्यात आलेले आहे. तसेच अद्याप आवश्यक असलेली माहिती आरोपीतांनी तात्काळ पुरविणे करीता त्यांना लेखी नोटीस बजावण्यात आलेली आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे, नमुद मुद्यांवर सविस्तर तपासासाठी आरोपींकडून तसेच महानगरपालिका येथुन माहितीची व कागदपत्रांची जमवाजमव करणे चालू आहे. आरोपींनी सदर माहिती मुदतीत न सादर केल्यास तसेच तपासात काहीएक सहकार्य न केल्यास आरोपीतांचा अटकपूर्व जामीन रद्द होण्याकरीता मा. न्यायालयास अहवाल सादर करण्याची तजविज पोलीस विभागाने ठेवली आहे.

----------------

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १६५४**

श्री. मुरजी (काका) पटेल मा. वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६५४ पुढीलप्रमाणे आहे:-

" अंधेरी पूर्व ते अंधेरी पश्चिम जोडणाऱ्या अंधेरी सबवेमध्ये प्रत्येक पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते, परिणामी वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होणे, तसेच सबवे मधील पाणी परिसरातील नागरिकांच्या घरामध्ये जावून मोठ्या प्रमाणात वित्तहानी होऊन जनजीवन विस्कळीत होत असणे, काही वेळा जीवित हानी होणे, दर पावसात सततच्या घटनेमुळे जनमाणसात तीव्र संतापाची व चिडेची भावना निर्माण होणे, त्यामुळे अंधेरी सबवे पाणी साचू नये, यासाठी कायमस्वरूपी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

अंधेरी भुयारी मार्ग हा मुंबईतील एक अत्यंत सखल व वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा भाग आहे. या ठिकाणी मोगरा नाल्याचे पाणी पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. पावसाळ्यात जोरदार पर्जन्यमान झाल्यास,सखल भूभाग असल्यामुळे येथे पाणी साचण्याची गंभीर समस्या निर्माण होते. ही समस्या दरवर्षी पुनरावृत्त होत असल्याने, महापालिकेच्या पर्जन्य जल विभागामार्फत तात्पुरत्या स्वरूपात्त मोठ्या क्षमतेचे पंप बसवून जलनिचरा करण्यात येतो.

सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये याकरीता वाहतुक गोखले ब्रिज व अन्य इतरत्र मार्गावर वळविण्यात येत असुन वाहतुकीचे योग्य प्रकारे नियमन व्हावे व वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी पावसाळ्यामध्ये दा. नौ. नगर वाहतुक विभागाकडुन नियमित बंदोबस्त नियुक्त करण्यात येतो.

तसेच दीर्घकालीन उपायोजनेच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत मोगरा नाला व अंधेरी भुयारी मार्गासाठी स्थायी पूरनिवारण उपाययोजना राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मोगरा नाला पाणलोट क्षेत्र क्र. २१८ मध्ये येतो, आणि त्याचे के पूर्व विभागात क्षेत्रफळ अंदाजे २७६.१ हेक्टर आहे. सद्यस्थितीत अंधेरी भुयारी मार्गाखालील नाल्याची वहन क्षमता १३.९८ घनमीटर/सेकंद (cumecs) आहे, तर के/पूर्व विभागातील या पाणलोट क्षेत्रावर पावसाचा अंदाजे भार ४२.१८ घनमीटर/सेकंद, cumecs (५५ मिमी प्रति तास पावसाच्या तीव्रताकरिता) इतका येतो, ज्यामुळे विद्यमान वाहिनीतून योग्य जलनिचरा होऊ शकत नाही. यासाठी बृहन्मुंबई महापालिकेने आयआयटी मुंबई व ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत शिफारस केलेल्या उपाययोजनांनुसार आणि तांत्रिक सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. (TUSPL) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थायी उपाययोजनेचा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे.त्यानुसार प्रस्तावाचा खर्च व व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर करण्यात येत आहे.

******

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १८३३

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८३३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबईतील मालाड पूर्व जी.जी.महालकारी मार्ग ते संस्कार कॉलेज दरम्यानच्या १८.३० मीटर या प्रस्तावित (डीपी रोड) नियोजित रस्त्याचे विकासकाम २०० झोपडी धारकांचे त्याच परिसरात पुर्नवसन करुन पुर्ण करण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे दि.०२.०७.२०२५ रोजी निर्दशनास येणे, या संदर्भात सहाय्यक महापालिका पी-उत्तर विभाग यांचे मार्फत २०० झोपडीधारकांचे सर्वेक्षण करुन परिशिष्ट-२ ची यादी तयार करण्याचे काम अनेक वर्षापासून अद्यापपर्यंत प्रलंबित असणे, झोपडीधारकांचे त्याच परिसरात पुर्नवसन करणेबाबतची कार्यवाही करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळेच १८.३० मीटर रस्त्याचे काम अद्यापपर्यंत पुर्ण होऊ न शकणे, या विषयासंदर्भात या आधीही महाराष्ट्र विधानसभागृहात लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या चर्चेत नगरविकास मंत्री महोदयांनी बाधीत झोपडयांचे पुर्नवसन करुन रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याचे आश्वासन देऊनही यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यासंदर्भात मा. पालकमंत्री, महापालिका आयुक्त यांना २१.०१.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने परिणामी मालाडपुर्व परिसरातील स्थानिक जनतेस वाहतूक कोंडीमुळे गैरसोय होऊन त्रासदायक ठरत असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.."

---

## मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मुंबईतील मालाड पूर्व जी.जी. महालकारी मार्ग ते संस्कार कॉलेज दरम्यानच्या १८.३० मीटर या प्रस्तावित (डी.पी. रोड) नियोजित रस्त्याचे विकासकामात बाधित होत असलेल्या १३१ झोपडीधारकांचे त्याच परिसरात पुनर्वसन करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले आहे. सदर रस्त्यामधील बाधीत बांधकाम / झोपडीधारक यांचे अंतिम परिशिष्ट महानगरपालिकेने तयार केले असून बाधीत झोपडीधारकांचे पुनर्वसन नजीकच्या परिसरात होण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झो.पु.प्रा.) मुंबई यांना महानगरपालिकेने विनंती केली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झो.पु.प्रा.) मुंबई यांनी संस्कार कॉलेज दरम्यानच्या १८.३० मीटर प्रस्तावित डी.पी. रोडलगतच्या चालू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये पुनर्वसन करण्यास मंजूरी दिली असून सदर रस्त्याचे अंतिम परिशिष्ट-॥ हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झो.पु.प्रा.) कडे सादर करण्याची कार्यवाही महानगरपालिकेद्वारे करण्यात येत आहे. पुनर्वसन व निष्कासनाची कार्यवाही झाल्यानंतर सदरहू रस्त्याचा विकास करुन वाहतूकीसाठी खुला करण्याबाबत महानगरपालिकेद्वारे कार्यवाही सुरू आहे.

******

## महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक १८८५

### सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती सरोज अहिरे,मा.वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक महापालिकेने वॉटर ग्रेस प्रोडक्ट्स कंपनीला नाशिक शहरातील रुग्णालयांच्या बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंटचा ठेका दिलेला असणे, त्यासाठी १५ गुंठे भुखंड नाममात्र दराने भाडेतत्वाने दिला असणे, या भुखंडाबाबत करार करताना या कंपनीने संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने बेकायदेशीर करारनामे करणे, सदर प्रकरणी सुधारीत करारनामा करतेवेळी महासभा व स्थायी समिती यांची धोरणात्मक बाब म्हणुन मान्यता न घेण्यात येणे, सदर प्रकरणी या भुखंडाबाबत करार करतांना या कंपनीने बेकायदेशीर करारनामे करणे व करारनाम्यात छेडछाड करुन नाशिक महापालिकेची फसवणुक केली असल्याची गंभीर बाब उघड होणे, गत अधिवेशनाच्या लक्षवेधी निवेदनात नमुद कार्यवाहीबाबत आश्वासनांची पुर्तता न करणे व तसेच मनपा नाशिक यांचेकडून वॉटर ग्रेस कंपनीकडून शुल्कासह रॉयल्टीच्या रक्कम अद्यापही दंडासह वसुल न करण्यात येणे, परिणामी महानगरपालिकेची तसेच जनतेच्या पैशाची होणारी धुळधाण पाहता शासनाने सदर रक्कम दंडासह वसूल करण्याची कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भुमिका."

### मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व खाजगी व शासकिय वैद्यकिय व्यावसायिकांमार्फत निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी मनपाने प्रकल्प उभारणी कामी वॉटरग्रेस कंपनीला रुग्णालयांच्या बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेन्टचा ठेका सन २००१ मध्ये दिलेला आहे. स्थायी समिती ठराव क्र. ११५७ व १२७८, अनुक्रमे दि. ११.०१.२००१ व दि. १५.०२.२००१ अन्वये मंजुरी देण्यात येऊन महानगरपालिका व मे वॉटरग्रेस प्रॉडक्ट्स यांच्या मध्ये दि. २०.१२.२००१ रोजी प्रथम करारनामा ११ वर्षे कालावधीचा करण्यात आला होता. त्यामध्ये सदर कंपनीस सर्वे न. ४०६ भूखंडा पैकी १५०० चौ.मी जागा हि ०१ रुपये प्रती वर्ष या नाममात्र दराने ११ वर्षाच्या मुदती साठी देण्यात आली होती.

सन २००१ ते २००५ दरम्यान सदरचा प्रकल्प राबविण्यामध्ये अडचणी येत असल्याने व २००१ च्या करारनाम्या मध्ये त्रृटी निर्देशनास आले असल्याने प्रकल्प सक्षम पुर्णपणे सुरु ठेवण्याकामी सुधारित करारनामा करण्याची आवश्कता होती. स्थायी समिती ठराव क्र. ११५७ दि. ०१.०१.२००१ व दि. २०.१२.२०२१ रोजीच्या करारनामा (मुद्दा क्र. २३) मध्ये आयुक्त तथा प्रशासक, नाशिक मनपा यांना अटी शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार प्रदान केल्याचे नमूद केलेले आहे. सबब सन २००५ मध्ये सुधारित अटी शर्ती जसे ' बाब क्र. ३ व ४ नुसार सदर प्रकल्प ११ वर्ष बी ओ ओ ऐवजी २१ वर्ष बी ओ टी वर देणे नमूद करुन मनपाचे तत्कालीन कायदे सल्लागार व तत्कालीन विधी अधिकारी यांच्याकडून तपासुन घेऊन नविन करारनामा करण्यात आला आहे.

या भूखंडाबाबत करार करताना याकंपनीने बेकायदेशीर करारनामे करणे व करार नाम्यात छेडछाड करून नाशिक महापालिकेची फसवणूक केली असल्याची बाब उघड होणे विषय बाबत - श्री. दिलीप दत्तू दातीर, यांची दि. ३०.०६.२०२३ व दि. २७.०३.२०२३ रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारी बाबत आयुक्त यांनी मुख्य लेखा परीक्षक यांना चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणे बाबत आदेशित केले होते. मुख्य लेखा परीक्षक मनपा, नाशिक यांचे कडील जा.क्र. ६३४, ३१.१२.२०१५ च्या पत्रान्वये जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प संदर्भात मा. स्थायी समितीच्या ठरावाच्या आधारे मक्तेदार नेमणेच्या नियुक्ती प्रक्रियेत त्रुटी असले बाबत आक्षेप घेण्यात आलेले आहे. स्थानिक निधी लेखापरीक्षण वर्ष २०१२-२०१३ अंतर्गत प्राप्त परिच्छेदा नुसार सन २००१ ते २००५ या कालावधीत वॉटरग्रेस कंपनी यांना सेवा शुल्कच्या रक्कमे पेक्षा र रु. ९५,२७,९०८/- इतकी रक्कम ज्यादा प्रदान झाल्याचे व त्यावरील रॉयल्टीची रक्कम रु. १३,४०,११२/- असे एकूण र रु. १,०८,६८,०२०/- एवढ्या रक्कमेचे महापालिकेचे नुकसान झाले बाबत आक्षेप प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद वस्तुस्थिती विचारात घेऊन नाशिक महानगर पालिका स्थायी समितीचे ठराव क्र. ११५७ दि. ११.०१.२००१ व ठराव क्र. १२७८ दि. १५.०२.२००१ हे तसेच या नंतर चे करारनामे दि. २०.१२.२००१ व दि. ०१.०४.२००५ व अनुषंगिक कार्यारंभ आदेश हे सर्व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ (३) नुसार विखंडीत करण्याबाबत तसेच सदर विखंडानाची प्रक्रिया झाल्यावर निविदा प्रसिद्ध करून पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. या करिता विद्यमान कंत्राटदार यांना कायम ठेवणे आवश्यक असले बाबत तत्कालीन आयुक्त यांनी दि. ०५.०५.२०१६ रोजी मा. शासनास प्रस्तावित केले होते.

त्यानुसार नाशिक महानगर पालिका स्थायी समितीचे उक्त ठराव, करारनामे व कार्यारंभ आदेश हे शासन निर्णय क्र.नामपा-२०१६/प्र.क्र.२०६/नवी-२५, दि. १४.०३.२०१७ च्या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ (१) नुसार निलंबित केले होते. परंतु दि. ०६ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णय अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेली वस्तूस्थिती विचारात घेऊन नाशिक महानगर पालिका स्थायी समितीचे ठराव क्र. ११५७ दि. ११.०१.२००१ व ठराव क्र. १२७८ दि. १५.०२.२००१ हे तसेच या नंतर चे करारनामे दि. २०.१२.२००१ व दि. ०१.०४.२००५ व अनुषंगिक कार्यारंभ आदेश यांचे दि. १४.०३.२०१७ च्या आदेशान्वये करण्यात आलेले निलंबन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ (३) नुसार शासन निर्णय, दि.०६ ००सप्टेंबर, २०१८ अन्वये रद्द करण्यात आलेले आहे.

गत आधिवेशना मध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सदर ठेकेदार कडुन वापरण्यात येण्या-या भुखंडाची चौकशी करणेकामी मनपा स्तरावर समिती दि.१६.०६.२०२५ रोजी स्थापन करण्यात आलेली असुन संबंधित मक्तेदारास दि. २५.०६.२०२५ रोजी याबाबत खुलासा मागविणेकामी नोटिस देण्यात आलेली आहे.

जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी नाशिक महानगरपालिकेने प्रकल्प उभारणेकरिता वॉटरग्रेस कंपनीला रुग्णालयांच्या बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेन्टचा देणेत आलेला ठेका दि. ०१ एप्रिल २००५ ते २१ वर्ष कालावधीकरिता असुन सदरचा ठेका हा दि. ३१ मार्च २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे. तसेच जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणे कामी महानगरपालिका नविन निविदा राबविणेत येवुन नविन ठेकेदारास नियुक्त करण्यात येईल.

**********************************************************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक १९३०

श्री. अजय चौधरी , मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९३० पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र विधीमंडळ सदस्यांना आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत नागरी सुविधाकरिता निधी दिला जाणे, सदर निधीबाबत वित्त व नियोजन विभागाने नियम व सुचना निर्गमित केलेल्या असणे,त्यानुषंगाने नागरी सोयी-सुविधांच्या कामांची शिफारस करणे हा विधीमंडळ सदस्यांचा हक्क असणे, असे असतानाही मुंबई महानगरपालिकेच्या परिमंडळ-२ क्षेत्रात आमदार/खासदार यांनी शिफारस केलेल्या कामांकरिता म्हाडाला "नाहरकत प्रमाणपत्र" देण्यात येणार नाही असा प्रस्ताव महापालिका उपायुक्त (परिमंडक-२) यांनी दि.२४ मार्च,२०२५ रोजी आयुक्त,मुंबई महानगरपालिका यांच्या मंजुरी करिता पाठवणे,त्यास आयुक्त यांनी एप्रिल, २०२५ मध्ये मंजुरीही देणे,त्यानुसार अति.महापालिका आयुक्त(शहर) यांनी म्हाडा प्राधिकरणास "ना हरकत प्रमानपत्र" देण्यात येणार नाही असे पत्र पाठवणे, तसेच आमदार/खासदार यांचा नागरि-सुविधाचा विकास निधी महापालिकेस वर्ग करावा असे संबंधित पत्रात नमूद करणे,तसेच म्हाडा प्राधिकरणास निधी वर्ग करण्याच्या प्रचलित नियमानुसार आमदार/खासदार यांनी शिफारस केलेल्या कामांना महापालिकेकडून म्हाडाला पाच ते सहा महिने "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येत नसणे,त्यामुळे अनेक नागरी-सुविधांची कामे प्रलंबित असणे, परिणामी विधीमंडळ सदस्याच्या हक्काचा निधी त्यांनी शिफारस केलेल्या कामांना न वापरता महापालिका आपल्या मर्जीने सदर निधी वापरण्याची शक्यता निर्माण होणे,त्यामुळे शासनाने महापालिकेचा सदर प्रस्ताव तात्काळ रद्द करून नागरी-सुविधांच्या कामाकरिता म्हाडा झोपडपट्टी सुधार मंडळास निधी वर्ग करण्याची प्रचलित पद्धत सुरु ठेवण्याच्या अनुषंगाने तातडीने महापालिकेस सूचना देण्याची आवश्यकता."

---

**मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

खासदार व आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत मा.संसद सदस्य व मा.विधानमंडळ सदस्य यांनी प्रस्तावित केलेली कामे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर केली जातात व कामांचा निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून म्हाडा प्राधिकरणास/SRA सदरची कामे पूर्ण करुन घेण्यासाठी वितरीत केला जातो. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणा-या कामांच्या समरूप स्वरूपाची कामे म्हाडा प्राधिकरणामार्फत करण्यात येतात. सदर कामांपैकी जास्तीत जास्त कामे Load Bearing Structures या प्रकाराची असतात. सदर Load Bearing Structures च्या कामांकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील जमिनींवर कामे करण्याच्याआधी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे संबंधित कार्यालयाकडून संबंधीत यंत्रणेकडून रितसर ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन कामे करणे आवश्यक आहे.

तथापि, म्हाडा प्राधिकरणामार्फत करण्यात येणा-या कामांमध्ये म्हाडा कायदा १९७६ च्या कलम १०८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित प्रक्रियेचे अवलंबन न करता, महानगरपालिका उद्याने, पदपथ, झोपडपट्ट्यामधील पायवाट सुधारणा, शौचालय, वाहतुक बेटांचे सौंदर्यीकरण, पुलांखालील मोकळया जागा, भिंतीचे सौदर्यीकरण, पर्जन्य जल वाहींन्याची कामे इ. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाची आवश्यक ना हरकत न घेता करण्यात येतात अशा स्वरूपाच्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होतात. सदर कामाच्या दोष दायीत्व कालावधीत निर्माण होणाऱ्या दोषाचे निराकरण म्हाडामार्फत वेळोवेळी होत नाही. यानुसार परिमंडळ-२ कार्यक्षेत्रातील काळात, म्हाडा प्राधिकरणामार्फत, बृहन्मुंबई महानगरपालिकेची ना-हरकत प्राप्त न करताच २८ कामे केल्याचे आढळून आले आहे. यापैकी म्हाडा प्राधिकरणाने ५ ठिकाणी केलेल्या नियमबाह्य कामांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निष्कासन करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरी सुविधांची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडूनच प्रामुख्याने करण्यात येतात. यास्तव, म्हाडा प्राधिकरणास महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा बृहन्मुंबई महानगरपालिकेस वर्ग केल्यास उपरोक्त नागरी सुविधांची कामे अधिक सक्षमपणे पार पाडण्यास सुसूत्रता येईल आणि एकाच नियोजन प्राधिकरणाच्या अंतर्गत सर्व कामे पूर्ण झाल्यास पायाभूत सुविधा योग्य प्रकारे विकसित होण्यास मदत होईल अशी महानगरपालिकेची धारणा आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ यानुसार मुलभूत नागरी सुविधा आणि महानगरपालिकेच्या कर्तव्यांची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडूनच करण्यात येतील असे म्हाडा प्राधिकरणास आणि जिल्हाधिकारी तथा सचिव, जिल्हा नियोजन आणि विकास समितीस कळविण्यात आले आहे.

****

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. संजय उपाध्याय, सन्मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२००६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई उपनगर जिल्हयातील वांद्रे-पुर्व या भागात 'तीन बंगला झोपडपट्टी' असणे, सदर झोपडपट्टीच्या जागेचा मिळकत पत्रिकेवर न.भू.क्र. ४१९, क्षेत्रफळ २४२.६ चौ. मी. असून, धारक सदरी फेरफार क्रमांक २३ नुसार वेस्टर्न रेल्वेच्या नावाची नोंद असणे, परंतू भूमापन क्रमांक ४१९ चे क्षेत्रफळ, त्यावरील वेस्टर्न रेल्वेचे नाव तसेच येथील झोपडपट्टी पुनर्वसन बाबीं विषयी 'तीन बंगला झोपडपट्टी रहीवाशी परिवर्तन सहकारी गृहनिर्माण संस्था' (नियो) चे पदाधिकारी यांची हरकत असणे, तीन बंगला झोपडपट्टीची व लगतची जागा ही मो. र. नं. ८४७/ २०१३ अन्वये मोजणी करण्यात आलेली असणे, त्यानुसार या आर्णी लगतच्या जागांना न.भू.क्र. ६७६, ६७७, ६७८ देण्यात आलेला असणे, नगर भूमापन अधिकारी वांद्रे यांच्या दिनांक २३/०९/२०२४ रोजीच्या पत्रानुसार न.भू. क्र. ४१९ व नव्याने तयार केलेला न.भू. क्र. ६७६ यांची जागा एकच असून, या दोन्हींचे मिळकत पत्रिकेवरील क्षेत्रामध्ये तफावत असून, दुरुस्तीप्रमाणे त्याचे क्षेत्र २३९१२.०० चौ.मी. असणे, असे असतानाही विकासक हे सदर जागा गावठाण घोषित करुन, सक्षम प्राधिकारी यांची परवानगी न घेता तसेच रेल्वेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न करता तीन बंगला झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करीत असणे, याबाबत शासनाची करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

## मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

नगर भूमापन वांद्रे पूर्व येथील न.भू.क्र. ४१९ चे मिळकत पत्रिकेवर क्षेत्र २४२.६० चौ मी. दाखल असून धारक सदरी वेस्टर्न रेल्वे यांचे नावाची नोंद दाखल आहे. मो.र.नं.८४७/ २०१३ अन्वये करणेत आलेली मोजणी व जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे आदेश क्र.सी/कार्या-२क/कलम २०(२)/ एस.आर. ३४/१३, दिनांक ११/११/२०१३ अन्वये न.भू.क्र.६७६, ६७७, ६७८ चे क्षेत्र अनुक्रमे २३९१२.०० चौ.मी., ६०४६९४.०८ चौ.मी. व १९९३६४.०० चौ.मी. याप्रमाणे मिळकत पत्रिका उघडण्यात येऊन धारक सदरी "पश्चिम रेल्वे" यांचे नाव दाखल करण्यात आले आहे. सदर मूळ न.भू.क्र.४१९ व नव्याने तयार झालेल्या न.भू.क्र. ६७६ ही मिळकत एकच असून नकाशा प्रमाणे त्याचे क्षेत्र २३९१२.०० चौ.मी. येत आहे. सदर मिळकतींच्या मिळकत पत्रिकेवर धारक सदरी "पश्चिम रेल्वे" यांचे नाव दाखल आहे. सबब सध्याचे अभिलेख पाहता, न.भू.क्र. ४१९, ६७६, ६७७, ६७८ चे मिळकत पत्रिकेवर धारक सदरी "पश्चिम रेल्वे" यांचे नाव दाखल आहे. तसेच न.भू.क्र.४१९, ६७६ या मिळकतीमध्ये असलेल्या झोपडपट्टी बाबतचा पुर्नविकास तथा संबंधीत संस्था / धारकाचे ना-हरकत प्रमाण पत्र घेणे इत्यादी बाबी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) यांचेशी संबंधीत आहेत. याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांचे अभिप्राय मागविले असता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक १२/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये या मिळकतीवरील पुनर्वसनाबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नसल्याचे कळविले आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्रमांक २०२३

**श्री. भास्कर जाधव , मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२३ पुढीलप्रमाणे आहे:-**

"बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभाग हद्दीतील जुहूतारा रोड मुंबई येथील "सो हो हाऊस" या पंचतारांकित हॉटेल चे बांधकाम करताना कोस्टल रेगुलेशन झोनचे उल्लंघन करणे, केवळ पंचतारांकित हॉटेलसाठी त्यावेळेस २ चटई क्षेत्र निर्देशांक मिळत असताना सदर थ्री स्टार निवासी हॉटेल इमारतीस २.५ जास्त चटई क्षेत्र निर्देशांक देऊन भोगवटा प्रमाणपत्र देणे हे पर्यावरण कायदा १९८६ चे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास येणे, सद्यस्थितीत या निवासी हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम झालेले असणे व त्यावर कोणतीच कारवाई महानगरपालिकेने केलेली नसणे, अनेक नगरसेवक, पर्यावरण प्रेमी एड.राजेश दाभोळकर यांनी तक्रार करूनही कोणतीच कार्यवाही न करणे तसेच माहितीचा अधिकारात वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी त्यांच्याकडील सदर परवानगीची फाईल हरवलेली असल्याचे उत्तर देणे, प्रॉपर्टी टॅक्स विभागाकडून टॅक्स गोळा करण्यासाठी कोणतीच कार्यवाही न करणे, सदर हॉटेलमध्ये राजरोसपणे दिवसरात्र अनधिकृतपणे पब चालू असण्यावर कोणतीच कारवाई न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया .

---

**मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभाग हद्दीतील जुहूतारा रोड मुंबई येथील "सोहो हाऊस" या भुखंडावर निवासी लकझरी हॉटेलच्या बांधकामाकरिताचा प्रस्ताव व नकाशे दि.०७ ऑगस्ट २००६ रोजी भुखंडाचे क्षेत्रफळ १ चटई क्षेत्राकरिता महानगरपालिकेद्वारा मंजुर करण्यात आले होते. त्याकरिता दि.१३ जुलै २००६ रोजी CRZ ना हरकत प्रमाणपत्रास अनुसुरून इमारतीला दि.२९ सप्टेंबर २००६ रोजी जोते बांधकाम प्रमाणपत्र व दि.२२ ऑक्टोबर २००७ रोजी बांधकाम प्रमाणपत्र देण्यात आले. तत्पश्चात १ FSI भुखंडाचे क्षेत्र अधिक अतिरीक्त शंभर टक्के चटई क्षेत्र अशा एकूण २ चटई क्षेत्राकरिता शासनाने दि. १२ फेब्रुवारी २००८ रोजी मंजूरी दिली त्यासअनुसरुन दि.०१ ऑगस्ट २००८ रोजी सुधारीत नकाशे मंजुर करण्यात आले. त्यानुसार दि.१० जुलै २००९ रोजी सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. परंतु तत्कालीन धोरणानुसार इमारत पुर्णत्वाचा दाखला (B.C.C.) देण्यात आल्याचे महानगरपालिकेच्या अभिलेख्यात दिसुन येत नाही.

दि.०५ ऑगस्ट २००९ रोजी शासनाने मंजुर २ FSI व्यतिरिक्त अधिकचा ५०% म्हणजे १ मुळ भुखंड क्षेत्र अधिक १.५ अतिरीक्त क्षेत्र असे एकूण २.५ चटई क्षेत्र वापरण्यास मंजुरी दिल्याने चटई क्षेत्र २.५ साठी सुधारीत नकाशे दि.२४ ऑक्टोबर २०११ रोजी मंजुर करण्यात आले. महाराष्ट्र किनारा क्षेत्र नियमन प्राधिकरण (MCZMA) च्या ७० व्या बैठकीच्या इतिवृत्तातील अनुक्रमांक ११ अन्वये

सीआरझेड अनुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत MOEF ला शिफारस करण्यात आल्याचे महानगरपालिकेकडील अभिलेख्यात दिसून येते.

हॉटेल "सो हो हाऊस" यास महानगरपालिकेच्या वैदयकीय आरोग्य अधिकारी कार्यालयातर्फे उपहारगृह व निवासी हॉटेल करिता सन २०१७ साली आरोग्य अनुज्ञापन जारी करण्यात आले आहे. तसेच सदर आस्थापनेकडे अग्नी सुरक्षा अनुपालन प्रमाणपत्र आहे. सदर हॉटेल "सो हो हाऊस" संबंधित मूळ मंजुरीची नस्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेख्यातून हरवलेली असल्याने दि.१३ मार्च २०२५ रोजी डी. एन. नगर पोलीस ठाण्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ऑनलाईन तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. तसेच सदर नस्ती चा शोध घेण्याकरीता महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालयाकडे शोधण्याकरीता पत्रव्यवहार करण्यात आला असुन नस्तीची दुय्यम प्रत तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर सुरु आहे.

हॉटेल "सो हो हाऊस" संदर्भात नागरिकांकडून महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी (MOH), विभाग कार्यालयास कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि आरोग्य विभागाकडून नियमित तपासणी मध्ये नियमांचे उल्लघंन झाल्याचे आढळल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

सो हो हाऊस येथील अनधिकृत बांधकामाबाबतची तक्रार महानगरपालिकेच्या अभिलेखात आढळून येत नाही. तथापि सो हो हाऊस या पंचतारांकित हॉटेलचे मंजूर नकाशानुसार स्थळ निरीक्षण केल्यानंतर मंजूर नकाशाव्यतिरिक्त काही अनधिकृत बांधकाम निदर्शनास आल्यास महानगरपालिका कायदा १८८८ किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये कारवाई करण्यात येईल.

महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून "सो हो हाऊस" ही इमारत बेसमेंट + तळमजला + ११ मजल्याची पंचतारांकित हॉटेलची व्यवसायिक मालमत्ता असून सदर मालमत्तेच्या मालमत्ता कराची देयके डॉ. मुराद धनजीशाह उर्मिगर यांच्या नावे वितरित करण्यात येत असून सदर पक्षकाराने दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत रू.१३,७०,५०,५१३/- एवढ्या मालमत्ता कराचे पुर्ण अधिदान केलेले आहे. सन २०२५-२६ मधील दि.०१ एप्रिल २०२५ ते दि.३० सप्टेंबर २०२५ या कालावधीतील देयकाची देय रक्कम रू. ८३,०३,९८५/- व दि. ०१ ऑक्टोबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीतील देयकाची देय रक्कम रु.८३,०३,९८५/- तसेच असे एकूण रू.१३,९२,२७,४७३/- एवढ्या रक्कमेचे मालमत्ता कराचे देयके संबधितांना बजावण्यात आली आहेत.

****

लक्षवेधी सूचना क्र. २१७२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. अबु आझमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१७२ खालीलप्रमाणे आहे:**

" महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका हद्दीतील रस्तारुंदीकरण मध्ये निष्कासीत केलेले वाणिज्य वापरातील गाळ्यांचे अजूनही महानगरपालिका नगरपालिकांकडून पुनर्वसन झालेले नसणे, असे अनेक लोकांच्या उपजीविकेवरती हातोडा मारुन त्यांना देशोधडीला लावलेले असणे, रस्तारुंदीकरण मध्ये गेलेल्या पीडीत गाळेधारकांनी वर्षानुवर्षे पुनर्वसनासाठी कित्येकदा महानगरपालिकांकडे दाद मागितली असून कुठलेही पुनर्वसनबाबत ठोस कार्यवाही होत नसणे, भिवंडीतील शिवाजी चौक येथील १४ गाळेधारकांनी मा. उच्च न्यायालयात दाद मागितली असता पुनर्वसन निष्कासीत जागेतच करण्याचे उच्च न्यायालयाच्या आदेश असतांना महापालिकेने त्यांना निकृष्ट दर्जाच्या अयोग्य एका मोठ्या नाल्यावर पुनर्वसन करण्याचे ठरवले असणे, म्हणून गाळेधारकांनी दिनांक २६/१२/२०२४ रोजी महापालिकेकडे तक्रार करुन विरोध दर्शविले असणे, तक्राराची पार्श्वभूमी पाहता तक्रारीच्या अनुषंगाने गाळेधारकांना निष्कासित केलेल्या ठिकाणीच पुनर्वसीत करणे अपेक्षीत असणे, भुमिअभिलेख नकाशात तफावत असलेल्या टॅक्सी स्टॅण्ड आरक्षणमध्ये बांधलेल्या इमारतीसाठी इमारतीच्या बाजुला गाळे पुनर्वसीत होऊ नये म्हणून गैरव्यवहारातुन गैरकायदेशीर खटाटोप करुन नोटीस न देता गाळे तोडले असणे, या १४ गाळेधारकांचे तात्काळ निष्कासीत मोकळ्या जागेतच पुनर्वसन करुन त्यांचे उपजीविकेचे साधन पुनर्जिवीत करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

भिवंडी निजामपूर नगरपालिकेने सन १९९१-९२ साली १) निजामपूर पोलिस स्टेशन आरक्षण क्र. ७० (नाटयगृह) ते ठाणगे आळी घर नं. ७४ पर्यत २) पारनाका ते फायर बिग्रेड क्र. १ कासार आळी पर्यत सार्वजनिक रस्ता रुंदीकरणात बाधित होणा-या ३४ गाळेधारकांना महासभा ठराव क्र. ४७८ दि.१७ मार्च, १९९२ व ठराव क्र. १२१ दि. १२ ऑक्टोबर, १९९८ नुसार शिवाजी चौक ते कांबा रोड स्मशानभुमी जवळ सि.स.नं. ३२८० लगतच्या परिसरात तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी जागा देण्यात आली आहे. त्यानंतर महानगरपालिकेमार्फत सदरची जागा सुध्दा रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित झाल्याने महानगरपालिकेनी त्या ठिकाणी असलेल्या गाळे धारकांना बांधकाम परवानगी / मालकी हक्काचे कागदपत्र सादर करण्याबाबत पत्र देण्यात आले होते. त्यानुसार गाळे धारक यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र सादर न केल्याने दि. २४ जानेवारी, २०२० रोजी मनपा मार्फत सदर गाळे निष्कासीत करण्यात आलेले आहेत.

३४ गाळेधारकांपैकी १४ गाळेधारकांनी पर्यायी जागेची मागणी केली. तथापि, पर्यायी जागा उपलब्ध करुन न दिल्यामुळे १४ गाळे धारकांपैकी १२ गाळे धारकांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. १०६३०/२०२३ दाखल करुन पुर्नवसन करण्याची मागणी केली होती. न्यायालयाच्या निर्णयानुसार जागा उपलब्ध करुन न दिल्यामुळे मा. उच्च न्यायालयात अवमान याचिका क्र. २२४०२/२०२४ दाखल करण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने शिवाजी चौक कांबा

रोड, अजयनगर येथील १४ गाळे धारकांचे पुर्नवसन अजयनगर रोड येथील मनपाचे सविता जगताप मार्केट येथे तयार असलेल्या ठिकाणी करण्यास प्रशासकीय ठराव क्र. ७०७ दि. २० डिसेंबर, २०२४ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने १४ गाळेधारक यांना १५ दिवसात गाळा धारक असल्याचे कागदपत्र सादर केल्यानंतर सदर कागदपत्रांची छाननी करुन नियमानुसार पुर्नवसन करण्यात येईल असे महानगरपालिकेकडून दि.२३ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. तथापि, संबधित गाळे धारकांनी कोणत्याही प्रकारे कागदपत्रे सादर केलेली नाहीत व शिवाजी चौक येथील सविता जगताप मार्केट मधील जागा पुर्नवसनाकरीता मान्य नसल्याचे सबंधितांनी दि. २६ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले आहे.भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मौजे भिवंडी येथील स. नं. १०१ सि.स.नं. ३२८० ही जागा श्री. अनंत गोविंद भोईर व इतर १ तर्फे कुलमुखत्यारपत्र धारक व विकासक मे. कनक रियल्टी तर्फे श्री. हरेश काळूराम टावरे यांच्या मालकीची असून, उक्त जागेवर मंजूर विकास योजनेचे आरक्षण क्र. ३२ (टॅक्सी स्टॅण्ड) दर्शविण्यात आलेले आहे त्यामुळे या ठिकाणी १४ गाळे धारकांचे पुर्नवसन करणे शक्य नसल्याने, सदर गाळा धारकांनी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर नियमानुसार पात्र ठरणाऱ्या गाळे धारकांचे सविता जगताप मार्केट या ठिकाणी पुर्नवसन करण्यात येणार आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना क्रमांक २२०२**

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुरेश (राजूमामा) भोळे,वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम **१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील नागेश्वर कॉलनी येथे दिनांक १ जून २०२५ रोजी, अंगणात खेळत असलेल्या आरव संदीप गायकवाड (वय ४) या बालकावर भटक्या श्वानांनी अचानक जीवघेणा हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याने त्याचा मृत्यू झाला असणे, या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असणे, स्थानिक नागरिकांनी महापालिकेकडे अनेक वेळा तक्रारी करूनही भटक्या कुत्र्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नसणे, मृत बालकाच्या उपचारात विलंब होऊन त्याला योग्य वेळेत वैद्यकीय मदत मिळाली नसणे, शहरात वारंवार यासारख्या गंभीर घटना घडत असणे, मनपा मार्फत श्वानांचे निर्बीजीकरण, पकड मोहिमा, जनजागृती किंवा ठोस उपाययोजना यांचा पूर्णतः अभाव असणे, शहरातील नागरिकांमध्ये व लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असणे, सदर घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून जळगांव महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही व भटक्या प्राण्यांच्या निर्बिजीकरण व पुनर्वसनासाठी निधी आणि ठोस योजना अंमलात आणण्याच्या दृष्टीने यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."**

## मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) महोदयांचे निवेदन

**दि.०१.०६.२०२५ रोजी हिंसक श्वानांच्या** हल्ल्यात जखमी झालेल्या बालकाचा दुर्दैवी मृत्यु झालेला आहे. मनपा मार्फत भटक्या व मोकाट कुत्र्यांवर मक्तेदार मार्फत दि.२३.०७.२०२१ ते दि.०४.०३.२०२४ पर्यंत एकूण २७,०६४ श्वानांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्यात आलेली होती. तसेच जळगांव शहरातील भटक्या मोकाट कुत्र्यांच्या नसबंदी व शस्त्रक्रिया करणेकामी यापुर्वी तीन वेळा ई-निविदा प्रसिद्ध करुनसुद्धा प्रतिसाद न मिळाल्यामुळे चौथ्या वेळी ई-निविदा क्रं. ०९ /२०२५-२६ दि.०२.०६.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असुन पात्र निविदाधारकांपैकी L१ निविदाधारक उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांनी दर विश्लेषण सादर केलेले असुन त्यांचेसोबत करारनामा व कार्यादेश देण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

मृत बालकाच्या उपचारात विलंब होऊन त्याला योग्य वेळेत वैद्यकिय मदत मनपाशी निगडीत नसुन जळगांव शहरातील दि.०१.०६.२०२५ रोजी हिंसक श्वानांच्या हल्ल्यात ४ वर्ष बालकाचा दुर्दैवी मृत्यु झालेला असून बालकाच्या वडीलांनी आर्थिक मदत मिळणे कामी दि.१८.०६.२०२५ रोजी म.न.पा.कडे अर्ज दिलेला असून सदर अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जळगांव यांना दि.१८.०६.२०२५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

शहरात अश्या प्रकारच्या घटना घडत असल्यामुळे जळगांव शहरातील भटके व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे कामी ई-निविदा क्रं. ०९/२०२५-२६ ची प्रक्रिया अंतिम होई पर्यंत १. अध्यक्ष, संरक्षणम् गो-पशु सेवा संस्था, जळगांव २. मे. नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार यांनी शहरातील श्वानांना पकडून उपायुक्त जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय, जळगांव यांचे मार्फत दैंनदिन किमान ५ श्वांनावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया व अँटी रेबीज लसीकरण देवून वरील संस्थांनी ५ दिवसांसाठी औषधी उपचार करणे व दिवसांतून दोन वेळा खानपान व्यवस्था करुन पुर्ववत ठिकाणी सोडणे कामी तात्पुरत्या स्वरुपाची परवानगी देण्यात आलेली असून आज पावेतो हिंसक २० श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया अँटी रॅबीज लसीकरण करण्यात आलेली आहे.

शहरातील नागरिकांमध्ये व लहान मुलांमध्ये भितीचे वातावरण कमी करण्याच्या दृष्टीने भटक्या मोकाट श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणेकामी मनपामार्फत ई-निविदा वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात आलेली असुन विभागामार्फत कोणताही हेतूपरस्पर हलगर्जीपणा अथवा दिरंगाई करण्यात आलेली नसुन वेळोवेळी विभागामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

जळगांव शहरातील भटक्या व मोकाट श्वानांवर निर्बिजीकरण व शस्त्रक्रिया करणेसाठी सन २०२५-२६ अंदाजपत्रकात रुपये १ कोटी २५ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे.

**************************************************************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २२२४

**श्री. अशोक धर्मराज पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२२४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई उपनगरातील भांडुप पश्चिम येथे रस्त्यांच्या अडचणीमुळे विकासक पुढे न येणे, भांडुप पश्चिम येथील टेंभीपाडा रोड, जंगल मंगल रोड, क्वारी रोड, गावदेवी रोड तसेच हनुमान नगर रोड याचे अंतिम आराखडा प्रस्ताव तयार असणे, प्रकल्पासाठी पात्र होणाऱ्या नागरिकांची भांडुप पश्चिम येथील ओबेरॉय एल.बी.एस मार्ग येथे उपलब्ध होत असलेल्या ८८० रहिवासी वा ८० व्यावसायिक गाळे हे संपूर्ण प्रकल्पग्रस्तांसाठी वापरावेत अशी मागणी असणे, या प्रकरणी भांडुप पश्चिम विभागातील नागरिकांमध्ये शासन पुरती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

<u>मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन आराखडा-२०३४ नुसार,भांडूप (पश्चिम) येथील टेंभीपाडा रोड, जंगल मंगल रोड, क्वारी रोड,गावदेवी रोड तसेच हनुमान नगर रोड हे अस्तित्वात असलेले रस्ते असून अनुक्रमे १३.४० मीटर, २३.८० मीटर,२३.८० मीटर आणि २७.४० मीटर ह्या रस्ते व वाहतूक विभागाच्या नियमित रेषांनी बाधित आहेत.

नागरी प्रकल्पात बाधित होणा-या निवासी बांधकाम धारकांना पर्यायी सदनिका वितरीत करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनाक २७ जानेवारी २०२५ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार परिमंडळ ६ मधील उपलब्ध/ निर्माण होत असलेल्या पीएपी सदनिकांपैकी उपलब्धेतेनुसार प्रकल्पग्रस्तांना देण्यात येत आहेत.

भांडूप गावातील नगर भूमापन क्रमांक २९१/बी/१, २९१/बी/२, २९१/बी/३, व २९१/बी/४ वरील खाजगी भूखंडावर डीसीपीआर २०३४ च्या विनियम क्र.३३(२०) बी अन्वये विविध प्रकल्पांमध्ये बेघर झालेल्यांचे पुनर्वसन आणि पुनर्स्थापन करण्याकरीता परवडणारी घरे बांधण्याची परवानगी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिली आहे. या प्रकल्पामध्ये ८४० रहिवासी सदनिका व ८० व्यावसायिक गाळे बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासापेक्ष दि.२७ मे २०२५ रोजी भोगवटा प्रमाणपत्र जारी केले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेस मेसर्स ओबेरॉय रिॲल्टी यांच्याकडून बांधिव ८४० रहिवासी सदनिका व ८० व्यावसायिक गाळे हस्तांतरणाचा प्रस्ताव प्राप्त झाला असून मालकी शिर्षक प्रमाणपत्र करीता महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

******

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

सूचना क्र. २३६३

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. नरेंद्र मेहता, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मिराभाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्या न्यायहक्काच्या विविध मागण्या प्रलंबित असणे,यामध्ये सा.आ विभागातील डॉक्टरांना अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती देणे, वैद्यकीय अधिकारी पदे भरणे,आरोग्य कर्मचारी यांना १५०० रुपये फिरता भत्ता लागू करणे,आशा वर्कर यांच्या मानधनात वाढ करणे, औषध निर्माण अधिकारी पदाची वेतनश्रेणी लागू करणे,आस्थापना विभागातील शासनाकडे सादर केलेला आकृतीबंध मंजूर करून घेणे,सचिव विभागाकरीता समिती अधिक्षक पद मंजूर करून घेणे,उपसचिव पदाच्या नेमणुकीची अर्हता व नेमणुकीच्या पद्धतीमध्ये बदल करून घेणे,सेवानिवृत्त यांना ७ वा वेतन आयोग फरकाची रक्कम अदा करणे,सफाई कर्मचा-यांना मोफत घर देणे, शासन निर्णयानुसार संगणक चालक यांना महापालिका सेवेत सामावून घेतल्यानुसार उर्वरित १३ संगणक चालक व लिपिक यांना कायम करणे, पदोन्नती देणे, अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरणे, त्यांना सर्व लाभ देणे, १०० अस्थायी कर्मचा-यांना फायरमन पदावर समाविष्ट करून घेणे,शहराच्या दृष्टीने वाढीव कर्मचारी पदनिर्मितीचा प्रस्ताव तयार करणे, पाणीपुरवठा व मलनिस्सार विभागातील मनुष्यबळ वाढीचा प्रस्तावास मंजुरी घेणे,मेस्त्री,प्लंबर व फिटर यांना देखील पदोन्नती देणे व अग्निशमन विभागाप्रमाणे अतिरिक्त कामाचा मोबदला देणे,या संदर्भात स्थानिक कर्मचारी संघटना व लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त मिभा मनपा यांच्याकडे सातत्याने मागणी करून देखील आयुक्त यांचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

## मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये कार्यरत डॉ. प्रमोद विठ्ठलराव पडवळ, वैद्यकीय अधिकारी यांना दि. १४/०६/२०२२ रोजी माता व बालकल्याण अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. तसेच, वैद्यकीय अधिकारी या पदावरुन वैद्यकीय अधिक्षक या पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

वैद्यकीय अधिकारी पद वर्ग-१ चे पद असल्याने सदर पदाची बिंदूनामावली नगरविकास विभागाकडून तपासणे आवश्यक असते. सबब सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याने व बिंदूनामावली तपासणी करणेकरीता विलंब होणार असल्याने बिंदुनामावलीनुसार सद्यस्थितीत ०३ वैद्यकीय अधिकाऱ्यांची ठोक मानधानावर नियुक्ती करण्यात आली असून रिक्त असलेल्या पदांची जाहीरात काढून ठोक मानधनावर घेण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

महासभा क्र.१०६ अन्वये ठराव दि. १८/०१/२०१६, ठराव क्र.१०६ अन्वये, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तृतीय व चतुर्थ श्रेणी संवर्गातील कर निरिक्षक, वरिष्ठ लिपीक, लिपीक, सर्व्हेअर, स्वच्छता निरिक्षक, कनिष्ठ अभियंता तसेच शिपाई व इतर चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना महापालिकेच्या कामकाजानिमित्त कार्यालय सोडून मनपा क्षेत्रात अथवा मनपा क्षेत्राच्या बाहेर मुंबई ठाणे येथे फिरती करावी लागते तसेच ज्या कर्मचाऱ्यांना वाहन उपलब्ध करुन दिले जात नाही अशा कर्मचाऱ्यांना रु.१२००/- प्रती महिना फिरती भत्ता देय आहे. त्याअनुषंगाने मनपा आस्थापनेवरील आरोग्य विभागातील स्थायी ३३ प्रसविका (ANM) कर्मचारी यांना प्रति महा फिरती भत्ता अदा करण्यात येत आहे.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियाना अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रात कार्यरत आशा स्वयंसेविका यांना रु.६०००/- मानधन लागू करण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त शासनामार्फत कामावर आधारित मोबदला अंदाजित रु.७०००/- असे एकुण रु.१२,०००/- ते रु.१३,०००/- मानधन मिळते.

मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर आकृतीबंध २०१९ मध्ये नमुद असलेली वेतनश्रेणी कार्यरत औषध निर्माण अधिकारी यांना लागू करण्यात आलेली आहे. शासन निर्णय दि.२५ जानेवारी, २०२३ नुसार उपसचिव पदासाठी विहीत केलेल्या अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीमध्ये बदल करण्यात आलेले आहेत.माहे मार्च-२०२५ च्या सेवानिवृत्ती वेतनामध्ये सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग चौथा हप्ता प्रदान करण्यात आलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेतील एकुण २१० सफाई कामगारांना मोफत सदनिका देणेबाबत मा. जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडून दि. १४/०३/२०२४ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार १८ पात्र लाभार्थ्यांना सदनिका वाटप पत्र देण्यात आलेले आहे व उर्वरित पात्र लाभार्थ्यांना सदनिकेच्या उपलब्धतेनुसार मोफत सदनिका देणेची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

दि. १६/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकुण ६४ अस्थायी संगणक चालक व लघुलेखक कर्मचाऱ्यांपैकी ५१ संगणक चालक यांची अधिसंख्य पदे निर्माण करुन त्यांना मनपा सेवेत कायम नियुक्ती देण्यात आलेली आहे.

श्री. यशवंतराव देशमुख, कनिष्ठ अभियंता यांचेबाबत मा. न्यायालयाचा निर्णय पारित झालेला असुन विभागीय चौकशीचा अंतिम निर्णय प्रलंबित आहे. श्री. श्रीकृष्ण मोहिते, कनिष्ठ अभियंता यांचे प्रकरण मा. न्यायालयामध्ये निर्णय प्रलंबित असल्याने त्यांचे विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीचा अंतिम निर्णय प्रलंबित आहे. श्री. स्वप्निल सावंत, सहा. आयुक्त यांचा ०२ प्रकरणामध्ये विभागीय चौकशीचा अंतिम निर्णय प्रलंबित आहे. सदर अधिकारी यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेनंतर चौकशीच्या निर्णयानुसार त्यांना पदोन्नती देण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्याचे नियोजित आहे. तसेच, श्री. प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांना शाखा अभियंता विद्युत या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनवरील अग्निशमन विभागातील सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी, चालक-यंत्रचालक व अग्निशामक या रिक्त पदांची सरळसेवेने पद भरती प्रक्रिया राबविणेकरीता TCS कंपनीची नियुक्ती करण्यात आलेली असून भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरु केलेली आहे.पाणीपुरवठा व मलनिःसारण विभागास आवश्यकता असल्यास त्यानुसार अनुषंगीक मनुष्यबळ वाढीबाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

मिरा भाईंदर मंजूर आकृतीबंध व सेवाप्रवेश' (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ नुसार मेस्त्री, प्लंबर व फिटर या पदाकरीता वरिष्ठ पद मंजूर/उपलब्ध नसल्याने पदोन्नती अनुज्ञेय नाही.

दि.१२/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांना अतिरीक्त कामाचा मोबदला देणेबाबतचा अहवाल देणेबाबत पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागास कळविले असून त्यानुसार अतिरिक्त कामाचा मोबदला देण्याचे प्रस्तावित आहे.

***

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २३६५

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३६५ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई दादर येथील इंदुमिल मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक तयार करण्यात येत असून हे स्मारक लाखो अनुयायांचे श्रध्दास्थान असणे, सदर स्मारकाचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता असून स्मारकापासून ५०० मीटर अंतरावर असलेल्या "अशोक स्तंभ ते चैत्यभूमी मुख्य स्तूप" या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी सध्याच्या रस्त्याच्या समुद्राकडील बाजूची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत पर्यावरण विभागाची परवानगी मिळण्यासाठी शासनस्तरावर मागणी केली असता, याबाबत दि.१९ जून,२०२५ रोजी मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांच्या दालनात घेण्यात आलेली बैठक सदरहू रस्त्यामुळे चैत्यभूमीसाठी येणाऱ्या हजारो नागरीकांना सोयीचे होणार असून वीर सावरकर मार्गावर होणारी गर्दी रोखण्यासाठी सदरचा रस्ता अत्यंत महत्वाचा असणे, परंतु याकडे महानगरपालिकेचे तसेच पर्यावरण विभागाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

दादर (प.) येथील चैत्यभूमीलगत असलेल्या अशोक स्तंभ ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय भव्य स्मारक (इंदू मिल) या प्रस्तावित रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक असलेली समुद्राकडील बाजूची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे.

सदर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी समुद्राकडील बाजूची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे विनामूल्य हस्तांतरित करण्याकरिता महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना दि.१ मार्च २०२३ रोजी विनंती केली आहे. संचालक, पर्यावरण व वातावरण बदल यांना सीआरझेड ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय देण्याबाबत दि. ११ जून २०२५ रोजी महानगरपालिकेद्वारे विचारणा करण्यात आली आहे.सदर, जमीन महानगरपालिकेस हस्तांतरित झाल्यानंतर आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या / ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही संबंधित प्रकल्प कार्यान्वित विभाग (Execution Department) / वापरकर्ता विभाग (User Department) यांच्या मार्फत कार्यवाही सुरू करणे शक्य होईल.

*****

लक्षवेधी सूचना क्र.२३९४

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.श्री.राजेश मोरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२३९४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"माझ्या मतदार संघातील खिडकाळी हा ठाणे महानगरपालिके अंतर्गत येत आहे. आत्तापर्यंत त्या गावात जी गावातील शेतकरी मंडळी राहतात त्यांनी आतापर्यंत गुरुचरण आणि शासनाच्या जागा शाबूत ठेवलेल्या आहेत. आणि ह्या गावातील जवळपास ३५० एकर जमिनीवर तसेच दिवा, आगासन आणि आजूबाजूच्या भागातील जमिनीवर जोर जबरदस्तीने महापालिकेने शैक्षणिक आणि इतर आरक्षण टाकण्यात आलेले आहे. त्यामुळे त्या गावातील भूमिपुत्रांची शेत जमीन आरक्षणात गेली आणि त्यामुळे तेथील शेतकरी हा देशोधडीला लागल्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेथील ग्रामस्थांचा कोणत्याही विकासाला विरोध नाही, परंतु ग्रामस्थांच्या अनेक जागांवर आरक्षण टाकली तर शेती व्यवसाय करायचा तरी कसा. सरकार एके ठिकाणी म्हणते शेतीला प्रोत्साहन द्या आणि त्यासाठी अनेक योजना राबवत असते. परंतु अशा प्रकारे ग्रामस्थांचा विरोध असताना सुद्धा मोठ्या प्रमाणात जर आरक्षण कायम ठेवले तर ग्रामस्थांचा सहन शक्तीचा उद्रेक होण्याची शक्यता आहे. तरी आपणाला सर्व ग्रामस्थांच्या वतीने कळकळीची विनंती आहे की, ठाणे महापालिकेने अन्यायकारकरित्या नवीन विकास आराखड्यानुसार जी आरक्षण दिवा शहर, आगासन आणि खिडकाळी गावांच्या जमिनीवर टाकली आहेत ती आरक्षणे रद्द करावी. तरी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी घेण्यात यावी."

### मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय . दिनांक ४ ऑक्टोबर १९९९ अन्वये ठाणे शहराच्या विकास योजनेस शासनाने मंजुरी देण्यात आली असून, तसेच विकास योजनेतील सारभूत स्वरुपाचे बदल म्हणून वगळलेल्या भागाच्या विकास योजनेस (Excluded Part) शासन निर्णय दिनांक ३ एप्रिल २००३ अन्वये शासनाने मंजुरी देण्यात आलेली आहे व सदर विकास योजना दिनांक १४ मे २००३ पासून अंमलात आली आहे.

ठाणे शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे आगासन येथे भारतीय रेल्वे कामगार संघटना (Indian Railway Workers Organization)चे आरक्षण वगळून सदर आरक्षणाखालील क्षेत्रावर "पोलिस स्टेशन, बस स्टँड, मार्केट, संप व Eleveted Storage Reservoir (ESR), प्रभाग कार्यालय, हॉस्पिटल, १५ मी रुंद रस्ता, पार्किंग, अग्निशमन केंद्र" ही आरक्षणे प्रस्तावित करणेकरीता, ठाणे महानगरपालिकेने कलम ३७ अन्वये वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन दिनांक १५/४/२०१७ च्या पत्रान्वये फेरबदल प्रस्ताव शासनास मंजुरीकरीता सादर केला होता. सदर महानगरपालिकेने कार्यान्वित केलेल्या कलम-३७ अन्वयेच्या फेरबदल प्रस्तावास शासनाने दि.३१/१/२०१८ रोजी मंजूरी दिलेली आहे. तसेच मौजे खिडकाळी येथे मंजूर विकास योजनेमध्ये "लो कॉस्ट म्यूनिसिपल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स" आरक्षणाखालील क्षेत्र व हरित विभागातील क्षेत्रावर "शैक्षणिक प्रयोजनार्थ (Education Purpose)" हे आरक्षण नव्याने प्रस्तावित करणेकरीता, महानगरपालिकेने कार्यान्वित केलेल्या कलम ३७(१) अन्वयेच्या फेरबदल प्रस्तावास शासन निर्णय दि.१/३/२०१९ अन्वये शासनाने मंजूरी दिलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत ठाणे शहराची विकास योजना सुधारित करणेकरीता अधिनियमांतर्गत वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन, ठाणे शहराची सुधारीत प्रारुप विकास योजना महानगरपालिकेने दिनांक ११/१०/२०२४ रोजी कलम २६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेने मंजूर विकास योजनेतील समाविष्ट उपरोक्त आरक्षणे प्रारूप सुधारित विकास योजना तयार करतेवेळी महानगरपालिकेने जशीच्या तशी पुन:श्च प्रस्तावित करुन सुधारीत प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द करताना सदर आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. तसेच मौजे दिवा येथे मंजूर विकास योजनेत प्रस्तावित आरक्षणाखालील क्षेत्र प्रारूप सुधारित विकास योजनेमध्ये कायम ठेवण्यात आले आहे. ठाणे महानगरपालिकेने भविष्यामध्ये लोकसंख्येत होणारी वाढ विचारात घेऊन सदर परिसरामध्ये रस्त्यांचे जाळे व नवीन आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

उक्त प्रारुप सुधारीत विकास योजना प्रसिद्ध झाल्यापासून विहित ६० दिवसांच्या मुदतीमध्ये सुमारे ७१४७सूचना/ हरकती ठाणे महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये मौ.दिवा, खिडकाळी व आगासन या गावातील रहिवाशांनी देखील हरकती/ सूचना दाखल केलेल्या आहेत. सदर सूचना/ हरकतीवर संबंधीतांना सुनावणी देऊन त्याबाबतचा अहवाल नियोजन प्राधिकरणाकडे म्हणजेच ठाणे महानगरपालिकेकडे सादर करणेकरीता, उक्त अधिनियमातील कलम २८ (३) अन्वये, संचालक, नगर रचना, पुणे यांनी दि.९/१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर नियोजन समितीवर नियुक्त करावयाच्या तज्ञ सदस्यांच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी त्यांचेकडील दि.१४/१/२०२५ रोजीचे आदेशान्वये सदर नियोजन समिती गठित केलेली आहे. सदर नियोजन समितीने दि.३/२/२०२५ ते ११/४/२०२५ या कालावधीमध्ये सर्व संबंधीतांना हरकत/सुचनाकारांना सुनावणी दिलेली आहे. हरकती/ सूचनेमध्ये उपस्थित मुद्दे तसेच सुनावणीवेळी मांडलेले म्हणणे विचारात घेऊन नियोजन समिती तिचा अहवाल ठाणे महानगरपालिकेस सादर करेल. तद्नंतर, अधिनियमातील कलम-२८(४) अन्वये ठाणे महानगरपालिकेने त्यावर निर्णय घेणे अभिप्रेत असून त्यानुसार ठाणे महानगरपालिकेने वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन कलम ३० अन्वये विकास योजना मंजुरीबाब प्रस्ताव शासनास सादर केल्यावर त्यावर शासनाने कलम ३१(१) अन्वये निर्णय घेणे अभिप्रेत असून, विकास योजनेस मंजुरी देताना शहराच्या हिताचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

****

<u>लक्षवेधी सूचना क्र. २१६७</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-2025 चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.शांताराम मोरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २१६७ पुढीलप्रमाणे आहे.**

"राज्यातील मुंबई उपनागततील मे. एम्पायर मैत्री फ्लोरा कन्स्ट्रक्शन एलएलपी या विकासकांनी महाराष्ट्र राज्य शासन राजपत्र दि. २८/८/२०१६ मध्ये सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २७ प्रसिद्ध झाला असून त्यामधील कलम ३ क नुसार, आदेशाच्या २५% रक्कम भरणा केले नसल्याची बाब उघडकीस येणे, या विकासकांने अनेक ठिकाणी केलेल्या कामाची गुणवत्ता राखली नसल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त असूनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करणे, आर्थिक व्यवहारांतून अधिकारी वर्गाला हाताशी धरून मनमानी कारभार करणाऱ्या या विकासाकडून मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याने त्याच्या पाठीशी अधिकारी वर्ग असल्याने जनतेचा शासनावरील उडालेला विश्वास, या विकासकावर त्वरित कारवाई करून नागरिकांना न्याय मिळावा या जनतेतून होत असलेल्या मागणीबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

..............................................................................................................................

## श्री. चंद्रशेखर बावनकुळे, माननीय मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मे. एम्पायर मैत्री फ्लोरा कन्स्ट्रक्शन एलएलपी यांनी अनधिकृत उत्खनन केल्याचे सिध्द झाल्याने तहसीलदार, कुर्ला (मुलुंड) यांनी दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या आदेशाने दंडात्मक आदेश पारित केलेले आहे. सदर आदेशाने व्यथित होऊन, मे. एम्पायर मैत्री फ्लोरा कन्स्ट्रक्शन एलएलपी यांनी दि. २२/०४/२०२५ रोजी उप विभागीय अधिकारी, पूर्व उपनगरे यांच्याकडे स्थगिती अर्ज व अपिल अर्ज दाखल केला होता. यानुषंगाने उप विभागीय अधिकारी, पूर्व उपगनरे यांनी दिनांक २८/०४/२०२५ नोटीस पत्रान्वये अपिलार्थी यांना शासन राजपत्र, दि.२२/०८/२०१६ मध्ये प्रसिध्द झालेला सन-२०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२७ मधील कलम ३ क नुसार तहसीलदार, कुर्ला यांच्या आदेशाप्रमाणे शासनाला देय रक्कमेच्या २५% रक्कम भरणा करण्याचे कळविण्यात आले होते. विकासकाने दंडाची रक्कम शासन जमा केली नसल्याने, उक्त अधिनियमाच्या कलम ३ क मधील परंतुकानुसार उप विभागीय अधिकारी, पूर्व उपनगरे यांनी मे. एम्पायर मैत्री फ्लोरा कन्स्ट्रक्शन एलएलपी यांचा स्थगिती अर्ज फेटाळला आहे.

तद्नंतर मे. एम्पायर मैत्री फ्लोरा कन्स्ट्रक्शन एलएलपी यांच्या अपिल अर्जावर उप विभागीय अधिकारी, पूर्व उपगनरे यांनी सुनावणी घेऊन, दिनांक १४/०७/२०२५ रोजी अंतिम आदेश पारित केले. सदर आदेशान्वये मे. एम्पायर मैत्री फ्लोरा कन्स्ट्रक्शन एलएलपी यांचा अपिल अर्ज फेटाळला असुन, तहसीलदार, कुर्ला यांचे दिनांक २१/०८/२०२४ रोजीचे आदेश कायम करुन गौण खनिज उत्खननाच्या दंडात्मक रक्कम वसुलीची कारवाई तात्काळ करण्याचे निर्देश तहसिलदार, कुर्ला यांना दिलेले आहेत. त्यानुसार तहसिलदार, कुर्ला यांनी संबंधित विकासक यांना दंडाची रक्कम भरण्याकरिता अंतिम नोटीस बजावली असुन दंड वसुलीची पुढील कारवाई सुरु आहे.

तसेच विकासकाने अनेक ठिकाणी केलेल्या कामाची गुणवत्ता राखली नसल्याची बाब तांत्रिक असून, सदर बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित आहे. तसेच याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर अथवा त्यांच्या अधिनस्त कार्यालयात अशी कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने कळविलेले आहे.

*****

922.

१९८५

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**ॲड. श्रीजया चव्हाण, श्री. जितेश अंतापुरकर, माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१९८५.**

---

"नांदेड जिल्ह्यातील उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचे कालवे तसेच त्यावरील बांधकामे क्षतिग्रस्त झाल्यामुळे तातडीने त्यांची दुरुस्ती न झाल्यास कालवा निरुपयोगी ठरण्याची शक्यता असणे, याच प्रकल्पांतर्गत पाण्याची तूट भरुन काढण्याच्या उपाययोजनेअंतर्गत उपसा जलसिंचन योजनाना सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद करण्याची आवश्यकता असणे, सन १९८६ मध्ये सुरु करण्यात आलेल्या मात्र अद्याप 0% उपयुक्त ठरलेल्या लेंडी प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण होणे आवश्यकता असणे, सुमारे ३५ वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या विष्णुपुरी प्रकल्पांतर्गत पंप तसेच उद्धरण नलीका नादुरुस्त झाल्या असल्याने त्यांची उपयुक्तता निम्मी होणे, अधिक क्षेत्र ओलीताखाली आणण्यासाठी सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाच्या सुधारीत प्रकल्प अहवालानुसार फेर नियोजनास अद्याप मान्यता न-मिळणे परिणामी दुष्काळग्रस्त मराठवाडयातील पाण्याची समस्या अधीक गंभीर होत असल्याने सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

### मा.मंत्री (जलसंपदा)(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापुर उजवा कालवा १४० कि.मी. व इसापुर डावा कालवा कि.मी. ८४ चा आहे. प्रकल्पाच्या इसापुर धरणाच्या उजवा कालवा व डावा कालव्याची कामे १९७८ ते १९८६ च्या दरम्यान झालेली असुन कालवा बांधकामास जवळपास ३५ ते ४० वर्ष पुर्ण झालेली आहेत. उजवा कालव्याची संकल्पीत वहन क्षमता ६५.८५ क्युमेक्स असुन कालवा क्षतिग्रस्त असल्यामुळे प्रत्यक्षात कालव्याची वहन क्षमता ३४ क्युमेक्स झाली आहे. तसेच इसापुर डावा कालव्याची संकल्पीत वहन क्षमता १३.०२ क्युमेक्स असुन कालवा क्षतिग्रस्त असल्यामुळे प्रत्यक्षात कालव्याची वहन क्षमता ९.० क्युमेक्स पर्यंत कमी झाली आहे.

सदर दुरुस्ती अनुषंगाने महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम (MIIP) टप्पा-१ अंतर्गत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या कालव्याच्या पुनर्स्थापनेसाठी रु. ३२५ कोटी किंमतीची मंजुरी असुन त्यानुषंगाने इसापुर उजवा कालवा कि.मी. १ ते २४ च्या दुरुस्ती कामासाठीची निविदा मान्यतेची प्रक्रीया अंतिम टप्प्यात आहे.

मूळ नियोजनात इसापूर धरण व सापळी धरण या दोन धरणांचा समावेश होता. यामध्ये इसापूर व सापळी धरणाचा एकुण प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा अनुक्रमे ९६४ दलघमी व १९९ दलघमी एवढा होता. सापळी धरणाच्या भुसंपादनास व पुनर्वसनास असलेल्या विरोधामुळे प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकले नाही.

कयाधु नदीवर खरबी उ.पा.बंधारा (२ द.ल.घ.मी.) व वळण योजनेद्वारे प्रवाही पद्धतीने बोगद्यामधुन १००.४६ द.ल.घ.मी. पाणी इसापूर धरणात वळविण्याचे कामाची निविदा प्रक्रिया करुन कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असुन काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत ९७ दलघमी पाणी गोजेगाव उच्च पातळी बंधारा येथुन उपसा पद्धतीने इसापुर धरणात टाकणे प्रस्तावीत आहे. अशाप्रकारे सापळी धरणाची १९९ दलघमी तुट भरुन निघणार आहे.

तसेच इसापुर धरणाची ५८२ दलघमी तुट भरुन काढण्यासाठी पेनगंगा नदीवरील पुर्ण झालेल्या दिगडी उच्च पातळी बंधाऱ्यावर ५८२ दलघमी पाणी अंशतः उपसा व अंशतः प्रवाही पद्धतीने इसापुर धरणात वळविणे प्रस्तावीत असून निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

लेंडी नदीवर मौजे गोणेगाव ता. मुखेड जि. नांदेड येथे लेंडी प्रधान प्रकल्प या आंतरराज्यीय प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. प्रकल्पाच्या कामाला १९८४ मध्ये सुरुवात झाली. प्रकल्पाची अद्यावत किंमत रु.२१८३.८८ कोटी आहे. प्रकल्पावर मार्च २०२५ अखेर रुपये ११६०.७६ कोटी खर्च झालेला आहे. प्रकल्पांतर्गत माती धरणाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. तसेच सांडव्याचे काम ८० टक्के पूर्ण झालेले आहे. मुख्य कालवा कामे ८० टक्के पूर्ण झाली आहेत. दिनांक ०६/०४/२०११ पासून प्रकल्पग्रस्तांनी "आधी पुनर्वसन मग धरण" या धोरणानुसार प्रकल्पाचे काम बंद पाडले होते. पहिल्या टप्प्यातील ७ गावांचे पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधा कामे पूर्ण झाले असुन भुखंडांचे वाटप प्रकल्पग्रस्तांना करण्यात आले आहे. एकूण २८४३ कुटुंबापैकी ५०० कुटुबांचे स्थानांतरण बाकी आहे. सर्व पुनर्वसित गावठाणात तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था शेड उभारुन करण्यात आली आहे. याअनुषंगाने प्रकल्पाचे काम पुनःश्च सुरु करण्यात आले असुन घळभरणीचे काम ९० टक्के पूर्ण करण्यात आलेले आहे. प्रकल्पाचा एकुण पाणीसाठा १४५.१५ दलघमी असून यावर्षी प्रकल्पात २६.८३ दलघमी पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन आहे. उर्वरीत पाणीसाठा ११८.३२ दलघमी जून २०२६ अखेर निर्माण करण्याचे नियोजन आहे.

शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प हा गोदावरी नदीवर नांदेड शहरापासुन ८ कि. मी. अंतरावर सन १९८७-८८ मध्ये बांधण्यात आला आहे. प्रकल्पाची साठवण क्षमता ८३.५५ द.ल.घमी. असुन प्रकल्पाचे लाभक्षेत्र २८३४० हे.आहे. प्रकल्पासाठी पंपग्रहात ८५० अश्वशक्तीचे १४ पंप बसविण्यात आलेले आहेत. योजने अंतर्गत ३ उध्दरण नलिका बसविण्यात आल्या असुन त्यांची लांबी ३८७० मी.आहे. सदर प्रकल्प ३५ वर्षापासुन कार्यान्वीत आहे. योजने करिता असलेले पंप व उद्धरण नलिका यांचे आयुष्यमान संपलेले असल्यामुळे उद्धरण नलिका व पंपाची मोठ्या प्रमाणात झीज झालेली आहे. त्यामुळे वारंवार पंप बंद

पडणे उद्धरण नलिका फुटणे व सततची दुरुस्ती कामे उद्भवणे हे प्रकार घडतात पंपाची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे व उद्धरण नलिकेतील गळतीमुळे अपेक्षित विसर्ग मिळत नाही, त्यामुळे सिंचनास अडचणी निर्माण होत आहेत. बंधाऱ्याची उपयुक्तता कायम ठेवण्यासाठी व सिंचन क्षेत्रास पूर्वी प्रमाणे लाभ मिळण्यासाठी उद्धरण नलिका व पंप नव्याने बसविण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता दिनांक २९/७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्राप्त असून सदर कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

पैनगंगा नदीवर मौ. कौठा तांडा, ता. हिमायतनगर, जि. नांदेड येथे सहस्रकुंड प्रकल्प प्रस्तावित आहे. मूळ आराखड्यानुसार पैनगंगा नदीवर मौ. कौठा तांडा, ता. हिमायतनगर, जि. नांदेड येथे मुख्य धरण व मौ. निंगणूर, ता. उमरखेड, जि. यवतमाळ येथे संपुट धरण बांधणे प्रस्तावित होते. मूळ प्रस्तावानुसार मुख्य धरण २२७.३९ दलघमी, संपुट धरण-२६.७२ दलघमी, एकूण पाणीसाठा २५८.१० दलघमी, सिंचन क्षमता-९५०० हे. व भूसंपादन-६२७७ हे. व बाधीत गावे १४ असून सदर प्रकल्प आराखड्यास गोदावरी महामंडळ कार्यालयाचे पत्र दि. २०.०७.२००९ अन्वये रु.५८३ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

दि. ११.०१.२०११ व दि.१२.०१.२०११ रोजी महागाव, जि. यवतमाळ व हिमायातनगर, जि. नांदेड येथे पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात आली. त्यात बुडीत क्षेत्राचे जास्त प्रमाणामुळे बाधित गावातील ग्रामस्थांचा तीव्र विरोध झाला. सुधारीत प्रस्तावानुसार प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा २५४.१३ दलघमी असुन यामध्ये मुख्य धरण ३३.६४ दलघमी व संपुट धरण २२०.४९ दलघमी चे आहे. सिंचन क्षमता - यवतमाळ जिल्हा १२२५९ हे. व नांदेड जिल्हा १९३४५ हे. असे एकूण ३१६०४ हे. एकूण भूसंपादन २३५५ हे.व ४ गांवे बाधित होत आहेत. दोन विद्युतगृहाऐवजी निंगणूर येथील संपुट धरणावरील एकाच विद्युतगृहाद्वारे २० MW जलविद्युत निर्मिती प्रस्तावित आहे. सदर बदलांच्या सुधारीत आराखड्यास शासनाने पत्र दि. ३०/११/२०१८ अन्वये तत्वतः मंजूरी दिली आहे. सुधारीत प्रस्तावातील घटक कामांचे सर्वसाधारण आराखड्यास सक्षम स्तरावरुन मंजूऱ्या घेण्यात आलेल्या आहेत. तसेच जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांनी दि. २०/१०/२०२३ अन्वये २०५.६१ दलघमी (७५% विश्वासार्हता) पाणी उपलब्धतेस मंजूरी प्रदान केली आहे.

सुधारीत आराखड्यानुसार सहस्रकुंड प्रकल्पाचा रु.७०७४.३६ कोटी किंमतीचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे दि.१६.०६.२०२५ अन्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) नाशिक यांना मंजूरीस्तव सादर करण्यात आलेला आहे. SLTAC नाशिक येथे २५.०६.२०२५ रोजी झालेल्या २३४ व्या बैठकीत प्रकल्पाच्या आराखड्याबाबत प्राथमिक चर्चा करण्यात आली. सुप्रमा प्रस्ताव SLTAC नाशिक यांनी अंतिम करुन शासनास सादर केल्यानंतर MWRRA यांची सहमती प्राप्त झाल्यानंतर सुप्रमा प्रस्तावास मान्यता देणेबाबतची कार्यवाही करुन प्रकल्पाचे काम सुरु करण्याचे नियोजन आहे.

*******************

लक्षवेधी सूचना क्रमांक २३६२.

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये

**श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जलसंपदा विभागाकडून शेतकऱ्यांच्या उपसा जलसिंचन योजनेला हवेली तालुक्यातील (जि. पुणे) नदी तीरावरील हिंगणागाव, खामगाव टेक, टिळेकरवाडी, भवरापूर, अष्टापूर, शिंदेवाडी, शिरसवाडी, बिवरी, वाडेबोल्हाई, कोरेगावमुळ, पेठनायगाव, थेऊर, मांजरी ब्रु., मांजरी खुर्द, प्रयागधाम, कोळवडी साष्टे, केसनंद, आव्हाडवाडी या गावातील ग्रामपंचायतींना जलमापक यंत्र बसविण्याबाबत लेखी सुचना झालेली असणे, जलसंपदा विभागाने पुणे महानगरपालिकेला मोबदला घेऊन पाणी पुरविणे, ज्या पाण्यावर पाणीपट्टी मोबदला घेतला तेच दुषित केमिकलयुक्त टाकाऊ घाणपाणी ड्रेनेजमधून नदीत सोडणे, त्याच रसायन मिश्रित घाण पाण्यावर पुन्हा जलमापक यंत्र लावून दुसऱ्यांदा शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी आकारण्यात येणे, सदरील केमिकलयुक्त पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापिकी होऊन शेती उद्योग धोक्यात आला असणे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मुळा-मुठा नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासून अहवाल सादर केला असता ही नदी प्रदुषणाच्या विळख्यात सापडली असल्याचे व गटारगंगा झाल्याचे अहवालात नमूद केलेले असणे, याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय न घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व चिडीची भावना, यावर शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया"

---

मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन.

खडकवासला प्रकल्पाचे लाभक्षेत्रात हिंगणागाव, खामगाव टेक, भवरापूर, अष्टापूर, शिंदेवाडी, शिरसवाडी, बिवरी, वाडेबोल्हाई, पेठनायगाव, थेऊर, कोळवडी साष्टे, केसनंद, आव्हाडवाडी ही गावे येत असून सदर गावातील लाभधारक शेतकऱ्यांना खडकवासला प्रकल्पातून पाणी उपसा परवाने देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांनी राज्यातील कृषी सिंचन, घरगुती व औद्योगिक वापरासाठी ठोक जलदर आदेश दि. २९.०३.२०२२ रोजी निर्गमित केलेले आहे. सदर आदेशामध्ये "खाजगी उपसा सिंचन योजनेच्या लाभार्थ्यांनी स्वखर्चाने स्रोतांच्या जागी बंदिस्त वितरण नलिकेवर जलमापक यंत्र बसवावीत. संक्रमण कालावधीत जलमापक यंत्र बसवेपर्यंत खाजगी / वैयक्तिक उपसा सिंचन धारकांची आकारणी क्षेत्राधारित करावी. मात्र ही सवलत या आदेशाच्या दिनांकापासून केवळ १ वर्षासाठी अनुज्ञेय राहील. यानंतर प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय दराच्या २ पट दराने आकारणी करण्यात यावी" अशी तरतूद आहे. त्यानुसार उपसा सिंचन योजनांच्या लाभधारक शेतकऱ्यांना जलमापक यंत्र बसविणे बंधनकारक आहे. तथापि, प्राधिकरणाने दि.०२.०२.२०२४ रोजीच्या सुधारणा आदेशान्वये, जलमापक यंत्र बसवेपर्यंत खाजगी / वैयक्तिक उपसा सिंचन धारकांची आकारणी क्षेत्राधारित करण्याबाबत देण्यात आलेली १ वर्षासाठीची सवलत या दि.३०.०६.२०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच शासन पत्र, दि.२६.०६.२०२४ अन्वये खाजगी उपसा सिंचन योजनांकरीता प्रवाही सिंचनासाठी क्षेत्राधारित अनुज्ञेय दरानुसार आकारण्यास सद्य:स्थितीत स्थगिती देण्यात आली आहे. सन २०२५-२०२८ या कालावधीसाठी ठोक जलदर निर्धारणाची कार्यवाही सुरु असल्याने, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दि.२४.०६.२०२५ च्या आदेशान्वये ठोक जलदरास दि.३१.१२.२०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

(शेरा) टचक्र ९२८ - १ (७००-१२-२०२५)

२. हवेली तालुक्यातील टिळेकरवाडी, कोरेगाव मुळ या ग्रामपंचायतींना जलजीवन मिशन अंतर्गत कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग यांच्या दि.३०.०१.२०२५ व दि.२१.०६.२०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. तसेच मांजरी बु, मांजरी खु, प्रयागधाम या ग्रामपंचायतींना नळ पाणीपुरवठा योजनांतर्गत शासन पत्र, दि.०१.०९.२०१४ व दि.६.४.२०२२ च्या शासन निर्णयान्वये बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजुर करण्यात आलेले आहे. सदर बिगर सिंचन पाणी आरक्षणाच्या आदेशानुसार, या ग्रामपंचायतींना जलमापक यंत्र बसविणेबाबत लेखी सुचना देण्यात आलेली आहे.

३. पुणे महानगरपालिकेस पुणे शहरासाठी ११.६१ टीएमसी इतका पाणीकोटा ६.५० टीएमसी सांडपाणी प्रक्रिया करुन सिंचनासाठी कालव्यामध्ये उपलब्ध करुन देणे या अटींवर मंजूर करण्यात आलेला. आहे. परंतू प्रत्यक्षात पुणे महानगरपालिकेमार्फत मंजुरीपेक्षा अधिक म्हणजेच २२ टीएमसी एवढा पाणी वापर होत आहे. तसेच पुणे महानगरपालिकेद्वारे सांडपाण्यावर पुर्णत: प्रक्रिया न केलेले पाणी नदीत सोडण्यामुळे नदीमधील पाणी प्रदुषित होत आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मुळा-मुठा नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासून सन २०२४-२५ चा प्रकाशित केलेल्या अहवालामध्ये नदीचे पाणी दुषित झाल्याचे आढळून आले आहे. आहे.

४. पुणे महानगरपालिका यांना सांडपाण्यावर पुर्णत: प्रक्रिया करुन तद्नंतरच नदीत सोडण्याबाबत वारंवार लेखी पत्रांद्वारे कळविण्यात येते. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे ठोक जलदर आदेश दि.२९.०३.२०२२ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणिमानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) स्थापित केलेला नसल्यास अथवा तो पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल", असे नमुद आहे. त्यानुषंगाने क्षेत्रीय स्तरावर प्रदुषण दंड आकारण्यात येतो. शेतकऱ्यांकडून दुसऱ्यांदा पाणीपट्टी आकारली जात नसून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे ठोक जलदर आदेश दि.२९.०३.२०२२ अन्वये निर्गमित केलेल्या ठोक जलदर निर्धारण आदेशानुसार आकारणी करण्यात येते.

५. पुणे शहरात निर्माण होणाऱ्या मैला पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ४७७ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन क्षमतेची एकूण ०९ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेली आहेत. पुणे महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीत जायका प्रकल्पांतर्गत विविध ठिकाणी ३९६ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन क्षमतेची एकूण ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पीय कामे मार्च, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच हडपसर रामटेकडी औद्योगिक वसाहत येथे १० एमएलडी क्षमतेची मैलापाणी शुद्धीकरण केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर असून सदर योजना सन २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये सन २०१७ मध्ये नव्याने समाविष्ट ११ गावांसाठी मलनि:सारण व्यवस्थेचा मास्टरप्लान तयार करण्यात आला आहे. यामध्ये १२ एमएलडी मैला पाणी शुद्धीकरण केंद्रे बांधण्यात येणार आहे. तसेच नव्याने समाविष्ट २३ गावांकरिता सन २०५४ ची वाढीव लोकसंख्या विचारात घेऊन मलनि:सारणासाठी आवश्यक असलेल्या मलवाहिन्या डिझाईन करून व आवश्यकतेनुसार एम.टी.पी. यंत्रणा उभारण्याकरिता (डी.पी.आय.) तयार करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पात २०१.५० एम.एल.डी. क्षमतेचे एकूण ०८ मैलापाणी शुद्धीकरण केंद्र प्रस्तावित आहे. सदर सर्व प्रकल्पीय योजना कार्यान्वित झाल्यानंतर मुळा-मुठा नदीचे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे.

**********

२२८

लक्षवेधी सूचना क्र. १५००

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.शिवाजी पाटील वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१५०० पुढीलप्रमाणे आहे:-

"ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या वीज बिलाचा प्रश्न गंभीर असल्याचे माहे एप्रिल २०२५ च्या सुमारास निदर्शनास येणे, वीज बिले आकारताना MSEB रेसिडेन्सीअल, कमर्शियल व पब्लिक सर्व्हिस अशा प्रकारात विभागणी करीत असणे. यापूर्वी जिल्हा परिषद शाळांचा समावेश रेसिडेन्सीअल कॅटेगीरीत असणे, त्यामुळे शाळांना महिन्याला विजेचा स्थिर आकार १२० रुपयांपर्यंत येते असणे. अलीकडेच जिल्हा परिषद शाळांच्या समावेश पब्लिक सर्व्हिस या वीज बिल कॅटेगीरीत केल्याने शाळांचा महिन्याला वीजबिल स्थिर आकार ४६० रुपये पेक्षा अधिक झाला असणे. १ ते ३० विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना दरवर्षी १०,०००/- (दहा हजार) रुपये संयुक्त शाळा अनुदान दिले जात असणे, त्यामधील ७५००/- (सात हजार पाचशे) रुपये पेक्षा अधिक रक्कम वीज बिलांवर खर्च होत असणे. यावर शासनाने करावयाची ठोस उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांसाठी भौतिक, शैक्षणिक सुविधा व दैनंदिन उपयोगाचे साहित्य उपलब्ध करण्यासाठी मागील वर्षाच्या वेतन खर्चाच्या ४ टक्के पर्यंत सादिलवार खर्च करण्यात येतो.

तसेच, समग्र शिक्षा अंतर्गत संयुक्त शाळा अनुदानातून इ. १ ली ते ८ वी चा वर्ग असणाऱ्या तसेच इ. ९ वी ते १२ वी चा वर्ग असणाऱ्या शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक तसेच माध्यमिक शाळांना पटसंख्येच्या निकषानुसार उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या अनुदानातून शाळेचे वीज बील भरण्याकरीता खर्च करण्यात येतो.

शासन निर्णय, दिनांक ४.६.२०२० अन्वये, सादील अनुदानातून खर्च करावयाच्या अनुज्ञेय बाबीमध्ये सुधारणा करण्यात आली असून, त्यानुसार स्थनिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे वीज बील इतर निधीतून भरले नसल्यास ( रु.१०००/- प्रति शाळा प्रति महिना या मर्यादेत ) त्याकरीता खर्च भागविण्यासाठी सादील अनुदानातून रक्कम अदा करण्यात येते.

जिल्हा परिषद शाळांची वीज भरण्याबाबतची प्रक्रिया व धोरण शालेय शिक्षण विभाग व उर्जा विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पार पाडले जाते.

वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांची वर्गवारी निश्चित करण्याचे अधिकार देखील वीज नियामक आयोगास प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसारच महावितरण कंपनीकडून वर्गवारी निहाय वीज दराची आकारणी करण्यात येते.

सद्यस्थितीत, वीज नियामक आयोगाच्या दिनांक २५.०६.२०२५ च्या आदेशानुसार, जिल्हा परिषद शाळांना सार्वजनिक सेवा ( शासकीय ) याच वर्गवारीतील दराने वीज आकारणी करण्यास मंजूर देण्यात आली आहे.

तथापि, विद्युत अधिनियम-२००३ मधील कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहक अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदानीत वीजदर लागू करण्याचे अधिकार शासनास असून, शासनाने अनुदानित वीज दर ठरविल्यानंतर महावितरणतर्फे वीज दर आकारणी करण्यात येते.

*****

लक्षवेधी सूचना क्रमांक-१७६७

महाराष्ट्र विधानसभा

जुलै, २०२५ चे पावसाळी अधिवेशन

श्री.रवी राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे. :-

" विद्यमान महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन सिमिती अमरावती यांना त्यांचे दिनांक, १०.०३.२०२५ रोजीचे पत्राव्दारे अमरावती जिल्हातील ब वर्ग व क वर्ग तिर्थक्षेत्र परिसरात सौर ऊजा लाईट बसविण्याकरिता जिल्हा वार्षिक योजनांचा निधी मंजूर झाला असणे, परंतु अद्याप पर्यंत अमरावती जिल्ह्यातील सामदा काशीपूर व सामन रामापूर ता. दर्यापूर येथे प्रस्तावित काम मेडा या यंत्रणा कडून हे काम सुरु केले नसणे. सदर काम पावसाळा सुरु असल्याने नागरिकांना त्याचा फायदा व्हावा या साठी वरील लाईट बसविणे चे काम सुरु करणे आवश्यक असणे. या साठी वरील लाईट बसविणे चे काम सुरु करणे आवश्यक असणे. या साठी शासनस्तरावरुन निर्देश देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची या संबंधाने प्रतिक्रिया."

---

श्री. अतुल सावे, मा.मंत्री (अपारंपारिक ऊर्जा) यांचे निवेदन

जिल्हा नियोजन समिती, अमरावती जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील श्री. सुर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान "ब" वर्ग तिर्थक्षेत्र सामदा (काशीपूर) व श्री. भोगेश्वर महाराज संस्थान क वर्ग तिर्थक्षेत्र सासन, रामापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील परिसरामध्ये एकूण ०४ नग सौर आधारित एल.ई.डी. हायमास्ट (०९ मिटर) आस्थापित व कार्यान्वित करण्याकरीता मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांच्याव्दारे एकूण रक्कम रु.१७,०५,९००/- (अक्षरी रुपये सतरा लक्ष पाच हजार नऊशे फक्त) एवढ्या निधी करीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

या अनुषंगाने महाऊर्जा विभागीय कार्यालय, अमरावती यांचेकडून ई-निविदा प्रकाशित करुन ई-निविदेतील प्राप्त न्युनतम किंमतीच्या आधारे मे. श्री. अशोका सोलर ॲन्ड एनर्जी प्रा. लि., नागपूर यांना या कार्यादेश वितरीत करण्यात आला. यास अनुसरुन में, श्री. अशोका सोलर ॲन्ड एनर्जी प्रा. लि., नागपूर यांनी अमरावती जिल्ह्यातील श्री. सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान "ब" वर्ग तिर्थक्षेत्र सामदा (काशीपूर) येथे ०२ नग व श्री. भोगेश्वर महाराज संस्थान "क" वर्ग तिर्थक्षेत्र सासन, रामापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे ०२ नग असे एकूण ०४ नग सौर आधारित एल.ई.डी. हायमास्ट (०९ मिटर) दि.२२.०८.२०२५ रोजी आस्थापित व कार्यान्वित केले आहे. सद्यःस्थितीत एकूण ०४ ही नग सौर आधारित एल.ई.डी. हायमास्ट सुस्थितीत कार्यान्वित आहेत.

*****************************************

२७६.

१४१७

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन**
**लक्षवेधी सूचना क्रमांक १४१७**

मा. श्री हिरामण खोसकर, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४१७ पुढीलप्रमाणे आहे :-

" त्र्यंबकेश्वर मतदार संघातील (जि. नाशिक) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत शासनाच्या देखभाल विशेष दुरुस्ती अंतर्गत मंजूर असलेल्या १. नाशिक त्र्यंबक रस्त्यावरील दुरस्ती करणे व २. तुपादेवी तळवाडे रोहिले रस्ता रामा-२९ विशेष दुरुस्तीकरणे याकरिता निधी मंजूर करुन वितरित करण्यात येऊनही अद्यापही सदर रस्त्यांची कामे पूर्ण न होणे, कामे पूर्ण होण्याआधीच कंत्राटदाराला देयके देण्यात येणे, सदर रस्त्यांची कामे अपूर्ण असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि. २५.६.२०२५ रोजीच्या सुमारास लेखी निवेदन देऊनही अद्यापही कोणतीच चौकशी वा कारवाई न करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, शासनाची फसवूणक केल्याप्रकरणी दोषी कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## मा. मंत्री (सा.बां.) (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

त्र्यंबकेश्वर मतदार संघातील (जि. नाशिक) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत शासनाच्या देखभाल विशेष दुरुस्ती अंतर्गत मंजूर असलेल्या १) डहाणु-जव्हार-त्र्यंबकेश्वर-नाशिक रस्ता रामा - ३० किमी १२३/५०० ते १२९/०० ची (उजवी बाजु) सुधारण करणे ता.त्र्यंबकेश्वर, सदर कामांतर्गत उजव्या बाजुस डांबरीपृष्ठभागाचे खड्डे भरुन त्यावर ९.०० मी रुंदीसाठी बी.एम. करुन त्यावर बी.सी. करण्याचे काम करण्यात आले आहे.

२) तुपादेवी - तळवाडे- रोहिले रस्ता रामा-२९ किमी २४/५०० ते ३५/०० रस्त्याची सुधारणा करणे ता. त्र्यंबकेश्वर जि.नाशिक, सदर कामांतर्गत किमी २८/५०० ते २९/३०० लांबीत ५.५० मी रुंदीसाठी ७५ मी.मी जाडीचा एम.पी.एम करून त्यावर बीएम व बी.सी करण्यात आला आहे. तसेच रस्त्यावरील किमी ३३/७०० ते ३४/८०० दरम्यान ५.५० मी रुंदीसाठी ५० मी.मी जाडीचा एम.पी.एम करुन त्यावर बीएम व बीसी करणे प्रगतीत आहे. ठेकेदाराने सदर काम करीत असतांना दिरंगाई केली असल्याने त्याबाबत विभागामार्फत पाठपुरावा करण्यात आला असुन पावसामुळे काही लांबीत राहिलेले काम लवकरच पुर्ण करुन घेण्याचे नियोजन आहे.

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र. ९३०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९३० पुढीलप्रमाणे आहे.-

"बीड (जि.बीड) येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक स्वप्नील माने व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गणेश विघ्ने यांनी तेथील नागरिकांना व वाहन धारकांना वेठीस धरुन केलेला प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार, हे दोन्ही अधिकारी गेल्या चार ते पाच वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत असुन वाहन धारक चालक-मालक संघटना व एजन्सी मालकांना वेठीस धरुन आर्थिक व्यवहार झाल्याशिवाय त्यांची कामे करीत नसणे, तसेच दिव्यांगाला वाहन चालवण्याचा परवाना देणे, वाहन मालक मयत असताना सदरील वाहन आर्थिक देवाण घेवाण करुन दुसऱ्याच्या नावावर करणे, हफ्तेखोरी करणे, भ्रष्टाचार करणे व अपसंपदा या संदर्भातील तक्रारी तेथील नागरिकांनी वारंवार करुन सुध्दा त्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात येत असणे, श्री.विघ्ने यांच्या विरुध्द दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी एफ.आय.आर नोंदविण्यात आलेला असणे, तर श्री.माने यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक शाखा यांच्याकडुन कार्यवाही करण्यात आलेली असणे, या दोन्ही अधिकाऱ्यांची बीड कार्यालयात नियमोचीत बदली झालेली असुन सुध्दा ते अद्यापपर्यंत कार्यमुक्त न होणे, या दोघांविरुध्द तातडीने चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२/०५/२०२५ रोजी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे केलेली असणे, या अधिकाऱ्यांविरुध्द त्वरीत कडक कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही उपाययोजना."

---

### मा.मंत्री (परिवहन) यांचे निवेदन

श्री. स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी हे दिनांक १०.०१.२०२२ पासून उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. श्री. गणेश विघ्ने हे मोटार वाहन निरीक्षक पदावर दि.२३.०६.२०२१ पासून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड येथे कार्यरत आहेत. श्री. माने व श्री. विघ्ने यांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड येथे नागरिकांना व वाहनधारकांना वेठीस धरून भ्रष्टाचार तसेच वाहनधारक चालक मालक संघटनांना व एजन्सी मालकांना वेठीस धरून आर्थिक व्यवहार केल्याप्रकरणी कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

दिव्यांगाला वाहन चालवण्याचा परवाना देणे, वाहन मालक मयत असताना सदरील वाहन आर्थिक देवाण घेवाण करून दुसऱ्याच्या नावावर करणे याबाबत मा.श्री. संदीप क्षीरसागर, वि.स.स.

यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली होती. सदर समितीने चौकशीमध्ये वरील तक्रारीतील मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यामध्ये तथ्य आढळून आले नाही.

श्री स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी हे प्रादेशिक परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असताना त्यांचेवर दिनांक १३.०७.२०२१ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम १२ व ७ नुसार एफआयआर (क्र. ०२०६) नोंदविण्यात आला असून त्याबाबत त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. परंतु सदर एफआयआर (क्र. ०२०६) हा त्यांचे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड येथील कार्यकाळामधील नाही. तसेच, श्री. गणेश विघ्ने, मोटार वाहन निरीक्षक यांचेविरुध्द कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

श्री. गणेश विघ्ने, मोटार वाहन निरीक्षक यांच्या बदली आदेशाच्या अनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी मुळ अर्ज क्रमांक ५२६/२०२५ मध्ये दिनांक २१.०५.२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. तसेच दिनांक १०.१०.२०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री. स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामिण) येथे बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे. तथापि, श्री. माने यांच्याकडे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे प्रशासकीय कामकाजाची निकड व कार्यालयीन कामकाज सुरळीत चालावे याकरिता तसेच नवनिर्मित उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वैजापूर कार्यान्वित करण्याची जबाबदारी श्री. माने यांचेवर सोपविण्यात आली असल्यामुळे श्री.स्वप्नील माने, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात आले नव्हते. तथापि, परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक ०९.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना बदलीच्या कार्यालयात रुजू होण्यासाठी दिनांक ०९.१०.२०२५ (म. नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे.

*****

गृह (परिवहन) विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१७६०

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री.रावी राणा, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७६० खालीलप्रमाणे आहे.:-**

**"विद्यमान परिवहन मंत्री महाराष्ट्र राज्य यांना वी.स.स. लोकप्रतिनिधी यांनी मध्यवर्ती टपाल कक्ष मंत्रालय द्वारे अनु.क्र.८३३३३११ दि.१४/०५/२५ रोजी पत्र सादर करून पत्रात अमरावती जिल्ह्यातील एस. टी. कर्माचारी यांचे मागण्या परिवहन विभागाच्या मान्यकरण्यासंबंधाने मागणी असणे.सोबतच विद्यमान महसूल मंत्री यांनीही वरील लोकप्रतिनिधी त्यांचे पत्रातील मागण्या शासनाकडून मान्य करण्यात यावे या संबंधाने दि.२४/०४/२५ रोजी चे पत्राद्वारे विद्यमान परिवहन मंत्री यांना पत्र पाठवून जिल्ह्यातील मागण्या मान्य करण्यास संबंधाने निर्णय घेणेसाठी शिफारस केली असणे.अद्यापर्यंत परिवहनविभागाकडून दोन्ही निवेदनातील मागण्या मान्य केल्या नसणे. यावर शासनाने घ्यावायाचा निर्णय करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."**

## निवेदन

**{श्री.प्रताप सरनाईक,मा.मंत्री (परिवहन)}**

मा.वि.स.स यांनी दिलेल्या पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने,नमुद करण्यात येते की, रा.प. महामंडळातील प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते इत्यादी त्यांच्या मुळ रा.प. विभागामार्फत अदा करण्यात येते व सदरचे वेतन, भत्ते संबंधित कर्मचाऱ्याच्या बँक खात्यावर जमा होते.

रा.प.महामंडळाच्या दि.२१.०३.२०२४ रोजीच्या सुचनेनुसार प्रादेशिक परिवहन विभाग येथे प्रतिनियुक्तीबाबतची सुचना प्रसारीत करण्यात आल्या, त्यानुसार बुलढाणा विभागाकडुन प्रतिनियुक्तीकरिता इच्छुक ८७ कनिष्ठतम चालकांची यादी प्राप्त झाली. सदर यादीमध्ये श्री.सचिन सनगाळे यांचा ५६ वा क्रमांक आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा करिता एकूण ११ चालकांची आवश्यकता असल्याने ११ चालकांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे. तसेच अकोला येथे ७ चालकांची आवश्यकता असल्याने तेथे ७ चालक दिले.श्री.सचिन सनगाळे यांचा सेवा कनिष्ठतम यादीमध्ये ५६ वा क्रमांक असल्याने त्यांना नियमानुसार प्रतिनियुक्ती देण्यात आली नाही.

तसेच, प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला येथे एकूण ०७ चालकांची आवश्यकता असल्याने सेवा कनिष्ठतम ०७ चालकांना प्रतिनियुक्ती देण्यात आलेली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने मागणी केल्याप्रमाणे आवश्यक चालक बुलढाणा व अकोला (RTO) यांच्याकडे ज्येष्ठतेनुसार नेमण्यात आलेले आहेत. रा.प.महामंडळाच्या दि.०४.०२.२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार प्रतिनियुक्तीबाबच्या सुचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत.

दिनांक ०३.०३.२०२४ रोजी वाहतूक नियंत्रक पदासाठी घेण्यात आलेल्या खात्याअंतर्गत बढती परीक्षेमध्ये बुलढाणा विभागातील एकूण ३१५ वाहक कर्मचारी वाहतूक नियंत्रक पदाच्या बढती परीक्षेमध्ये

उत्तीर्ण झालेले आहेत. वाहतूक नियंत्रक पदासाठी खात्याअंतर्गत ६९ जागांची मंजूरी आहे. त्यापैकी ५५ कर्मचारी कार्यरत असून, १४ रिक्त जागांवर बढती परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठतेनुसार बढती देण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे. श्री. सुधीरसिंग कालुसिंग राठोड, यांचा उत्तीर्ण कर्मचा-यांच्या यादीत २३४ वा क्रमांक आहे.

श्री.विजय श्रीरामजी बाभूळकर, वाहक, यांनी रा.प. यवतमाळ विभागातून रा.प. अमरावती विभाग येथे विनंती बदली मिळणेबाबत अर्ज केला आहे. सदर बदलीची कार्यवाही ही प्रादेशिक व्यवस्थापक, संनियंत्रण समिती क्र.५ (अमरावती) यांच्या अखत्यारित येते. तथापि, श्री. विजय बाभूळकर हे " विशेष मागास प्रवर्ग " या जात प्रवर्गात मोडत असून, बिंदूनामावलीनुसार रा.प.अमरावती विभाग येथे वाहक पदामध्ये " विशेष मागास प्रवर्ग " या जात प्रवर्गात रिक्त जागा नाहीत, त्यामुळे सद्यस्थितीत त्यांची विनंती बदली करता येणे शक्य नाही.

*****

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

**डॉ. जितेंद्र आव्हाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ५८० पुढीलप्रमाणे आहे :-**

"नागपूरमधील उमरेड एकआयडीसीतील ऍल्युमिनियम कंपनीत दिनांक १२.०४.२०२५ तया सुमारास भिषण स्फोट झाल्याची घटना घडणे, या स्फोटात पाच कामगारांचा होरपळुन झालेला मृत्यू, तर सहा कामगार गंभीर जखमी होणे, सदर कंपनीत मिक्सर युनिटमध्ये झाली असुन पॉलिसिंग ट्यूब (पीटी) बॉक्स असल्याने स्फोट झाल्याचा आरोप कामगारांकडून करण्यात येणे, ज्यावेळी स्फोट झाला त्यावेळी ८७ कामगार कर्तव्यावर असणे, कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने कोणती उपाययोजना नसणे, सदर घटनेबाबत कंपनीविरोधात स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात येणे, या स्फोटात मृत व जखमी झालेल्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, व त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भुमिका."

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

एमएमपी इंडस्ट्रिज लिमिटेड, एमआयडीसी उमरेड, ता. उमरेड, जि. नागपूर या कारखान्यात ॲल्युमिनिअम पावडर व ॲल्युमिनिअम फॉईल चे उत्पादन घेतले जाते. दिनांक ११/०४/२०२५ रोजी कारखान्यात मिक्सींग विभागामध्ये अचानक स्फोट होऊन आग लागली. कारखान्यातील एका ॲल्युमिनियम पावडरच्या मिक्सरवर असलेले दोन्ही एअर फिल्टर कार्ट्रिज व्हॉल्व्ह बंद स्थितीत ठेवण्यात आले होते. त्यामुळे या मिक्सरच्या फीड हॉपरमध्ये बॅक प्रेशर निर्माण झाले व फीड हॉपरच्या तोंडावर ॲल्युमिनियम डस्ट क्लाउड तयार झाला. त्यादरम्यान ड्रममधील ॲल्युमिनियम पावडर फीड हॉपरमध्ये टाकताना अचानक स्पार्क झाला व त्यामुळे ॲल्युमिनियम पावडर डस्ट क्लाउडमध्ये स्फोट होऊन त्या विभागात आग लागली. अपघाताच्या वेळी कारखान्यात एकूण ८७ कामगार कामावर हजर होते.

सदर घटनेमध्ये एकूण ७ कामगारांचा दूदैवी मृत्यु झाला. ५ जखमी कामगारांना उपचारानंतर दवाखान्यातून सोडण्यात आले आहे.

पॉलिशर ट्यूब, मिक्सर सेक्शन आणि पॅकिंग सेक्शनमध्ये काम करणाऱ्या कामगारांना घटनेच्या वेळी संरक्षणात्मक कपडे जसे की एप्रन, नोज मास्क, सेफ्टी गॉगल, इत्यादी संरक्षणात्मक उपकरणे पुरवण्यात आली नव्हती.

कारखाना व्यवस्थापनाकडून मृत कामगारांच्या वारसांना भरपाई व सानुग्रह अनुदान मिळून प्रत्येकी रु.५५ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आली असून जखमी कामगारांना रु.२० लाख आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी रु. ५ लाख आर्थिक देण्यात आली आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत कारखान्याचे भोगवटादार यांच्याविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांच्या न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे. कारखान्यात घडलेल्या अपघाताच्या अनुषंगाने कारखान्याचे महाव्यवस्थापक व सुरक्षा अधिकारी यांचेविरुध्द उमरेड पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारखान्याचे बाह्य सुरक्षा लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे. कारखान्यातील कामगारांची वैद्यकिय तपासणी तसेच प्रेशर प्लान्ट व लिफ्टींग मशिनची तपासणी करण्यात आलेली आहे. तसेच अशा प्रकारच्या अपघाताची पुनरावृत्ती टाळण्याकरिता कारखान्यास सुरक्षेबाबत उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

**********

लक्षवेधी सूचना क्र.२०२

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

श्री. चेतन विठ्ठल तुपे विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२ पुढीलप्रमाणे आहे :-

"शेगांव (जि. बुलढाणा) तालुक्यातील काही गावांत माहे एप्रिल ते जून, २०२५ या तीन महिन्यात मोठ्या प्रमाणात नागरिकांची नखं गळती होत असल्याची समस्या आढळून येणे, यापूर्वी याच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नागरिकांचे केसगळती प्रकरणी भारतीय वैद्यकिय संशोधन परिषदेच्या पथकाने केलेली तपासणी, त्यावर उपाय चालू असतांनाच मागील ३ महिन्यात बोंडगांव-१४, कालवड-१३, कठोरा-१०, मच्छींद्रखेड-७ आणि घुई-२ अशा पाच गावांत एकूण ४६ रुग्णांची नखं गळती झाल्याचे आढळून याबाबत आरोग्य विभागाने तात्काळ सर्व्हेक्षण सुरु केले असतां तज्ञांच्या मते या प्रकारामागे दुषीत पाणी व पर्यावरणीय घटक कारणीभूत असल्याचा संशय, काही भागातील जमिनीत सेलेनियमचे प्रमाण अधिक असून, झिंकच्या प्रमाणात घट झाल्यामुळे केस व नखं गळतीची शक्यता वर्तविण्यात येत असणे, हात व पायांची नखे पोकळ होऊन गळून पडत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत शासनाकडून तपाणी होत असली तरी या भागातील लोकांच्या केसगळतीनंतर नखंगळती सुरु झाल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तात्काळ योग्य ती उपाययोजना करण्याची आवश्यकता व शासनाची भुमिका.."

--------

## मा.श्री.प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

बुलडाणा जिल्हयातील शेगांव तालुक्यातील बोंडगाव, कालवड, कठोरा, मच्छिद्रखेड, घुई, या ५ गावांमध्ये केस गळती व नखं गळतीच्या समस्या असणारे नागरिक आढळुन आले आहेत. सदर गावामध्ये दिनांक ८/१/२०२५ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सह जिल्हा सर्वेक्षण अधिकारी, त्वचारोग तज्ञ, आयडीएसपी टिम, तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकिय अधिकारी यांनी सबंधित गांवाना भेट देवून पाहणी केली असता त्यामध्ये · प्राथमिक आरोग्य केंद्र भोनगांव अंतर्गत १) बोडगांव-१६,कालवड - १३. कठोरा ०७, भोनगांव- ०३ प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा व अंतर्गत हिंगणा वैजिनाथ- ७६. असे एकूण ५१ रुग्ण आढळून आले सदर गांवा मधील पाणी नमुने जैविक /रासायनिक तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. तसेच वरिल नागरिकापैकी २७ नागरिकांची Skin Biopsy Testing साठी अकोला येथील शासकिय वैदयकीय महाविद्यालय येथे पाठविण्यात आले आहे. दिनांक ९/१/२०२५ रोजी शेगांव तालुक्यात सर्वेक्षण केले असता त्यामध्ये प्रगतिपर खालीलप्रमाणे रुग्णसंख्या आढळूण आली. प्राथमिक आरोग्य केंद्र भोनगांव अतर्गत बोंडगांव - १९ कालवड १ कटोरा ७८. भोनगांव-०४, मच्छिंद्रखेड- ०५ प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा

व अतर्गत १)हिंगणा वैजिनाथ- ०६ २) घुई ०८ असे रुग्ण आढळून आले. तसेच दिनांक ०९/०१/२०२५ रोजी साथरोग अधिकारी यांनी सर्व्हेक्षण करून पाहणी केली.

शेगाव जिल्हा बुलढाणा येथील माहे एप्रिल २०२५ ते जुन २०२५ या कालावधीतील नखंगळती व केसगळती रुग्णसंख्या खालीलप्रमाणे.

| अनु क्र. | गावाचे नाव | रुग्णसंख्या | |
|---|---|---|---|
| | | नखंगळती (एप्रिल २०२५ ते जुन २०२५) | केसगळती (जाने २०२५ ते जुन २०२५) |
| १ | बोंडगाव | १० | २९ |
| २ | कालवड | १९ | ३२ |
| ३ | कठोरा | १३ | ३५ |
| ४ | मच्छिंद्रखेड, | ११ | २५ |
| ५ | घुई | ६ | १३ |
| एकुण | | ५९ | १३४ |

प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा व अतर्गत तरोडा कसबा १० प्राथमिक आरोग्य केंद्र जलंब अतर्गत माटरगांव- ०८, पहुरजिरा १२. निंबी- ०५ असे एकुण ११ गावामध्ये एकुण आजपर्यंत १०० रुग्ण आढळून आले. दिनांक १०/०१/२०२५ रोजी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अकोला येथील त्वचारोग तज्ञ व त्यांच्या पथकाने बोंडगांव व हिंगणा येथील रुग्णांची पहानी करून त्यांच्या डोक्याच्या स्किनचे २८ नमुने तपासणीसाठी जतन केले. दिनांक ११/०१/२०२५ रोजी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अकोला यांनी स्किन नमुण्याचा KOH Mount चा अहवाल फंगल इन्फेक्शन नसल्याचे कळविले आहे. तसेच ११ गावांमधील ३३ पाणी नमुणे हेवीमेटल्स व इतर तपासणी साठी पाठवले असता कोणत्याही नमुण्यामध्ये हेविमेटल्स आढळून आले नाही. तथापि १४ पाणी नमुण्यांमध्ये नायट्रेटचे प्रमाण नॉर्मल पेक्षा जास्त आढळूण आले आहे .दिनांक १२/०१/२०२५ रोजी D.M.E.R यांचेकडिल चमू त्वचारोगतज्ञ, शा.वै. म. छ. संभाजीनगर, प्राध्यापक जनऔषध वैद्यक शास्त्रविभाग, शा.वै.म. भंडारा आणि प्राध्यापक, औषधवैद्यक शस्त्रविभाग, शा.वे.म. नांदेड.) यांनी तपासणी करून अहवाल सादर केला आहे. त्यांच्या अहवालानुसार Diffuse Alopecia of Scalp Multifactorial असे निदान केले असुन रुग्णांची संपूर्ण तपासणी होवून वातावरणाची तपासणी तसेच न्युट्रिशनल असेसमेंट व इपिडेमिऑलॉजीकल अभ्यास होणे गरजेचे असल्याचे कळविण्यात आले.

तसेच राज्य सार्वजनीक आरोग्य प्रयोगशाळा,पुणे येथील उपसंचालक व त्यांचे पथक बोंडगाव येथे दाखल झाले त्यांनी पाण्याचे स्त्रोतांचे अवलोकन केले तसेच पाणी नमुणे तपासणी करीता गोळा केले. दिनांक १५/०१/२०२५ रोजी आयसिएमआरचे ८ सदस्यीय पथक व राज्य सार्वजनीक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथील उपसंचालक व त्यांचे पथक पहूरजिरा येथे दाखल

झाले त्यांनी पाण्याचे स्त्रोतांचे अवलोकन केले तसेच पाणी नमुणे तपासणी करीता गोळा केले. सदर दिवशी पदमश्री डॉ.हिम्मतराव बावस्कर,यांनी मच्छींद्रखेड येथे भेट देऊन रुग्णांची तपासणी केली व नमुणे संकलित केले. दिनांक १८/०१/२०२५ रोजी पासून प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र येथील कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण तथा उपचार करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक, अंतर्गत असलेल्या आयुष विभागातील वैद्यकिय अधिकाऱ्यांचे पथकाद्वारे गावांचे सर्वेक्षण करून रुग्णांवर प्रतिबंधात्मक उपचार करण्यात आले.

KOH Mount , पाणी नमुणे, यांचे काही अहवाल प्राप्त झाले असून त्यामध्ये केस गळतीशी निगडीत कोणताही घटक आढळलेला नाही. पदमश्री डॉ. हिम्मतराव वावस्कर यांनी खासगी लॅबमधुन केलेल्या तपासण्यामध्ये सदर गावातील रुग्णांच्या रक्तांत व केसामध्ये सेलेनियम जास्त प्रमाणात आढळल्यामुळे तसेच झिंकचे प्रमाण कमी झाल्यामुळे रुग्णांचे केस गळत असल्याचे मिडीया रीपोर्टनुसार प्रसारीत करण्यात आलेले आहे. सदर गावामध्ये ८ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत एकुण रुग्ण २४६ तसेच फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत एकुण रुग्ण ४७ व १ मार्च ते ३१ मार्च २०२५ पर्यंत एकुण रुग्ण ४ केसगळतीबाबत आढळून आले. एकुण आजपर्यंत ( शेगाव २८८, नांदूरा ७ व खामगाव २) एकूण २९७ रुग्ण आढळले आहे. शेगाव तालुक्यातील भोनगाव, बोडगाव, कालवड, कठोरा,मच्छिंद्रखेड, घुई, पळसखेड, हिंगणा, गायगाव बु.नागझरी, तरोडा कसबा, पहूरजिरा, जलंब या गावामंध्ये दिनांक १७ एप्रिल २०२५ ते २५ एप्रिल पर्यंत नख गळती चे एकुण ७५ रुग्ण आढळून आले.

सदर रुग्णांचे सर्वेक्षण करुन औषधोपचार करण्यात आले. सदर गावामध्ये मा.सहसंचालक,आरोग्य सेवा पुणे यांनी भेट देऊन पाहणी करून रुग्णांसोबत चर्चा करून नखाचे नमुणे तपासणी पाठविण्यात आले आहे. केस व नख गळती झालेल्या रुग्णांना आयसिएमआर पथकाकडून सुचविल्या नुसार औषधोपचार करण्यात आला असुन केस गळती व नख गळती झालेल्या सर्व रुग्णांना १०० टक्के केस व नख आलेले आहे. आरोग्य विभागामार्फत अहवाल प्राप्त करणे करीता आय.सी.एम.आर. दिल्ली यांना पत्र क्र.२२६९ दिनांक २४/०६/२०२५ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. केस गळती संदर्भात मा.ना. श्रीमती मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १८ जून २०२५ रोजी झालेल्या आढावा सभेचे इतिवृत्तानुसार कार्यक्षेत्रात कार्यवाही करणे करीता तालुका आरोग्य अधिकारी यांना पत्र क्र. २३४८ दिनांक २७/०६/२०२५ नुसार कळविण्यात आले आहे. आरोग्य विभागामार्फत केस व नख गळती झालेल्या गावात नियमित रुग्ण सर्वेक्षण व औषधोपचार करण्यात येत असुन ११ मार्च २०२५ पासुन केस गळती बाबत रुग्ण संख्या निरंक आहे तसेच नखं गळती रुग्ण संख्या २६ एप्रिल २०२५ पासून निरंक आहे

*************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचा-यांचे वेतन दिनांक १ एप्रिल २००५ पासून बायोमेट्रीक व फेसरिडींग हजेरीनुसार अदा करण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिले आहेत मात्र सदर कर्मचारी हे तांत्रिक व क्षेत्री कर्मचारी असून त्यांच्या सेवा ह्या तांडा वस्ती, गावे, वाड्या, पाडे व क्षेत्री कर्मचारी इत्यादी ठिकाणी सतत बदलत असणे, तसेच त्यांचे कामाचे तास निश्चित नसून प्रसंगी तातडीची सेवा द्यावी लागत असल्याने ते २४ तास कार्यरत राहत असणे, आरोग्य विभागात अपु-या मनुष्यबळामुळे अनेक पदे रिक्त असल्याने एकापेक्षा जास्त ठिकाणी या कर्मचा-यांना प्रभाव दिल्याने त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण येत असणे, दुर्गम भागात अनेक ठिकाणी नेटवर्क उपलब्ध नसतानांही हे कर्मचारी रात्रंदिवस सेवा देत असणे, त्यामुळे क्षेत्रिय आरोग्य कर्मचा-यांना बायोमेट्रीक व फेस रिडींग उपस्थितीनुसार वेतन या प्रणालीचा फेरविचार करुन या कर्मचा-यांना पुर्वी प्रमाणेच वेतन आजा करण्याची मागणी या कर्मचाऱ्यांकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री. प्रकाश आबिटकर, मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थामधील उपलब्ध मनुष्यबळाचे प्रभावीपणे व कार्यक्षमरित्या व्यवस्थापन करुन गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा सुविधा सर्वसामान्य लोकांना उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व कार्यालये व आरोग्य संस्थामध्ये बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली प्रभावीपणे राबविण्यासाठी तसेच वेतनाशी संलग्न करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दि.२३ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार सूचना आरोग्य सेवा आयुक्तालया मार्फत अधिनस्त सर्व कार्यालयांना वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

२. सार्वजनिक आरोग्य विभांगातर्गत कार्यरत सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची ऑनलाईन बायोमेट्रीक नोंदणी करण्यात येत नसल्याचे आढळून आल्याने आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांचेमार्फत दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना फेसरिडींग तसेच बायोमेट्रीक हजेरीनुसार वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर पत्राच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी तसेच आरोग्य विभागातील विविध अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संघटनेनी बायोमेट्रीक प्रणाली बाबत योग्य निर्णय घेण्याबाबत निवेदने सादर केलेली आहेत. सदर निवेदनामध्ये आरोग्य संस्थेत कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी /शुश्रुषा संवर्ग/निमवैद्यकीय संवर्गातील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी हे नेमुन दिलेल्या शिफ्ट नुसार कामकाज करीत असतात. तसेच काही अधिकारी/ कर्मचारी यांना संबंधित आरोग्य संस्थेच्या अधिनस्त गावात जावून वैद्यकीय सेवा पुरवाव्या

लागतात. राज्यातील तांडा वस्ती, गावे, वाड्या, पाडे व क्षेत्रीभागात सेवा पुरविण्यात येते, तेथील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना नेटवर्क अभावी बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी नोंदविणे शक्य होत नाही. अशा विविध अडचणींमुळे बायोमेट्रीक व फेसरिडींग प्रणाली बाबत फेरविचार करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

तांडा वस्ती, गावे, वाड्या, पाडे व क्षेत्री नेटवर्क अभावी बायोमेट्रीक व फेसरिडींग प्रणालीद्वारे हजेरी नोंदविण्यात काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या सोडविण्याबाबतच्या सूचना संबंधित सर्व संस्था प्रमुखांना वेळोवेळी सभेमध्ये तसेच व्ही. सी. द्वारे आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांचेमार्फत देण्यात आलेल्या आहेत.

**********

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"माहे एप्रिल २०२५ मध्ये निदर्शनास आल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागात आरोग्य उपकेंद्रातील हजारो अर्धवेळ अंशकालीन स्त्री परिचर काम करत असणे. परिचारिकांच्या बरोबर फिरतीच्या वेळी कार्यक्षेत्रात मदतनिस म्हणून काम करणे, परिचारिकांना मदतकरणे व उपकेंद्राची साफसफाई करणे या त्यांच्या जबाबदाऱ्या असणे. सहाय्यक परिचारिका प्रास्ताविक (एएनएम) यांच्याबरोबर औषधांची किट नेण्या-आणण्याची जबाबदारी पेलून त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर असणे. अर्धवेळ स्त्री परिचारिकांना दि.१ मार्च २०१९ पासून त्यांचे मानधन दरमहा ३०००/- रु. करण्यात आले असणे.या संवर्गाला "अर्धवेळ स्त्री परिचर" असे जे पदनाम दिले गेले असणे, त्या अर्धवेळ काम करत नसणे. तर त्या "पूर्ण वेळ" काम करत असणे,म्हणून त्यांचे पदनाम "स्त्री परिचर" असे करणे आवश्यक असणे, तसेच त्यांना मानधन वाढ करणे आवश्यक असणे. यावर शासनाने करावयाची ठोस उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

## श्री. प्रकाश आबिटकर, मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

राज्यात एकूण १९४० प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत १०७६६ उपकेंद्र कार्यरत आहेत. सदर उपकेंद्रांमध्ये आरोग्य सेवक (पुरुष), सहाय्यक परिचारिका प्रसाविका (एएनएम) व अंशकालीन स्त्री परिचर असा ३ कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर आहे. त्यापैकी आरोग्य सेवक (पुरुष), सहाय्यक परिचारिका प्रसाविका (एएनएम) ही दोन पदे नियमित वेतनश्रेणीची असून त्यावर नियमित कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. अंशकालीन स्त्री परिचर हे पद मानधन तत्वावरील पद असून सदर पदास नियमित वेतनश्रेणी नाही. त्यामुळे मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या अंशकालीन स्त्री परिचरांना शासकीय सेवकांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ देण्यात येत नाहीत. सद्यस्थितीत राज्यात अंशकालीन स्त्री परिचारीकांची संख्या **९६९३** इतकी आहे.

अंशकालीन स्त्री परिचारीकांकडून समुदाय आरोग्य अधिकारी यांना OPD साठी मदत करणे, महिन्यातून किमान पाच वेळेस लसीकरण सत्रासाठी सहाय्यक परिचारिका प्रसाविका (एएनएम / समुदाय आरोग्य अधिकारी यांच्यासोबत मदतनीस म्हणून जाणे, उपकेंद्रावर होत असलेल्या नैसर्गिक प्रसूतींसाठी मदत करणे, तसेच प्रसुती झाल्यावर कपडे धुणे व प्रसुतीगृहाची साफसफाई करणे, उपकेंद्र परिसर स्वच्छ ठेवणे व साफसफाई करणे इ. कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्यात येतात.

शासन निर्णय, वित्त विभाग, दि.०१.०३.२०१९ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार शासनपत्र दि.११.०४.२०१९ अन्वये अंशकालीन स्त्री परिचरांच्या मानधनात रू. १२०० वरून रु. ३००० इतकी वाढ करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील उपकेंद्रातील कार्यरत अंशकालीन स्त्री परिचरांच्या मानधनामध्ये वाढ करणे तसेच अंशकालीन स्त्री परिचर यांचे पदनाम बदलून, "बहुउद्देशिय स्त्री परिचर" करण्याबाबत विविध संघटनांकडून मोठया प्रमाणात मागण्या प्राप्त होत आहेत. अंशकालीन स्त्री परिचारीकांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

**********